# माणूस

जुलै ८५/८ रूपये

## तरुण तरुणी विशेषांक



With Best Compliments
From :

# APTE Amalgamations Ltd.

## Fine Chemicals Division

199, Churchgate Reclmn
Bombay 400 020
Tel. : 221944

Manufacturers of Exporters of :

**Sulphamethoxazole** I. P. / B. P.

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : पंचविसावे

अंक : सहा ते दहा

¤

जुलै १९८५

किंमत : आठ रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०


दूरध्वनी : ४४३४५९

¤

यापुढील ' माणूस ' अंक १० ऑगस्टला प्रसिद्ध होईल.



| | | | |
|---|---|---|---|
| कादबरी | शार्प एज | राजेंद्र बर्वे | ६४ |
| मुलाखत / लेख | रसरशीत तरुणपण खणखणीत आव्हान | मेधा राजहंस | ४१ |
| विशेष लेख | चेहरे बोलतात, डोळे बोलतात | विनय हर्डीकर | १२ |
| | आज वाटतं | विद्या बाळ | २७ |
| | ये हंसता हुआ कारवाँ जिंदगीका | अस्मिता दीक्षित | ५ |
| लेख | मॉडेलिंग...मॉडेलिंग | ललिता बर्वे | ३५ |
| | लहान वय मोठं पद | गिरीष प्रभुणे | १०१ |
| | ' अनुभव ' नावाचा अनुभव | अनुभव | ३९ |
| | ट्रेकिंग... ...ते रोमांचक क्षण | अभय कुलकर्णी | ३१ |
| | मनोगत | शुभदा रानडे | ६० |
| | जनरेशन गॅप | मंगला गोडबोले | ५६ |
| कथा | पाठलाग | विनया खडपेकर | १९ |
| कविता | | हेमंत जोगळेकर, रविंद्र लाखे भारती बिर्जे, नारायण कुलकर्णी – कवठेकर, राजन कल्याणकर | ५३ |
| व्यंगचित्रं | | विजय पराडकर | |
| मुखपृष्ठ | | चारुहास पंडित | |
| मुखपृष्ठावरील छायाचित्रं | | अभय कुलकर्णी / सुदेश सावंत चारुहास पंडित | |
| सजावट | | चंद्रमोहन कुलकर्णी / राभा सुरेश नावडकर / संजय पवार चारुहास पंडित | |



# शिंगं फुटल्यावर....

लहानपण संपायला लागलं की जरा आजूबाजूला बघायची नजर येते. इतके दिवस जग स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेलंच नसतं. ते कोणीतरी बोट धरून दाखवलेलं असतं; पण त्यात काय मजा ? धडपडत–चाचपडत– मन मानेल तिथे–मन मानेल तसं पुढे जाण्यात मजा आहे. एकदा धडपडून मांजरीच्या पिलासारखं उभं रहाता आलं की, स्वतंत्र विचारांची शिंगं कधी फुटतात ते कळतच नाही. असले शिंगांचे प्राणी मग वेगळे दिसायला लागतात. 'जनरेशन गॅप' नावाचं युद्ध, एकेकाळी असलेली शिंगं गळून पडलेले आणि ती नव्यानं उगवलेले यांच्यामधलंच असतं. तरुणपणाचं व्यवच्छेदक लक्षण म्हणजे ही शिंगं. ती डोक्यावर असली की सगळंच कसं सहज–साधं–सुंदर वाटतं. कारण डोळ्यात स्वप्नं असतात, ओठात कविता असतात आणि हातात जादूची कांडी असते. स्वप्नं–कधी साधीसुधी प्रेमाची, कधी क्रांतीची, कविता कधी भावगर्भ, आत्ममग्न वगैरे तर कधी सामाजिक जाणिवेच्या धुमसत्या विद्वेषाची. दोन्हीतला जोम, आवेग, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता सारखीच.

याच वयात डोक्यात मूल्यं, आदर्श, महत्त्वाकांक्षा असतात. 'काहीतरी' करण्याची जिगर असते, अपयशाची भीती नसते, कारण जग आपल्यासाठीच आहे याची खात्री असते.

'माणूस'च्या या विशेषांकात तरुणपणाची ही जादू शब्दात पकडण्याचा प्रयत्न केलाय. सतत नव्याच्या शोधात असलेल्या जाहिरात क्षेत्रातल्या स्पर्धेची–संघर्षाची आणि नव्या व्यावसायिक संस्कृतीची ओळख करून देणारी 'शार्प एज' ही कादंबरी, मराठी प्रकाशन व्यवसायात क्रांती करणाऱ्या विवेक परांजपेची सविस्तर मुलाखत, लहान वयात मोठ्या पदांवर असणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रातल्या कर्तबगार तरुण–तरुणींची ओळख, ही झाली अंकाची ठळक वैशिष्टयं. याशिवाय ट्रेकिंगचे अनुभव, 'अनुभव' नावाचा नवा ग्रुप, मॉडेलिंगचं जग, एका स्वतंत्र व्यावसायिकाचं मनोगत, तरुणपणाचा पोत उलगडून दाखवणारं मुक्त चिंतन, एका संपादकाचे तरुणपणातले अनुभव, यासारखे विचार करायला लावणारे, काहीतरी नवं सांगणारे लेखही आहेत.

कथा, जनरेशन गॅपवरील खुसखुशीत लेख यावरोबरच अंकातली विशेष भर आहे कवितांची. अंकातल्या कविताही विषयाशी नातं सांगणाऱ्या आहेत.

तशीच आहेत अंकातली व्यंगचित्रंही.

अंकासाठी लेखक, चित्रकार यांचं सहकार्य तर मिळालंच; पण 'मोला'चं सहकार्य मिळालं ते जाहिरातदारांचं. त्यांचा विशेष उल्लेख करायला हवा.

आता भेट नेहमीच्या माणूस अंकात...तोपर्यंत तुमच्याकडून प्रतिसाद कळेलच.

□

## महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

**प्रकाशने खालील ठिकाणी उपलब्ध**

१. प्रकाशन व्यवस्थापक,
**शासकीय** लेखन **सामग्री विभाग,**
**चर्नीरोड, मुंबई** ४.

२. व्यवस्थापक,
**शासकीय लेखन सामग्री आणि ग्रंथागार,**
शहागंज, गांधी चौक,
**औरंगाबाद.**

३. व्यवस्थापक,
**शासकीय ग्रंथागार,**
बडवे बिल्डिंग,
पी. वाय. सी. जिमखाना,
**पुणे** ४११ ००४.

४. व्यवस्थापक,
**शासकीय मुद्रण व ग्रंथागार,**
सिव्हिल लाईन्स, **नागपूर.**

With the Compliments
of

# TATA
# ENTERPRISES

आता अधिक आकर्षक वेष्टनात....




**शुभेच्छा !**

**कणाकणाने फुलली माती । मोदभरे जीवन संगीत गाती ।।**

**दर्जेदार पीक व कसदार जमिनीसाठी सर्व तऱ्हेच्या पिकांना इतर खताबरोबर योग्य प्रमाणात पोटॅश पुरवा**

INDIAN
POTASH

पोटॅश खताचे वितरक

**इंडियन पोटॅश लिमिटेड**

६३/६४, मित्तल चेंबर्स, नरीमन पॉईंट
टपाल पेटी क्र. ९९६०, मुंबई ४०० ०२१

# ये हसता हुआ कारवाँ जिंदगी का...

अस्मिता दीक्षित

निरोपा–निरोपीचा आणि फोनाफोनीचा 'टिपिकल' गोंधळ घालत सगळे कशा-तरी वेळा जमवून एकत्र येतो–'ट्रेक' ठरवा-यला ! प्राथमिक फेरीत-झालेल्या गोंधळा-बद्दल एकमेकाला जबाबदार धरणं, बऱ्याच दिवसांनी भेटलेल्यांनी एकमेकांच्या चौकशा करणं, महत्त्वाच्या बातम्यांची देवाणघेवाण, आणि 'कसं मला बऱ्याच दिवसांपासून कुठं-तरी जायचंच होतं, आणि त्यामुळे हा ट्रेक ठरणं किती आवश्यक होतं,' हे दुसऱ्याला सांगत रहाणं–वगैरे प्रकारांना अगदी ऊत येतो.

'मोठी माणसं बाबा ती, त्यांना वेळ नसतो भेटायला.'

'अरे तुला माहितीये, परवाच्या पेपरमध्ये काय आलं होतं–'

'परीक्षा कशी झाली तुमची ?'

'त्याची आठवणसुद्धा नको–'

'कुठेही चला, फक्त उद्या सहा वाजता पुण्यात पाहिजे.'

'झाली का सुरुवात पहिल्यापासूनच रडायला ?'

'गेल्या ट्रेकचे फोटो कुठायत साहेब, काही दाखवायची पद्धत वगैरे...?'

'ए ऽ, ठरवा ना आधी कुठे जायचं ते..'

'ठरवू ग, एवढी काय घाई ?'

'ए उगाच फार 'कष्टप्रद' वगैरे नको हं. आम्हाला आपलं जनरल ट्रेकिंगला जायचंय.'

या खास फर्माइशीनंतर वेगवेगळी ठिकाणं सुचवणं सुरू होतं. प्रत्येकजण एकेकदा आपला 'व्हेटो' वापरणारच. मग हिरीरीनं जंगी चर्चा सुरू होते. दोघं–तिघं अपक्ष,तर बाकीचे गट-वार आघाडी जमवून प्रचंड वाद.

तोपर्यंत कुणा दोघांची आपापसात बडबड सुरू–

'खरंतर प्रत्येकाला जायचंय ट्रेकला, पण तडजोड करणार नाहीत.'

'तडजोड करून कशाला जायचं ?'

'म्हणजे काय ? ट्रेक महत्त्वाचा की वैय-क्तिक आवड-निवड ?'

'अर्थात ट्रेक. पण प्रत्येकाचा हेतू वेग-वेगळा आहे ना–'

'तुझा काय आहे ?'

'जनरल चेंज. तुझा ?'

'मला दमायचंय् खूप.'

मग 'कोण' 'कोणासाठी' येतंय् याचे खमंग अंदाज करणं.

'मला माहितीये ग...'

'कशावरून–? मला कसं नाही कळलं ?'

'डोळे उघडे ठेव, म्हणजे कळेल.'

'हो ऽ ऽ ?'

या नव्या माहितीचा प्रसार करण्याचा उत्साह अगदी उचंबळून येतो. तोपर्यंत यशो-धन सगळ्यांवर आवाज काढून चर्चा हातात

'-- न बिते कभी ये सफर '-- असं एकमेकांना वाटायला लावणं ही साधी गोष्ट नाही. ट्रेकिंग करणाऱ्या माझ्या सारख्या मित्र-मैत्रीणींनी मला जे अनुभव दिलेत त्याचं मोजमाप शब्दांत करता येणार नाही. मग कृतज्ञतेची औपचारिकता कशाला ? तरी सुद्धा यशोधन बाळ, शाम लंके, अविनाश फौजदार यांची मदत महत्त्वाची !



घेतो. आणि सरळ सगळं पटापट ठरवून टाकतो.

'सगळ्यांनी चारला स्वारगेटवर हजर रहा. थंडी असेल, एक रात्र काढणार आहोत, आपापल्या गरजेप्रमाणं पांघरायला आणा. आणि दोन वेळचं जेवण. जमल्यास काहीतरी चांगलंचुंगलं आणायला हरकत नाही.

मग सगळे पांगतात. जातानासुद्धा चर्चा चालूच.

'अग, माझे हंटर शोधायलाच पाहिजेत.'

'सॅकचं काय ?'

'उधार का सिंदूर !'

'यावेळी कोणाची ?'

'मावसभावाची घेईन बहुदा, धड असेल तर–'

मला अगदी नवल वाटतं–मुलं कधीच असल्या चर्चा करत नाहीत. खरंतर त्यांनाही थोडीफार तयारी–जमवाजमव करावी लागतच असणार. हे मी अनूला म्हटलं, तर म्हणे –'काही नाही ग, आपण कसे फालतू प्रश्न सोडवताना बडबड करत बसत नाही, असं दाखवायचं असतं.'

'काय पण लॉजिक–!'

नेहमीप्रमाणे घरी 'आमच्या उपकाराला जात नाही तुम्ही ट्रेकला, तेव्हा आपापलं काय ते बघा,' असा सूर. पण मजा येते त्यामुळे. उगाचच घरच्यांचा विरोध पत्करून युद्धावर वगैरे निघाल्यासारखं फिलींग येतं– तेही हसत हसत तळहातावर शिर घेऊन. (हे जरा जास्तच होतंय).

चार वाजता स्वारगेटला एखाद्या संमेलनाच्या स्वागतकक्षाचं स्वरूप येतं–

'या ऽ वेळेवर आलात अगदी.'

'बाकीचे कुठायत् ?'

'येतील वरं, सगळे येतील.'

'तू कसा लवकर यावेळी ?'

'लीडर आहे तो या ट्रेकचा, आलंच पाहिजे वेळेवर.'

'काय आणलंय्स खायला ?'

'रिझर्वेशनचं काय ?'

'ए, तुम्ही सॅक इथेच ठेवा आणि गाडीत घुसून जागा मिळवा. मग आम्ही सगळं घेऊन येऊ,' एक धोरणी सल्ला.

'राजाची राणीच की नाही तू ? काही नाही, उलट पोरींना लवकर जागा देतात- तुम्हीच जागा पकडा आमच्यासाठी.'

मधेच कुणाचं तरी आत्मकथा निवेदन–

'अरे, आमचा इतका घोळ चालला होता'

'चालायचंच. देशस्थ शेवटो.'

'काय जातीयवादी आहेस रे !'

'बोलू नकोस त्याच्याशी.' हे आमच्यातलं अलिप्तराष्ट्र. कुठलीही समस्या–भांडण–वाद असो–तोडगा एकच.


'ए, ते नवीन लग्न झालेलं जोडपं बघ ना, कसे बघताहेत आपल्याकडे.'

'हेवा वाटत असेल त्यांना. असलं काहीतरी करायचं सोडून आपण हे काय करून बसलो ?'

'बिनडोकच आहे. त्यांना कशाला हेवा वाटेल ? हनिमूनला निघाले असतील चांगले–'

'ए काऽऽय हेऽ–' हे आमचं पाकिस्तान. बुरख्यातच आहे अजून. जरा कुठे नवरा-बायको, स्त्री–पुरुष असा विषय निघणार असा वास आला की डोळे वटारून मोकळ्या.

गाडीत घुसताना धमाल. सॅक आमच्या




महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात
वीज मंडळाचे
सौरयुगात
पदार्पण

महाराष्ट्रातील दुर्गम
आदिवासी खेड्यात
सौर पथदीपांची उभारणी

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

२५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५ २५

दृष्टीने लाख सोयीची असेल, इतर प्रवाशांच्या दृष्टीनं त्रासच. इतके वैतागतात. सारखे क्रोधपूर्ण कटाक्ष फेकत चिडचीड करतात. एखाद–दुसरा साधा सरळ मध्यमवर्गीय असेल तर विचारतो– ' काय, कुणीकडे चाललाय ?'

एखादीच प्रेमळ, आजोबाटाईप व्यक्ती कौतुकानं निरखत रहाते.

कुणी अस्सल पुणेरी असेल तर मिस्किलपणे म्हणतो, ' खरं म्हणजे तुम्ही इथपासूनच चालत गेलं पाहिजे. एस. टी.नं जाण्यात काय थ्रिल ?'

बाकी साऱ्यांच्या चेहऱ्यावर–

' काही तरी फॅड आहे झालं–'

' फुकट आई–बापांना त्रास !'

' पोरापोरींना एकत्र यायला कारणच लागतं हो सतत काही ना काही –'

' घरात काडीचा उपयोग नाही–'

'आमच्या वेळी नव्हती असली मूर्ख थेरं–'

– वगैरे वगैरे स्पष्ट वाचता येतं

त्यातून जर आम्ही सगळेच एकत्र बसलो किंवा उभे राहिलो असलो आणि दंगा चालू असला, तर चेहऱ्यावर अगदी एरंडेल प्यायल्याचा भाव.

खेडूत फक्त नवलानं निरीक्षण करत रहातात.

.. ......

कोरीगडला जातानाही असंच सगळं.

ठरवतानाच इतका गोंधळ– एस. टी.त बसल्यावर हुश्श्य केलं. असल्या गोष्टी शामच्या पटकन लक्षात येतात. एरवी दगडं मारली तरी हूं म्हणणार नाही

' काय ग ? '

' निघालो एकदाचे. मी म्हटलं, शेवटच्या क्षणी कॅन्सल होतोय की काय ट्रेक !'

' कसं शक्य आहे ? एकदा जायचं म्हटलं की आपण जाणारच. शब्दाला पक्के आहोत म्हटलं.'

' अँहॅं, भीष्माचा अवतारच की नाही. ' हे आपलं उगीचच. सात–आठ वर्षे ट्रेकिंग करणारा माणूस किमान एवढ्या आत्मविश्वासानं बोलणारच. पण ट्रेकवर भांडायला आणि चिडवायला वेगळीच मजा येते. शब्दा–शब्दाला समोरच्याला अडवायचं आणि पीळ मारत बसायचं. नशीब, फारसं कोणी चिडकं नाहीये आमच्यात, किंवा हळवं वगैरे. तसं असणं वाईटच ट्रेकच्या दृष्टीनं. फालतू उपचार पाळत बसावं लागतं मग. तसा एखाद्या वेळी औपचारिकपणा डोकावतो कुणाच्या ना कुणाच्यात, पण पुण्यातल्यापेक्षा चांगले वागतो आम्ही ट्रेकवर. बऱ्यापैकी स्वच्छ – निर्मळ – मोकळेपणानं. फारशी स्पर्धेची किंवा अविश्वासाची भावना नसते कशातच.

' आपण ट्रेकवर वागतो तसं नेहमीच का वागू शकत नाही !'

' कारण नेहमी आपण ' आजूबाजूचे काय म्हणतील, ' याचा फारच विचार करतो. '

' ट्रेकवर ' ओरिजनल ' माणूस कसा आहे ते कळतं. विशेषतः ट्रेकमध्ये येणाऱ्या अडचणीत माणूस ओळखता येतो.'

' मुळीच नाही. ट्रेकवर सगळे चांगलंच वागतात. '

' कारण सगळे मुळात चांगलेच असतात. ट्रेकमध्ये चांगुलपणा व्यक्त करता येतो. शहरात असताना त्यावर बंधनं घातल्यासारखं होतं. '

' असं नाही मला वाटत. '

' च्यायला पेसिमिस्टच आहेस. '

' पेसिमिस्ट नाही रे. पण बघ–ट्रेकवर आपण एकमेकांशी किंवा एकूणच चांगले वागतो; म्हणून ते लगेच आपलं ' ओरिजनल' वागणं का ?'


' होय, (हे अगदी ठास स्वरात) म्हणूनच ट्रेकवर ठरलेली लग्न जास्त यशस्वी होतात. '

' काय पण कारणमीमांसा केलीय. '

'खरंच, अनुभवाचे–आयमीन–निरीक्षणाचे बोल आहेत '

' चल! ट्रेकवर मुळातच प्रेम वगैरे गोष्टींना पोषक असा परिसर आणि वातावरण असतं. त्यामुळे बरीच लग्नं जुळतात. आणि आपल्याकडं एकूणच, लग्न अयशस्वी झाल्याचं लग्नाला साधारण १५–२० वर्षं झाल्यानंतर लक्षात येतं.–त्यामुळे असं वाटत असेल. '

' खड्डयात जा. एकदा पटवूनच घ्यायचं नाही म्हटल्यावर ' एस. टीत असा सवयीचा सुखांत झाला एखाद्या विषयाचा, की एकदम खास वाटायला सुरुवात होते. ट्रेकची नशा डोक्यात शिरायला लागल्यासारखं विनाकारण हसायला यायला लागतं. बालिशपणा करावासा वाटतो. प्रत्येकजण उत्साहानं उसळणारा.



' काय होईल ग आपलं ट्रेकींग बंद पडलं तर ?'

' मी तर मरूनच जाईन. '

' इतकं काही नाही, पण एकूण ते पचवणं फार अवघड जाईल. ट्रेकींग जवळजवळ गरज झाली आहे माझी. महिन्यातून एकदा जर कुठे गेलो नाही तर अस्वस्थ वाटायला लागतं. '

' व्यसन झालंय ते आपलं. '

' मला तर ठरलेला ट्रेक कॅन्सल झाला की फ्रस्ट्रेशनच येतं थोडे दिवस. '

' असं का होत असेल ?'

' आपल्याला सवय होते ना कुठल्याही गोष्टीची. त्यातनं शहराचा–अभ्यासाचा नोकरीचा–त्याच त्याच माणसांचा कंटाळा येणारच. '

' त्यातून ती निसर्गाची ओढ वगैरे म्हणतात ती असतेच की प्रत्येकाला. '

' खरंय रे, निसर्गाइतकं थोर कुणी नाही जगात. असले क्षुद्र वाटायला लागतो आपण त्यापुढे. '

' प्रेम जडतं माहितीये–डोंगरा-झाडांवर ! आणि एखादा मित्र बरेच दिवस नाही भेटला की जसं बेचैन होतो ना, तसं व्हायला होतं. '

' आणि आपल्यातल्या चांगुलपणाला चॅलेंज मिळतं रे ! म्हणजे, ' च्यायला या नदीला काय गरज आहे लोकांना पाणी पाजत वहायची ? तरी बिचारी सोशिकपणे वहात असते. ' असं काही मनात आलं की, अप्पलपोटेपणा करायची टाप नाही होत. '

' थोडक्यात सांगायचं तर व्यक्तिमत्त्व विकास होतो आपला. '

' अगदी थोडक्यात, साहित्यिक भाषेत सांगितलंच पाहिजे का ?'

' तुला काय त्रास होतो पण ?'

' झालं का सुरू ? तुम्ही न भांडता बोलू

शकत नाही का रे ?'

'तुला काय करायचंय त्याच्याशी ?'

'मरा साल्यांनो, चांगलं काही सांगायला गेल तर–'

'स्वतःला आजोबा समजून आमच प्रबोधन करायची नाही, तरी खाजच आहे तुला !'

'पुरे ऽ ! उतरा आता.'

'आलं सुद्धा ?'

'मग ? बुटुक्स, सॅक घे ती खाली.'

हे 'बुटुक्स' अश्विनीला उद्देशून. आमच्या सर्वांत बुटकी आहे म्हणून. खरं तर असं नेहमी नेहमी म्हटलेलं आम्हाला आवडत नाही. पण ती जोपर्यंत चिडत नाही तोपर्यंत हे चालूच रहाणार.

'ए, आता मुणगेकर काका असते तर लगेच विचारलं असतं,' होय फौजदार– आपलं-अविनाश, आता किती चालावं लागेल आपल्याला ?' त्याना नेहमी असे काय-काय प्रश्न पडत असतात.'

'बिझनेसमन आहेत ते !'

'तरी कसे काय येतात ट्रेकींगला ?'

'हल्ली उलट टेन्शनमध्ये किंवा सारख कामात असणारेच ट्रेकींग करायला लागलेत. पंधरा दिवसाच्या ट्रेकच्या आठवणीवर वर्ष सुखात जातं त्यांचं.'

'आणि ब्लडप्रेशर–हार्ट अॅटॅक वगैरेची भीती रहात नाही बरं ट्रेकींग करणाऱ्यांना.'

'हो का आजोबा ? तुम्ही सुद्धा म्हणूनच येता का ?'

'ए, गप. माझं काय वय झालय काय ?'

'मग कशाला येतोस रे ?'

'येतो आपला. चागल्या चागल्या पोरींशी ओळखी होतात. गप्पा मारायला मिळतं– परत कॉलेजमध्ये शाईनिंग–'

'ए काऽय हेऽऽ–'

'खर वाटतय का तुला ? सातवी-आठवीत सुरू केलय त्यानं ट्रेकींग. ते काय या हेतून असेल ?'

'मग कुठल्या रे ?'

'एक फिल्म पाहिली होती अशीच त्यातला हिरो असाच डोंगरांवरनं वगैरे भटकणारा ! लगेच ठरवलं. आपण पण असंच करायचं.'

'आणि तू ?'

'दहावी-अकरावीत जायचो ग मी, दर रविवारी एकटाच कुठल्यातरी गडावर वगैरे. सुरुवातीला एकटं जायला बरं वाटायचं. आता ग्रुपनं जायला आवडतं.

'ए, आपण कशासाठी येतो ?'

'आपण ना, छान-स्मार्ट पोरं येतात–'

'स्वाती ऽऽ–'

'ओरडतेस काय ? चेष्टा पण कळत नाही ?'

'आणि तुम्ही एक वेळ या उद्देशानं येत नसाल, पण बहुसंख्य पोर-पोरींसाठी आणि पोरी पोरांसाठीच ट्रेकला जातात.'

'साहजिक आहे रे. पुणेरी सोवळेपणानं काचलेल्या पोरा–पोरींना ट्रेकवरच काही तरी संधी असते मोकळेपणानं वावरायची.'

'आऽहा ! आणि भलतंच काही झाल तर ?'

'भलतंच कशाला होईल ? एवढं कुणी भान हरपत नाही ट्रेकवर. उलट सगळे कसोशीन सभ्य-सुसस्कृतपणे वावरायच्या प्रयत्नात असतात.'

'खरय. पूर्वी मी पोरांशी बोलायला पण घाबरायचो. आता त्यांच्यातही थोडाफार चागुलपणा असतो यावर विश्वास बसायला लागलाय.'

'करेक्ट. मला पण वाटायच–पोरी रड्या असतात. त्यांना सगळं आयत हवं असतं वगैरे. पण तसं नसतं रे–'

'तात्पर्य काय-उभयपक्षी माघार, तडजोड आणि सुसंवाद.'

'आलं का तुझं तात्पर्य परत ?'

'चुकलं माझं, बास ?'

'बासच आता ! इथेच थांबायचंय, पहाटे उठून मग गडावर.'

'आधी लाँचनं जायचंय ना ?'

'हो हुंऽ बाळा, उद्या होडीत बसायचं–'

'ए-चूप.'

'काठावर झोपायचं त्यापेक्षा लाँचमध्ये झोपू ना, पहाटे उठायचा त्रास तरी वाचेल–'

'चालेल.'

ट्रेकवर सहसा मला रात्री झोप लागत नाही. खरं तर जागंच रहायला आवडतं.

असे क्षण फार दुर्मिळ असतात ट्रेकमध्ये– तुम्हाला एकटं पकडू शकणारे ! त्यातून जर रात्र असेल तर सारं कसं शांत शांत-शेजारी कुणी गाढ झोपलंय. साऱ्या जगावर विश्वास व्यक्त करत-आणि मी आपली जागी-डोळे टक्क उघडे ठेवून–डोक्याखाली दोन्ही हात अडकवून-आभाळात नजर गुंतवून पडलेली.

लाँच वाऱ्याबरोबर डोलतीय. कुणी तरी जाणिवपूर्वक वारा घालत असल्यासारखे, थोड्याथोड्या वेळानं अलवार येणारे वारे आणि मधूनच पाण्यात होणारी, कानांना कळत-नकळत जाणवणारी हालचाल.

लाँचच्या टपावर झोपलो होतो आम्ही. कठडासुद्धा नसलेल्या-डोक्याकडे आणि पायाकडे उतरत्या होत जाणाऱ्या पत्र्यावर !

नजर आकाशात-त्यामुळे अंगाखालचं पाणी आजूबाजूचे डोंगर-झाडी-झुलती लाँच आणि बरोबरचे सारे-सगळ्यांचं अस्तित्व आपलं गृहीतच झालेलं.

सगळे तारे डोळ्यात उतरतात आणि आभाळ हळूहळू पाघरल्यासारखं !

ओठातून हळूच एक सुस्कारा निसटतो आणि पापण्या अलगद मिटल्या की डोळ्यातून झिरपणारे थेंब केसात शिरतात.

तसं तर कुणीच संपूर्ण रात्र गाढ झोपून रहात नाही. नामसप्ताहाला बसल्यासारखं कुणी ना कुणी मधून मधून उठून गप्पात भाग घेत रहातात.

फारच मूडमध्ये असला की सुधीर हिंदी गाणी स्वरचित चालीवर म्हणत रहातो. स्वरचित म्हणजे सुद्धा एकाची चाल दुसऱ्याला असं.

उदाहरणार्थ, 'पछी बनू-उडती फिरू'ची 'काँटोसे खिचके ये आचल'ला किंवा उलट.

त्याच्या जोडीला प्रत्येकजण आपापल्या गोड गळ्याची नव्यानं चाचपणी करतो.

मग वातावरणाला नाट्यपूर्ण कलाटणी–

अवि किंवा सुजाताची गझल.

एकदम फिल्मीच सिच्युएशन–

'ये रात – ये चाँदनी ये फिजाँए – ठंडी हवा –' वगैरे–वगैरे–वगैरे.

सुरुवातीला प्रयत्नपूर्वक गभीर–दर्दभरी मुद्रा करावी लागते– कारण सगळ्याचेच 'मचलते अरमान !' जरा वेळानं मात्र सारं वातावरण मनःपूर्वक भारावलेलं.

ट्रेकमधे दिवस/रात्र असं वेगळं काही नसतंच ट्रेक सुरू झाल्यापासून संपेपर्यंत एकच दिवस–! दिवस अशा अर्थी की आपण जागृतीचा किंवा क्रियाशीलतेचा संबंध दिवसाशी जोडतो म्हणून ! या एका दिवसात मधे

काही काळ 'रंगमंचावर अंधार' – पण घटना घडतच रहातात आणि वातावरणातील धुंदी अबाधित !

........

पहाटे पहाटे लाँचनं दोन तास प्रवास– पुणेकरांच्या दृष्टीनं तरी रोमँटीकच ! अडचण एकच होती की लाँचच्या 'घर्र घर्र' आवाजात एकमेकांचं बोलणं ऐकू येत नव्हतं. त्यामुळे सारेच, मुणगेकर काकूसुद्धा, गप्प गप्पच.

शेवटी मलाच रहावेना. लाँचच्या वरताण आवाज काढत विचारलं, (नशीब, काकू माझ्या आवाजाच्या टप्प्यापलीकडे होत्या.) 'काकूंना बोअर होत असेल का रे काका ट्रेकला नसले की ?'

'बोअर होत असतं तर कशाला आल्या असत्या ?'

'तसं नाही रे, बोअर म्हणजे मधेच एकटं वाटत असेल का एखाद्या क्षणी ?'

'मला नाही वाटत. उलट त्यांना जरा चेंज म्हणून बरंच वाटत असेल.'

'कौतुक आहे नाही त्यांचं, संसार–पोरं सांभाळून वेळ काढून येत असतात.'

'त्यात काय कौतुक ? तू नाही का जाणार ? की लग्न झाल्यावर ट्रेकिंग बंद ?'

'मी जाणारच रे–'

'नवऱ्याला पसंत नसलं तरी –'

'वेडीच आहेस. असला खुळा नवरा कोण करेल ? ट्रेकिंग पसंत नसणारा–'

'मी सांगतो. आपल्यापैकी कोणीही, आता, काहीही झालं तरी ट्रेकिंग कायमचं बंद करू शकणार नाही.'

'हे अगदी बरं झालं. म्हणजे तू 'आपल्यापैकी' असं म्हणालास ते. नाहीतर, मी – तू वगैरेच असायचं इतके दिवस.'

'आता आपला एक ग्रुप तयार झालाय ना! त्यामुळे असं म्हटलं गेलं–'

'इतके वेळा बरोबर ट्रेकला गेल्यावर ग्रुप असा तयार होणारच.'

'आता इतरांबरोबर जायला नको वाटतं, हो नं ?'

'आणि एकूणच ट्रेकला दहापेक्षा जास्त माणसांनी गेलं की जत्राच होते.'

'आणि उगाच फारशी ओळख नसणारे आले की सुद्धा बोअरच.'

'हो नं, जरा तरी ओळख हवीच.'


आख्ख्या जगात ट्रेकला माणसं जितकं 'ऱ्हिदमिक' चालतात तितकं 'ऱ्हिदमिक' कुणीच चालत नसेल. कुठलही बंधन–सक्ती–ताण नाही, कुठलंच शिखर सर करायची घाई नाही– त्यामुळे स्पर्धा–भीती–धोक्याची जाणीव नाही. पुढच्याबद्दल विश्वास–मागच्याबद्दल खात्री ! मोकळेपणाची जाणीव –सैलावलेलं मन– आणि आपल्यासारखं आज जगही आनंदातच आहे अशी नकळत रुजलेली कल्पना– एक प्रकारची स्वाभाविक–नैसर्गिक लय येते चालण्यात. पडण्याची–पाठलागाची–पहाऱ्याची शंकासुद्धा येत नाही– त्यामुळे साऱ्याच हालचालींना सहजता येते– आणि अकृत्रिमपणा.

झाडांना–पक्ष्यांना कल्पनाशक्ती लढवत नाव देत – एकमेकांना चिडवत – स्वतःशीच गुणगुणत–मधेच आपल्याच नादात वाट चुकत जाण्यातला आनंद वर्णन करणं अवघडच. तो अनुभवून पहावा.

'थकणं' एन्जॉय करणं, कल्पनेतच दिसू शकेलसं वाटणारं एखादं दृश्य दिसल्यावर ह्या थकव्याचाही विसर पडणं–म्हणजे काय? हे सांगता कसं येईल ?

गुडघ्याएवढ्या उचीचं गवत. हिरवं–लुसलुशीत वगैरे नाही– तर चक्क उन्हानं पिकून खमंग वाळलेलं– चुरचुरीत– पायवाट झाकून टाकणारं– पुढच्याच्या मागे मागे जात रहायचं– पावलं उचलून न टाकता–





एक जरी बसला घाव
तटतटा धागे तुटतील
यशोमंदिराचे चिरे कोसळतील
एक पीळ जरी उलगडला तरी सारे काही
छिन्नभिन्न होईल. कळस खाली येईल.
प्रगतीला पेच बसेल. अशा वेळी
समर्थ एकजूट हेच विकासाचे शिखर
गाठण्याचे महासूत्र.
राष्ट्र म्हणजे एक विशिष्ट भूभाग नव्हे;
तर समानता आणि प्रबळ इच्छाशक्ती
असलेला अभेद्य ऐक्याचा जागृत
समाज होय.
सारे एक राहू...
राष्ट्र महान घडवू!
माहिती व
जनसंपर्क
महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

गवती गालिचा डिस्टर्ब होतो त्यामुळे ! सगळे तुरे गवताचे. एकाच दिशेला– अर्थात वाऱ्याच्या–झुकलेले. वारा आला की सरसरून लाट आल्यासारखं. एका जागी थांबून पहात राहिलं तर कधी ओठाच्या कोपऱ्यात हसू उमटतं कळतही नाही.

जरा वरती पोचल्यावर परत पाहिलं मागे वळून तर सिंहाच्या अंगावरची लवच डोंगरावर पांघरल्यासारखं–भयानक सुंदर.

तसं पाहिलं तर एरवी फिरायला जाताना आपण आजूबाजूच्या झाडांकडे–फुलांनी डवरलेली नसतील तर– ढुंकूनही पहात नाही. ट्रेकवर मात्र प्रत्येक झाड ओळखीचं वाटायला लागतं– किंवा ओळख करून घ्यायला उत्सुक असल्यासारखं.

दगडसुद्धा तसेच– उगडेवाघडे– माणुसघाणे– एकटंच रहाणाऱ्या म्हाताऱ्यासारखे– कधी तरी एकदम गूढ वाटून जाणारे.

सगळे गप्प गप्प चालत– जवळ जवळ एका रांगेत. उन्हं चढायला सुरुवात झालेली असते आणि सगळेच शांततेच्या आणि गारव्याच्या शोधात निघाल्यासारखे निशब्द.

झाडीत घुसणाऱ्या वाऱ्याचा अस्पष्ट आवाज आणि पाऊल पडल्यावर हलकेच कुरकुरणारा पाचोळा.

पोचायचं ठिकाण जवळ येत चालल्याची सुखद जाणीव– मधेच मानेवरून पाठीवर सरंकन् घसरणारा घामाचा एखादा थेंब– कपाळावर साकळलेलं घामाचं दव–प्रत्येकाचा चेहरा स्वतःतच गुंग– शोधत होतो ते सारं सापडल्यासारखं वाटतं.

भुकेचा त्रास कधीच नसतो ट्रेकवर. लाजून एवढीशी झालेली असते बिचारी. खाण्यापेक्षा बडबड आणि चिडवणंच जास्त– आणि पाणी पित रहाणं.

मग सगळे लवंडणार– सॅक डोक्याशी घेऊन पाठ टेकली जमिनीला की एकेकाच्या जिभेवर सरस्वतीच नाचायला लागते.

जमिनीवरच्या– शरीराला बोचणाऱ्या– टोचणाऱ्या प्रत्येक खड्याला शब्दरूप देणं चालल्यासारखं वाटायला लागतं.

या खेळात उन्हं कधी उतरतात तेच कळत नाही. कुणी तरी घड्याळ दाखवतं– त्याचा खरेखोटेपणा– घाईची गरज– एकमेकांच्या हालचालीत भरून रहायला आळस तपासत 'बॅक टू पॅव्हेलियन' सुरू !

तेवढ्यात कुणीतरी वस्तीच्या ठिकाणावर नजर फिरवतं– कागदाचे बोळे– अन्नाचे अवशेष– काही मागे टाकून चाललो नाही ना आपण, याची खात्री करून घेण्यासाठी.

'ते काय रहाणार आहे का आपल्यामागे? वाऱ्यानं उडून जाईल.'

'पण कुठे तरी जाऊन पडेलच ना ?'

'अगदी गांधीबाबागिरी करतोस हं तू–'

'करायलाच पाहिजे. नाही तर आपल्यात आणि खाल्लेल्या कोंबड्यांची पिसं आणि बिअरच्या बाटल्या मागं ठेवून जाणाऱ्यात काय फरक ?'

'करेक्ट. नैसर्गिक समतोल आणि स्वच्छता–'

'आलं लक्षात. पुरे आता. चुकलं माझं, बास ?'

.......... .....

उतारच असतो परतताना– त्यातून गाडी पकडायची घाई– त्यामुळे सगळेच दुडदुडत चाललेले.

मधूनच एखादं–दुसरं अभिप्रायाचं वाक्य टाकत– किंवा उद्याच्या बेताच सुतोवाच करत.

एस. टी. ची वाट पहात असताना सगळे कसे खूष असतात स्वतःवरच ! फारच वेळ असेल तर चक्क गोट्या खेळणं सुरू–! उगाचच कुणाचीही नजरानजर झाली की हसू फुटत असतं. काही तरी निरर्थक बोलणं चाललेलं असतं– तुडुंब सुखानं ग्लानी यावी आणि तरीही दुसऱ्याशी संवाद करायची ओढ वाटत रहावी तसं काही तरी–!

एस्. टी. च्या खिडकीतून परत एकदा गडाकडे पहायचं– 'मगाशी आपण तिथे होतो रे', – मग नजर तिथे रहाते आणि डोक्यात विचार वेगळेच. खिडकीच्या दोन दांड्यांतून सूर्यास्त– मग उतरती संध्याकाळ –क्रमाक्रमानं गडद होणारं आकाश– पहात पहात एकदम रस्त्याकडेच्या झगझगीत दिव्यांची रांग डोळ्यात घुसते– एकदम कळतं– 'पुणं आलं.'

पुण्याला पाय लावताना– एकदम अमेरिकेला पहिलं पाऊल लावतानाचा कोलंबस झाल्यासारखं वाटतं– 'इतके दिवस कुठे दिसलं नाही हे पुणं ?'– सगळं नवीनच पाहिल्यासारखं– 'छान आहे की हे सुद्धा !'

खूप खूप माणसं–चालणारी–बोलणारी–हसणारी–! वेगात जाणाऱ्या गाड्या– अंगावर येणारे आवाज– राग येत नाही कशाचा– नव्यानं कुतूहल– जवळीक वाटते.

आता काही दिवस यांच्यात राहू या मजेत– मधेच चिडचीड करत– एकमेकांना मिनिटभर भेटत–कधी तरी कंटाळा येईलच– मग आहेच 'आपलं' ट्रेकिंग ! □


Phone off. : 443992
Resi : 21560

NIKO
TRADING COMPANY

1049/50, Sadashiv Peth, Near Nagnath Par, Pune 30

**Wholesale Paper Merchant**

**All Types of Papers,**

**Art Paper, Art Card,**

**Ivory Card, Chromo Art Paper**

**& Maplitho Paper etc.**



# चेहरे बोलतात, डोळे बोलतात

• विनय हर्डीकर •

परवाच्या लोकसभा निवडणुकीमध्ये उमळलेल्या राजीव लाटेचं (माझ्या मते ती बरीचशी 'इंदिरा लाट'च होती) विश्लेषण अनेकांनी अनेक प्रकारे केलं; परंतु एक मुद्दा सर्वांनीच मांडला.

राजीव गांधीची प्रतिमा युवकाची आहे आणि देशातला ७८ टक्के (काही चुकभूल द्यावी घ्यावी) मतदारही युवक आहे. युवक म्हणजे वयानं ३५ पेक्षा कमी. हे वाचताना मी साडेपस्तीशीत होतो. त्यामुळे थोडासा दचकलो. आपण परत एकदा mainstream सोडून गेलोय की काय, म्हणून अस्वस्थ झालो. हे लिहिताना देखील मी ७८ टक्के किंवा २२ टक्के असलेल्या कोणत्याही एका गटाच्या वतीनं लिहितोय असं म्हणता येणार नाही.

## एक

माझा एक दोस्त फर्ग्युसनमध्ये शिकवतो. एकदा त्याच्या तासाला जाऊन बसलो.

मी त्याच कॉलेजात असताना ज्या M–२२ या हॉलमध्ये आमचे बरेचसे तास–कार्यक्रम व्हायचे तोच वर्ग. पंचेचाळीस मिनिटात काय काय बदललंय आणि काय काय टिकलंय ते पाहत बसलो. हॉल तर फारच घाण झालेला. भिंतींचा रंग विटका, पोपडे उडालेले, छपराकडून झेपावणारी जळमटं भरपूर आणि बाकं, भिंतीचा एक इंचही असा नाही की पोरांनी काही लिहून ठेवलेलं नाही. वर्ग अकरावीचा–म्हणजे सरळसरळ वीस वर्षं नवा; पण मुलं उजवीकडे–मुली डावीकडे–अशी तीच बसण्याची व्यवस्था. तसे फरकही बरेच होते. भाषाविषयाबद्दलची अनिच्छा कायम असली तरी लक्ष देण्याचं नाटकसुद्धा कुणी करत नव्हतं. समोरच्या काही रांगांपुरतंच संभाषण मर्यादित होतं. तासाला बसणं हा बहुतेकांच्या दृष्टीनं एक कर्मकांडाचा प्रकार वाटत होता. मुख्यत: ज्या अर्ध्या भागात मला साड्या, स्कर्ट ब्लाऊज, दोन वेण्या क्वचित एखादा पंजाबी ड्रेस किंवा बॉबकट आणि कपिलाषष्ठीलाच पॅंट शर्ट पाहायची सवय होती, तिथे मुख्यत: बॉबकट किंवा बॉयकट किंवा वेणी म्हणता येणार नाही अशी काही केशरचना. पंजाबी ड्रेस, स्लॅक्स, जीन्स व अजूनही मला नक्की नावं माहीत नाहीत असे पोषाख होते.

त्या भागातूनही कोणाला पाहणाऱ्या असे काही फरक दिसले असतील.

तसं दिसण्यातलं वेगळेपण तर फार झपाट्यानं कमी झालंय. वागण्यातलंही. वाहनं चालवण्यातलंही. एकत्र सिनेमा–नाटकाला जाणं, कॉलेजात घोळक्यानं गप्पा मारणं, रेस्टॉरंट वा कॅंटीनमध्ये बसणं, सहलीला जाणं यामधलं माझ्यावेळी (हे शब्द वापरावे लागतायत–नाइलाजानं)

दिसणारं जाणवणारं टेन्शनही दिसत नाही किंवा तसं करण्यात काही खास अनुभव येतोय असंही कुणी भासवताना दिसत नाही.

दोन-तीन महिन्यांपूर्वी काही मित्र-मैत्रिणींना घेऊन रायगडला गेलो होतो.

रायगडचं दुपारचं रणरणतं ऊन, रात्रीचं मुलायम चांदणं, रुचकर पाणी इ. इ. चं वर्णन करण्याची ही वेळ नाही-जागा नाही- पण ते सगळं काही होतंच.

या ग्रुपमध्ये तीनजण असे होते की त्यातल्या चौघींची-त्यांची फारशी ओळख नव्हती. आम्ही दोघे जण मात्र दोन्ही ग्रुप्सना ओळखणारे. असा नवांचा छोटा ग्रुप.

पहिला झटका बसला तो दोन मैत्रिणींनी विचारलं, 'बरोबर कोण येणार आहेत? त्यांची आमची ओळखही नाही' प्रश्नात सगळीच काळजी नव्हती; पण साशंकता होती.

मी म्हटलं 'माझे मित्रच आहेत. ओळखी होतील. तुम्ही चला' दोन दिवस फार छान गेले. उत्साहाचा, विनोदांचा, गाण्यांचा आणि शारीरिक ताणही सोसण्याचा कळस झाला-

परत आल्यावर दोन्ही बाजूंनी सांगितलं, 'आमच्या मनात साशंकता होतीच; पण इतकी धमाल येईल असं वाटलं नव्हतं. दुसरा झटका. मी त्यांना म्हणालो, 'एवढा मोकळेपणा असतो तुम्हाला, हातात बऱ्यापैकी पॉकेटमनी असतो, प्रश्न विचारणारे लोकही आता कमी झालेत, मग अनोळखीपणाची एवढी धास्ती का?'

त्यांच्याकडे उत्तर नव्हतं. कारण याक्षणी हा प्रश्न अशा स्वरूपात स्वतःला-इतरांना विचारण्या-इतके ते वस्तुस्थितीपासून वेगळे होऊ शकत नाहीत.

हल्ली माझा बराचसा वेळ ज्या ७८ टक्क्यामधून मी सावकाश eliminate होत होतो आणि गेल्या निवडणुकीत पूर्णपणे झालो, त्यांच्याशी गप्पा मारण्यात जातो. लिहिण्यामधून आपल्याला मुळीच न दिसणाऱ्याशी संवाद करण्यापेक्षा ज्यांचे बोलणारे डोळे, चेहरे आपण पाहू शकतो त्यांच्याशी अखंड गप्पा मारत रहाणंच जास्त छान वाटतं. छापील वाचणं किंवा वर्गात बसून ऐकणं-ऐकवणं या फार कृत्रिम गोष्टी आहेत क्वचित कुरूपही वाटतात.

माझा एक मित्र, मला थोडथा फार अंतरावरून माहीत असलेल्या एका मुलीच्या प्रेमात पडला. याचं व्यक्तिमत्व चांगलं, वय अनुकूल, नोकरीही बऱ्यापैकी परंतु पुढे जाण्याची मनाची उभारी. लहानपण बेताच्या परिस्थितीत गेल्यानं हा थोडासा बुजरा परंतु झगडून पुढे येऊ शकणारा.

मुलगी होती बंगलेवाल्या आईबापाची. म्हणून त्याच्या सांगण्यावरून तिचा जरा कानोसा घेतला. तिच्या अपेक्षा येणेप्रमाणे.

मुलाचं वय-रूप याचा फारसा मुद्दा नाही परंतु निदान तीन/साडेतीन हजार पगार असावा. बँकेत सहा आकड्याच्या जवळपास शिल्लक असावी. आईवडील, भावंडे असली तरी त्यांची जबाबदारी नसावी आणि फाईव्ह स्टार घर स्वतःच्या मालकीच्या जागेत मांडून तयार असावं.

हे का, तर मग आयुष्यात काही tension उरणार नाही.

मला पंधरा वर्षांपूर्वीचा एक संवाद आठवला. उत्तम करिअरच्या माझ्या एका मैत्रिणीने सांगितलं होतं, 'सतत आपली काळजी घ्यायला कुणी तरी आहे याचा आनंद तुला कळायचाच नाही.'

पण मी पंधरा वर्षं पुढे आलोय. या tension नकोवाल्या मुलीला माझा सल्ला असा-'तुझ्या अपेक्षा ठीकच आहेत. पण एक पाऊल पुढे जा. दोन पोरं असलेल्या विधुराशी लग्न कर. म्हणजे त्यातलेही कष्ट तुला व्हायला नकोत.'

अनेक मैत्रिणींना हा किस्सा ऐकवला. बहुतेकींचं म्हणणं 'कोणतीही लग्नाळू मुलगी असाच विचार करील.'

नुकताच बाप झालेला दोस्त सांगत होता, 'आपली बायको आणि पोरगा यांना नाही म्हणावं लागणार नाही इतके पैसे मिळवलेच पाहिजेत.' मी म्हटलं, 'समजा तुझ्या बायकोनं कॅडिलक गाडी आणि पोरानं हेलिकॉप्टर मागितलं तर सगळे लाड पुरवण्याच्या महत्त्वाकांक्षेचं काय होईल?'

परंतु बहुतेकांची हीच महत्त्वाकांक्षा असते. आपल्या मुलीसुद्धा प्रथम आईबाप, नंतर नवरा यांना झेपेल असेच हट्ट करतात, असं हट्टांचं लाडांचं एक खिशाच्या भाषेतलं समर्थनही आहे.

ते तीन-चार खोल्यांचं घर, 'जिथे कुणास्तव कुणीतरी' वाट पाहत, येरझारा घालतं, ते उभं करणं तर आता इतकं भयंकर खर्चाचं झालंय की मी एका परदेशी मैत्रिणीला हसत पण गांभीर्यानं म्हणालो, 'तू पुन्हा येशील तेव्हा पलीकडच्या झोपडपट्टीतच आमची चौकशी कर'

हे ऐकून महत्त्वाकांक्षी दोस्त भडकला. 'तुझ्यात पाणी नाही' वगैरे म्हणाला- 'माझी बायको आणि मुलं यांना काही कमी पडू नये म्हणून मी जिवाचं रान करतो-'

काही महिन्यांपूर्वी यानंच सांगितलं होतं- काँट्रॅक्ट मिळवण्यासाठी कोंबडी-दारू-पैसे-पोरी काय वाटेल ते पुरवावं लागतं आणि मी ते पुरवलंय. मी स्वतः मात्र कधी दारू पीत नाही-पोरी मागत नाही.'

स्वतः हा काही करत नाही ते ठीकच आहे पण त्याला कधी तरी असा प्रश्न विचारावा लागेल की 'तू नेमक्या कुणाच्या जिवाचं रान करतोस?'

Professionalism हा शब्द फार ऐकायला येतो. सर्व प्रकारच्या व्यवसायातले उघड-गुप्त व्यवहार बिनबोभाट पार पाडून यशस्वी व्हायचं आणि पुढे जायचं-कारण मागे पाहायला वेळ नाही. ज्यांची जबाबदारी स्वीकारली त्यांच्यासाठी दमछाक होईपर्यंत धावण्याखेरीज इलाजच नाही. यशाला पर्याय नाही अपयशाला क्षमा नाही.

Professionalism ला काही तांत्रिक बाजूही आहे. ती उत्कृष्ट असावी, अद्ययावत असावी हा आग्रह योग्यच आहे. ती किमान अट आहे.



Professionalism आणि भ्रष्टाचार, शोषण यांच्यात काही सीमारेषा उरली आहे की नाही ते कळत नाही. असली तर दिसते न दिसते इतकी पुसट आहे. Professional ethics असा एक तिसरा शब्द फारसा कुणी उच्चारत नाही.

कारखानदार मित्रांची ऑफिसं, स्टाफ, फर्निचर, गाड्या सगळं अद्यावत असतं. कारण गिऱ्हाईकाला प्रसन्न राखण आणि मध्यस्थाला संतुष्ट ठेवणे हा नवा ॲप्रोच आहे. उत्तम आहे. परंतु 'माझ्याकडे अर्धा तास येणाऱ्या गिऱ्हाइकासाठी हे स्टॅंडर्ड असेल तर आठ–दहा तास माझ्याकडे राबणारे कामगारही तशाच स्टॅंडर्डच्या घरात राहतील' असा आग्रह धरा म्हटल तर लोक म्हणतात, 'धंदा बदच करावा लागेल.' Professional ॲप्रोच पाहिजे. ही काय सोशल सर्व्हिस आहे ?

या विषयावर विचाराचा गोंधळही बराच आहे वेस्टइडीज आणि इंग्लडकडून, ऑस्ट्रेलियाकडून आपले क्रिकेटर हृय्या मार खात होते तेव्हा 'व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव' हेच कारण पुढे येत होतं. त्याच समीक्षकाची आणि प्रेक्षकांची तक्रार आहे की हल्ली खेळाडू फक्त पैशाकडेच पहातात.

अशा गोंधळात व्यावसायिक नीतिमत्तेचं तुणतुणं वाजवणार तरी कोण आणि त्याच्याकडे लक्ष कुणी द्याव ?

Proffessionalism चा बोलबाला आहे, पण एका विशिष्ट वर्गापुरता. व्यवस्थापनाचं कौशल्य ज्यांच्याकडे आहे आणि काही किंमत पडली तरी यशस्वी व्हायचं ज्यांनी ठरवलय त्यांच्यापुरता.

कशासाठी यशस्वी व्हायच–चार–साडेचार वर्षात इजिनिअर किंवा ग्रॅज्युएट की पाठोपाठ मॅनेजमेंट ट्रेनी किंवा मॅनेजमेंटची डिग्री- पुढे मग Professionalism चा तथाकथित मेन रोड.

खरं म्हणजे तो मेन रोड नाही. त्यातही घाट आहेत, वळण आहेत, खड्डे,चढ–उतारही आहेत.

पण यशस्वी व्हायचंय म्हटल्यावर, ते पाहायला विचार करायला सवडच उरत नाही.

सिगरेटची सवय कॉलेजातच लागते–काही वेळा दारूचीही लागते. मग उरतो लग्नापर्यंत या दोन्हीचा मनसोक्त (?) उपभोग– कळपात राह्यचं म्हणून !

या वर्गातले तरुण-तरुणी फार लवकर लग्नाला येतात–विशेषतः जर आईबापांनी घरात एका जादा बेडरूमची सोय केली असेल तर बघायलाच नको

दुसरीकडे शिक्षण बेताच, घरची परिस्थिती बेताची, अगात धमक बेताची अशी अनेक मुली-मुल केवळ फॅंटसी करून जगत असतात- कारण स्वतंत्र आयुष्य सुरू करायला लागणारा रनवे त्यांच्याकडे आहे कुठे ?

त्या माझ्या दोस्ताकडे सगळं होत. रूप, यौवन, दणकटपणा आणि सहसा आढळत नाही अशी साहसी वृत्तीही.

नव्हती फक्त व्यावहारिकता. म्हणून प्रेमात पडताना त्यानं विचार केला नाही– आणि फाइव्हस्टार घर जिला हक्क म्हणूनच हवं तिच्या प्रेमात पडला. तिच्या हसण्यानं- त्या हसण्यात किमान सभ्यपणापेक्षा दुसरं काहीच नव्हत–पार वेडा झाला दुष्यन्तासारखा–कामी स्वता पश्यति. तो म्हणायचा 'तिच माझ्यावर प्रेम आहेच.'

मी म्हणायचो, 'तू एका फॅंटसीत जगतोस कारण ती तुझ्या मनाची गरज आहे' शेवटी त्यान करू नये ते केलं, तिला विचारलं–ती म्हणाली, 'मला काही म्हणालास ? माझं लक्षच नव्हतं.'

आता हा पुणं सोडूनच गेलाय–परत येण्याची शक्यता नाही. इथल्या बऱ्याच मित्रापासून तुटलाय–स्वत.पासून तुटलाय का माहीत नाही. कदाचित त्याला नवी फॅंटसी सापडली असेल.

लग्नाकडे प्रयोग म्हणून पाहणं शक्य आहे का ? काहीजण हा प्रश्न जर एखाद्या जनमत कौलामध्ये विचारला तर हो म्हणतील; पण तसं म्हणताना अनेकाना लग्न कायम आणि नंतरचे प्रयोग असं अभिप्रेत असेल.

तरुण तरुणीची मैत्री लग्नापर्यंत गेली नाही तरी चालेल अस मनापासून कितीजण मानतात ते काही कळत नाही.

मानतो असं म्हणणारे खूप असतील; पण दहा मुलीशी मुलाशी मैत्री ठेवून एकाशीच लग्न होऊ शकतं हे किती जणाना संयुक्तिक वाटेल ?

दहा स्थळ नाकारून अकराव्याशी लग्न केलं तर त्याला मान्यता आहे. तसं मैत्रीमध्ये केलं तर साशकता, मत्सर, काही वेळा कुचेष्टा वाटयाला येऊ शकते; पण एक तरुण–एक तरुणी एकत्र दिसले की, त्यांच्या सकट सर्वांनीच लग्नाचाच विचार करावा हे किती भयानक आहे.

मैत्रीचा अर्थ फार ताणला जायच्या आधी एक किस्सा सागतो,

'नवीन लग्न झालेले पाच-सहाजण गप्पा मारत बसलो होतो.' प्रत्येकाचे अनुभव वेगळे अडचणी गमतीदार–उपायही मजेदार. एकमताचा मुद्दा एकच–

'कुमारिकेला (Virgin) पहिला अनुभव दिल्यानतरचे तिचे विभ्रम फार विलोभनीय असतात.'

पण आमच्यातला जो सिनिअर मोस्ट होता– *त्यानं शातपणे म्हटलं,* 'हा अनुभव निदान प्रत्येकाला एकदा मिळावा म्हणून तर मॅरेज सिस्टीम एवढी कडक आहे.'

आम्हाला ते पटतं, रास्त वाटतं.

अशी मैत्री करता येईल, एकत्र गाता–नाचता येईल, दंगामस्ती करता येईल अशी काही युक्ती सापडेल का? ती व्यवस्था असून चालणार नाही–

तुरळक असे ग्रुप दिसतात; पण कधी ती मुल-मुली स्वतःच फार वेगळं काही करतोय असं भासवत वेगळी पडतात, तर बऱ्याच वेळा पाहणाऱ्यांच्या नजरा त्याना वेगळं पाडतात. कोणत्या ना कोणत्या नशेच्या धुंदीत कसलाही विधिनिषेध न पाळता जगणारे ग्रुपही आहेत; पण मी त्याच्याबद्दल बोलत नाही. कारण त्यांचं जगण अपवादासारखं आहे ते सगळ्याना लागू नाही, आणि जोपर्यंत ते समाजाला आपली जीवनपद्धतीच कशी चांगली हे फुशारकी मारून सागू पाहत नाहीत, तोवर त्यांना कुणी छळायचं कारण नाही.

'मला तो आवडतो पण त्याला मैत्रिणी फार आहेत.'

'तो चागला आहे; पण त्याच्या त्या दोन खोल्याच्या जागेत मी गुदमरेन.' असं एरवी आवडणाऱ्या मित्राबद्दल विचारणांचा प्रश्नच खरा आहे. माणूसघाणेपणा कुणालाच आवडत नाही. दहा जणाचं लक्ष वेधून घेणारा



पार्टनरच हवा असतो; पण गुंतवणूक मात्र फक्त स्वत:मध्ये. लहान घरं आवडत नाहीत, मोठी परवडत नाहीत. तरुण जोडपी एकत्र राहण्याच्या प्रयोगाला सामोरी जात नाहीत– समाज आणखी काय म्हणेल ते वेगळंच.

प्राणीमित्र लोक नेहमी सांगतात–' प्राण्यांचं जग किती सुंदर आहे. त्यात बलात्कार नावाची गोष्टच नाही.'

वरकरणी बरोबरच आहे पण प्राण्यांच्या-मध्ये उत्कट जीवनव्यवहार घडतात तेही फार नैसर्गिकपणे आणि त्यासाठी जो अत्यंत Well–equipped आहे तो आपली ती ताकद सिद्ध करून पुढे जाऊ शकतो.

माणसांमध्ये असं करायचं ठरलं तर आता होणाऱ्यांपैकी एक टक्का लग्नं तरी होतील का, टिकतील का ?

परंतु दोन्ही विचार तसे निरुपयोगी कारण, प्राण्यांसारख राहण्यात प्राण्यांनाच कमतरता भासली म्हणून आपण माणसं तयार झालो.

मी ' होतकरू ' होतो तेव्हाच शिक्षकही होतो. अनेकदा विद्यार्थ्यांच्या घरी गेल्यावर पालक लग्नाचा विषय काढीत.

रुटीन विषय–रुटीन कारणंच मी सांगायचो–बँकेत पैसा नाही. राहायला जागा नाही वगैरे. कारण विचार चालू आहे असं म्हणताक्षणी स्थळांचा भडिमार सुरू व्हायचा !

अशा चौकशा कधी न करणारं–कदाचित मला जास्त ओळखणारंही एक घर आहे. तिथं एकदा अगदी सहज बोलणं निघालं. मी नेमीहची कारणं सांगितली. त्या विद्यार्थ्याची आई म्हणाली, ' लग्नानंतर कितीतरी दिवस आपण कुठे राहतो, कसे राहतो, शेजारचे काय म्हणतात याची जाणीवच नसते. आमचा संसार तर पत्र्याच्या चाळीत एका खोलीत सुरू झाला.'

संसार या शब्दाचा बोजडपणा त्याक्षणी एकदम निघून गेला !

## दोन

स्वातंत्र्य संग्रामात ( की चळवळीत ) आम्ही कुणीही नव्हतो. त्यामुळे त्याग, समर्पण, आत्मबलिदान वगैरे शब्द फारसे भिडत नाहीत. आंदोलनं होतात, गोळिबारात लोक मरतात, आपण त्यांना हुतात्मे म्हणतो; पण त्यांनी आत्मबलिदान केलेलं नसतं. त्यांना सहानुभूती मिळते,कुटुंबियांना भरपाई मिळते-पूजा होत नाही. आणि अकारण घातपात करून इतर निःशस्त्र समाजाला वेठीला धरणारांच्या वाट्याला येतो फक्त तिरस्कार.

नाही म्हणायला आणीबाणी येऊन गेली. परंतु आणीबाणीमधून एखादा फ्रँको, स्टालिन हिटलर निर्माण झाला नाही. कमालीच्या माफक किंमतीमध्ये लोकांनी आणीबाणी परतवली.

त्याग, समर्पण, बलिदान ही भाषा उघडपणे हास्यास्पद झालेली नाही अजून; परंतु तिचा परिणाम ७८ टक्क्यांपर्यंत होत नाही. नक्षलवाद्यांचा सुरवातीचा काळ हा एक अपवाद. पण सुरवातीचाच. राजीव गांधी सुद्धा बोलतो आता त्यागाची भाषा; पण तो त्याग असतो तो आई, आजोबा, पणजोबा यांचा. संशयाचा फायदा द्यायचा झाला तर त्यांच्या पिढ्यांचा.

कदाचित त्याच्याभोवती जी नाकर्त्या म्हाताऱ्यांची गर्दी उभी आहे, तिच्यासाठी त्याला तसं बोलणं भागही आहे.

पण खरे भिडलेत ते त्याचे अजून न आलेले कॉम्प्यूटर्स, जाहिरातीनी देऊन केलेला प्रचार, राजकीय जीवन आणि प्रशासन स्वच्छ करण्याची घोषणा सुद्धा २२ टक्क्यांच्या आत्म्याला थोडीफार शांतता मिळावी म्हणून केलेली असावी.

काही महिन्यांपूर्वी एका मित्रानं युनिव्हर्सिटीमधली नोकरी, रिसर्च सोडून शेतकरी संघटनेचं काम करायचं ठरवलं. ते ऐकून संघटनेची माहिती विचारणारे त्या मानानं कमी निघाले. मुळात असं काही करण्याची आवश्यकता असते का, हा न विचारलेला प्रश्न आणि ' त्याला शेतकरी संघटना काय देणार ?' हा आस्थेमधूनच विचारलेला; पण इतरही पुष्कळ सांगणारा मुख्य प्रश्न !

कार्य आणि वाहून घेणं या शब्दांमधूनही काही फारसं व्यक्त होईनासं झालंय–काम करणं, कामात बुडून जाणं हेच बरं वाटतं. परवाच्या लोकसभा निवडणुकीत भुईसपाट झालेल्या राष्ट्रीय पक्षाचे नेते हळहळत होते. ' चंद्रशेखर, अटलजी यांचं चारित्र्य पाहा, त्याग पाहा, अभ्यास, चिकाटी पाहा.'

लोकांनी (७८ टक्के) मनात म्हटलं, ' किती वर्षं पाहा, हातात एकदा मतपत्रिका आणि शिक्का येऊ दे. मग पाहतो.'

कदाचित विकास पावू इच्छिणाऱ्या समाजाला या गोष्टी गौण वाटत असतील–आपुलकी, माणुसकी जशी दारिद्र्यातच जास्त व्यक्त होते, तशी राष्ट्रभावना आणि तिच्यामुळे येणारे त्याग, चारित्र्य, समर्पण वगैरे गुण परतंत्र समाजातच जास्त अपरिहार्य असतील.

आपण म्हणताना म्हणतो की जपानी, ब्रिटिश, अमेरिकन माणसं फार राष्ट्रीय असतात; पण तिकडच्या समाजशास्त्रज्ञांचे अभ्यास तर खूपच वेगळ्या प्रवृत्ती दाखवतात.

कसंही असो, विकासाची, उत्कर्षाची भूक आहे. कॉम्प्यूटर हे त्याचं प्रतीक. मी अनेक जणांना म्हणालो, ' राजीव गांधीच्या कॉम्प्यूटरचं काही खरं नाही. आता प्रत्येक बस स्टॉपवर दोन कॉम्प्यूटर बसवतील. एक सुरुवातीला, एक शेवटी सुरुवातीच्या यंत्रात पैसे टाकायचे तिकिट घ्यायचं. शेवटच्या यंत्रात तिकिट टाकून रिफंडचे पैसे परत घ्यायचे. कारण बस बहुदा यायचीच नाही. '

लोक चांगली कॉमेंट म्हणून हसतात; पण कॉम्प्यूटर विसरायला तयार नाहीत.

सभा, संमेलनं यांनादेखील या जुनाट-भाषणांनी भंपक मेळाव्यांचं स्वरूप आलंय. म्हातारे प्रौढांना विचारतात तरुण कुठे गेले? युवक आघाड्यांचं सरासरी वय राजीव गांधी येईपर्यंत सरासरी चाळीस ते पंचेचाळीस असायचं. आता आपलीच माणसं

भरतो प्रत्येक पुढारी; पण जरा तरी तरुण भरतो.

महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर गेल्या दशकात स्वयंसेवी संस्थांची बऱ्यापैकी लाट आली होती. तरुण पोर फार मोठ्या सख्येनं त्यातून कामाला लागली होती. बाबा आमट्यानी जे ६७,६८,६९ मध्ये मेळावे भरवले त्याची ती अपरिहार्य परिणती होती. ग्रामायनचा पहिला मेळावा झाला तेव्हा ही म्हाताऱ्यांची संघटना आहे असं म्हणवत नव्हतं. या संस्थांचा गाजावाजा इतका झाला की, प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक सेक्टर याच्याबरोबर व्हॉलंटरी सेक्टर असं तिसरं नाव घेतलं जायचं–अजूनही इतर राज्यातले बुद्धिवंत या सेक्टरचं परत परत नाव घेतात.

आज मात्र या कामाकडे तरुण फारसे वळताना दिसत नाहीत. दहा वर्षांपूर्वी जी माणसं धडपडू लागली तीच त्या त्या जागी आहेत. माझ्याच वयाची, काही लहानच. सगळ्याची तक्रार ही की माणसं काही मिळत नाहीत. एकीकडे ब्रेनड्रेनला आळा बसलाय. आपण राष्ट्रवादी झालो म्हणून नव्हे. रशियाशी करार झालेला मैत्रीचा आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या स्वतःच्या समस्यांमुळे आता संधी कमी झाल्या. कायमचं तिकडे जाणं फारच कठीण झालं. तरी पण आपल्याकडच्या विकासाच्या कामांना मात्र माणसांची वाण आहेच.

कारणं तर खूप दिसतात. स्वयंसेवी संस्थांमध्ये झोकून द्यावं असं भव्यदिव्य काहीच नसतं. जनताही तुम्हाला सरकारकडून विकास पदरात पाडून देणारी एक तरफ म्हणूनच ओळखते. शिवाय दुसऱ्याचे प्रश्न उसने घेऊन लढण्याचा उत्साह दोनपाच वर्षांपेक्षा जास्त टिकू शकत नाही. काम करता करता विचार वाढत जाण्याऐवजी दोन व्यक्तींचं भांडण तर मुद्दामच वैचारिक म्हणून उभं केलं जातं. घर शहरात, काम खेड्यात किंवा झोपडपट्टीत हा दुहेरीपणाही फार काळ करता येत नाही. आणखी एक कारण आहे– ती कामं करायला जाणाराची कुवत काय, पात्रता काय कोणी विचारत नाही. इच्छा हीच पात्रता.

माझी पीएचडीची फेलोशिपची वर्षं संपली. रिसर्च काही संपला नाही. रिकामाच होतो. अगदी भल्याभल्या विचारवंतांनी कितीदा तरी मला पुण्याजवळची, मुख्यतः शेतीची प्रॉजेक्टस् हाती घ्यायला सुचवलं. सुरुवातीचं वाक्यच असं– 'सध्या तू मोकळाच आहेस. तिथेही माणसाची गरज आहे.' मी मनात म्हणायचो 'दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत; पण म्हणून मी शेतीचं प्रॉजेक्ट सांभाळायला लायक कसा ठरतो ?'

पण आज असे खूप लोक-मोकळे असल्यामुळे सेवाभावी झालेले, नुसते इकडून तिकडे फिरतायत. इथं पटल नाही की तिथे जातात.

तीसचाळीस डोंगराळ गावांना स्पर्श करणारं काम चार–पाच वर्षांतच उभं करणारा एक मित्र सांगत होता.

'आम्ही शहाणपणा शिकवायला जात नाही. त्यांच्या गरजावर आमचे उपाय लादायचा प्रयत्न करत नाही स्वतःदेखील या कामाकडे आपली एक करिअर म्हणून पहातो. आपल्या कल्पना लादून कुणी पैसा देऊ केला तर घेत नाही. म्हणून टिकलोय आणि वाढतोय.'

आणखी एक त्यानं सांगितलं, 'काही चुकलं, घोटाळा झाला, नुकसान झालं तर 'चला, निदान एक प्रयोग करून पाहिला. सगळेच प्रयोग यशस्वी कुठे होतात' असं म्हणण्याचा कोडगेपणा आमच्याकडे नाही. कारण आमचे प्रयोग जिवंत माणसांशी चालतात.'

विकासाच्या कामांकडे केवळ नोकरी म्हणून पाहून, इतका प्रचंड भ्रष्टाचार चालू असताना जर इतके तरुण ओढले जातात तर तेच काम त्यागाचं, उद्धाराचं, आपलं काही काढून दुसऱ्याला देण्याच आहे, असं न सांगता तीसुद्धा एक करिअर आहे असं सांगितलं असतं तर कदाचित या तिसऱ्या सेक्टरचा असा पराभव झाला नसता. पण आधीच्या पिढ्यांनी पारतंत्र्यात जन्मलेल्यांची भाषा आणि स्वातंत्र्यात जन्मलेल्याची भाषा यांच्यातलं अंतर जाणलच नाही. काम एक होतं, भाषा दुसरीच–जुनाट राहिली.

पण भारत इंडियाच्या गुलामगिरीत सडतो आहे असं एक वाक्य उच्चारताच ग्रामीण भागातून केवढं वादळ शरद जोशींनी निर्माण केलं !

एक तर मरण्यासारखं आव्हान दाखवा. किंवा गणितात, शास्त्रात नवे शोध लावायला सांगा, नवी धरणं, नव्या इमारती, नवे रस्ते, नवी वाहनं शोधायला सांगा. नवे अनुभव घेऊन नवं वाङ्मय, नवी काव्य रचायला सांगा, नाटकं, चित्रपट, नृत्य यात नवे फॉर्म आणायला सांगा, नवे विनोद करायचा आग्रह धरा. तुम्हाला तोंडपाठ आहे म्हणून येता–जाता त्याग, कष्ट आणि बलिदान करायला काय सांगता ?

मग पाहू युवक शोधावे लागतात का !

आपलं बरोबरच आहे, ते समजावून सांगायची गरज नाही, ते उदात्त आहे म्हणून आपोआपच भिडणार, त्याची भाषाही बदलायचं कारण नाही. या आत्मसंतुष्ट भूमिकेमुळे काय उत्पात होऊ शकतो, त्याचं उदाहरण म्हणजे राखीव जागांचा प्रश्न.

गुजरातचं आंदोलन राजकीयच जास्त आहे ते सोडून देऊ; परंतु घटना तयार करून राखीव जागाचं कलम घालण्यापूर्वी बऱ्याच ठिकाणी चर्चा झाल्या होत्या, आंबेडकरांची चळवळ होती, फुल्यांची पार्श्वभूमी होती, गांधींचं उपोषण लोकांच्या स्मरणात होत, त्या पिढीची मानसिकता काही प्रमाणात तयार झाली होती

मी एकूण अठरा वर्षं शिकलो; परंतु राखीव जागा हे काय तत्त्व आहे त्याची चर्चा कधी ५ मिनिटेदेखील वर्गात झाल्याचं आठवत नाही. शाळेत, कॉलेजात, विद्यापीठात, घरात कुठेच नाही. मी आर्टस्‌चा विद्यार्थी होतो. फारसा प्रश्न नव्हताच; पण दहा वर्षं वर्गात बसणारा मित्र–मैत्रीण एकदम अकराव्या वर्षी राखीव जागामुळे पुढे गेली तर महत्त्वाकांक्षी पोरं बिथरतील नाही— तर दुसरं काय होईल ?

त्याग करा, त्याग करा सांगितलं; पण पोचलं नाही. राखीव जागा आहेत, अमुक रास्त कारणामुळे आहेत असं तर सांगितलं सुद्धा नाही ज्यांच्या मानसिकतेची काही मशागतच झाली नाही त्यांना ते पटणार कसं आणि ते तुमच्या मागे येणार कसे ?

## तीन

आत्ता, या क्षणाला जे आपल्याभोवती वावरताहेत, वाढताहेत, त्यांची मानसिकता नेमकी शब्दानं पकडणं फार अवघड जातं.

जाणवतात काही इतस्ततः अनुभव–त्यांच्यात काही संगती दिसली तर पाहावी.

घर, शिक्षणसंस्था, आसपासचे लोक आणि शवटी स्वतः व्यक्तीच मानसिकता घडवत असते.

घर कसं असावं त्याबद्दल पुष्कळ वेगवेगळे विचार असतील; पण घर नकोच असं तरी कुणाला फारसं वाटत नाही. उलट विकास झाल्याची मुख्य पावती म्हणजे मिळवलेला पैसा आणि तो जास्तीत जास्त वापरण्याची जागा म्हणजे घर.

तसं घर असावं म्हणून मग प्रमोटर्स, बिल्डर्स–गॅसवाले–इलेक्ट्रिकल आणि प्लंबिंगची कामं करणारे, गुरखे, मोलकरणी या सगळ्यांची मर्जी सांभाळायला मंडळी तयार आहेत. पण घराची प्रतिमा बदलायला तयार नाहीत.

स्त्रीपुरुष संबंधामध्ये सुद्धा एकनिष्ठता हीच महत्त्वाची अट आहे, विवाहितांमध्ये तर चांगलीच जाचक आहे. थोडेफार इकडेतिकडे करायची संधी मिळाली तर कोणी घेत असतील; पण त्याची संख्या फार मोठी नाही. परंतु व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेची शेवटची अवस्था ही स्त्रीपुरुष संबंधामधून व्यक्त होते असं म्हटलं तर बरेचसे लोक थोडं आधीच थांबूया म्हणतील.

'शेवटी कॉम्प्रोमाइज करावा लागतो' असं मानणारे तरुण–तरुणी फार आहेत.

'शेवटी करायची गोष्ट तुम्ही सुरवातीलाच का करता' एवढीच माझी शंका असते. तिच्याकडे एक कोटी म्हणून पाहिलं जात. एकूण पाश्चात्य समाजात घर जसं विसकटलं तसं आपल्याकडे दिसत नाही.

माझ्यावेळी घर म्हणजे पुरेसं खायला प्यायला मिळण्याची, योग्य कपडे आणि क्वचित विरंगुळा मिळण्याची; पण मुख्यतः मुलांना धाकात ठेवण्याची आणि बाप, आई किंवा क्वचित दोघानीही सत्ता गाजवण्याची जागा होती. धाक–तत्त्वज्ञानाच्या आईबापाचा तो शेवटचा कालखंड.

सध्या कोणत्याही करियरमध्ये अडथळा उत्पन्न झाला की, आईवडिलांची मुख्य कैफियत एकच 'आमचे हाल झाले, तसे पोराचे होऊ नयेत म्हणून सगळी धडपड केली, त्यांना काही कमी पडू दिलं नाही; पण निदान चांगल्या मार्कांनी पास होण्याइतकी जबाबदारीची जाणीव नाही.'

हा प्रश्न तसा जुना आहे. कोसलामध्ये पांडुरंग सांगवीकर विचारतो, 'खरं म्हणजे नुसत्या पैशानी अभ्यास कसा करता येईल? मार्कं मिळवले म्हणजे जबाबदार असं मानलं तर मग तीच उत्तम करियरची मुलं नोकरीत गेल्यावर आपल्या वरच्यांच्या शिव्या का खातात? पहिल्यापासून सगळं त्याना का पुन्हा शिकाव लागतं?

शिक्षण आणि व्यवहार यांच्या फारकतीपेक्षा एक काही महत्त्वाचा मुद्दा यात आहे. मोठे प्रयत्न न करता बरंच काही मिळवता येतं. घरात लाड आणि सुरक्षितता, नोकरीत बढती आणि स्थैर्य, आयुष्यात लौकिक आणि मान्यता! कष्ट वगैरे आपल्यासाठी नाहीत, झगडण्याच आपल्याला कारण नाही. आपण फक्त आहे त्या चौकटीचा जास्तीत जास्त फायदा उठवायचा. नातेवाइक, हाताखालचे लोक आणि जनता याची माया, श्रम आणि अज्ञान यांच्यावर आपण मोठं व्हायचं, हे नवीन तत्त्वज्ञान घरापासूनच सुरू होतय की काय?

असं असेल तर आपल सध्याच घर, सध्याची आर्थिक घडी आणि राजकीय चौकट मोडायला कुणीच धावणार नाहीत. उलट ती वरकरणी भक्कम राहावी, चोरवाटा आपल्याच हातात असाव्यात अशी काळजी घेतील.

पण सुरक्षितता, स्थैर्य आलं की कंटाळा पाठोपाठ येतोच. 'चारचौघांपेक्षा वेगळं काही तरी केलं पाहिजे' अशी टोचणी त्यानाच लागू शकते, ज्यानी ते वेगळं करण्याची संधी जाणूनबुजून अव्हेरून सुरक्षिततेची वाट धरली असते. ज्याक्षणी 'माझं असं मत आहे' असं म्हणणारा तरुण त्या मताची किमान किंमत–स्वतःला लागणारा पैसा–साधनं स्वतःच मिळवण्याची किंमत––मोजायला कचरतो, त्याच क्षणी त्यानं कंटाळवाणी वाट पकडलेलीच असते. आई-वडील नाकारणं सोपं असतं. त्याचा पैसा नाकारणं फार अवघड–वेगळं होतानासुद्धा, पुन्हा तोंड पाहणार नाही म्हणतानासुद्धा मला माझा शेअर आताच देऊन टाका म्हणणारे, पुन्हा तोंड वेंगाडणारे चारचौघांपेक्षा वेगळे कसे होणार?

आपण वेगळं केलं पाहिजे असं निदान सारखं म्हणतोय याचा आनंद वाटणारेही काही कमी नाहीत.

प्रत्यक्षात करणारेही पुष्कळ आहेत.

'तुझ्या आणि आमच्या पिढीमध्ये तुला काय फरक वाटतो?' माझ्याहून एका पिढीपेक्षा जास्त तरुण असलेल्या मित्रानं विचारलं.

**Platochem**

Shed No. 40, Parvati Industrial Estate,
Poona 411 009.

PHONE : 35976

**Electroplaters : Chromium, Bright Nickel, Silver, Zink, Copper & Copper Oxidizing etc. Hard Chromium, Barrel Plating & Aluminium Anodizing in any Colour**

'तुमची पिढी निश्चितच सुपीरिअर आहे. अनुभव, विचार आणि समज या तिन्हींमध्ये आमच्यापेक्षा फास्ट आहे.'

तो सुखावला पण थोडासा भारावलाही. मी म्हणालो, 'माझं बोलणं संपलं नाही. असं होणं हा उत्क्रांतीचा नियमच आहे. तू सुपीरिअर आहेस यात जशी तुझी वैयक्तिक कमाई काही नाही तसं मी कबूल करतो त्यात माझा मोठेपणाही काही नाही.'

'विनय, माकडांना पोहता येत का?' दोन चमकणारे डोळे म्हणाले.

मी चक्रावलो. समजा येत असल तर नसलं तर? इथे अप्पा बळवंत चौकात त्याचं काय?

'तसं नाही, येत असेल तर बिरबलाची गोष्ट खोटी ठरते' डोळे जास्तच चमकले.

ट्रेकवर गप्पा चालल्या होत्या. पुढे जड आणि दोरान फेकून मारायचं असं काही शस्त्र असतं, त्यालाच विटा म्हणतात का?

'त्याला विटा कसं म्हणतील, फ्लेक्झिबल गदा झाली तो.'

'गदा फ्लेक्झिबल नसते. पाहा—'फ्लेक्झिबला तू कदा नास्ति गदा च रिजिडा सदा' महाभारतातला श्लोकच आहे.

'तू खरा बंडखोर असशील तर ऑफिसात जीन्स घालून जाशील.' 'मी ऑफिसात जीन्स घालून जाईन. पण माझी आवड म्हणून जाईन, बंडखोर म्हणून नाही.'

आता हा रोज जीन्स घालूनच जातो.

एक मैत्रीण फार उदासपणानं म्हणाली, 'माझ्या ग्रुपमध्ये मी फार वेगळी पडते असं सगळी म्हणतात. मला काय झालय कुणास ठाऊक.'

'पण तुझा वेगळेपणा हीच कदाचित तुझी ताकद असेल' असा विचार तू कधी केलास का?'

तिचा सगळा चेहरा नुसता फुलून गेला.

'मी तुला सर्वस्व दिलं' याची कधीही जाणीव करून न देणाऱ्या मुलीशीच मला लग्न करायचंय असं म्हणताच तत्काळ 'ही मी तुझ्याशी लग्नाला तयार आहे' असं म्हणणारी तरुणीही भेटू शकते.

त्या तिघांकडे मी फार उत्सुकतेन पाहतो. नवरा—बायको आणि तिचा मित्र. मित्राशी तिच प्रथम लग्न ठरलं होतं. नतर त्यानी लग्न करायच नाही, मैत्रीच ठेवायची असं ठरवलं. तिनं लग्न केलं. आधीचं सगळं नवऱ्याला माहीत असूनही त्यांचे संबंध अगदी सहज आहेत.

शिक्षण संपलं की बरेचसे मित्र बदलतात. आर्थिक संबंधानुसार सहवासाचे तास ठरतात, त्यातून नवे मित्रही मिळतात. पण हे तिघे-चौघे एका कॉलेजात, एका बेंचमध्ये होते. एकत्रच व्यवसाय सुरू केला. बऱ्यापैकी यशही मिळवलं. सगळे आनंदात असतात. मुख्य म्हणजे सगळे मराठी असूनही आम्हाला एकमेकाच्या चहाड्या कधीच सांगत नाहीत.

'मी त्याच्याशी बोलते, पाहून हसते एवढंच. त्यानं मला लग्नाच विचारलंय. मी काहीच उत्तर दिलेल नाही; पण माझं गप्प बसणं हाच होकार मानून तो सगळ्याना सांगतोय.' ती त्रासून म्हणाली.

'माझ्याकडे येऊन त्रागा कशाला करतेस' त्याचा कान पकडून विचार म्हणजे ही वाईट सवय जाईल मैत्री कायम ठेव म्हणजे झालं.' रणरागिणी उठली आणि लढाई जिंकून आली

ट्रेकिंगमध्ये तर प्रत्येकामधलं सत्त्वच प्रकट होतं. कारण खरोखरच साहसी ट्रेक असला तर युद्धाप्रमाणेच एका चुकीच्या निर्णयामुळे काही जणाचे जीव संकटात पडू शकतात. धाडस, चिकाटी, शरीराची ताकद, मनमिळाऊपणा, प्रसंगावधान वगैरे तर कळतंच, पण परवाच एक जण जंगलातल्या मुक्कामावर म्हणाला, 'विन्या, रात्री जे खरंच ग्रेट आहेत त्यांच्या जवळच आपल्याकडच्या गृप्त्या कुऱ्हाडी असू देत'

'आपले अंदाज, कधीकधी निष्कर्ष हे नकाशासारखे असतात. नकाशावरून प्रदेश कळतोच असं नाही.' असंच एका चर्चेतलं वाक्यं.

बावीस-तेवीस वर्षाचा तरतरीत मुलगा—बुद्धिमान, उत्कृष्ट विनोदबुद्धी असलेला काही नवीन ऐकताना एकदम लकाकणारी नजर कोणत्याही कॉलेजात गेला असता तर युवक-युवतीचा घोळका त्यानं स्वत.भोवती गोळा केला असता.

पण आज तो ब्रदर आहे, उद्या फादर होईल. कोणत्याही आर्थिक लाभासाठी त्यानं हे व्रती आयुष्य स्वीकारलंय असं वाटत नाही. पॅन ख्रिश्चॅनिटी वगैरेही त्याच्या डोक्यात नाही.

'अशी मुलं मिळत असतील तर ख्रिश्चन धर्माला काही मरण नाही.' त्याला पाहून अनेकांना वाटतं.

'वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, इफिशिअन्सीचा आग्रह धरला की, कधीकधी अगदी जवळचे लोक, वर्षावर्षांचे मित्र, घरातली माणसं दुखावतात. मनाला त्रास होतो, पण म्हणून या गोष्टीचा आग्रह सोडून कसं चालेल!'

'मोठा भाऊ अमेरिकेत आहे, तो माझी सगळी व्यवस्था करायला तयार आहे; पण मलाच तिकडे जाण्यात काही चार्म वाटत नाही. शिकायचंच असेल तर इथे काही कमी नाही आणि भावाच्या जिवावर जाण्यात कसलं आलंय मेरिट. तो स्वतः मेरिटवरच गेला असताना मला त्याच्या मदतीनं जाणं नको वाटतं.'

असे कितीतरी चेहरे अवतीभवतीच असतात. देश, समाज, त्याग, तळमळ वगैरे काही न बोलणारे, रूढार्थानं पाहिल तर सामान्य चार चौघासारखेच जगणारे.

मात्र त्याची संख्या वाढली पाहिजे. कारण ते दिसतात तेवढे सामान्य नाहीत.

'माझ्या पश्चात हे काम कुणी सांभाळावं याचा विचार मी करतो. तेव्हा प्रौढांची नावही समोर येतातच; परंतु युवकाच्या मनाची उभारी वेगळीच असते, तिला सगळ्यानी मान द्यायला शिकलं पाहिजे.'

'सैन्यामध्ये जनरल्सना जसे तीन वर्ष झाल्यावर निवृत्तच करतात. तसच ३।४ वर्ष झाली की, सामाजिक, राजकीय आंदोलनाच्या नेत्यांना निवृत्त करून तरुणाच्या हाती नेतृत्व दिलं पाहिजे'

दोन अगदी वेगवेगळी कामं ज्यानी उभारली अशा दोन प्रभावी युवक नेत्याचे हे शब्द आहेत

पहिल्या पिढीनं गावस्कर विश्वनाथ दिले तर पुढची पिढी कपिल, शास्त्री, अझरुद्दीन देते हा आपला अनुभव आहे.

□



# पाठलाग

**विनया खडपेकर**

मुंबईतले संध्याकाळचे साडेपाच वाजले. कचेरीच्या भल्या मोठ्या इमारतीतून वर्षा बाहेर आली. समोर मावळत्या सूर्यकिरणात समुद्र चमकत होता. वाऱ्याचा मोठा झोत तिच्या अंगावर आला. तिला अगदी प्रसन्न वाटले. प्रवेशद्वाराशी क्षणभर थांबून वाऱ्याच्या झुळुका तिने मजेत सर्वांगावर झेलल्या आणि उंच टाचांच्या चपलांचा टक्‌टक् आवाज करीत कचेरीच्या पांढऱ्या गुळगुळीत पायऱ्या उतरू लागली. तिच्या बाजूच्या विभागातल्या कुळकर्णीबाई मागून आल्या.

'बस स्टॉपवरच येतेस ना?' कुळकर्णीबाईंनी विचारले.

'छे: मी जाताना चालतच जाते. सकाळी येते बसनी' वर्षा म्हणाली.

'अग, पण इथून किती लांब आहे स्टेशन! व्ही. टी. लाच जातेस ना?' कुळकर्णीबाई पुन्हा म्हणाल्या.

'हो. व्ही. टी. लाच जाते. चांगला अर्धा तास सहज लागतो पोचायला. कदाचित थोडा जास्तच. पण मला आवडतं चालायला!' वर्षा बोलली.

'बरं बाई! तुला घाईही नाही. लग्न झालं नाही तोपर्यंत घे मनासारखं वागून. एकटी जातेस ती जपून हं!' त्या म्हणाल्या आणि घाईघाईने पुढे निघून गेल्या. वर्षाला हसू आले.

असे तिला कशाकशाचे हसू यायचे! नोकरीबद्दल, स्थानकापासून एवढ्या लांब असणाऱ्या कचेरीबद्दल, स्थानिक गाड्यांबद्दल कोणी चिडचिड केली की तिला हसू यायचे! तिला अगदी प्रामाणिकपणे वाटायचे, यात काय चिडण्यासारखं आहे! घरापासून असं दूर येण्यात मजा असते की! इथल्यासारखी दुकानं, उंच उंच इमारती, सेफ्टीपिनेपासून टेपरेकॉर्डरपर्यंत पदपथावर विक्रीसाठी असलेल्या शेकडो तऱ्हांच्या वस्तू, मस्त हॉटेल्स, सगळ्या बाजूंनी अगदी जवळ दिसणारा समुद्र, त्यातल्या होड्या हे सगळं उपनगरात कुठं बघायला मिळतं? समजा आपण घेतल्या नाहीत वस्तू, गेलो नाही हॉटेलमध्ये, फिरलो नाही होडीतून तरी सगळ्यावरून नजर फिरवत फिरवत जाणं हेच कसं छान वाटतं! मजा करण्याची वृत्तीच नाही म्हणून करतात चिडचिड! त्या स्त्रीस्वातंत्र्यवाल्या बायका ओरडून ओरडून सांगताहेत थोडं स्वतःसाठी जगा! धीट व्हा! निर्भयपणे फिरा! बोलत्या व्हा! पण इथं ऑफिसमधल्या बायकांच्या कानापर्यंत काही पोचत नाही ते! एकसारखं आपलं लग्न—लग्न संसार—संसार!

अशाच विचाराच्या नादात कचेरीचा

परिसर ओलांडून वर्षा पदपथावरून चालू लागली होती. तिला नोकरीला लागून जेमतेम दोन महिनेच झाले होते. भोवताली दिसणाऱ्या झाडाकडे, माणसांकडे, प्रत्येक वस्तूकडे ती कधी कुतूहलाने, कधी हरखून जाऊन पहात होती. तिचा स्वभाव वयाला साजेसा, उत्साही, काहीसा स्वच्छंदी होता. म्हणूनच सध्याकाळी चालत चालत जाण्याचा तिचा कार्यक्रम होता.

पदपथावर असलेल्या नियतकालिकाची, पुस्तकांची शीर्षके वाचत, छायाचित्रे पहात, नावे पहात वर्षा चालली होती. मधूनच तिची नजर विकायला ठेवलेल्या कुठच्या तरी खेळण्यांवर जात होती. मधून कुठच्या तरी कारवर जात होती किंवा उगीच इकडे-तिकडे भिरभिरत होती. कोणाकोणाची नजर तिच्या टवटवीत चेहऱ्याकडे गेलेली तिच्या लक्षात येत होतं. त्यामुळं खुदुखुदु येणारं हसू प्रयासान दाबून टाकून शहाळ्याच्या स्टॉलवरची शहाळी, चणेदाणे विकणाऱ्याचे पिवळे-काळे, चणेदाणे पहात पहात ती चालली होती. हे सगळे तसे आता नेहमीचे झाले असले तरी अजून तिला त्याचा कंटाळा आला नव्हता. रमतगमत ती चालली होती. भोवतालच्या इमारतीतून शेकडो माणसे बाहेर पडत होती. स्थानकाच्या बाजूला चालू लागत होती. सगळे पांढरपेशे थकलेले चेहरे! तिने मनाशी म्हटले हेच ते मर्ढेकराच्या कवितेतले लोक !
' सकाळी उठोनी चहा-कॉफी प्यावी, आणिक गाठावी वीजगाडी—'

पदपथावरून माणसांचा प्रवाह स्थानकाकडे जात होता सगळयाच्या गतीत आपली गती मिसळून वर्षा चालली होती. असं प्रवाहातला बिंदू होऊन चालताना तिला नेहमीसारखीच गंमत वाटत होती. चारचौघीसारखाच असलेल्या तिच्या सावळ्या चेहऱ्याला एक तजेला होता. खांद्यापर्यंत कापलेले केस चालण्याच्या हेलकाव्याबरोबर मागेपुढे होत होते. गुलाबी रंगाचा सैलसर खमीस शरीराच्या गोलाईला झाकून टाकीत गुडघ्यापर्यंत गेला होता. गुडघ्यापाशी असलेली त्याची जाभळी किनार तिच्या चालण्याच्या तालाबरोबर तितकीच तालबद्ध गोल हलत होती. त्याच लयीत गुलाबी चुडीदारवर चुण्या फुलत होत्या आणि विरत होत्या. लहान लहान गुलाबी फुलाच्या नक्षीची जाभळी चुन्नी दोन्ही खांद्यावरून मागे जाऊन लयदार हालचाल करीत होती. चुन्नीची दोन्ही टोके एकाच सरळ रेषेत राहतील याची वर्षा अगदी लीलया काळजी घेत होती. नाही तर काही काही मुलींच्या चुन्नीचं एक टोक अगदी टाचेला येऊन भिडतं, तसला गबाळेपणा नको बाई ! पिवळ्या रंगाची मारुती कार पदपथाच्या अगदी जवळून गेली. कार चालविणाऱ्या रूबाबदार तरुणाकडे वर्षाचे लक्ष गेले. कार क्षणात पुढे गेली. दिसेनाशीसुद्धा झाली; पण तिचे मन त्या कार पाठोपाठ धावत गेले. ती स्वतःच्या मनाशीच कुजबुजली, असाच कोणी तरी भेटला पाहिजे हेल्दी, कुरळ्या केसांचा आणि—

सपकन् तिच्या पार्श्वभागावर फटका बसला. ती केवढ्यांदा दचकली ! तिच्या छातीत धडधडले. अभावितपणे तिने भोवताली पाहिले. क्षणात तिच्या लक्षात आले, तिच्यापासून पुढे चार-पाच हातांच्या अंतरावर सथ चालत असणाऱ्या माणसाचीच ही कृती. तिचा चेहरा कावराबावरा झाला. चोरून तिने भोवताली पाहून घेतले. कोणी पाहिले असले तर? तिला अगदी त्या कल्पनेनेच शरम वाटली; पण भोवतालची माणसे आपल्याच नादात चालली होती. तिला तेवढंच बरं वाटलं ! छातीत धडधडत असतानाच ती सावधपणे चालू लागली. तिला तो एका बाजूने स्पष्ट दिसत होता. त्याचा चेहरा कुरूप नव्हता. सुरूप नव्हता. अगदी साधा होता. रंग गोरा नव्हता. काळा नव्हता. आपला उन्हाने रापलेला तपकिरी होता. कपडे घुवट होते. पँट तशी थोडी आखूड होती तो पांढरपेशा वाटत नव्हता. अगदीच राबणारा मजूरही वाटत नव्हता. दोन्हीच्या मधेच कुठे तरी होता. तिने स्वतःला प्रश्न केला, कशावरून हाच तो? त्याच्या चेहऱ्यावर त्याने काही तरी केल्याचे चिन्ह नाही, मला का वाटते की हाच तो ? तिला कारण सापडेना; पण खात्री वाटली की हाच तो ! त्याचा चेहरा अगदी मख्ख होता. कोरडा होता त्यावर कोणतेच भाव नव्हते. तिने स्वतःची चालण्याची गती मद केली. तो आपोआपच थोडा पुढे गेला. त्यांच्यातले अतर थोडे वाढले. तिला वाटले, आता जाणारच तो पुढे निघून ! या विचाराने छातीतली धडधड खूप कमी झाली तरी अस्वस्थपणे, सावधपणे ती चालली होती. जरा वेळ गेल्यावर तिच्या लक्षात आले, त्याचीही गती मद झाली आहे. त्याच्यातले अंतर पुन्हा थोडे कमी झाले आहे. वर्षाच्या मनात आले, तो पुढे असताना त्याला कसे कळले मी चालण्याची गती मंद केली आहे ? तिच्या हातापायांना कंप सुटला. श्वासोच्छ्वास जलद होऊ लागला. कोणाला सांगावे का ? पण सांगणार काय ? त्याने कसे मारले हे ती सांगू शकत नव्हती त्यानेच कशावरून मारले हे ती सिद्ध करू शकत नव्हती. त्याने पुन्हा तिला धक्का दिला नाही. तिच्याकडे वळून पाहिलेसुद्धा नाही; पण स्वतःची गती तो तिच्याबरोबर ठेवीत होता. ती जलद चालू लागली की तो जलद चालू लागायचा. ती सावकाश जाऊ लागली की तो सावकाश जाऊ लागायचा काहीच न सुचून ती पाय ओढीत मुकाट्याने चालत होती. एकदा तिला वाटले, हा उगीच आपल्याच कल्पनेचा खेळ आहे कोणी तरी हलकटपणे मारलं हे खरच ! पण तो हाच कशावरून ? अशी किती तरी माणसं याच दिशेनं चाललेली आहेत. मी याचाच का सशय घेते ?

दुसरा कोणीतरी मागून मारून निघूनही गेला असेल. पण आत आत तिला वाटत होते, दुसरे-तिसरे कोणी नाही. हाच तो ! तिला वाटले चौकात गेल्यावर कुठेतरी वळणे त्याला भागच पडेल. मग आपण दुसऱ्या रस्त्यावरून निघून जाऊ. श्वास रोखून ती पहात होती तो कोणत्या बाजूला वळतो आहे. पण चौकात आल्यावर पदपथाच्या कोपऱ्याशी तो थांबून राहिला. तिच्याकडे न पाहता थाबून राहिला. जसा काही तो दुसऱ्याच कोणाची तरी वाट पहात होता. भीतीची एक जोरदार सणक तिच्या मनातून पायापर्यंत निघून गेली. तिला वाटले, आता टॅक्सी पकडावी चालताना ती रस्त्याकडे पहात होती पण एकही टॅक्सी सहज रिकामी दिसत नव्हती. ती थाबली. दिसणाऱ्या प्रत्येक टॅक्सीला हात करू लागली. पण प्रत्येक टॅक्सी भरून आलेली होती. तिच्या हाताला अर्थातच जुमानत नव्हती. एक दोन रिकाम्या असलेल्या टॅक्सीही न थांबता निघून गेल्या. बराच वेळ ती थांबली. दहा मिनिटे होऊन गेली असतील रस्त्याने जाणाऱ्या कोणीतरी तिला म्हटले, ' इधर

# पोषणकर्ता व प्रतिपालक

## केवळ आयुर्विमाच तुम्हाला भरपूर उत्पन्न देऊन तुमच्या कुटूंबियांचा पूर्ण संभाळ करूं शकतो!

बचत व गुंतवणुकीच्या योजना तशा खूपच आहेत. त्यांतील बऱ्याचशा योजना भुरळ पाडणाऱ्या वाढत्या व्याजाची, आकर्षक लाभांशाची व मोठया बोनसची गोड गोड अभिवचनें देतात.

अर्थात् कुटुंबाचे संरक्षण सोडून सर्व काही!
आयुर्विमा मात्र एक अशी गुंतवणूक आहे की जिच्यामुळे तुमच्या कुटुंबास आजन्म संपूर्ण संरक्षणाची हमी तर मिळतेच पण फायदा ही खूप होतो. पोषणकर्ता व पालनकर्ता ह्या दुहेरी जबाबदाऱ्या आयुर्विम्याच्या सहाय्यानेंच तुम्ही सहज निभावून नेता!

विशेष म्हणजे, तुमच्या आयुर्विमा पॉलिसीच्या उदार सहाय्यानेंच, संपत्ति कर, प्राप्ति-कर व बक्षिस-करांच्या कचाटचातून सुटल्याचा निःश्वास तुम्ही टाकता. एवढेंच नव्हे तर कर्जास तारणापोटी हि ती उपयोगी पडते.
मुलांच्या शिक्षणाचा खर्च, त्यांच्या भविष्याची जडणघडण, विवाह व इतर नजरेच्या टप्प्यांतील खर्च केवळ आयुर्विम्याच्या पॉलिसीवरच यथाकाल उपलब्ध झालेल्या पैशांतून तुम्ही भागवू शकाल!


तुमची आयुर्विमा पॉलिसी, पोषणकर्त्यांचा आसरा नष्ट होण्याच्या भयापासून तुमच्या कुटुंबाचे संरक्षण करीत असतानाच तुमची सावकारांच्या पाशातून पूर्णतः मुक्त अंशी, जायदाद तुम्ही निर्माण करीत असता!

तुम्ही पालनकर्ते अन्नदाता तर आहातच पण तुमच्या आयुर्विमा पॉलिसीमुळे तुम्ही प्रतिपालक देखील होता.

एवढें अमाप दातृत्व असलेला आयुर्विमा लक्षावधींच्या पसंतीस न उतरला तरच आश्चर्य!

आपली ही पसंती आयुर्विमाच असू द्या! नजीकच्या विमा शाखा कार्यालयास किंवा तुमच्या विमा प्रतिनिधीस भेटा. तुमच्या गरजानुरूप योग्य अशी पॉलिसी तो तुम्हास दाखवेल. वर्षानुवर्षे तुमच्या कुटुंबास ज्याची वारंवार आठवण येत राहील अशा संरक्षक छत्रांत गुंतवणूक करा!

**विमा घ्या व निश्चिंत व्हा!**



**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

daCunha/LIC/161/85/MR/R

नही मिलेगा बहेनजी टॅक्सी' तिला वाटले याच माणसाच्या सोबतीने चालू लागावे. पण तिचा निर्णय होईपर्यंत तो गर्दीत कुठेतरी मिसळूनसुद्धा गेला होता. तिने चौकाच्या दिशेने पाहिले. पदपथाच्या टोकाशी 'तो' निश्चलपणे उभा होता. एवढ्या गर्दीतून तिने त्याला बरोबर हेरले. टॅक्सी मिळत नाही. आता काय करणार? अनोळखी माणसाला काय आणि कसे सांगणार? मधूनच दिसणाऱ्या बायका तर कमालीच्या धावत स्थानकाच्या दिशेने चालल्या होत्या. हिला सांगावे, तिला सांगावे असे वर्षा ठरवेपर्यंत ती बाई पुढे निघून जात होती. तिने धीर केला. पुढे जातच रहायचे! एवढी माणसं भोवताली आहेत. तो असं काय करू शकतो! त्याला लक्षात न घेताच आपण निघून जायचं! चौकात आल्यावर त्याच्याकडे न बघता ती डाव्या बाजूला वळली. पण काही क्षणातच स्वतःचं अस्तित्व तिला जाणवेल अशा बेताने तो तिच्या बाजूने चालू लागला. भीतीने तिचा जीव कासावीस झाला. तिने निश्चय केला, आता कोणाला तरी सांगायचेच! ओळखीचे कोणी दिसतच नव्हते. तिने सभ्य दिसणाऱ्या अनोळखी माणसाला म्हटले, 'जंटलमन, वो वो आद–आदमी वो वो...' संकोच आणि भीती यामुळे शब्द नीट उमटतच नव्हते. ते घशातच अडखळत राहिले. त्या माणसाने तिच्याकडेच विचित्र नजरेने पाहिले. आणि तो निघून गेला. ती मुकाट्याने चालू लागली. चालताना आता तिला विलक्षण थकवा वाटत होता. भोवताली माणसांचा समुद्र हेलावत होता. पण तिला अगदी एकटं एकटं वाटत होतं. जशी काही त्या समुद्रात भीतीच्या बेटावर ती एकटीच उभी होती. सावळा चेहरा श्रमानी लालसर दिसत होता. कपाळावर घर्मबिंदू साठले होते. तिला वाटलं आपण कुठेतरी थांबावं! आणि अचानक युक्ती सुचली. तत्क्षणी जरा सुटल्यासारखं वाटलं. एका मोठ्या इमारतीपाशी ती थांबली. प्रवेशद्वारामधे असलेल्या अनेक पाट्या ती वाचू लागली. तिने घड्याळात पाहिले. येथे मी थांबणार आहे, मला आत शिरायचे आहे असा तिने बहाणा केला. डोळ्यांच्या कोपऱ्यातून ती अंदाज घेत होती. हा किती दूर गेला असेल, जाईल? तिच्या मनात आले, एवढ्या मोठ्या गर्दीत असे कपडे घातलेली कितीतरी माणसं! आपण कसे ओळखणार त्याला? तेही समोरासमोर न पहाता डोळ्यांच्या कोपऱ्यातून! पण एकेक गोष्टी, एकेक वेळ अशी असते की माणसाला सारे अचूक दिसते, कळते! दूर साधारण तीस पस्तीस पावलांच्या अंतरावर तोसुद्धा असाच थांबला होता. त्याच्या समोरच्या इमारतीमधल्या पाट्या वाचीत होत्या. आरशातल्या प्रतिबिंबाने तीच कृती करावी तसा! जसे काही तिचीच कृती करून तो तिला सांगत होता, माझे तुझ्याकडे लक्ष आहे! वर्षाला वाटले, पुन्हा मागे वळावे? छे: मग कळूच शकणार नाही की तो कसा कुठून येतो आहे? शिवाय त्याला निश्चित कळेल की मी घाबरले आहे आणि तो जास्तच मागे लागल. ती पुन्हा पुढे चालू लागली. काय करील? काय करील? तिच्या घशाला कोरड पडली. समोरून एक बाई येत होती. वर्षाला वाटले, तिने आपल्याला विचारावे, 'का घाबरलीस? काय झालं तुला?' पण ती बाई तशीच निघून गेली. मग वर्षा स्वतःवरच चिडली. मीच का नाही म्हटले तिला 'अहो थांबा. मला भीती वाटते आहे.' तिने बाजूला पाहिले. पदपथाच्या बाजूने मैदानाची जाळी होती. मैदानात फुटबॉल, क्रिकेटचा खेळ चालला होता. तिकडे कोणाला काही कळणं शक्यच नव्हते. पदपथाच्या



दुसऱ्या बाजूने असलेल्या रस्त्यावरून बसेस, टॅक्सी, कार माणसांनी भरभरून धावत होत्या. त्यांचाही वर्षाला उपयोग नव्हताच. चौकातून इकडे वळल्यावर या पदपथावर म्हणण्यासारखे फेरीवालेही नव्हते. गर्दी त्या बाजूपेक्षा तशी कमीच होती. तरीही बरीच माणसे होती. वर्षाला वाटले, मी इतकी घाबरलेली कोणाला दिसत कशी नाही? पण मुंबईच्या माणसांना, विशेषतः कचेरीला येता–जाताना गाड्या पकडणाऱ्यांना केवळ स्वतःचा रस्ता दिसतो. इतर काही दिसतच नाही. दिसलं तरी थांबून बघण्याइतका त्यांना वेळच नसतो. कदाचित वेळ असला तरी परक्या माणसाबद्दल विश्वास नसतो. पायात गोळे आले असतानाच ती असहाय्यपणे चालत होती आणि तिला दिसले, जाळी तुटलेल्या एका ठिकाणी तो मैदानात शिरला. डोळे फाडफाडून ती पहात होती. तिचा विश्वासच बसत नव्हता; पण तो खरंच मैदानात शिरला. तिच्या मार्गाशी काटकोनात चालू लागला. दडपल्या मनाने ती पहात होती. त्याचा ठिपका दूर गेलेला तिला दिसला. छातीवरचा प्रचंड दगड कोणी तरी उचलून टाकावा तसे तिचे झाले.

वाऱ्याची झुळूक आता तिला जाणवली. थोडीफार तरतरी आली. तिला वाटले, पाणी प्यावे! पण तशी शक्यता नव्हती. शिवाय वेळ न दवडता जलद व्ही. टी. स्थानक गाठायचे होते. अजून ती बिचकत बिचकत सावधपणे चालत होती. तिला वाटत होतं, जाळी तुटलेल्या कुठून तरी तो पुन्हा येईल. एक मैदान संपून चौक ओलांडल्यावर दुसरे मैदान सुरू झाले. पुन्हा पदपथाच्या एका बाजूला मैदान. रस्त्याच्या पलीकडे टेलीफोन एक्सचेंजची मोठी इमारत. तिच्या मनात आले, आत अजून शेकडो माणसं असतील; पण बाहेरच्या बाजूला त्यांचा मागमूस नव्हता.

मन थोडे शांत झाल्यावर तिला एकेक विचार सुचू लागले. मुलुंडमध्ये असा अनुभव कधी आला नव्हता. म्हणजे कोणीतरी काहीतरी बोलणे, गर्दीत धक्का मारणे हे सर्रास होते; पण असा सतत पाठलाग तिला माहिती नव्हता.

गेल्याच आठवड्यात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे वर्तमानपत्रात आलेले उद्गार तिला

आठवले. अंधार पडल्यावर गेटवे आणि एकंदर भोवतालच्या भागात महिलांनी हिंडू नये असे त्यांनी म्हटले होते. या बोलण्यावर ऑफिसमधल्या मैत्रिणींबरोबर गप्पाही झाल्या होत्या. लंच टाइममध्ये कुलाबा स्ट्रीटवरची एक–दोन दुकानं पालथी घालून ऑफिसला परत जायला त्या बसस्टॉपवर उभ्या होत्या. तेव्हा एकजण म्हणाली, 'हा एरिया अगदी पॉश दिसतो; पण रात्री इथे कसले कसले धंदे चालतात' दुसरी म्हणाली, 'हो अग, इथल्या लेडीज हॉस्टेलला रहाणारी माझी मैत्रीण सांगत होती एकदा अंधार पडला की बस! पायात चाळ बांधून फिरणारी बाई म्हणजे अगदी खूणच...' 'ताजमहाल हॉटेल जवळच्या लहान गल्ल्या आहेत ना, तिथे पण बाई आणि बाटलीचेच धंदे म्हणतात...' आणखी कोणीतरी म्हणाली, 'उघडच आहे. म्हणून तर, वसंतदादा बोलले असणार कालच पेपरमध्ये आलं नाही का!' वर्षाच म्हणाली होती. 'वर्षा तूच रोज एकटी चालत जातेस हं. आम्ही दादरपर्यंत पोहोचतसुद्धा असू तेव्हा तुझी स्वारी व्ही. टी. ला येते मला वाटत ..' 'ए: त्यात काय, एवढे लोक असतात. उगीच काय–' वर्षा बोलत होती. बस आली आणि ते सगळं बोलणं तिथेच सपलं. आता ते सगळं आठवल्यावर स्वत:ची अगदी खोडकी जिरल्यासारखे वर्षाला वाटले. ती स्वत:च्या मनाशी म्हणाली, म्हणजे बायकांनी काय एकटं फिरायचंच नाही? वा रे वा असं कसं चालेल? पत्रच लिहायला पाहिजे पेपरमध्ये. स्वत:च्याच नादात ती पुन्हा चालू लागली होती. आणि एकदम कोणीतरी जोरात खाकरले त्या बाजूला तिची नजर गेली. भीतीचे वारूळ सर्‌कन् तिच्या अंगावर चढले. थोड्या वेळानंतर तो पुन्हा तिच्या जवळ उगवला होता. अगदी जमिनीतून वर यावा तसा अचानक उगवला होता. तो कुठून आला, कसा आला तिला काहीच कळले नाही केव्हा दुर्लक्ष झाले, केव्हा अवधान सुटले हे विचारांच्या नादात तिच्या लक्षातच आले नाही. पायात मणामणाच्या बेड्या असाव्यात तसे तिला वाटू लागले. स्थानक आता फार लांब राहिले नव्हते; पण अंधार वातावरणात मिसळू लागला होता. यांत्रिकपणे ती चालत होती. आपण जोरात चालतो आहोत की मंद चालतो आहोत हेच तिला कळत नव्हते. फक्त रस्त्याचे टोक दिसत होते. ते गाठले की पुढे स्थानकाचाच परिसर. तेथे फळवाले, फेरीवाले यांची गर्दी! अंतर तसे थोडेच उरले होते. थोडे रेटायला हवे होते. तो तसाच अंतर राखून मख्ख चेहऱ्याने तिच्या बाजूने चालला होता. भीतीने तिच्या पोटात खड्डा पडला होता. रस्त्याच्या टोकाकडे नजर खिळवून ती पावले उचलत होती.

तिचे शरीर थकलेले! डोके सुन्न झालेले! मन बधीर झालेले! तरीही त्यात आत्मरक्षणाची जाणीव अगदी जागी होती त्या जाणीवेच्या आधारानेच त्याच्यावर नजर ठेवून ती यांत्रिकपणे चालत होती.

एकदम तो चालायचा थांबला तिला काही कळायच्या आत तिच्या अगदी समोर उभे राहून त्याने विचारले, 'काय चहाला येणार का?' 'शी: घाणेरडा!' सपकन् तिच्या तोंडून शब्द बाहेर आले. भीतीचं अंगावर चढलेलं वारूळ कसं कुणास ठाऊक जमीनदोस्त झालं क्षणार्धात भोवतालची परिस्थिती तिला जाणवली. मागेपुढे पन्नास पावलांच्या अंतरावर कोणी नव्हते. त्याने अचूक वेळ साधली होती. एवढ्या गर्दीच्या मुंबईत त्या क्षणी तिच्या अगदी भोवताली अशी माणसेच नव्हती. चित्रपटगृहाच्या मागच्या बाजूला उभ्या असलेल्या दोन–तीन कार, टॅक्सीमधले ड्रायव्हर गलिच्छ नजरेने पहात होते. 'हां! यायचं नाही का?' पुन्हा त्याचे घोगऱ्या आवाजातले शब्द. अवाक् होऊन ती जमिनीला खिळली. तिच्या कपाळावर आठ्या पडल्या. क्रुद्ध नजरेने तिने त्याच्याकडे पाहिले. हेतुत: विचाराने ती आता काही करीत नव्हती जे काही घडत होते ते आपोआप घडत होते. स्वत:चे दोन्ही हात एकमेकांवर दाबत ती खवळून म्हणाली, 'शरम वाटत नाही का?' त्याचा चेहरा मख्ख. डोळे शुष्क आपण काही मवालीगिरी करतो आहे असा भाव नाही 'यायचं नाही का?' पुन्हा त्याने थंडपणे विचारले. जसे काही आपले तसे ठरलेच होते किंवा आपण नेहमीच जातो तर आज का नाही? जसे काही असे विचारण्यात काही वावगे नव्हतेच. 'शी: नालायक!' अभावितपणे ती जवळजवळ किंचाळली. तो तसाच मख्खपणे पहात




होता. त्याच्या पलीकडे थोडं लांब तिला पोलीस दिसला. 'पोलीस–' सगळं बळ एकवटून ती मोठ्याने ओरडली. तसा 'तो' खटकन् वळला. रस्ता ओलांडून दुसऱ्या बाजूच्या पदपथावर गेला. अगदी निर्विकारपणे तिच्या उलट दिशेने चालू लागला. जसे काही, काही घडलेच नव्हते. पोलीस थांबला होता. दोन पावले पुढे येत पलीकडच्या पदपथावरच्या पाठमोऱ्या त्याच्याकडे बोट दाखवत ती जेमतेम म्हणाली, 'केव्हापासून माझ्या मागे आहे .' तिच्या तोंडून अधिक शब्द फुटेनासे झाले· अचानक आलेले अवसान अचानक गळाले. आपले शरीर थरथरते आहे असे तिला जाणवले. पोलिसाने तिच्याकडे पाहिले. त्याच्या नजरेतून तिचे मध्यमवर्गीयपण लगेच लक्षात आले घाबरलेल्या कोवळ्या चेहऱ्याची गंमत वाटली पाठमोऱ्या जाणाऱ्या त्याच्यावर शिकाऱ्याची नजर रोखत तो तिला म्हणाला, 'तो बराऊन पॅंटवाला नव्ह का!'

'स्टेशनवर जायचं का बाई तुम्हाला? मग जावा की! समोरच तर हाय! मी पक्की नजर ठेवतो तेच्यावर.'

खरंच की स्थानक इतके जवळ आले होते हे तिच्या लक्षातच आले नव्हते. वाहनांच्या गर्दीतून अगदी धावत रस्ता ओलांडून ती स्थानकात शिरली. स्थानकात माणसांची




गर्दीच गर्दी. गाड्यांचा धडधडाट. ध्वनिक्षेपकावरच्या सूचना. त्या गर्दीत, त्या गोंगाटात तिला शांत वाटले. अर्धा पाऊण तास भीतीच्या चढ उताराच्या लाटा ती अनुभवित होती. पण तीन–चार तास त्या लाटा आपल्या अंगावर येत होत्या, असे तिला आता वाटत होते.

पोटात एकसारखं ढवळत असावे आणि वांती होऊन गेल्यावर शांत पण थकल्यासारखं वाटावे तसे तिला वाटत होते. तिला वाटत होते कोणीतरी ओळखीचं भेटले तर बरं होईल. शेकडो माणसांची ये–जा चालू होती. ती आपली शोधक नजरेने पहात होती. 'कुंदाताई...' वर्षानं एकदम हाक मारली. कुंदाताईने इकडे तिकडे पाहिले. पण कोणीच न दिसल्यामुळे मैत्रिणींबरोबर ती पुढे चालू लागली. वर्षाला वाटले, कुंदाताई हातची निसटणार. वर्षा झपाट्याने पुढे आली आणि कुंदाच्या खांद्यावर हात ठेवत ती म्हणाली,

'कुंदाताई...'

'अय्या ! कोण वर्षा ? मी ओळखलीच नाही तुला पटकन ! केवढी मोठी झालीस ग ! सर्व्हिस करतेस ? कुंदा म्हणाली.

'हो. दोनच महिने झाले सर्व्हिसला. रोज हीच गाडी असते तुझी ? ' वर्षाने सहज विचारले.

'नाही ग. केव्हाच जाते मी. तू काय म्हणतेस ? आई कशी आहे तुझी ?' कुंदा बोलली.

कुंदाच्या मैत्रिणींबरोबर वर्षा गाडीत चढली. सगळ्या घोळक्यात तिला अगदी सुरक्षित वाटलं. त्या सगळ्यांची बडबड चालली होती. 'ए फारच उशीर झाला बाई. ऑफिसच्या वेळेनंतर कसली सेंडऑफ पार्टी. आधीच करत जा म्हणावं.' 'तेच ना घरी आमची मुलं वाट पहात असतात.' 'काय ग सेन्ड ऑफच्या भाषणांना अर्थ. एन. के. जायचा म्हटल्यापासून मेहता खूष आहे. पण भाषण काय ठोकलं भरल्या हृदयानं.' 'बाकी आता आपण सरळ सांगून टाकू या हं कोणत्या तरी ऑफिसरचा सेन्ड ऑफला आम्ही थांबणार नाही. प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांनीच गेल्या आठवड्यात सांगून टाकलं आहे, अंधार पडल्यावर या भागात बायकांनी हिंडू नाही म्हणून !'

'मुख्यमंत्र्यांना म्हणावं आधी भाववाढ थांबवा. म्हणजे बायकांना नोकरी करायला लागणार नाही आणि त्या हिंडणार नाहीत.'

'वाः समजा नोकरी केली नाही म्हणून काय बायकांनी हिंडायचं नाही का ?' वर्षा त्यांच्या संभाषणात भाग घेत म्हणाली. 'ते झालंच हो ! पण आपलं सांगितलं' बोलणारीने उत्तर दिलं. वर्षाच्या प्रश्नाला मुद्देसूद उत्तर न देता त्या आपसात बोलत राहिल्या. 'या मुख्यमंत्र्यांना आता जाग आलीय. त्यांना म्हणावं तुम्ही नकोय बायकांना शिकवायला. या फोर्टच्या भागात हे आज कैक वर्ष चाललंय.' 'हो. अग, मी नोकरीला लागल्यालाच आता चौदा वर्षं झाली. तेव्हापासून या भागातल्या मवालीपणाचा एक्सपिरीयन्स आहे. एकदा मी आणि मैत्रीण क्रॉफर्ड मार्केटमधून निघालो. तर एक माणूस आपला आमच्या मागे थेट अगदी आमच्या ऑफिसपर्यंत येऊन ऑफिसची पाटी वाचून गेला. इतक्या घाबरलो होतो आम्ही'

'मग ? नंतर काय झालं ?' वर्षानं पटकन् विचारलं. 'व्हायचंय काय ? काही झालं नाही.' बोलणारी म्हणाली. 'ह्या एरियाच वाईट ग ! सबर्बमधे कसं सेफ वाटतं.'

'सबर्बमधे काय आणि इकडं काय, सगळं सारखंच !'

'नाही हं ! सबर्बमध्ये जाग असते उशीरापर्यंत.'

'शिवाय सबर्बमधे रहाणारे खूप आहेत. इकडे रेसिडेन्शियल बिल्डिंग कमी.या एरियात ऑफिसेस सुटली की सन्नाटा.'

'इथली फाइव्ह स्टार हॉटेल्स, स्मगलिंगचा माल यामुळे गुंड लोक वाढतायत. माझे मिस्टर म्हणत होते असं.'

'तरुण मुलींनी दिवसासुद्धा एकटं फिरायची सोय नाही राहिली या भागात. आपल्या ऑफिसमधली ती देसाई स्ट्रेन्ड

सिनेमाला बुकींग करायला गेली तर बसस्टॉपवर चक्क एकानं विचारलं सिनेमाला कंपनी देणार का म्हणून ! असली घाबरली. टॅक्सी पकडून चर्चगेटला गेली.'

'टॅक्सीवाल्यांचा तरी काय भरवसा !'

वर्षा ऐकत होती. जो अनुभव तिला आला होता त्यासारखेच अनुभव इतर जणींना आल्याचे तिला कळत होते. असला अनुभव आपल्या एकटीलाच आला नाही या कल्पनेनेच तिला दिलासा वाटला. नुकतंच जे घडलं ते त्या सगळ्यांना सांगून टाकावं असं वर्षाला वाटलं पण ते बोलायचे या कल्पनेनीच पुन्हा तिच्या छातीत धडधडले. तिला एकदम वाटले आपल्या घरापर्यंत कोणीतरी सोबत मिळावे. सगळे सांगून टाकून कुंदाताईला बरोबर ये म्हणावे असे तिला क्षणभर वाटले. पण प्रत्यक्षात ती म्हणाली,

'कुंदाताई पूर्वी आम्ही तुझ्या मावशीच्या शेजारी रहात होतो ना, आता तिथे नाही बरं का ! बाजूच्या बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावर रहायला गेलो गेल्याच वर्षी. आलीस की ये.'

'येत्या शनिवारी येणारच आहे मी !' कुंदा म्हणाली.

'मग चल की आताच. मला पण कंपनी होईल. एकटीला म्हणजे कंटाळा येतो ग !' वर्षा सहज बोलल्यासारखी बोलली.

'ए: शहाणे, माझी दोन पोरं आहेत घरी ! चल काय चल ! मावशीला सांग हं मी भेटले म्हणून !' एवढे बोलून कुंदा आणि तिच्या मैत्रिणी उठल्याच. भोवतालची गर्दी पहात वर्षा खिडकीच्या बाजूला सरकली. भोवताली पहात आणि ऐकत ती नुसती बसून राहिली. तिच्या मनात येत होते, 'कशी त्याच्याशी दोन वाक्य तरी बोलले मी ? कसं बळ आलं पोलिसाला हाक मारण्याचं ?' खिडकीतून ती बाहेर पाहू लागली. नको नको म्हटले तरी त्याचा मख्ख निर्विकार चेहरा पुन्हा पुन्हा तिच्या डोळ्यासमोर येत होता. पोलीस वेळेवर भेटला नसता तर ? त्याला हाक मारणे जमले नसते तर ? तो थांबला नसता तर ! तर–तर–तर–चित्रपटातली भेसूर दृश्ये तिच्या नजरेसमोर आली. ती शहारली. अंगावर काटा उभा राहिला. तिला स्वतःचाच राग आला. का घाबरावं मी ? उगीच जास्तच घाबरते आहे ! मघाशी त्या बाई नाही का म्हणाल्या एवढा त्या माणसाने पाठलाग केला; पण नंतर काही झालं नाही म्हणून ! पोलीस भेटला नसता तरी काही झालं नसतं ! निघून गेला असता तो ! काही करू शकत नव्हता भर रस्त्यात. स्वतःच्या मनाशी अशी समजूत घालायचा तिनं प्रयत्न केला तरी समजूत पटत नव्हती. पुन: पुन्हा तिच्या मनात येत होतं, त्यानं जर मला पकडलं असतं तर काय करू शकत होते मी ? काय करू शकत होते ? या मुंबईत मदतीची मुळीच खात्री नाही. निर्भय व्हायचं, धीट व्हायचं म्हणजे काय करायचं ? प्रत्यक्ष प्रसंग आला की त्यातून कसं निभवायचं ? एवढंसं काही तरी घडलं तर केवढी घाबरगुंडी झाली माझी ! नकोच ते पुन्हा ! तिने मनाशी निर्णय घेतला. उद्यापासून सरळ बसने व्ही. टी. स्टेशनला यायचे ! त्या निर्णयाने घाबरलेल्या, बावरलेल्या तिच्या मनाला सुरक्षित वाटले.

चाळा म्हणून ती गाडीच्या डब्यातल्या नेहमीच पाहिलेल्या जाहिराती पाहू लागली. खिसेकापूंपासून सावधान, कुटुंबनियोजन, गर्भपात, वृद्धाश्रम. ती जाहिरात पहात होती. एका जाहिरातीवर तिची नजर स्थिर झाली. कराटे शिकण्याची वर्गाची जाहिरात. कितीदा पाहिलेल्या त्या जाहिरातीने आज तिला ओढून घेतले. ती विचार करू लागली, 'जायचे आपण ? जमेल आपल्याला ?' नुसत्या कल्पनेनेच तिला उत्साह वाटू लागला. तिच्या तरुण वयाला समस्येतून बाहेर पडण्यासाठी एक वाट दिसली. मुलुंड स्थानक जवळ आले. तोपर्यंत तिचा निर्णय झाला होता– उद्या मैत्रिणींना विचारायचे तिच्याबरोबर कोण कोण कराटे शिकायला येणार ते ! आता एकटीला घरी जाण्याची तिला अजिबात भीती वाटत नव्हती.

आपण एक शिकलो की गुंड आणखी नवी तंत्रे काढतील, मध्यमवर्गीयांचे संस्कार, लहानपण.पासूनचे वातावरण, गुंडामागची अर्थशक्ती, सत्ता असे कोणतेही विचार वर्षाच्या आवाक्यातले नव्हते. तिने शोधलेल्या मार्गावर ती खूष होती.

□


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

लेक वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

काही दिवस श्यामचे काही राधाचे
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

रौप्य महोत्सवी

# महाराष्ट्र

१९६०-१९८५

इथे नांदते अस्मिता भारताची
इथे नित्य सन्मान हो भारताचा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Dialogue

# आज वाटतं,—

**सामान्यतः ज्या तारुण्याचा उल्लेख आपण करतो त्यापासून तर मी आज कोसन्‌कोस दूर आहे. आणि तरी एका खऱ्या अर्थानं मी आजच अधिक तरुण आहे.**

## विद्या बाळ

माझ्या आयुष्यातल्या २०–२५ वर्षांपूर्वीच्या काळाच्या तुकड्याचा मी अनेकदा विचार करते. पण त्याचे संदर्भ वेगळे असतात. आज मात्र हे तरुणपणीचं आयुष्य आठवतानाच्या माझ्या भावना संमिश्र आहेत. त्या त्या वेळी वाटलं तसंच जगले; पण आज वळून बघताना काही वेगळंच वाटतं. शारीरिक वयाच्या अंगानं विचार करून सामान्यतः ज्या तारुण्याचा उल्लेख आपण करतो त्यापासून तर मी आज कोसन्‌कोस दूर आहे. आणि तरी एका खऱ्या अर्थानं मी आजच अधिक तरुण आहे असं मला वाटतं. कैरीला पाड लागतो तिथपासून तो आंब्याचा स्वाद आणि चव भरायला लागेपर्यंतचा काळ तारुण्याचा मानला, तर आयुष्य कळून जगण्याची चव मला आत्ता-आत्ताच कळायला लागली आहे. वयाच्या अठरा किंवा अठ्ठाविसाव्या वर्षी मी तरुण नव्हते, तेवढी आज पन्नाशीच्या जवळ असताना मी मला तरुण वाटते. स्वतःचा म्हणून एक वेगळा विचार असणं, त्याचा काहीसा आग्रह असणं, रग आणि आत्मविश्वास वाटणं ही सगळी तारुण्याची लक्षणं असतील तर मी आजच अधिक तरुण आहे.

शाळा संपतासंपता खरी तारुण्याची सुरुवात होते. मी बालवर्गापासून अकरावीपर्यंत सलगपणे एका शाळेत शिकले. त्यामुळे माझी मलाच एक परंपरा होती. अभ्यासात, वर्गात, मैदानावर, शिक्षकवर्गात सगळीकडे, शाळा संपण्याच्या वेळेपर्यंत मी पक्की स्थिरावले होते. नववीपर्यंत अखंड पहिला नंबर होता. पहिला नंबरवाल्यांची दोन ठिकाणं 'पानपत' होण्याची असतात. एक म्हणजे चित्रकला आणि दुसरं म्हणजे पी. टी. मला या दोन्हींची मस्त साथ होती. वक्तृत्वस्पर्धेत मला बक्षिसं मिळायची. गायला आवाज गोड आणि सुरेल होता. तालाची कटकट न वाटता, मैत्री वाटायची. या सगळ्यामुळे मी म्हटलं तशी, माझीच मला कुठेतरी, काही तरी असण्याची एक परंपरा चिकटून बसली होती.

आपण दिसायला 'सुंदर' नाही हे मला चांगलं माहीत होतं. अगदी 'वयात आलेली गाढवीसुद्धा सुंदर दिसते' हे सुभाषित पाठ असूनसुद्धा, स्वतःबाबत माझा मुळीसुद्धा गैरसमज नव्हता. मी चारचौघींपेक्षा उंच, बांधा शेलाटा, लांबसडक डोळ्यात भरतील एवढे केस. एकदा माझी एक मैत्रीण अकरावीत असताना मला म्हणाली होती– 'तू पाठमोरी किती छान दिसतेस.' मला तिचं म्हणणं अजिबात खवचटपणाचं वाटलं नव्हतं. मी कशी आहे हे समोरचा आरसा मला सांगतच होता. पण माझं पाठमोरं सौंदर्य माझ्या मैत्रिणीनं एका वाक्यात पुढे ठेवलं होतं. मला वाटलं, चला आपल्याजवळ एक तरी बाजू किंवा कोन आहे तर! सौंदर्याच्या या (उणिवेच्या) जाणिवेमुळे, ही वस्तुस्थिती मी मान्य केली होती. पण त्यातून न्यूनगंड कधीच निर्माण झाला नव्हता. कदाचित असंही असेल, शालेय जीवनात ज्याला खूप किंमत असते असे बाकी बरेच चमकदार गुण माझ्याजवळ असल्याने, मला एक स्थान होते. वर्गात, मैदानावर आणि शिक्षकांच्या मनातसुद्धा. त्यातून मिळालेल्या आत्मविश्वासातूनच वर्गाचं म्होरकेपण करायला मला जमायचं आणि आवडायचंही. सुंदर मुलगी म्हणून मला कुणीच ओळखत नव्हतं पण चांगली मुलगी म्हणून बहुतेकजण ओळखत होते.

शाळेच्या शेवटी शेवटी ललित म्हणून माझ्याहून खरोखरीच खूप हुषार मुलगी माझ्या वर्गात आली. पहिल्या नंबरावरचं माझं सार्वभौमत्व संपलं आणि ते दुसऱ्या नंबरावर गेलं! शिवाय शाळा संपता-संपता माझी दृष्टी अभ्यासाच्या किरकोळ गोष्टींपलीकडे म्हणजे 'त्या तिथे, पलीकडे–' अशी 'विशाल' व्हायला लागली होती. मी प्रेमात पडले होते! माझ्या शाळेतल्या शिक्षकांबरोबर. मैदान गाजवण्याच्या तयारीत असतानाच प्रेमाच्या पहिल्याच बॉलला माझी विकेट पडली होती आणि तरी मी प्रचंड आनंदात होते. शरीर आणि मन मोहरण्याच्या नेमक्या अवस्थेत असतात, डोळ्यात टचकन् पाणी येतं, दुःखानं व्याकुळायला होतं, सहजच्या कुणाच्या शब्दांनी मन दुखावतं, अपमान झटकन जिव्हारी लागतो, आणि तितक्याच पटकन प्रेमभावनेनं हृदय घायाळ होतं– अशी जी 'हायली एक्सप्लोजिव्ह अँड इन्फ्लेमेबल' अवस्था असते, त्या काळात, वयाच्या १५–१६ व्या वर्षी मी प्रेमात पडले. सतराव्या वर्षी कॉलेजचं एक वर्ष होतं ना होतं तोच माझं लग्न झालं. कॉलेजतरुणी मी होते; पण त्याच वेळी पत्नी, सून, वहिनी इ. अनेक नात्यांच्या कोषात मी मजेनं आणि हमतहमत शिरले अभेद्य चक्रव्यूहात शिरल्याची भावना तेव्हा नव्हतीच. विविध भूमिकांची जबाबदारी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा संकोच करील, अशी शंकासुद्धा मनाला शिवली नव्हती. उलट 'कम व्हॉट मे'च्या थाटात, सर्व परिस्थितीत, काय वाट्टेल ते करून, म्हणजे तटाची भिंत होऊन नाही तर लव्हाळी होऊन निभावून नेईन ही जिद्द होती मनात.

तीस वर्षांपूर्वी मी प्रेमविवाह केला होता. शिक्षक–विद्यार्थिनी या नात्यातील विवाहाला आईवडिलांचा विरोध होता. म्हणूनच, काही झालं तरी विवाह फसता कामा नये ही जिद्द होती. कौटुंबिक अडचणी, आर्थिक ताण– सुरुवातीच्या काळात खूप होते. पण मी चंगच बांधला होता! स्वतः ठरवलेलं लग्न आणि विरोध पत्करून लग्न यात तारुण्यातली बंडखोरी संपली असावी. एरव्ही मी प्रेमळ, समजुतदार. त्यामुळं लवणं, वाकणं, समजावून घेणं, गिळणं, पडतं घेणं या शब्दांना

जागत जागत मी जगले. या प्रकारच्या जगण्यातून आपण 'संपन्न' होत जात आहोत अशी त्यावेळी माझी प्रामाणिक भावना होती, त्यामुळे त्यात त्यावेळी सल नव्हती, दुःख नव्हतं.

कॉलेजचं पहिल वर्ष मोठं छान होत. लग्न ठरलं होतं; पण झालेलं नव्हतं. मुला-मुलींचा आमचा असा एक झकास ग्रुप होता. बहुतेक जण हुषार, अगात 'काहीतरी' असणारे होते. जिमखाना भावेस्कुलसारख्या मध्यमवर्गीय ब्राह्मणी शाळेतून १९५३ साली बाहेर पडल्यावर, हा ग्रुप ज्यात पंजाबी, गोवन आणि मराठी अशी समिश्र मंडळी आहेत, फारच इन्टरेस्टिंग वाटला. आवडला.

कॉलेजचं पहिलं वर्ष नवीनपणामुळे बिचकवणारं होतं,पण लवकरच रूळवणारही ठरलं आयुष्य इतकं भरगच्च होत! आतर-महाविद्यालयीन खेळात कबड्डी आणि थ्रो-बॉलसाठी निवड झाली होती. खेळ आणि मनापासूनचा अभ्यास मैदानाला भरपूर वेळ मग पूर्णवेळ सपूर्ण कॉलेज. शिवाय प्रेमाच्या मनोमनीच्या कल्पनेंन तुडुंब होणारा दिवस. दिवस अपुराच पडायचा. आईसुद्धा इतकी छान की, पुरोगामी विचार वगैरे नसले तरी या सगळ्यातून घरकामाला वेळ द्यायची कटकट तिन कध्धी केली नाही! खेळाबाबत आठवत, कबड्डी (खरं तर तेव्हा हुतुतू म्हणत असू आम्ही!) मध्ये मी राखीव गडी होते. कुणीतरी न आल्यामुळे माझा संघात प्रवेश झाला पाठीवर 'आठ नंबर' लटकावून मी खेळले. पहिल्याच एस. पी. विरुद्धच्या मॅच-मध्ये काही चागल्या खेळी करून मैदान गाज-वल मॅचच्या दुसऱ्या दिवशी फर्ग्युसन रोड-वरून जाताना, मैदानावरचा 'आठ नंबर' लक्षात ठेवून कुणीतरी कॉमेंट्स केल्या, यात कौतुकच होत. तरीपण रस्त्यावर मुलानी, मैदानावरची ओळख उघडपणे द्यावी यामुळे मी भाबावले आनन्दलेसुद्धा. कॉलेजचं जग कस मोठ, खुलं आणि मुलंमुलींच समिश्र आहे याची खूण तेव्हा पटली होती. दुसऱ्या टर्मला थ्रोबॉल खेळताना काही मुलं प्रॅक्टिस द्यायला आमच्याबरोबर खेळायची. मुलं खेळा-यला असली की प्रॅक्टिस चागली मिळायची पण प्रॅक्टिसला रगतही यायची ही मुलं काही माझी खास दोस्त मंडळी नव्हती. २५–३० वर्षापूर्वी मुलामुलींच्या मैत्रीत आजच्या एवढा मोकळेपणाही नव्हता. तरीपण मैदानावरच्या या समिश्र खेळात अधिक मजा वाटायची, हे मला निःसंकोचपणे आणि आवर्जून सागा-वंसं वाटतं.

खूप मनाजोग छान वर्ष पार पडून, वर्गात दुसरी येऊन, बक्षिस मिळवून मी इंटरला गेले आणि एका मोठ्या आजारपणान गाठल. खेळाच्या मैदानाला रामराम ठोकावा लाग-लाच; पण वर्षही बुडाल. यावेळी पहिल्या वर्षानतर लग्न होऊन, लग्नानतरचं शिक्षण सुरू झालं होतं आणि त्यात प्लूरसीसारख्या आजारानं डाव साधला लग्नानंतरच्या बदल-लेल्या जीवनात कॉलेजजीवनाचा रंगच बदलला. या जीवनात कॉलेज कमी आणि घर जास्ती असं मिश्रण झालं. इथं मला लग्नानंतरच्या शिक्षणाविषयी अनुभवाचे बोल सागावेसे वाटतात. पहिल्या पदवीपर्यंतचं किमान शिक्षण लग्नापूर्वीच पूर्ण करून, मग लग्नाचा विचार किंवा कृती करावी अस मी म्हणीन. कारण आपल लग्न झालेलं असणं ही घटना आपल्याला सफाईनं, नकळत इतरा-पासून अलग पाडते! इतराच्या नजरेत तुम्ही जरा 'वेगळ्या' आणि दूरच्याच ठरता. शिवाय 'सासर' या कल्पनेत जे माहेरपेक्षा सामान्यतः वैशिष्ट्य असतं ते हेच की, तिथे तुम्हाला माहेरच्याइतकं मोकळं वाटत नाही. काचजाच असतो, फार प्रचड काम असतं अस नाही माझ्या घरी तर फारच अनुकूल वातावरण होतं. तरीपण लग्नापूर्वी तुम्ही 'लहान' असता. लग्नानंतर 'मोठ्या' होता. लग्नापूर्वी तुम्ही मुलगी असता पण सासरी गेल्यावर दीरनणदा बरोबरीच्या असल्या तरी तुम्ही 'मोठ्या'च झालेल्या असता किंवा असाव्या ही अपेक्षा असते. मुलीच्या मनाच्या घडणीतूनच सासरी कुणी क्वचित उच्चारलंही नसेल,अस जबाबदारीचं ओझं मानगुटीला बसलेलं असतं. लग्नापूर्वी आयुष्य एकटीच असतं, लग्नानतर ते दोघा-चंच नाही तर अनेकाबरोबर 'दोघाचं' या प्रकारच सामान्यतः होतं.

लग्नानंतर माझ्या शिक्षणात आधी आजारपण आलं वर्ष बुडाल्यामुळे एफ. वाय.-चा आवडता ग्रुप मोडला बॅच बदलली. नव्यानच लग्न झाल्यामुळे कॉलेज सपलं की गप्पात न रेंगाळता, होस्टेलवरच्या घोळ-क्यात न शिरता पाय आपोआप घराकडे वळत असत.

आणखी एक आठवतं. घर अगदी कॉलेज-जवळच होत. ५।१० मिनिटाच्या अंतरावर. तरी पण त्याकाळी वह्यापुस्तकाबरोबर पैशाच छोटंस पाकिट माझ्याभवती तरी कुणाच्याच जवळ नसायचं. मॅच जिंकल्यावर कॉलेजन दिलेली ट्रीट ही हॉटेलशी भेट! आठआणेसुद्धा जवळ नसायचे! मला बस–रिक्षाची गरज नव्हती हे खरं; तरीपण पैशाचं पाकिट बहुसख्याच्या कॉलेजपोषाखाचा भाग नव्हतच. माझा एकूणच विचार जरा गरजा, कर्तव्य यांच्याभोवती घुटमळायचा. त्यात उनाडपणा, भारावून जाव, वाहून जाव, या तारुण्याच्या फारशा खुणा नव्हत्या. ससार, नवरा, कौटुंबिक गोष्टी याच भान अधिक होतं. सगळ्या वाटा काहीशा बद करून मी स्वखुषीनच सासरच्या घरात शिरले होते. मित्रमैत्रिणीच्या ताफ्यात दाही-दिशा धुडाळाव्या, क्षितिजापर्यंत नजरेचे घोडे उधळू द्यावे, स्वत ही उधळावं, झोकून द्याव हा आवेग एकदम नियंत्रित झाला होता. कारण जोडीदारासाठी एकदा आधीच झोकून दिलं होत त्यामुळे तरुण वय असूनही मी वृत्तीनं पोक्त झाले होते. कॉलेजच्या शेवटच्या वर्षी विसाव्या वर्षी मी आईसुद्धा झाले होते.

कॉलेजच्या दुसऱ्या वर्षातल्या आजार-पणान खेळाच जगच बंद झाल. त्यामुळे लेखन आणि वक्तृत्व याकडे वळले वसत व्याख्यानमालेतला सहभाग, आकाशवाणी-वरची निमत्रणं, हे बी. ए. होण्यापूर्वीच मिळाल होतं. बी. ए. ला असताना, किती तरी वर्षांनी कमलाकर नाईक आणि मी अशा आमच्या सघान रानडे वाद स्पर्धेची प्रतिष्ठेची ब्रॉंझची सरस्वती–मूर्ती कॉलेजला मिळवून दिली. बी ए. ला अर्थशास्त्र घेणाऱ्या सर्व मुलींच्यात पहिली आले आणि देवल आपटे आगरकर हे विद्यापीठाचं पारितोषिक मिळवल सागायचा मुद्दा हाच की, कॉलेजात जे जे करून आपले गुण दाखवता येतात, नाव मिळवता येतं, चमकता येत ते सगळं मी मिळवल शिवाय लग्न झालं, मूल झालं तरी शिक्षण बद न पडता, चागल्या प्रकारे पूर्ण झाल,याच सासरी माहेरी सर्वांना कौतुक होत. किरकोळ व्याख्यानाची निमत्रणं, परीक्षकपदं, कथाची प्रसिद्धी, आकाशवाणी-वरची बोलावणी–या सगळ्यामुळे मी तृप्त

होते. खूपच खूप होते. यापलीकडे काही बघण्याची गरजच तेव्हा जाणवली नव्हती.

बी. ए झाल्यावर कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे नोकरीची गरज होती. परीक्षेतली गुणवत्ता असूनही ती मिळेना. म्हणून मग मनात नसतानाच एम. ए. ला नाव घातलं. खरं तर अर्थशास्त्राचा कटाळा आला होता. दुसऱ्या टर्मला आकाशवाणीवर तात्पुरती नोकरी मिळाली, तेव्हा एम ए च पहिलं वर्ष जेमतेम पुरं केलं. पुढे एम. ए. सोडून नोकरीच चालू ठेवली. 'गृहिणी' हा स्त्रियांचा कार्यक्रम मी सचलित करत होते. त्यावेळी आकाशवाणीवर शकर पाटील होते. सई परांजपे बालोद्यान बघायची. रजनी मुथा (आता निळू फुल्यांची पत्नी) ही फार चांगली निवेदक आणि नाटकातली कलाकार होती. पद्मा काकनूरकर होती. दिवस मजेचे होते; पण पद्मा, सई, रजनी यांच्यापेक्षा माझा गोतावळा वेगळा होता. त्यावेळीही मी त्यांच्यापेक्षा लहान असूनही थोडी 'मोठीच' होते! स्त्रियांच्या कार्यक्रमाच सूत्रसचालन करण्याची जबाबदारी श्री वाकर हे प्रोग्रॅम एक्झिक्यूटिव्ह आणि मी अशी वाहून घेत होतो; पण वयाच्या तेविसाव्या वर्षी आत्मनिर्भर स्वतत्रपणे जगण्यातून आलेला आत्मविश्वास माझ्याकडे होता का? त्या वेळी, गेल्या २२।२२ वर्षात पाहिलं तेवढ जग मी बघितलं नव्हतं. माझ्या विचाराना स्वत:ची पालवीसुद्धा नव्हती त्यामुळे आता गाठीशी आहे तेवढा अनुभव आणि त्यातून आकाराला आलेला विचार नव्हता हे तर उघडच आहे; पण कधीतरी पालवण्याच्या शक्यताही तेव्हा मला कळल्या नव्हत्या, जाणवल्या नव्हत्या. आज मी उभी आहे, त्याहून दूर जाणाऱ्या वाटेवरच मी तेव्हा उभी होते. एकच दुवा आजच्या आणि तेव्हाच्या कामात समान होता तेव्हा मी स्त्रियांचा साप्ताहिक कार्यक्रम साभाळत होते आणि दीड वर्षानतर आकाशवाणी सोडल्यावर मी 'स्त्री' मासिकाकडे आपणहून वाट शोधत गेले!

आकाशवाणी सोडल्यावर म्हणण्यापेक्षा आकाशवाणीन मला नाकारल्यावर म्हणायला हवं. स्त्रियांच्या कार्यक्रमाच्या निर्मात्याच्या जागेवर माझी निवड झाली नाही. मोठा अपेक्षाभग पत्करून, खूप खंतावून; पण मराठी बाणेदारपणे पुन्हा देऊ केलेलं जुनच काम मी नाकारलं. वयाच्या तेविसाव्या वर्षी लखलखत्या पण छोट्या पदवीपर्यंतच्या शैक्षणिक जगातून बाहेर पडतापडता नोकरी मिळाल्याचा आनंद झाला होता; पण लवकरच अपयशाचा पहिला फटका खाऊन, व्यवहारी जगाच्या निरंतर चालणाऱ्या परीक्षेसाठी माझी वाटचाल सुरू झाली.

याच वेळी माझ्या दुसऱ्या मुलाचा जन्म झाला त्याच्यासाठी वर्षभर पूर्णपणे घरात राहून मग मी पुन्हा वाट शोधत 'स्त्री' मासिकाच दार ठोठावलं. त्यावेळी शांताबाई किर्लोस्कर, त्याचं नाव 'स्त्री'च्या सपादक म्हणून येत नसलं तरी सर्व काम त्या बघत असत. त्यानी सुरुवातीपासूनच आपलेपणान माझं स्वागत केलं. त्यांच्या / माझ्या गरजा आणि वेळेची उपलब्धता याचं गणितही जमलं आणि छोटा मुलगा, मोठी मुलगी यांना आणि घराला फारसं एकटं, दूर न ठेवता मी आठवड्यातून २।३ दिवस २।३ तास अशी कामाला सुरुवात केली ही वेळ, ही सधी किती मोलाची आहे, हेही तेव्हा कळलं नव्हत; पण 'स्त्री' सारख्या मासिकात काम करायला मिळणं, हा माझ्या आयुष्यात आणि व्यक्तिमत्त्वात पुढे घडलेल्या अनेक बदलाचा आणि 'वाढी'चा (Growth) पाया ठरला.

. तिशीपर्यंत तारुण्याचा काळ मानला तर या टप्प्याच्या आत मी तीन मुलाची आई झाली होते. धाकटा मुलगासुद्धा चार वर्षांचा झाला होता. लवकर लग्नाचा हा एक फायदा सांगतात, त्यात थोड तथ्यही आहे; पण मुळात मला काय करायचं आहे, काय करता येईल याची माझी मला ओळख होण्यापूर्वीच मी लग्न केलं होत आणि माझ्या वोटीचं सुकाणू दुसऱ्याच्या हातात सोपवलं होतं. यात बळजबरी नव्हती; पण स्वत:चा विचारही नव्हता. थोडं उशिरा लग्न केलं असतं तर, कदाचित इतक्या रिफ्लेक्स ॲक्शनसारखी मुल झाली नसती. हे लिहिताना मी वस्तुनिष्ठपणे विचार माडते आहे. केवळ आई म्हणून नाही, हे सुजाणाना समजेल! नाहीतर इतकी छान तीन मुलं असताना काय हा नतद्रष्ट विचार असंही कुणी म्हणेल; पण आज विचार करताना खरंच वाटतं की, मुलं केव्हा हवीत, किती हवीत याचा धोपट मार्गापलीकडचा विचार मी केला नव्हता. बाईला स्वत:चं काही सापडलं की त्याचा पाठपुरावा करण्यासाठी ती कुटुबाचा आकार आटोपशीर किंवा आपल्याला हवा तेवढा ठेवते किंवा ठेवू बघते हे समाजशास्त्रीय सत्य आहे हे आता पटतं.

वयाच्या तिशीपर्यंतच्या अनेक घटना आणि आठवणी आठवताना वाटतं की, त्यावेळपर्यंत आपण केवळ जवळच्याचा आणि समोरच्याचाच विचार केला. तोही केवळ 'आजवर नाही का सगळे गेले याच रस्त्यानं?' या चालीवर! अर्थशास्त्र अभ्यासासाठी का निवडलं? आवडलं म्हणून? तर नाही. नोकरीची शक्यता त्या विषयाच्या पदवीधराला अधिक होती म्हणून! या प्रकारे निर्णय घेताना खर तर समोर रस्ता होताच रुळलेला. मी फक्त त्यावर माझी पावलं टाकायची होती! त्यामुळे कुटुब।नातेवाईक।स्नेही यापलीकडचा समाज, त्यातले प्रश्न, त्यात आपला सहभाग – इ. इ. कशाचाही स्पर्शसुद्धा मला कधी झाला नव्हता. स्वातंत्र्य मिळालं तेव्हा मी दहा वर्षांची होते. मी तरुण होते तेव्हा सामाजिक चळवळी माझ्यापर्यंत पोचल्या नाहीत आणि मीही त्यांच्याकडे गेले नाही. सगळं निवांत होतं. छान होतं मी म्हटल तशी मी खूपच खूप होते! माझं लग्न प्रेमलग्न होतं म्हणून किंवा माझी तत्त्वनिष्ठा होती म्हणून हुड्याविना झालं असं नाही, तर माझ्या सासरी, विशेषत: माझ्या यजमानाना देणघेणं हा व्यवहार कधी आवडला नाही म्हणून. त्यानी हुडा मागितला असता तर आईवडिलानी दिलाही असता आणि यात मला काही खटकलही नसतं अस्मिता, समता, स्वातंत्र्य यासारख्या मूल्यांचा माझ्या जगण्याशी जाणीवपूर्वक सबधच नव्हता!

टेकडीवर चढता चढता नजरेचा टप्पा, आवाका व्यापक होत जातो. घराच्या अगणातून, खिडकीतून किंवा गच्चीवरून दिसणाऱ्या आकाशापेक्षा टेकडीवरून मोठं आकाश दिसू शकतं. 'बघितलं तर' हे अर्थातच गृहीत धरलं आहे हे आयुष्याच्या बाबतीतही खरं आहे. म्हणूनच तरुण वयात काही पारपारिक किंवा संस्कारातून पाझरत

येऊन मनावर परिणाम करणाऱ्या कल्पनाविषयी मला मोकळेपणानं काही म्हणावसं वाटतं. लग्न लवकर आणि वेळेवर व्हायला हवं कारण ते सर्वांत महत्त्वाचं आहे असं लहानपणापासून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या मनावर बिंबवलं जातं. लग्न ठरेपर्यंत शिक्षण, असं पुष्कळदा घडत. म्हणूनच पदवीपर्यंतच्या कॉलेजमधल्या वर्षातही लग्नाला योग्य असं मुलीचं वागणं असावं यासाठी कटाक्ष असतो. म्हणून मैत्रिणी चालतात, मित्र फारसे नसावेतच आणि नसतील असं पालक बघतात. त्यामुळे मुलीला कुणी 'पसंत' केलं की आईबापांना आणि कधीकधी मुलीनासुद्धा इतकं थरारून जायला होतं! याऐवजी मित्रमैत्रिणींच्या समवयीन सहज वर्तुळात वाढणाऱ्या मुलीला थरारून जाण्यापेक्षा नीट काही बघण्यासाठी दम राहातो. कारण तरुण मुलगा भेटणं तिला इतकं दुर्मिळ नसतं! या सगळ्या शक्यताच आहेत. यात शास्त्रीय नियमाचा ठामपणा नाही. पण अनुभवाचा आधार आहे. शिवाय हे सुशिक्षित मध्यमवर्गीय घरातलं चित्र आहे. पण शिकलेल्यांच्या घरात ही तऱ्हा तर न शिकलेल्या, परंपरेत जखडलेल्यांचं काय सांगायचं! मुद्दा एवढाच की माझ्या विधानाच्या मर्यादा मी ओळखते! लग्न महत्त्वाचं आहे जरूर. पण वय झालं म्हणून, घाईघाईनं लग्न उरकण्यापेक्षा, मनाजोगं घडण्याच्या काही शक्यता दाखवणारं दिसेपर्यंत थांबायला हरकत नाही. लग्न कशासाठी, हा प्रश्नच मी तरुणपणी कुणाला केला नव्हता. कुणी केलेला ऐकला नव्हता. माणसाला प्रेम हवं, सुखदुःखात सहभाग हवा, आधार हवा, सोबत हवी, सगळं खरं. पण म्हणजे लग्न म्हणजे एकमेकांना जखडणं नाही तर उलट एकमेकांच्या आधारानं पण स्वतंत्रपणे वाढणं. आपापलेपण जपतही एकत्र, एकसाथ चालता येतं हे समजण, ३०।३५ वर्षांपूर्वी माझ्या आवाक्यापलीकडच होतं. पण आज, इच्छा असेल, त्याला हा विचार समजून घेता येईल कारण तो समाजाच्या वातावरणात, हवेत उतरला आहे सर्वत्र नाही, पण कुठे कुठे नक्की भेटू शकतो. लग्नाबाबत फार रोमँटिक किंवा पारंपारिक न राहाता वास्तववादी आणि डोळस असणं गरजेचं आहे.

जग बघायला मिळण्याआधीच लग्न करण्याचा आणखी एक तोटा असतो. प्रश्न पडण्यापूर्वीच आपण चालायला लागतो आणि नंतर प्रश्न पडायला लागलेच तर भवतीभवतीचे जाब विचारत म्हणतात, 'मग लग्न करताना नव्हतं हे सुचलं?' निःप्रश्न अवस्थेपेक्षा प्रश्नपूर्ण अवस्था हे मला जिवंतपणाचं लक्षण वाटतं आणि मग या जाब विचारणाऱ्यांना मला विचारावसं वाटतं—प्रश्न पडणं हा माणसाचा गुण आहे की गुन्हा? झेप घेण्याचा स्वभाव आहे का, कुवत आहे का, हे तरी झेपावण्याची संधी आल्याशिवाय कळेलच याची खात्री असते का? तरुण, वाढत्या, उमलत्या वयात स्वतःची ओळख करून घेत, स्वतःबरोबर, इतराबरोबर आणि इतरांसाठी जगण्याच्या वाटा दिसण्यापूर्वीच जोडीदाराबरोबर वाटचाल सुरू झाली तर आयुष्य कधीकधी फार अवघड होतं. आपल्यालाच केवळ नाही, आपल्याभवतीच्यानाही! स्वतःविषयीच्या काही बीजरूप गोष्टी उशिरा आणि अनपेक्षित तरारून वर आल्या तर त्यांना जपणं किंवा कुस्करून, पुरून टाकणं दोन्ही अवघड असतं. ते नाकारताही येत नाही आणि स्वीकारण्याच्या यातना तर जीवघेण्या असतात.

या सगळ्या तडफडीच्या संदर्भात आणि संकल्प करण्याचा उत्साह वाटतो त्या तारुण्याच्या संदर्भातच मला डायरी लेखनाविषयी काही म्हणायचं आहे. मीही डायरी लिहिली. नेम म्हणून लिहिली. ती केवळ दिनचर्या होती. पण स्वतःचा स्वतःशी संवाद म्हणून लिहिली, तेव्हा ती फार फार मोलाची होती. आयुष्यातले अपार उत्कट आनंद आणि असह्य होणाऱ्या वेदना, आवरता न येणारं डोळ्यातलं पाणी यासाठी डायरीसारखी सोबत कुणाचीच नसते. ती बहुदा तुम्हाला हवी तेव्हा एकांतात उपलब्ध होते. प्रश्न येतो हा उत्कट संवाद, उद्रेक शब्दात लिहिल्यावर! आपल्याकडे 'प्रायव्हसी'च्या कल्पनेला मान्यता नाही. कुटुंबात येणारी पत्रंसुद्धा ज्याची त्यानं फोडावी आणि त्यानं दिली तर ती इतरांनी वाचावी हा संकेत 'प्रेमापोटी' उधळला जातो. तिथे डायरीचं काय? यामुळेच डायरी लिहिली तरी सांभाळणं अवघड जातं. पाश्चात्त्य देशातले लोक डायऱ्या लिहितात आणि त्यांच्या पश्चात त्या सांभाळल्या जातात याचं आपण कौतुक करतो. पण त्या डायरीची प्रतिष्ठा राखायची आपली कुवत आहे का? एरव्ही रोज नाही तरी आपल्याला वाटेल तेव्हा डायरी लिहिणं, हा आपल्या आयुष्याचा आपण काढलेला सुरेख आलेख असतो. आपल्या जीवन प्रवासातली वळण-वाकण, मैलाचे दगड याचं इतरांसाठी नाही, आपल्यासाठीच प्रचंड महत्त्व मला वाटतं. माझ्या तरुणपणी मी काही काळ डायरी लिहिली आणि नंतर ती थांबलीही. नेमकं कारण काय घडलं आज आठवत नाही.

मी हे सगळं खूप आठवून आठवून त्यावर आज काय वाटतं, काय बदललं असा पडताळा घेत घेत लिहिलं याचं कारण एकच. माझे वडील एक फार मार्मिक वाक्य सांगतात. सेन्ट्स हॅव्ह ए पास्ट अ‍ॅण्ड सिनर्स हॅव्ह अ फ्युचर. यात बदलाचं जे निरंतर महत्त्व सूचित केलं आहे त्यावर तर माझा विश्वास आहेच; पण माणसा-माणसांनी आपल्या अनुभवाची देवघेव केली; मोकळेपणानं, प्रामाणिकपणानं आपल्या चुका, आपल्या मर्यादा सांगितल्या; त्या पल्याड जाण्याच्या प्रयत्नांच्या हकिगती सांगितल्या तर वारा, पाणी पक्षी यांच्यासारखाच यातूनही बीजप्रसार होतो. हा माझा व्यक्तिगत आणि व्यावसायिक अनुभव आहे. नाहीतर सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे रूढ अर्थाने तारुण्य केव्हाच मागे गेल्यानंतर हे लिहायचं तरी कशासाठी? □

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# ट्रेकिंग.. ते रोमांचक क्षण!

● अभय कुलकर्णी ●

गिर्यारोहण हा क्रीडाप्रकार दिवसेंदिवस लोकप्रिय होत चालला आहे. अनेक तरुण–तरुणी दिवसेंदिवस या क्षेत्राकडे वळत आहेत. निसर्गाची आव्हाने झेलण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यापैकी गिर्यारोहण हा एक. प्रेक्षक नसणारा, स्पर्धा नसणारा असा हा क्रीडाप्रकार साहसयुक्त असा असून पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असा आहे. गिर्यारोहण करीत असताना बऱ्याच अडचणी येत असतात. सह्याद्री व हिमालयातील अडचणी ह्या वेगळ्या प्रकारच्या असतात. पण ह्यातील बऱ्याच अडचणींवर मात करता येते. गिर्यारोहणात कॅल्क्युलेटेड रिस्क नावाचा प्रकार असतो तो अवलंबिल्यास उद्भवणाऱ्या बऱ्याच अडचणींतून मार्ग काढता येतो.

परंतु निसर्गाने निर्माण केलेल्या अडचणींवर अजूनही माणूस संपूर्णपणे मात करू शकलेला नाही. गिर्यारोहणातील बराचसा भाग हा निसर्गावर अवलंबून असतो. त्यामुळे एकदा निसर्गाच्या सान्निध्यात गेल्यावर आपण पूर्णपणे त्याच्या हातात असतो. अशावेळी निसर्गाचा कोप झाल्यास किंवा इतर काही नैसर्गिक आपत्ती आल्यास त्यातून बाहेर पडणे केवळ अशक्य असते. काही काही वेळा जीवावर बेतते. अजूनही आठवण झाल्यास अंगावर रोमांच उभे रहातात.

### कोकणकडा

आळेफाट्याजवळ असणारा विस्तीर्ण हरिश्चंद्रगड म्हणजे गिर्यारोहकांसाठी एक पर्वणीच आहे. हरिश्चंद्रगडाचा पसारा खूप मोठा असून सर्व बाजूंनी गड दुर्गम आहे. पुणे, ठाणे व नगर या तिन्ही जिल्ह्याच्या सरहद्दी गडाजवळ एकत्र मिळतात. हरिश्चंद्र, तारामती व रोहिदास असे तीन बालेकिल्ले या गडास असून आणे माळशेज घाटाच्या अलिकडील खुबी गावातून पुढे असणाऱ्या टोलार खिडीतून गडावर जाण्याचा रस्ता आहे

हरिश्चंद्रगडाच्या इतर सर्व गोष्टींशिवाय गडाच्या ठाणे जिल्ह्याच्या बाजूस असणारा कोकणकडा हा सर्वात आकर्षक व आव्हान असणारा आहे. शकू मधोमध कापल्यास तयार होणाऱ्या आकारासारखा याचा आकार असून उंची ३१०० फूट आहे. माथ्यावरून उभे राहून याचा तळ दिसत नाही. तो झोपूनच पहावा लागतो. वरून खाली दगड टाकल्यास सुमारे १८ सेकंद दगड खाली पोचावयास लागतात. माथ्यापासून तळापर्यंत सरळ उभा कातळ व मध्यभागी आतमध्ये गेलेला अशी याची रचना आहे. कोकणकड्याच्या शेजारी नकट्या नाकासारखा आकार असणारा एक डोंगर असून त्याचे नाव 'नकट्या' असेच आहे.

दरवर्षीप्रमाणे त्या वर्षीही आमचे वार्षिक गिर्यारोहण शिबीर नोव्हें. महिन्यात हरिश्चंद्रगडावर भरले होते. या शिबिरास जाण्यापूर्वी नकटा व कोकणकडा यांच्यामधून कोकणकडा उतरण्यास एक रस्ता आहे अशी माहिती आम्हास मिळाली होती. गडावर पोहोचल्यावर दुसरे दिवशी मी व माझे दोन सहकारी ही वाट शोधण्यासाठी बाहेर पडलो. वाट अवघड होती. जेमतेम १० फूट रुंद घळ, उतरण्याचा कोन अंदाजे ७०° पायाखाली संपूर्णपणे भुसभुशीत माती व संपूर्णपणे नवीन प्रदेश अशा तऱ्हेचे ते साहस होते. केवळ रस्ता आहे का नाही हे बघण्यासाठी बाहेर पडलो असल्याकारणामुळे बरोबर प्रस्तरारोहणाचे कोणतेही साहित्य नव्हते जसे जसे पुढे जात होतो तसा तसा पुढील रस्ता सापडत होता. खरं म्हणजे याला रस्ता असे म्हणता येणार नाही. आम्ही नकटा व कोकणकडा यांच्या मधील एका घळीतून खाली उतरत होतो. कोणाला काही झाल्यास एकाने त्याच्याजवळ थांबायचे व दुसऱ्याने वर जाऊन इतरांना बोलवायचे असे ठरले. एक हजार फूट खाली उतरल्यावर पाण्याचे एक छोटे डबके (?) दिसले. त्यातील पाणी पिऊन तहान भागविली. अशा ठिकाणी पाणी हे जीवन आहे असे का म्हणतात हे पटले. अजून किती पुढे जावयाचे आहे, किती वेळ लागणार आहे याची कल्पना नव्हती. पण साधारण अर्धे अंतर खाली उतरून आल्याचा आम्हास अंदाज आला. अक्राळविक्राळ कडा, घनदाट झाडी व माकडांच्या आवाजाशिवाय कसलाच आवाज नाही, यामुळे वातावरण अतिशय शांत व भीतीदायक असे होते. मजल दरमजल करीत तळाच्या टप्प्यावर असणाऱ्या घनदाट जंगलात आम्ही प्रवेश केला. बराच

काळ पुढे गेल्यावर जवळपास कोठे तरी मनुष्यवस्ती असण्याच्या खुणा आम्हास दिसावयास लागल्या व अखेर आम्ही बैलपाडा नावाच्या आदिवासी लोकांच्या गावात येऊन पोहोचलो. तेथे सुदैवाने एका माणसाकडे आमच्या जेवणाची सोय झाली. त्याचमाणसाकडे तेथील सर्व भागाचा एक उंचीदर्शक नकाशा बघावयास मिळाला. तेव्हा आम्ही साधारण ३१०० फूट खाली उतरून आलो असे आम्हास समजले व परत तेवढेच परत वर चढून जावयाचे आहे याची जाणीव झाली. ठाकर व महादेव कोळी या लोकांची वस्ती असणाऱ्या बैलपाड्यातील पाहुणचार उरकून लगेचच परतीच्या प्रवासाला लागलो. घनदाट जंगल संपल्यानंतर बरोबर कड्याच्या पोटामध्ये जाऊन उभे राहिलो. तेथूनच उभी चढण सुरू होत होती. तेथून एकदा वर पाहिले. अक्षरशः डोक्यावरील टोपी खाली पडेल इतके मागे झुकल्यावर कड्याचा माथा नजरेस पडला. ऊन रणरणत होते. ताबडतोब प्रस्तरारोहणाच्या तंत्राचा वापर करून चढाईस सुरवात केली. मी सर्वात पुढे होतो. चढताना एकदोन कपारी ढासळण्याचे प्रसंग वगळता काहीही घडले नाही. शेवटचे साधारण ८०० ते १००० फूट चढावयाचे राहिले होते मी अशा ठिकाणी उभा होतो की ज्या ठिकाणी मला दोन्ही हात पूर्ण वर करून पक्का आधार घेऊन पुढे जावयाचे होते. त्यामुळे मी ज्या ठिकाणी हात ठेवले होते त्या ठिकाणी काय आहे याची मला कल्पना नव्हती. म्हणून मी दोन्ही हातांनी शरीर पूर्णपणे छातीपर्यंत वर खेचले. त्याच वेळी मला पाय ठेवण्यासाठी बरी जागा (?) सापडली. परंतु जेव्हा मी माझ्या हाताकडे पाहिले तेव्हा मी जागच्या जागी थिजलो. माझ्या दोन हातांच्या मध्ये साधारण १ फूट लांबीची शेपटी लोंबकळत होती. तिच्यापुढील भाग मला दिसत नव्हता. तेव्हा माझ्या लक्षात आले की, आपण एका सापाच्या बिळाच्या बाजूस असून काहीही करू शकत नव्हतो. सर्व शरीर छातीपर्यंत वर खेचलेले, पाय ठेवण्यास जेमतेम जागा मिळालेली, खाली ३००० फुटाचा कडा माझ्याखाली माझे दोन सहकारी उभे व दोन्ही हाताच्या मध्ये साप अशा परिस्थितीमध्ये मी साधारण १० मिनिटे उभा होतो. मी तेथून हात सोडून दिले असते तर मी व खालचे दोघे असे आम्ही तिघे सरळ कड्यावरून खाली कोसळलो असतो. ती दहा मिनिटे मला दहा तासासारखी वाटली. माझे सुदैव असे की दहा मिनिटांनी त्या सर्पराजाने आपली संपूर्ण शेपटी बिळात ओढून घेतली व मला पाय ठेवायला जागा करून दिली. त्यानंतर केवळ अर्ध्या तासात आम्ही माथ्यावर पोहोचलो. पण अजूनही तो प्रसंग आठविल्यास अंगावर काटे उभे राहतात. केवळ दैव बलवत्तर म्हणून आम्ही त्या संकटातून वाचलो.


## पावसाळ्यात–लोहगडावरील विंचूकाटा

दिवस पावसाळ्याचे होते. आम्ही हाती घेतलेल्या शालेय गिरिभ्रमणाच्या उपक्रमातील पुण्यातील मॉडर्न हायस्कूलमधील विद्यार्थिनींचे ते एक दिवसाचे लोहगड येथील गिरिभ्रमण होते. सुमारे ५० विद्यार्थिनींनी त्याच्यात भाग घेतला होता. इ.७ वी ते इ. १० वी या वयोगटातील त्या सर्व मुलींना घेऊन मी, उल्हास केळकर व माझे इतर सहकारी (ज्यात अनुभवी गिर्यारोहक मुलीचासुद्धा समावेश होता) असे आम्ही सर्वजण सकाळच्या पहिल्या लोकलने निघालो. मळवलीला उतरल्यानंतर लगेचच लोहगडाकडे चालावयास सुरुवात केली पावसाळ्याचे दिवस असूनसुद्धा आकाश पूर्णपणे निरभ्र होते कोठेही साधे किंवा पावसाचे ढग दिसत नव्हते. थोडक्यात, गिर्यारोहणास पोषक असेच वातावरण होते. मजल दरमजल करीत आम्ही सर्वजण गडावर पोहोचलो. लोहगड तसा चढावयास विशेष अवघड नसल्यामुळे वर पोहोचण्यास जास्त वेळ लागला नाही. जवळपासची पाण्याची टाकी, गुहा वगैरे सर्व गोष्टी बघून झाल्यावर सर्व मंडळी जेवावयास बसली. नेहमीप्रमाणे हसतखेळत जेवण पार पडले. तोपर्यंत वातावरणात कोणताही बदल झालेला नव्हता. जेवणे झाल्यानंतर लोहगडावरील प्रसिद्ध विंचूकाटा बघण्यास आम्ही निघालो. विंचवाच्या नांगीसारखा आकार असणाऱ्या लोहगडाच्या एका माचीस अथवा भागास विंचूकाटा असे संबोधण्यात येते. गडावरून विंचूकाट्यावर उतरण्यासाठी साधारण ८ ते १० फुटाचा एक रॉकपॅच लागतो. आम्ही जसे विंचूकाट्याकडे निघालो, तसा वातावरणात झपाट्याने बदल होऊ लागला ऊन तर कोठल्याकोठे पळून गेले होते. आकाशात काळे ढग जमावयास लागले व वारा जोरजोरात वाहू लागला. थोडक्यात म्हणजे पावसाची लक्षणे दिसावयास लागली होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे बदल केवळ दहा मिनिटात घडले होते. आम्ही आमच्या सोईसाठी मुलींचे पाच गट तयार केले होते. सर्व गट गडावरील गुहेमधून रॉकपॅचपर्यंत पोहचेपर्यंत थेंबथेंब पाऊस पडावयास सुरुवात झाली होती. पहिला गट रॉकपॅच उतरून जाईपर्यंत मुसळधार पाऊस पडावयास सुरुवात झाली. पहिल्यांदा थेंबथेंब पावसात मजा वाटणाऱ्या सर्व मुलींना मुसळधार पाऊस सहन होईना. वारा अतिशय सोसाट्याचा सुटला होता. मिनिटागणिक पावसाचा वेग वाढत होता लोहगडावरील अत्युच्च ठिकाणी आम्ही उभे होतो. पावसाचा वेग इतका भयानक होता की, दोन फुटावरील देखील दिसणे अशक्य झाले. पहिला गट पुढे गेल्यावर त्या रॉकपॅचवरून अक्षरशः धबधबा वहावयास सुरुवात झाली होती. त्यामुळे इतर चारही गट दुसऱ्या रस्त्याने खाली उतरवण्याच्या प्रयत्नास आम्ही लागलो. परंतु सोसाट्याचा वारा, भयानक पाऊस, चमकणाऱ्या विजा व थंडी यामुळे जागेवरून हालणे देखील मुष्किल झाले होते. नाइलाजास्तव पुढे गेलेला गट सोडून बाकी सर्व मुलींना उल्हास केळकराबरोबर परत गडावरील गुहाकडे परत पाठविले. पुढे गेलेला गट परत येईपर्यंत आम्हाला तिथे थांबणे भाग होते. समोर काहीच दिसत नव्हते. निसर्गाचे इतके रौद्र व भीषण स्वरूप मी आयुष्यात प्रथमच पहात होतो. सर्व अंगावरील कपडे केव्हाच भिजले होते व त्यानंतर खिशातील सर्व गोष्टी भिजायला लागल्या त्या वस्तू जास्त भिजू नयेत म्हणून मी आमच्याबरोबर असणारी एक अनुभवी गिर्यारोहक मुलगी हिने पाठीस लावलेल्या रॅकसॅकमध्ये टाकावयास लागलो. ती मुलगी माझे पुढे (रॉकपॅचच्या तोंडाशी) उभी होती. मी खिशातील सर्व गोष्टी रॅकसॅकमध्ये टाकल्या व रॅकसॅकचे बंद लावले आणि तेवढ्यात प्रचंड आवाज झाला. माझ्या पायाखालील जमीन अक्षरशः सरकली व मी

माझ्यामागे पाठीवर पडलो व सर्वात भयंकर दृश्य मी पडता पडता पाहिले. ते म्हणजे माझ्यापुढे उभी असणारी मुलगी रॅकसॅक-सकट मला हवेमध्ये दिसली. ही घटना केवळ एका सेकंदात घडली होती. दुसऱ्या सेकंदाला मी उठून उभा राहिलो तेव्हा ती मुलगी रॉकपॅच ज्या ठिकाणी संपतो (म्हणजे साधारण १० ते १२ फूट) तेथे खाली पडली होती. त्या रॉकपॅचवरून अक्षरशः धबधबा वहात होता. मी त्या पाण्यातून खाली उतरलो. व त्या मुलीपाशी गेलो. सुदैवाने त्या मुलीला मुक्यामाराशिवाय काहीही लागले नव्हते. त्या मुलीस उभे करून व आधार देऊन दुसऱ्या रस्त्याने वर आणले. अजूनही पावसाचा जोर थांबला नव्हता. पाच मिनिटापूर्वी घडलेल्या घटनेवर माझा विश्वास बसत नव्हता. वाऱ्याने कागदाच्या कपट्यासारखे त्या मुलीस हवेत उडवून लावणे ही गोष्ट केवळ निसर्गापुढे मानवाची काय किंमत आहे याचे द्योतक होते. म्हणजे निसर्गाने मनात आणल्यास तो मानवाचे काहीही करू शकतो हे त्याने या प्रसंगाने दाखवून दिले होते. थोड्याच वेळात पुढे गेलेला गटसुद्धा आम्हास येऊन मिळाला ते सुद्धा जास्त पुढे जाऊ शकले नाहीत. आम्ही सर्वजण गडावरील गुहेत येऊन पोहोचलो. सर्व मुली भेदरलेल्या दिसत होत्या. पुस्तकी ज्ञानाशिवाय जास्त माहिती नसलेल्या त्या मुलींचे विश्व अतिशय लहान असल्याने त्यांना नक्की काय घडले याची जाणीव नव्हती. निसर्गाचे इतके भीषण स्वरूप त्यांनी पुस्तकात वाचलेसुद्धा नव्हते त्यामुळे अनुभवणे ही गोष्ट दूरच. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे आम्ही गुहेमधे परतल्यानंतर केवळ दहा मिनिटातच पाऊस थांबला व नंतर चक्क ऊन पडले. ते सर्व नाट्य साधारण १ ते १।। तास चालले होते व जणू काही आम्हाला निसर्गाला स्वतःची ताकद दाखवायची होती याचसाठी जणू काही ती घटना घडली होती. नंतर ऊन पडल्यानंतर ती घटना घडली का नाही, इतकी परिस्थिती निर्माण झाली. एखादा चित्रपट डोळ्यासमोरून सरकावा असे आमचे झाले होते. परंतु भिजलेले कपडे घडलेल्या घटनेचे साक्षीदार होते. अजूनही तो प्रसंग आठवला तर अंगावर रोमांच उभे राहतात.

## एव्हरेस्ट बेस कॅम्प

गिर्यारोहणास सुरुवात केल्यानंतर प्रत्येकाच्या मनामध्ये जगातील अत्युच्च शिखर माऊंट एव्हरेस्ट उर्फ सागरमाथा बघण्याची उत्सुकता असते. प्रत्येकाला एव्हरेस्टवर जाणे अशक्य असते. परंतु एव्हरेस्ट बेस कॅंपपर्यंत जाणे तसे सोपे आहे. मे–जून १९८४ मध्ये भारताची एव्हरेस्टवर मोहीम होती, ज्यात फूदोरजी व कु. बचेंद्रीपाल यांनी शिखर सर करण्यात यश मिळविले. त्याच वेळेस आम्ही सातजण एव्हरेस्ट बेस कॅंप येथे एव्हरेस्ट पहाणे व थोर भारतीय गिर्यारोहकांना तिथे जाऊन भेटणे व त्यांचे अभिनंदन करणे या हेतूंनी गेलो होतो. या अत्युच्च शिखराचा बेस कॅंपसुद्धा सुमारे १८००० फुटावर लावलेला होता. एव्हरेस्टवर भारतीय मोहीम असल्यामुळे भारताच्या महाराष्ट्र, तामिळनाडू, दिल्ली या भागातूनसुद्धा गिर्यारोहक येथे आले होते. लुक्ला–फागडिंग–नामचे बझार– थँगबोचे– फेरीचे – लोबुजे – गोरकशेप–बेस कॅंप असा या मोहिमेचा मार्ग होता. नामचे बझार येथे मुक्कामास असताना आमची दिल्लीतून आलेल्या गिर्यारोहकांच्या तुकडीची गाठ पडली. नेपाळमध्ये व डोंगरात अशा ठिकाणी भारतीय व गिर्यारोहक अशांची ओळख झाल्यावर ती जास्त न

वाढल्यासच नवल. त्या तुकडीमध्ये पुण्याची एक मुलगी असल्यामुळे ओळख आणिकच दृढ झाली. दिल्लीतील ही गिर्यारोहकाची तुकडी पण एव्हरेस्ट बेसकँप येथेच चालली होती. परतु त्याचा कार्यक्रम आमच्यापेक्षा पुढे एक दिवस असल्याने सर्व मडळी दुसऱ्याच दिवशी सकाळी पुढील प्रवासास रवाना झाली.

हिमालयातील गिरिभ्रमणात इतर सर्व त्रासापेक्षा अतिउंचीवरील त्रास ( High Altitude sickness ) हा जास्त होण्याची शक्यता असते. याचा अर्थ असा की, आपण जसे जसे जास्त उचीवर जाऊ, तसेतसे मनावरील तावा सुटून माणूस काहीही करू लागतो. तसेच झोप उडणे, भूक न लागणे ही याच प्रकारच्या त्रासाची लक्षणे. भारतातील हिमालयापेक्षा एव्हरेस्ट प्रदेशात उची जास्त असल्याने या ठिकाणी हा त्रास जास्त होण्याची शक्यता असते. मानसिक बलावर या त्रासाचा कमी–जास्तपणा अवलंबून असतो. यासाठी जास्त भरभर न चालणे व हवेशी आणि वातावरणाशी पूर्णपणे समरस झाल्यानंतरच अधिक उंची गाठणे असे काही मार्ग हा त्रास टाळण्यासाठी आहेत.

नामचे बझार येथे वातावरणाशी समरस होण्यासाठी आमचा एक दिवसाचा जास्त मुक्काम होता. त्यानतर आम्ही दुसरे दिवशी पुढील प्रवासास निघालो. प्रत्येक मुक्कामावर दिल्लीची तुकडी आम्हाला एक दिवस पुढे असल्यामुळे पुढे गेल्याची बातमी कळावयाची. होता होता आम्ही लोबूजे ( १७००० फूट ) येथे येऊन पोहोचलो आता फक्त गोरकशेप व बेसकॅम्प असे दोनच मुक्काम राहिले होते. लोबूजेला पोहोचल्यावर त्याच दिवशी सकाळी दिल्लीकरानी लोबजे सोडून गोरकशेपकडे कुच केल्याचे कळले गरम कपडे घालून आम्ही हळूहळू वातावरणाशी समरस होत होतो. ध्येय जवळ आल्याने सर्वजणांमधे उत्साह ओसडून वहात होता. साधारण दुपारचे ५ वाजले होते. हॉटलेमनचा आस्वाद घेत, मधे शेगडी घेऊन आम्ही सर्वजण पत्ते खेळत होतो. तेवढ्यात गोरकशेपच्या बाजूने निकी पिरीयाचो नावाचा एक अमेरिकन फोटोग्राफर आमच्या मुक्कामावर आला व एक भारतीय गिर्यारोहक बेशुद्ध आहे, त्याच्या मदतीस येणार का ? असे विचारले. माझ्या डोळ्यासमोर झरकन दिल्लीच्या तुकडीतील सर्व जणांचे चेहरे तरळून गेले. जास्त प्रश्न न विचारता झोपायची पिशवी फेकून देत मी व उल्हास केळकर स्ट्रेचर हातात घेऊन एका भारतीयाच्या मदतीच्या हाकेला ओ देत धावत सुटलो. धापा कळत नव्हत्या व श्वासाची अपेक्षा नव्हती. १७००० फुटांवर पळणे ही गोष्ट वर्णन करता येणे अशक्य आहे समोर काहीच दिसत नव्हते. आम्ही पळत होतो अखेर अनोजलाल, होय तो दिल्लीच्या तुकडीतील एक रांगडा व देखणा अनोजलालच होता. इतर दोघाच्या खाद्यावर आपले ओझे टाकून व त्याच आधारामुळे उभा असलेला परतु निपचीत असलेला, एक एक पाऊल कष्टाने पुढे टाकीत चालला होता. चेहऱ्यावर अचेतन भाव, डोळे पांढरे व त्यात अनोळखी भाषा असे त्याचे रूप बघवत नव्हते. हाक मारल्यास ओ देत नव्हता. स्ट्रेचर सरळ करून त्याला आम्ही त्यावर ठेवले सर्व क्रिया निशःब्दपणे चालल्या होत्या स्ट्रेचर उतरून परतीच्या प्रवासाला लागलो साधारण एक तासाने लोबूजेस परत आलो. त्याच्या बरोबर त्याचे दोन सहकारी पण होते, ते अतिशय भांबावलेले होते. त्याना धीर दिला व पुढील कारवाईस लागलो. सुदैवाने त्याच वेळी लोबुजे येथे एक अमेरिकन नर्स अथवा अर्ध–डॉक्टर तेथे हजर होती. तिने सागितल्यानुसार अखेर अनोजला अजूनही खाली म्हणजे फेरीचे येथे न्यावयाचे ठरले सकाळचे ६ तास चालणे, त्यानंतर गोरकशेपच्या वाटेवरील पळणे व त्यानंतर आता त्यास परत खाली नेणे म्हणजे हा मानसिक व शारीरिक ताण सह्य होत नव्हता. सध्याकाळचे ७–३० वाजले होते. एव्हरेस्टच्या प्रदेशात दुपारी ३–३।। नतर ऊन नाहीसे होते व ५ ते ६ वाजल्यानतर धुके पडावयास सुरवात होते. आम्ही संध्याकाळी ७–३० वाजता खाली उतरावयास सुरुवात केली आमच्या बरोबरचे पोर्टर्स, आम्ही चौघेजण असे आम्ही सर्वजण निघालो. प्रचड काळोख, जीवघेणी थंडी, दाट धुके अरुद व चढ उताराची वाट अशी परिस्थिती, पण नाईलाज होता. साधारण १००० फूट उतरल्यावर अनोजला भडभडून उलटी झाली, व त्याचे नैसर्गिक विधीवरचे नियत्रण सुटले. त्याची अवस्था अतिशय शोचनीय झाली. त्यात भरीस भर म्हणजे धुके व काळोख दाट झाल्यामुळे पुढचा रस्ता दिसेनासा झाला. प्रचंड मानसिक तणाव वाढला. परत फिरावयाचे का तसेच पुढे जावयाचे हा निर्णय घ्यावयाची वेळ आली. माझ्या निर्णयावर अनोजचे भवितव्य अवलंबून होते. दैवावर विश्वास ठेवून परत फिरण्याचा निर्णय घेतला. परत येण्यास जवळ जवळ ११ वाजले. अनोजची स्थिती गंभीर होत होती उरलेली रात्र कशी बशी तळमळत व एकमेकांकडे पहात काढली. सकाळी अनोज आणखीनच अत्यवस्थ झाला. त्याने नैसर्गिक विधी जागेवरच केले. डोळे गरागरा फिरवू लागला सकाळी ५ वा. दिल्लीच्या ,मोहिमप्रमुखाना गोरकशेप येथे त्याच्या पोर्टरकरवी निरोप पाठविला व त्याच अनोजला ताबडतोब खाली म्हणजे फेरिचे कडे नेण्याचा निर्णय घेतला. जशीजशी उंची कमी होत होती तशीतशी अनोजची अवस्था सुधारत होती. तो हाकेला ओ देत होता व स्वतःस होणाऱ्या वेदना त्याला जाणवू लागल्या व त्याची जगण्यासाठी धडपड सुरू झाली. साधारण अकरा वाजता मोहिमप्रमुख लोबूजेमध्ये येऊन पोहोचले वताबडतोब फेरिचेला जावयास निघाले. ते गेल्यावर आम्ही सर्व शात होतो. सध्याकाळी अनोज पूर्णपणे शुद्धीवर आल्याची बातमी त्याला पोचविण्याऱ्या पोर्टरकडून समजल्यावर ती विचित्र शातता सपली तो शुद्धीवर आला ही बातमी समजल्यावर आम्ही एव्हरेस्ट जिंकल्याच्या आनदाने एकमेकास मिठ्या मारल्या व आमच्या मोहिमेच्या पुढील मार्गाची आखणी करू लागलो. परतीच्या प्रवासात थॅगबोचे येथे अनोज कोणताही आधार न घेता स्वतःच्या पायावर दोन पावले चालताना दिसल्यावर मोहीम यशस्वी झाल्याचे सार्थक झाले. परतु अजूनही तो प्रसंग आठविल्यास अगावर काटे उभे राहतात.

# मॉडेलिंग....मॉडेलिंग

## ललिता बर्वे

फिल्म स्टार्सबद्दलच आकर्षण काही आपल्याला नवीन नाही. आणि हे आकर्षण आपल्या जन–मन–व्यवहाराच्या सगळया पातळयावर पोचलेल आहे. मग या आकर्षणात अमिताभ बच्चनच्या आजारपणात रक्ताच्या शाईनं देवाची प्रार्थना लिहिणं येत, तसा एन. टी. रामारावांचा अभूतपूर्व विजय येतो, आणि एम. जी. रामचंद्रनचं स्वागत करण्याच्या गडबडीत माणस चिरडून मरू शकतात, तिथे केशभूषा–वेषभूषांमधल्या फॅशन्सच्या अनुकरणाची तर मोजदादच नाही !

आणि हे काही केवळ आजच्या तरुण पिढीचच नाही. बालगधर्व, त्याची अदा, वेषभूषेची पद्धत, त्याच चालण, हळदीकुंकवाला जाण, ते नेसतील तशी साडी नेसणं हा महाराष्ट्राच्या रसिकतेच्या परपरेतला एक सास्कृतिक ठेवा मानला जातो. एवढच नाही, वेषभूषेबाबत राजकारणामधूनही आयात झालेली दिसते. गाधीटोपी, नेहरू जाकिट, इदिरा गाधीसारखी रुद्राक्षाची माळ, राजीव गांधी छाप झब्बा पायजमा ही त्याची ठळक उदाहरण झाली. म्हणजे राजकारणात मॉडेल ठरलेल्या व्यक्ती वेषभूषेतही मॉडेलच ठरल्या की !

परतु बदलत्या काळाबरोबर अशी मॉडेल्स फारच अपुरी वाटायला लागली. याच कारण समाजातल्या क्रयशक्ती असलेल्या वर्गाला काहीतरी नावीन्यपूर्ण सतत हवं असतं. पचवीस-तीस वर्षापूर्वी हिन्दुस्तान लीवरनं लक्सकरता चित्रपटतारकाचे चेहरे वापरायला सुरुवात केली. कारण त्यावेळी खरोखरची व्यावसायिक मॉडेल्स आपल्याकडे नव्हती. त्यामुळे त्या उत्पादनाचा खप वाढला तो त्या तारकांच्या उजन्या आणि तयार झगमगत्या प्रतिमेमुळे लक्सची- जाहिरातीची ही पद्धत अजूनही चालू आहे आणि त्याअर्थी त्याचा खपही वाढत असला पाहिजे.

परंतु एखाद्या उत्पादनाची जाहिरात करण्याचा हा कामचलाऊ मार्ग असला, तरी तो दर्जेदार मात्र नव्हे. अशाच कमी दर्जाच्या पातळीवर जाहिरात व्यवसाय रेंगाळत होता, तोपर्यंत खऱ्याखुऱ्या व्यावसायिक मॉडेल्सचं आगमनही भारतीय जाहिरातक्षेत्रात झालेलं नव्हत. १९६०–७० च्या सुमाराला शीला जोन्स, झीनत अमन, मनेका आनंद, फिलिस् मॅंडिस, ७३–७४ च्या सुमाराची लिरिलमधली कॅरेन ल्यूनेल आणि 'वोग' या आतरराष्ट्रीय फॅशनच्या मासिकाच्या मुखपृष्ठावर झळकलेली मराठी मुलगी शोभा राजाध्यक्ष या मॉडेल्सनी गाजवलेल्या बॉम्बे डाइंग, लॅक्मे, नेस्कॅफेच्या जाहिरातीपासून जाहिरातीच नवं युग सुरू झाल. यानतर जास्तीत जास्त, कपडयांच्या जाहिरातीतून नवनवी मॉडेल्स लोकापुढे यायला लागली. बॉम्बे डाइंगच्या जाहिरातीतून येणारा अर्धेदु रॉय हा खाजगी व्यापारी, जाता जाता सहज म्हणून या व्यवसायात शिरला. विमल सुटिंगजमधला दीपक पराशर दिल्लीच्या एका हॉटेलमधला एक साधारण अधिकारी. पण मोठयातली मोठी फी आकारणारा तो एक मॉडेल आहे. तर विल्स, नेस्कॅफेमधला जफर स्वतःचं गॅरेज चालवत असे. फोर स्क्वेअरमधला अतिशय गाजलेला मॉडेल सुनील बुटानी व्यवसायानं डॉक्टर आहे. पण या सगळयांचं वैशिष्टय, हे त्यांचं स्वरूप तरुण पिढीला आकर्षक वाटल आणि असं हे आकर्षण वाटायला लावण हीच तर मुळी त्याच्या वापरामागची थीम होती.

या दृष्टीन दोन जाहिरातीचा न ट विचार करण्यासारखा आहे. पहिली जाहिरात मार्लबोरो या अमेरिकन सिगारेटची आणि आपल्याकडच्या चार्म्स सिगारेटची. मार्लबोरोच्या जाहिरातीमध्ये नेहमीच विस्तीर्ण माळरानं आणि घोडयावर स्वार होऊन चाललेला मर्दानी तरुण. त्याच्या डोक्यावरची कलती मेक्सिकन हॅट, अगात रफ जाकिट या तरुण पिढीला आकर्षक वाटणाऱ्या पार्श्वभूमीचा अत्यत प्रभावी उपयोग आहे; परतु त्याच पद्धतीनं केलेली एल्पारची जाहिरात मात्र तितकीशी वठलेली नाही. दोन वर्षापूर्वी आलेल्या चार्म्स सिगारेटनं मात्र मार्केटचा अचूक अभ्यास करून मोठी बाजी मारली. सिगारेटच्या पाकिटापासून उत्तम प्रतीच्या पारदर्शिकेचा उत्कृष्ट वापर केला. चार्म्स ही तरुणाची सिगारेट 'चार्म्स इज द स्पिरिट ऑफ फ्रीडम' अस म्हणून विकनिकला गेलेल्या, पार्टीत गिटार वाजवणाऱ्या तरुण मॉडेल्सचा चागला उपयोग केला. ही सिगारेट जीन्स कल्चर संस्कृतीवाल्या तरुण पिढीला अपील करणारी आहे चौकडोचा शर्ट आणि निळया जीन्स घातलेली शामली वर्मा त्यात फिट बसते. तसच सिगारेटच वेष्टणही जीन्ससारख भासणारं,ब्राउन चामडी पट्टयासकट.

एकूणच तरुण पिढी, त्याचं विश्व, त्याना रुचणाऱ्या जाहिराती हे त्या त्या मॉडेल्सच्या रुपाशी आपोआपच निगडीत होत जात. आणि त्यामुळेच त्याचीही दुनिया तशीच रगीबेरगी, बिनधास्त असेल असं आपल्याला वाटतं ! परंतु फिल्मस्टारइतपत पैसा, प्रसिद्धी याची वलय मॉडेल्सभोवती अजून तरी पडलेली नाहीत; पण ती वलयं आपण कधी एकदा आत्मसात करू, यासाठी त्याची घाई आणि धडपड मात्र सतत चालू असते. झगमगत्या हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश करण्याचे दोन राजमार्ग म्हणजे हिंदी रंगभूमी आणि मॉडेलिंग. आणि हा नियम फक्त तरुणानाच लागू आहे अस नाही. दीड-दोनशे जाहिरातीत चमकून गेलेला न्यूट्रामूल दादा जुगल हसराज याच मार्गानं मासूम चित्रपटात चमकला झीनत अमन याच मार्गानं चित्रपटात आली. दीपक पराशर आणि अगदी अलीकडचा जॅकी श्रॉफ 'चारमिनारच्या' तुमच्यासारख्या मर्दाला हीच सिगारेट सतोष देऊ शकते' अशा कॉपीवाली असलेला मर्दानी चेहऱ्याचा जॅकी श्रॉफ पाच ते

हार्दिक शुभचिंतन !

# श्री सुवर्ण सहकारी बँक लि.

मुख्य कचेरी :

७५९ / ५१, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४

दूरध्वनी : ५४५२९, ५८१५४, ५३९२५

- जोगेश्वरी शाखा : ३१ बुधवार पेठ, रेणुसे बिल्डिंग
  पुणे ४११ ००२ दूरध्वनी : ४४ ६५ १९
- टिळक रोड शाखा : २०३५ / २, सदाशिव पेठ,
  पुणे ४११ ०३० दूरध्वनी : ४४ २६ ४८
- श्रीपूर शाखा : ता. माळशिरस, जि. सोलापूर
  दूरध्वनी : ५०
- शनिवार पेठ शाखा : २७५ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

| मुकुंद जोशी | प्रकाश जोशी | विलास एकबोटे | ज्ञानेश्वर आगाशे |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक | सरव्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

सात हजार रुपये एका रंगीत छायाचित्रामागे मिळवत असे.

तरीही लिंटासचे मॉडेल को ऑर्डिनेटर गौतम राजाध्यक्ष याच्यामते या क्षेत्रात फारशा नखरेलपणाला वाव नाही. या व्यवसायात व्यावसायिक निष्ठा आणि चिकाटी लागते. लिरिलच्या कॅरेन ल्यूनेलनं कोडाईकनालच्या पहाटेच्या कडाक्याच्या थंडीत टू पीस बिकिनी घालून किती मोकळेपणानं आणि किती वेळा अंघोळ केली, याचा हिशेब नाही. यालाच राजाध्यक्ष व्यावसायिक निष्ठा म्हणतात आणि म्हणूनच मॉडेल असण्याकरता आकर्षक चेहेरा आणि चांगलं शरीर सौष्ठव असून भागत नाही. अंगात पुरेसा डौलदारपणा, लवचिकपणा–ग्रेस असावी लागते राजाध्यक्ष म्हणतात, मॉडेल्स म्हणजे कपडे टाकायचे *हँगर्स नव्हेत* ! किंवा कपड्यांच्या दुकानातल्या बाहुल्याही नव्हेत! अशा प्रकारचा डौलदारपणा संगीता बिजलानी, (विको वज्रदंती, कोलगेट इ.) अॅना ब्रॅडमेयर (विमल, फोर स्क्वेअर इ.) टीना राझदान (थ्रिल, अपेला इ.) शामली वर्मा (लॅक्मे आणि अन्य) याच्यात भरपूर आहे आणि म्हणूनच ही सर्व यशस्वी मॉडेल्स आहेत. पण टीना राझदानच्या मते मॉडेल्सचं ग्लॅमर तर तर हिंदी फिल्मपेक्षा देखील अधिक तकलुपी असत. तीन वर्षांपूर्वी थ्रिलच्या जाहिरातीनं भारतात अक्षरशः धुमाकूळ घातला ! तशी त्या जाहिरातीची कल्पनाही आकर्षक होती. अंतराळयानातली दृष्यं, स्टारवॉर्स, चित्रविचित्र राजेशाही पोषाखातला महेश आनंद आणि टीना राझदान, जागोजागी टीना राझदानाचे प्रचंड कट–आउट्स उभे केले होते; पण या अशा भपकन प्रकाशात येण्यामुळे मॉडेलच स्वतःचं मार्केट कमी होत. कारण तुमचा चेहरा त्या विशिष्ट वस्तूशी इतका निगडीत होतो की लोक तुम्हाला दुसऱ्या जाहिरातीत स्वीकारू शकत नाहीत. हेच प्रॉमिस गर्ल माया अलकबद्दलही झाल. माया अलक व्यवसायानं डॉक्टर आणि तिन जास्तीत जास्त जाहिराती गृहिणीच्याच केल्या आहेत. तिच्या मते 'मुंबईमध्ये मॉडेलिंग करण सोपं आणि समाधानकारक आहे. याचं कारण मुंबईच्या जाहिरात संस्था या काटेकोरपणे काम करणाऱ्या आहेत. प्रॉमिसच्या माझ्या जाहिरातीत माझी साडी, अंबाड्यावरचा गजरा, मेक-अप हे सगळं अचूक आणि पूर्व नियोजित होत '– ती म्हणते आणि म्हणूनच डॉक्टरकीसारख्या व्यवसायात असूनसुद्धा मी मॉडेलिंग सोडलं नाही.

तरीही मॉडेलिंग म्हटलं की स्त्रीच्या अनावृत्त देहाचा मन चाळवणारा उपयोगच सर्वप्रथम ध्यानी येतो. त्याचमुळे जाहिरात बाथरुम टाइल्सची असो, की नव्या टेलिविजनची असो, तिथे स्त्रीदेहाची उभी–आडवी वळण सामोरी येतात. स्त्रीच्या शरीराच्या या अशा उपयोगामुळे हातात पैसा खेळवणारा पुरुष वर्ग निश्चितच त्या जाहिरातीकडे अधिक काळ बघतो ! हा सगळा प्रकार हीन अभिरुचीचा आणि बाजारु आहे. या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या जाहिराती *करणाऱ्या मॉडेल्सना काय वाटतं ?* हा प्रश्न मयुक्तिक ठरेल. पण हा सगळा प्रश्नच मुळी मध्यमवर्गीय वेडगळ समजुतीचा आहे, असं एकेकाळची प्रसिद्ध असणारी एक मॉडेल म्हणते ! आम्ही उच्चभ्रू आणि मुक्त समाजात वावरत असल्यामुळे असल्या संकुचित विचाराची पर्वा कशासाठी करावी ? तर, अनावृत्त स्त्रीदेहाप्रमाणेच अनावृत्त पुरुष देहाचाही वापर होतोच की, असं उर्मिला देशपांडे म्हणते उर्मिला असलेल्या वी. आय. पी. फ्रिपसच्या जाहिरातीत हे स्पष्टच दिसतं. स्वतःच्या शरीराचा असा उपयोग करून घ्यायला तिची स्वतःची हरकत नाही कारण तिच्या मते हा तिचा उपयोग नसून तिच्या फोटोचा उपयोग असतो !

असं वैचारिक समर्थन ज्या तरुण तरुणींना रुचेल त्यानीच या क्षेत्रात शिराव, हे वेगळं सांगायला नकोच ! तर गौतम राजाध्यक्ष म्हणतात, तरीही या व्यवसायात हिंदी चित्रपट व्यावसायासारखं शोषण नाही आणि याला अनेक व्यावसायिक स्त्री आणि पुरुष मॉडेल्सनी दुजोरा दिला. कॅम्पाकोला, चार्मिस, इत्यादी जाहिरातीतली काहिनी म्हणाली, मॉडेल म्हणून काम करण्यासाठी मला कोणाची हाजी हांजी करावी लागली नाही. उलट प्रत्यक्ष शूटिंगच्यावेळी किंवा एजन्सीच्या स्टुडिओमध्ये देखील वातावरण खेळीमेळीचं आणि मैत्रीचं असतं. आमचे परस्पराशी सबंध हे फक्त *व्यावसायिक पातळीवर* असतात. याला दुजोरा देत एल. आय. सी., सिलेक्शन सेंटर इत्यादी जाहिरातीतला सुहास म्हणतो, मॉडेल होण्यासाठी मला पुरेसा पडला माझा चेहरा आणि हाताशी असलेला फोन.

मॉडेल होण्याचा राजमार्ग म्हणजे स्वतःचे वेगवेगळ्या अँगलसमधले अनेक फोटोग्राफ्स, स्वतःची थोडक्यात माहिती आणि पत्ता अॅडवर्टायजिंग एजन्सीकडे 'सोडायचा' ! अर्थात तुम्हाला चालू फॅशन्स, काय 'इन' आहे, काय 'आऊट' आहे हे माहीत असणं


With Best Compliments From :

**M/s. J. D. Panse**

**Decorators & Painters**

1852 Sadashiv Peth, Pune 411 030

Tel. Off. : 44 43 65
Resi. : 44 93 46

आवश्यक आहे. चटपटीतपणाही हवा. त्यामुळेच असेल कदाचित, या व्यवसायात बिगर मराठी तरुण तरुणींचा वावर अधिक आहे. त्यामानान मराठी तरुण आपला बिचारा सीधासाधा, 'धोपटमार्गा सोडू नको' वर पक्का भरवसा असलेला ! खेरीज या व्यवसायात टिकण्याकरता त्या विशिष्ट वर्तुळात वावरत असण, 'सर्क्युलेशनमध्ये असणं' हेही आवश्यक असतं. त्यामुळेच या व्यवसायात मराठी तरुण भेटला तरी त्याच्यात मराठीपण कमीच. अर्थात हा प्रश्न काही 'व्यापार उद्योगात मराठी तरुण मागे का' यासारखा ज्वलंत आणि चिंता वाटायला लावणारा नाही !

मुळात मॉडेलिंग हा व्यवसायच फारसा टिकाऊ, आजन्म एकनिष्ठेनं करण्यासारखा नाही. तो टिकतो फार तर ४–५ वर्षे. यात येणारी मॉडेल्सची संख्याही सतत बदलती, कमी जास्त होणारी. व्यावसायिक चढाओढीमुळे मॉडेल्सचे परस्पराशी संबंध मित्रत्व आणि सहकार्याचे असतीलच असं नाही. त्यामुळे एखाद्या लहानमोठ्या एजन्सीनं एखाद्या मॉडेलला फसवल, तर ते गुपचूप सहन करावं लागतं. इथे काही मॉडेल्सचे हितसंबंध जपणारी संघटना–युनियन नाही, असं बंगाली तरुण रीतेश हल्दार म्हणतो. ही फसवणूक नेमकी कसली ? तर एखादी एजन्सी एखाद्या विशिष्ट उत्पादनाकरता तुम्हाला करारबद्ध करते. काही कारणामुळे ते उत्पादन लांबणीवर पडतं. दरम्यानच्या काळात त्याच्याशी स्पर्धा करणारं दुसरं एखादं उत्पादन पुढं येतं. साहजिकच उत्पादनासाठी मॉडेल म्हणून काम करण शक्य नसल्यामुळे ही दुसरी जाहिरात नाकारावी लागते. कधी कधी त्यामुळे आधीच्या उत्पादनाची जाहिरात करण्याची थीम बदलते आणि तीही जाहिरात आपल्या हातून जाते. अशा रीतीनं दोन्ही घरचा पाहुणा उपाशी रहाण्याचे प्रसंग, विशेषतः अप्रसिद्ध मॉडेल्सवर तर फारच येतात आणि याची कुठेच दाद मागता येत नाही.

यामुळेच मॉडेलिंग हा काही मुख्य व्यवसाय ठरत नाही, निदान पुरुषाच्या बाबतीत तरी नाहीच नाही, कारण तो भरवशाचा नाही. मफतलाल, डू इट, कोहिनूर फिएस्टा इत्यादी जाहिरातीतला रीतेश हा इंटिरियर डिजायनर म्हणून काम करतो. कोलगेट, एस्. कुमारच्या जाहिरातीतला रवी आपल्या कुटुंबाच्या वाहतूक व्यवसायात काम करतो त्यातल्या त्यात वाळकेश्वरला रहाणारा जॅकी श्रॉफ तेवढा चाळवजा एका खोलीतल्या मध्यमवर्गीय कुटुंबातून आला. स्त्री मॉडेल्स मात्र बहुसंख्य वेळेला, सुखवस्तु घरातून आल्यामुळे मॉडेलिंग इतपतच व्यवसाय करत रहातात.

त्यातल्या त्यात पैसा मिळवून देणारी आणि जगाची सैर घडविणारी गोष्ट म्हणजे फॅशन शोज. पण त्यालाही परिश्रम लागतातच. त्याना नाटकाप्रमाणेच दौरे करत हिंडावं लागतं. संगीताच्या तालावर चालण्याचा सराव करावा लागतो. अर्थात श्रमाच्या मानान पैसा आणि मजा भरपूर.

अर्थात असे कष्ट ॲड फिल्मच्या शूटिंगच्या वेळीही करावेच लागतात. थोडेसे जास्तच. नाही म्हटलं तरी कधी कधी भरदुपारी 'उन्हातान्हात राबाव' लागत. न आवडणाऱ्या पेयाच्या बाटल्याच्या बाटल्या रिचवाव्या लागतात. त्याही चेहरा हसरा ठेवून ! असाच अनुभव बॉम्बे डाइंगच्या शीला जोन्सनंही सांगितला, की कसं आम्ही एकदा सतत अठरा तास शूटिंग केलं, तेही अंधाऱ्या कोंदट तळघरात, परत परत टेक्स–रिटेक्स घेत आणि अखंड 'निळाचा घाम' गाळत!

बट इट वॉज ऑल फन, जस्ट लाइक अ पिकनिक. ती म्हणते आणि आत्ता ..इथे थोडं थबकणं. ही एक गमतीची गोष्ट आहे हं. खरं म्हणजे मॉडेलिंगची दुनिया चिरतारुण्याची असं आपल्याला वाटतं. इथे जनरेशन गॅपला वगैरे वावच नाही, असही वाटून जातं. आणि हे अधिकच पटत ते शीलासारख्या एक्स–मॉडेलशी बोलल्यावर. शीला काही अजून मागच्या पिढीत जमा झालेली नाही, पण तिची मॉडेलिंग करिअर मात्र भूतकाळजमा झालेली आहे. आणि केवळ १०–१५ वर्षांतच या क्षेत्राचा नजारा असा काही बदलला आहे, की शीलाला 'ते आमचे पूर्वीचे रम्य दिवस' असा उल्लेख आताच करावा लागतो आहे तरुणाई आणि चलतीची स्पदनं इथे इतक्या संवेदनाक्षमतेनं टिपली जातात, की इथे नव्याचे नऊ दिवसही नसतात, इतका त्याचा आत्मा तरुण आहे इथे काळ सरकत नाही, लोटत नाही, तो भरधाव दौडतो !

मॉडेलिंग आणि जाहिरातीच्या क्षेत्रात काळ असाच झपाट्यानं बदलतो आहे, आणि त्याबरोबर बदलताहेत जाहिरातीच्या कल्पना, जाहिराती आणि मॉडेलिंगचं स्वरूप. अलीकडे अशा अनेक जाहिराती पाहण्यात आल्या ज्यामध्ये मालाची वैशिष्टयं कलात्मक पद्धतीनं मांडली जातात त्यामागे काही विषयसूत्र असतं. अलीकडच्या स्टॅनरोजच्या कपड्याच्या जाहिरातीतही खरी मॉडेल्स वापरलेली नाहीत. कदाचित थरमॅक्स, दोदसाल, कम्प्यूटर्स यासारख्या कपन्याच्या उत्पादनाच्या जाहिरातीतही मॉडेल्स ओढून ताणून बसवता आली असती पण तो मोह टाळला आहे. हे एकूण जाहिरात क्षेत्राच्या दृष्टीनं निरोगीपणाचं आणि प्रगतीच लक्षण आहे.

जाहिरात क्षेत्राच्या या पार्श्वभूमीवर मॉडेल्सकडूनही अपेक्षा बदलल्या आहेत. मॉडेल्सचा वापर एकतर कमी होणारा आणि जिथे होईल तिथेही त्या मॉडेलच्या देहाच्या किंवा सौंदर्याच्या प्रदर्शनाला महत्त्व नसेल तर त्या मॉडेलचा वापर त्या कल्पनेसाठी केलेला असेल. उदाहरणार्थ गार्डनच्या जाहिरातीत केवळ बाह्याकृती–सिलहूट आणि स्पष्ट–अस्पष्ट चेहरा याचाच वापर आहे, कारण महत्त्व आहे ते कल्पनेला, वातावरणाला. दुसरी ठळक नजरेत भरणारी जाहिरात, लॅक्मे उत्पादनाची रगवलेल्या रेखीव ओठामधली बासरी आणि त्यावर फिरणारी रगीत निमुळती बोट आणि नखं, आणि शेवटी दिसणारा शामली वर्मांचा उत्कट आत्ममग्न चेहरा आपल्या चित्रांची प्रदर्शनं भरवणारी तरतरीत आणि रेखीव चेहऱ्याप्रमाणे बुद्धीही असेल, असा प्रत्यय देणारी शामली वर्मा, सध्याच्या टॉप मॉडेल्सपैकी एक आहे. आणि भविष्यकाळ तिच्याचसारख्या संवेदनाक्षम आणि बुद्धिमान दिसणाऱ्या–असणाऱ्या तरुण मॉडेल्ससाठी उज्ज्वल आहे.

□

तरुण मुलामुलींचा एक ताजा ग्रुप

# 'अनुभव' नावाचा अनुभव

मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुण्यात विषमता निर्मूलन परिषद भरली होती. त्यात चार मे पंच्याऐंशीला आमच्या 'अनुभव' ग्रुपनं शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या आयुष्यातील काही प्रसंग सादर केले.

त्यानतर एक दोन दिवसांनी आम्ही एकत्र जमलो. आता पुढे आपण काय करायचं, हे ठरवायचं होतं. त्यावेळी नुकतंच आम्हाला पुण्यातल्या कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम (CASP) या संस्थेचं बोलावणं आलेलं होतं. त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी एक छोटंसं नाटकाचं शिबीर घेण्यासाठी. त्यामुळे तिथे आपण काय सांगायचं हेही ठरवायचं होतंच. पण मग सुट्टीतली नेहमीची कारणं पुढं आली. कुणाला गावाला जायचं होतं तर कुणाला ट्रेकला ! एकंदर, पुढचं ठरवणं असं काहीच झालं नाही. आणि ते लांबणीवर पडलं.

झालं असं की, कॉलेजात आल्यावर थोड्याच अवधीत असं जाणवलं, काही स्पर्धा सोडल्या तर आपल्या वयाचं-अनुभवातलं नाटक कुठेच सादर होताना दिसत नाही. म्हणून ते आपण सादर केलं पाहिजे. यासाठी आमच्याकडे दोन पर्याय होते. एक म्हणजे संपूर्णपणे स्वतः जबाबदारी घेऊन नाटक करायचं. आणि दुसरं म्हणजे एखाद्या संस्थेत राहून ते करायचं-मांडायचं. पण संस्था म्हटली की संस्थेचे नियम, तत्त्व, विचार, डॉमिनेशन्स हे सांभाळणं भाग होतं. नेमकं हेच आम्हाला नको वाटलं आम्हाला आमचा स्वतंत्रपणा महत्त्वाचा होता आणि आहे.

नुसतं नाटक करायचं नाही, तर ते आपल्या अनुभवातलं, आपल्या वयाचं आणि 'आपलं' असलं पाहिजे, ही कल्पना तशी नवीनच. म्हणून तितकाच गोंधळात टाकणारी. कारण अनुभवाची व्याख्या काय, आणि नक्की कुठले अनुभव घ्यायचे ? असा विचार करताना आम्ही आमच्या रोजच्या जगण्याकडे वेगळ्या दृष्टीनं पहायला लागलो मग लक्षात आलं की आपले अनुभव म्हणजे फक्त घराची चौकट नाही. आमच्या अवती भवतीचं सगळंच त्यात आलं.

या विचारातूनच आम्ही 'प्रश्न' केलं. शिक्षणपद्धतीमधला भ्रष्टाचार, घरच्या आघाडीवर येणारी दडपणं आणि आम्हा विद्यार्थ्यांमधला भोंदूपणा त्यात मांडला होता.

आमचे अनुभव मांडणं त्यावेळी आम्हाला इतकं महत्त्वाचं वाटत होतं की ग्रुपला नाव द्यायचंही आम्ही टाळलं.

'प्रश्न' सादर केल्यानंतर आम्हाला दोन प्रकारच्या प्रतिक्रिया मिळाल्या. एक म्हणजे नाट्यक्षेत्रातल्या मंडळींच्या आणि त्याचप्रमाणे सामाजिक कामात गुंतलेल्या लोकांच्या. 'प्रश्न' मधला आशय त्यांना खूपच जवळचा वाटला.

त्यानंतर सादर केलं— 'पळसाला पानं पाच.' समान हक्क असलेलं, कोणाही एकाभोवती केन्द्रित नसलेलं असं पाच तरुण मुलामुलींचं घर त्यात दाखवलेलं होतं. आणि मग त्यामधले तणाव, जबाबदाऱ्या आणि गमतीजमती मांडल्या होत्या.

'प्रश्न'च्या तुलनेत 'पळसाला पानं पाच' वेगळं वाटणं साहजिक होतं. आणि तसंच झालं. समीक्षकांचं मत असं की, ते आमच्या वयाचं असलं तरी प्रातिनिधीक नाही काहींनी आम्ही 'मध्यमवर्गीयपणा' करत आहोत अशी टीका केली. ज्यांना 'प्रश्न' मधला सामाजिक आशय आवडला होता त्यांचं 'पळसाला पानं पाच'मुळे समाधान झालं नाही.

याच वेळी आम्ही आमच्या ग्रुपला 'अनुभव' हे नाव दिलं. आणि याच नावामुळे आमच्या डोक्यातले या आरोपांमुळे निर्माण झालेले गोंधळ दूर झाले. आमच्या जगण्याविषयीच्या जिवंत अनुभवांना कोणत्याही प्रकारची लेबलं लागणं शक्य नाही किंवा त्यात 'सामाजिक आशय नाही' म्हणून ओरड करण्यातही अर्थ नाही, हे आम्हाला कळलं.

एक मात्र खरं, 'प्रश्न' मुळेच आम्हाला वेगवेगळ्या ठिकाणाहून बोलावणी यायला लागली. साधू वासवानी मिशनतर्फे वासवानींच्या जीवनावर आम्ही एक नाटक लिहून ते बसवलं त्यावेळी वासवानींच्या जीवनाचं नुसतं उदात्तीकरण करून त्यांना माणसांपासून दूर न नेता, आपल्या अनुभवातलं त्यांच्या तत्त्वज्ञानाचं स्थान दाखवण्याचा आम्ही प्रयत्न केला.

त्याच सुमारास अंधश्रद्धा निर्मूलन परिषद भरली होती. त्यात सहस्रबुद्धे मठासमोर बुवाबाजीविरुद्ध एक पथनाट्य केलं. हे आमचं पहिलंच पथनाट्य ! साहजिकच त्यात मोकळेपणा थोडासा कमी होता. पण त्यातही आम्ही आक्रस्ताळेपणा न करता समाजात वावरणाऱ्या या साधू लोकांच्या संभावितपणावर भर दिला होता. तसंच मुख्य विरोध हा देव मानण्याला नसून दैववादी असण्याला आणि म्हणून अंधश्रद्ध होणाऱ्यांना होता. त्यावेळी मिळालेल्या प्रतिसादामुळे आम्हाला खूपच विश्वास मिळाला.

नंतर लगेच हमालपंचायतीच्या बायकांसमोर सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरचं पथनाट्य केलं. सनातनी वातावरण, स्त्री



**डावीकडून–सुनील गोडसे, अश्विनी इनामदार, सुनिल सुखथनकर, सुलभा साने सती भावे, स्मिता राईलकर, महेश राजवाडे**

म्हणून असणारा दुर्लक्षितपणा आणि ज्योतीराव वगळता पुरेसं पाठबळ नाही–अशा सगळ्या प्रतिकूल परिस्थितीत सावित्रीबाईंनी अगदी तरुण वयात दाखवलेला निर्भिडपणा आणि केलेलं काम निश्चितच खूप मोठं. स्त्रियांनी शिक्षण घ्यावं म्हणून त्यांनी घेतलेले कष्ट, हे सगळं आम्ही मांडलं. तिथल्या बायकांना ते खूपच जवळचं वाटलं. आम्हालाही आत्मविश्वास आला.

मग आम्ही युवकवर्षानिमित्त ठिकठिकाणी पथनाट्य करायचं ठरवायला लागलो आणि तेव्हा असा मुद्दा निघाला की, आपला ट्रॅक बदलतोय का? आपण एकत्र आलो ते नाटकाची आवड आणि ते सादर करण्यासाठी! मग आता त्याला हे समाजसेवेचं स्वरूप कसं काय? आणि खरं तर आपण जे करतोय त्याला 'समाजसेवा' तरी म्हणता येईल का? की आपण तथाकथितपणाच करतोय?

तेव्हा विचार करता करता असं लक्षात आलं की, नाही तरी आपण सुरवातीला हा विचार केला होताच. आपलं व्यक्त होणं हे घराच्या चौकटीपुरतं मर्यादित नसणारंय. तेव्हा आपण ट्रॅक बदललेला नाही.

आणि यातूनच 'मित्र-मैत्रिणींचा पार' ही कल्पना पुढे आली. ज्या गोष्टींमुळे ट्रॅक बदलला असं वाटत होतं त्याचसाठी एक स्वतंत्र उपक्रम करावा असं ठरवलं. युवकवर्ष हे एक चांगलं निमित्तही आम्हाला मिळालं. पण हे सगळं करायचं कुठं हा प्रश्न आला. आतापर्यंत लोक आम्हाला बोलवत, जागेचा प्रश्न आलाच नव्हता. दोन चार ठिकाणी चौकशी केली तेव्हा त्यांनी बरेच पैसे मागितले. पण पैसे देणं हे आम्हाला आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखं नव्हतं हे एक, आणि युवकांसाठीच हा उपक्रम करायचा पण त्यात कुठेही व्यावसायिकता नाही असं असताना आपण पैसे का मोजायचे?

कुणी तरी सांगितलं फर्गसन कॉलेजातलं 'किमया' जे आहे आहे त्याचा विचार करा. मग एकदम आठवलं, खास युवकांसाठीच, त्यांना त्यांचे कार्यक्रम सादर करता यावेत म्हणून 'किमया' आहे. आता आपला प्रश्न सुटला. आपल्याला हक्काची 'जागा' मिळाली. तातडीनं प्रमुखांना भेटलो......

—पण इथंही पैसेच!!

तसेच परत आलो.

शेवटी आय. एल. एस. लॉ कॉलेजातला एक हॉल त्यावेळचे प्राचार्य सत्यरंजन साठे यांनी मोफत आणि कुठलीही अट न घालता दिला.

तिथं आम्ही धडाक्यानं कार्यक्रम सुरू केले. चर्चा,परिसंवाद याचबरोबर डॉ.सुनंदा अवचट व डॉ. अनिल अवचट यांच्या मुलाखतीचा कार्यक्रमही केला.

या सगळ्या प्रकारात ज्यांना केवळ नाटकाची आवड होती, त्यांना या गोष्टीत रस वाटेना. ते हळूहळू जायला लागले. पण त्याचबरोबर या उपक्रमामुळे काही नवीन लोकही मिळाले.

नवीन लोकांच्या नव्या शंकांमुळे परत एकदा ग्रुपचं इव्हॅल्युएशन करायला मदत झाली. काहींचं म्हणणं असं की, आपण राजकारणाबाबत काय करायचंय? एक गोष्ट एकदम लक्षात आली. राजकारणाशी आपला काय संबंध? आपला संबंध आहे तो माणसांशी. त्यांच्यासाठीच आपण आपल्या योजना आखणार आहोत. करणार आहोत. काहींचं विचारणं असं, 'अनुभव'च्या आर्थिक बाजूचं काय? याचं उत्तर फारच सोपं. 'अनुभव'च्या सध्याच्या काळात पैशांपेक्षा माणसं निश्चितच जास्त महत्त्वाची. त्यामुळे आधी माणसं. पैसे कधीही मिळतील.

अजून एक गोष्ट अशी की जर जास्तीत जास्त लोकांशी संवाद साधायचा असेल तर ग्रुप मर्यादित असून भागायचच नाही. म्हणूनच पूर्वी 'एकमेकांना समजून घ्यायला सोपं जातं' या कारणासाठीचा मर्यादितपणाचा हट्ट आता उरला नाही.

मधे स्थगित झालेला 'मित्र-मैत्रिणींचा पार' आता पुन्हा सुरू होतोय. त्याची आखणी पूर्ण झालेली आहे त्याचप्रमाणे एका नवीन नाटकाची जुळवाजुळव चालूच आहे.

आणखी एक नवीन योजना आहे. अंधशाळेतल्या विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला एक करमणुकीचा कार्यक्रम करायचा! त्यातल्या काही तांत्रिक बाबी पूर्ण झाल्या की त्याचे कार्यक्रम सुरू होतीलच.

तशा अनेक योजना डोळ्यासमोर आहेत. पण उत्साहाच्या भरात एकदम सगळ्याच सुरू करून 'एक ना धड...' असं होणं आम्हाला पटण्यासारखं नाही.

तयार आहेत त्या योजना प्रत्यक्षात यायला सुरुवात होतीय. आता आवश्यकता फक्त सहकार्याची, आणि ते आम्हाला मिळेलच!

—अनुभव

□

पत्ता : सुनील सुकथनकर
बी–१, दीपक अपार्टमेंट
मॉडेल कॉलनी,
पुणे १६

अठ्ठाविसाव्या वर्षी निसर्गकोषासारखा सुमारे पंचवीस लाखांचा प्रकल्प हातात घेणारा विवेक परांजपे

# रसरशीत तरुणपण... खणखणीत आव्हान

● मुलाखत : मेधा राजहंस ●

खरंच, तरुणपण म्हणजे काय ?
संवेदनशीलता, धडाडी, नवा विश्वास, नवी क्षितिजं हुडकून सर करण्याची उमेद, बेहिशेबीपणानं मांडलेला कर्तृत्वाचा जुगार .. हे आणि असं बरंच काही.
पण सहजपणे सापडतं का कधी असं रसरशीत तरुणपण, जे लहान-मोठ्या सगळ्यांना सहज आपल्याबरोबर ओढून नेईल....
असं उत्फुल्ल तारुण्य कधी कधी तुमच्याआमच्यामध्येच लपून बसलेलं असतं. निसर्ग कोषासारखं अवघड काम आपल्या आजुबाजूची, आपल्यातलीच काही विशी–पंचविशीतली तरुण मुलं हातात घेतात. त्यांना वेडं करणारा पशू-पक्षी-किटक-मानवांचा निसर्ग त्यांना अभ्यासातून पुढे ठेवायचा असतो. आणि तोसुद्धा ' मराठी ' भाषेत आणि तेसुद्धा नेहमीच्या मराठी प्रकाशनासारखं नाही....
उत्तम कागद, उत्तम छपाई, उत्तम लिखाण आणि शेकडयांनी रंगीत छायाचित्रं...छे ! छे ! मूर्खपणाचा कळसच. ठरलेल्या वेळी, ठरलेल्या पद्धतीनं ' आपली सृष्टी आपले धन ' या निसर्गकोषाचा पहिला खंड प्रसिद्ध होतो तो भल्याभल्यांना चपराक देत आणि मराठी प्रकाशन व्यवसायाचं साचेबंद रूप झुगारून देत. निसर्गकोषाच्या निर्मितीतला प्रमुख आणि कोषाचा प्रकाशक विवेक परांजपे याला विचारलं हे कसं शक्य झालं ?
विवेक म्हणतो – तरुणपणामुळं.
पण अशी मोठी स्वप्नं, मोठी आव्हानं झेलणारं तरुणपण मुळात कसं तयार होतं ?
मला आठवतात शाळेतले दिवस. विवेक आमच्याच कॉलनीत होता. मुलामुलींचा आमचा एक छोटा ग्रुप होता. कशात कशात भाग घेणारा. त्यातसुद्धा विवेक सहज पुढाकार घ्यायचा. दिवाळीतले मातीचे किल्ले असोत की गणपती उत्सवातले कार्यक्रम असोत, तो त्याच्या उत्साहात फसफसत असायचा. कॉलनीत आम्ही आमची म्हणून एक छोटी लायब्ररी केली होती. कल्पना विवेकची होती. त्यानंतर प्रयोगशाळा सुरू केली. त्यात आम्ही 'लिक्विड इरेझर' बनवलं होतं. ते बाटलीत भरून विकायचो. बाटल्या खपल्या नाहीत, प्रयोगांचा उत्साहही कमीच झाला पण विवेकनं मात्र तो छंद त्याच्या घरी वाढवला.
लहानपणीसुद्धा मला आठवतंय की

त्याच्याकडे कायम एखादा प्राणी असायचा. स्लेंडर लॉरीस, माकड नाहीतर साप. अभ्यासात पहिला नंबर येऊन पेढे वाटणाऱ्या स्कॉलर मुलाच्यातला तर तो कधीच नव्हता. असले छंद आणि उद्योग करणाऱ्या मुलाबद्दल इतर लोक जसं बोलतात तसंच तेव्हा बाकीचे बोलत असतील. मध्ये काही वर्षांची गॅप पडली आणि एकदम 'फ्रेंडस् ऑफ ॲनिमल्स' हे नाव पेपरमध्ये यायला लागलं.
पेशवेपार्कबद्दल सकाळमधनं त्याचे लेख यायला लागले. त्याचं प्राण्याबद्दलचं प्रेम खरंच प्रामाणिक आहे हे माहीतच होतं. पण त्या प्रेमाचा हा सामाजिक आविष्कार बघितल्यावर हे प्रेम अजून खोलवर आहे असं वाटलं. दरम्यान तो वैद्य झाला. त्याच्या व्यक्तिमत्त्वातले वेगवेगळे रंग इतके मजेशीर होते की तो करत असलेल्या उद्योगाची गंमत वाटायची. विवेक म्हणतो की तेव्हा लोकांना 'फ्रेंडस् ऑफ ॲनिमल्स' हे काहीतरी खूळ वाटायचं. पण ते खरंच होतं.. खूळ वाटण्याजोगंच होतं. नाहीतर उद्योगधंदा सोडून काहीतरी प्राण्यांच्या मागे लागायचं, त्यांच्याबद्दल लिहायचं, त्यांच्यावतीनं मागण्या करायच्या म्हणजे खूळच. पण तो ते करत होता.
त्याच्याबरोबरची मुलं नंतर वाढायला लागली. मग कधीतरी एकदा, त्यानं संयोजित केलेल्या नेचर कँपची जाहिरात वाचली. मनाली, अंदमान, सिक्कीम आणि अशाच ठिकाणी. विवेक हळूहळू वगळाच वाटायला लागला. तेव्हा हुषारी मोजण्याच्या सर्वमान्य चाचण्यांचा फोलपणा आम्हालाही कळून चुकला होता आणि मग एकदम त्याच्या 'निसर्ग' मासिकातून 'आपली सृष्टी आपले धन' या कोषाची जाहिरात आली. डोक्यात काहीतर लख्कन चमकून गेलं. तेव्हा वाटलं 'काढेल बुवा हा. काहीपण करू शकेल.'
विवेकशी बोललं की त्याच्याबद्दल हा 'काहीपण' करू शकेल असं वाटतं आणि हे वाटणं हेच त्याचं वेगळेपण आहे.
कोषाचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. खंड पाहिला आणि क्षणभर धक्काच बसला. इतकी सुदर, आव्हानात्मक, महत्त्वाकांक्षी निर्मिती आणि तीसुद्धा मराठीत ? आणि हे कुणी केलं तर–पराजपे–वाटवे–मोघे–देशपांडे–खोले या मंडळींनी. यातली बहुतेक माणसं तर माहिती आहेत. अशा छोट्या मराठी गटानं इतकं मोठं काम केलं ? खंडाचं पान न् पान बघणीय–वाचनीय आहे. याची निर्मिती कोणत्याही उच्च प्रतीच्या इंग्रजी गुळगुळीत पुस्तकापेक्षा कमी नाही. पुस्तकाची छपाई विवेकनं डायरेक्ट सिंगापूरला केली. तो म्हणतो आपलं नाणं खणखणीत पाहिजे- मराठीला किंमत द्या म्हणून मिळणार नाही. आपल्या कामातूनच ती किंमत मिळवायला पाहिजे. विवेकनं त्याच बोलणं खरं केलंय. मराठी भाषेला, मराठी प्रकाशन व्यवसायाला त्यानं जाणीवपूर्वक एका मोठ्या कक्षेत नेऊन सोडलं. 'निसर्ग'च्या या खंडाची पाच भाषात भाषांतरं होणार आहेत आणि त्यावर Translated from Original Marathi असं मिजासीत लिहिलं जाणार आहे.
याच्यानंतर काय करणार ? विवेक म्हणतो, कोषाचे पाच खंड पूर्ण झाले की आम्ही चित्रपटक्षेत्रात उतरणार. निसर्गावरच्या उत्तम फिल्म्स आम्ही तयार करू ज्या जगात कोणी केल्या नसतील. विवेकची बेहिशोबी मस्ती हीच त्याची शक्ती आहे.
विशेषांकात त्याची मुलाखत घ्यायचं ठरलं. इतके प्रश्न डोक्यात होते की, कुठून सुरुवात करावी तेच सुचेना...

□

**विवेक आता पहिला प्रश्न. तू लहानपणापासून धडपड्या होतास, अभ्यासाव्यतिरिक्त चारचौघांपेक्षा वेगळं काही तरी करत असायचास ते माहीत आहे. पण पक्षी निरीक्षण-प्राण्यांची ओळख याची सुरुवात कशी झाली ?**

: लहानपणापासूनच मला प्राण्यांची आवड होती. आमच्या घरी स्लेंडर लॉरीस होता. तो बंगलोरहून विकत आणला होता आपल्याकडे सापडणारा माकडाच्या जातीतला तो एकमेव प्राणी, ज्याला शेपूट नाही. सांगायचं म्हणजे लहानपणापासून आवड होती. पण पक्षी-निरीक्षण वगैरे पुस्तकं घेऊन खऱ्या अर्थाने करायला, म्हणजे नावं माहिती करून घ्यायला त्यामानानं खूप उशिरा सुरुवात केली साधारण मॅट्रिकनतर. तोपर्यंत मी नुसताच हिंडायचो. खूप पक्षी तेव्हासुद्धा माहीत होते; पण सर्वसाधारण इतर मुलासारखीच माझीपण स्थिती होती की, हा कोणता पक्षी, त्याचं शास्त्रीय नाव माहीत नसायच मग आजूबाजूच्या लोकाना विचारून पक्षी ओळखायचो. त्या काळात इतर कोणीही हिंडलं नसेल इतका मी हिंडलोय. खारी–पक्षी गोळा करत हिंडायचो, सापही भरपूर पकडायचो, जंगलातून भटकायचो, ते हिंडणं व्हायचं. सर्वात जास्त मला आवडायचं ते कोकणात जायला. तिकडे जंगलं होती. तिकडे जायच कारण म्हणजे लहानपणापासून वाघ कधी बघायला मिळेल अशी उत्सुकता होती.

**कोकणात वाघ आहेत ?**

: वाघ म्हणजे तेव्हा नीट माहीत नव्हतं.


वाघ म्हणजे पट्टेरी वाघ, कोकणात बिबळे आहेत. नदीवर वगैरे वाघ बघायला आम्ही जायचो.

**पक्षा-प्राण्यांचं वेड तुझ्याकडे कसं आलं ? तुझ्या वडलांना आवड होती ?**

: हो. पक्षा-प्राण्यांची आवड त्यांना होती. साप-बिप पकडायला मी त्यांच्याकडनंच शिकलो. ते पूर्वी सापांवर लेक्चर्स द्यायचे. आता बरोबर तशीच मी देतो, आणि आता काही दिवसांनी माझा मुलगापण द्यायला लागेल. इतका आता तोही त्याच्यातच आहे. वडलांकडनंच ही आवड आलीय. लहानपणी घरामध्ये वडलांनी प्रयोगासाठी काही प्राणी आणले होते. ते सतत बघण्यात होते. पण नंतर प्रयोगासाठी म्हणून कधीही मी प्राणी वापरले नाहीत. जिव्हाळ्यानेच सगळे ठेवले. त्यात काही मलबारी खारी होत्या, रंग बदलणारे सरडे होते. त्यांची भीती तर पहिल्यापासूनच वाटत नव्हती. पहिला साप मी साधारण ९।१० वर्षांचा असताना पकडला. पपा नसताना. त्यामुळे नंतर सापांची भीती अशी वाटेनाशी झाली.

**पण तेव्हापासून तुला विषारी-बिनविषारी साप कळायला लागले होते ?**

: हो. ते मात्र मला सापांबद्दल फार लवकर कळायला लागलं. साप मी खूप पाळलेलेही होते, पकडलेलेही होते. साधारण अकरावीत असताना मी जवळजवळ सापांमधला तज्ज्ञच झालो होतो. दहावीत असताना माझी भारत हायस्कूल, भारत इंग्लिश स्कूल आणि इतर एक-दोन शाळांमध्ये लेक्चर्स होत होती. पण गंमत म्हणजे त्यावेळी या विषयावर—साप-प्राणी यांच्यावर लेक्चर्स होत नव्हती. तेव्हा माझी सर्वात जास्त लेक्चर्स केमिस्ट्रीवर झाली. म्हणजे केमिकल गार्डन, केमिस्ट्रीतले निरनिराळे प्रयोग याच्यावर माझी लेक्चर्स झाली. घरामध्ये खूप मोठी प्रयोगशाळा होती, तिथेच मी वेगवेगळे प्रयोग करून बघायचो. त्या काळात हा प्राण्यांचा छंद थोडा मागे पडला होता की काय असं वाटतं, पण तसं बघायला गेलं तर तसंही नव्हतं. जेव्हा प्रयोगशाळा होती, तेव्हाच कमीत कमी दहा प्रकारचे प्राणी घरात होते.



फिरणं आणि फोटो काढणं हे माझं व्यसन आहे. —विवेक

**तुझ्या घरी तुझ्या आईला पण प्राण्यांची आवड आहे का ? नाहीतर सर्वसाधारणपणे या आयांना प्राणी वगैरे आवडत नाहीत.**

: अगदी तसंच आहे. तिला अजिबात प्राण्यांची आवड नाही. अगदी मांजरसुद्धा तिला आवडत नाही. पण तिनं विचारीनं कधी त्याचा प्रश्न निर्माण केला नाही. तिच्यामुळेच तर आत्तापर्यंत मी माझा छंद सांभाळू शकलो.

**घरात जे प्राणी पाळले होते, त्यांचं खाणं पिणं—घाण काढणं कोण करत होतं ? कारण मला खूप जण माहित आहेत, की त्यांना प्राणी तर आवडतात, पण बाकीच्या गोष्टींचा कंटाळा असतो.**

: आमच्या घरात त्यांचं खाणं—पिणं, घाण काढणं सगळं मीच करायचो

**आता घरात कोणते प्राणी आहेत ?**

एक खार आहे, स्लेंडर लॉरीस आहे. घुबड इकडे तिकडे येऊन जाऊन असतं. गरुड इतके दिवस होते; पण मग ते पेशवेपार्कमधे देऊन टाकले. काय होतं, लोक 'फ्रेंडस् ऑफ ॲनिमल्स'चा पत्ता शोधत शोधत येतात आणि काही तरी जखमी प्राणी वगैरे आणून टाकतात. मग ते नीट करण्याची जबाबदारी आमच्यावर येऊन पडते.

**फ्रेंडस् ऑफ ॲनिमल्स सुरू होण्यापूर्वी तू अभयारण वगैरे पाह्यली होतीस ? पक्षा—प्राण्यांबद्दल आपण काही जास्त योजनापूर्वक करावं असं कधी तुझ्या डोक्यात होतं का ?**

: अभयारण्य मी तेव्हा पाहिली होती. हिमालयात जाऊन राहिलो होतो. उत्तर प्रदेशातली अभयारण्यं पाहिली होती उत्तर-प्रदेशात एका ठिकाणी मी जास्तीत जास्त वन्य प्राणीजीवन पाहिलं. साधारण मॅट्रीक-नंतर मी तिकडे गेलो. तिकडे जे पाहिलं,




युवदर्शन – चॅनेल टू

त्याचा माझ्यावर खूप परिणाम झाला. तेव्हा पुस्तकंही खूप होती संदर्भाला. त्यानंतर पुण्यात आल्यावर कॉलेजची तीन वर्षं माझ्याकडे पक्षी–प्राणी असायचेच. ते कधी चुकले नाहीत. एका कुत्रीला सहा पिल्लं, दुसऱ्या कुत्रीला आणखी पाच–सहा पिल्लं. पंधरा–पंधरा, वीस–वीस कुत्री–कोंबड्या, अगदी नको व्हायचं. घर म्हणजे अगदी संतापजनक परिस्थिती होती आई–वडलांसाठी. त्यांच्या दृष्टिकोनातून माझ्याशी जमवून घ्यायचं म्हणजे अगदी कठीण होतं. दररोज घरात आमच्या प्रचंड वाद व्हायचे. पण त्यातूनच ते खूप जमवून घ्यायचे.

**याच्याशिवाय मधे काही वेगळं करावं असं तुझ्या कधी डोक्यात शिरलं नाही का ?**

: नंतर समस्त पुणेकरांप्रमाणे मी एक नाटककंपनी काढली.

**ही केव्हाची गोष्ट ?**

: साधारण ७५–७६ मध्ये नाटककंपनी काढली. महेश एलकुंचवारच्या हस्ते त्याचं उद्घाटन झालं. महेश माझा मित्र होता. हे सगळं कॉलेजमध्ये असताना केलं. मॅट्रिकनंतर एक वर्ष मी फर्ग्युसनला सायन्सचं पहिलं वर्ष केलं. पण तेव्हा साधारण माझ्या लक्षात आलं की मला हे M. B. B. S वगैरे अजिबात शक्य नाही आणि खरं सांगायचं तर मला त्याची आवड नव्हती आणि या इतर सगळ्या गोष्टींतून मला ते झेपलंही नसतं. सायन्स नाही म्हटल्यावर मग मी केटरिंग कॉलेजला गेलो. पण वडलांनी तिकडून पकडून आणलं आणि शेवटी आयुर्वेदाच्या साडेचार वर्षाच्या कोर्सला घातलं. आमच्या घरात परंपरागत संजीवनी म्हणजे आयुर्वेद आहेच. त्यामुळे शेवटी मी साडेचार वर्षाच्या आयुर्वेदाचा कोर्स केला आणि वैद्य झालो. पण आता माझ्या इतर उद्योगांमुळे मला दवाखान्यात फारसा वेळ द्यायला होत नाही, आणि पुढेही देता येईल असं वाटत नाही.

**मगाशी म्हणालास त्या नाटककंपनीचं पुढे काय झालं ?**

: आधी एका ग्रुपबरोबर लहान मुलांची काही नाटकं केली. मग रंगदीपच्या दोन-तीन नाटकांना मी संगीत दिलं. मला संगीताची भयंकर आवड होती. मी शिकतही होतो–गाणं आणि पेटीही वाजवत होतो बाकी सगळी वाद्यंही वाजवत होतो. माझ्याकडे सगळी वाद्यं होती–अगदी सतारीपासून. मी दिलेलं संगीत लोकाना आवडलं. मग आणखी काही नाटकांना संगीत दिलं. मग काही दिवसांनी मी माझंच नाटक बसवलं. वसंत पासलकरचं नाटक होतं. अशी दोन - तीन नाटकं मी बसवली, पण तेही मला विशेष आवडलं नाही. म्हणजे जे 'नाट्यविश्व' आहे ते मला फारसं आवडलं नाही. खूप लोकांशी संबंध यायचा. मग रात्ररात्र भरतवरच पडायचं असं चालू होतं. पण हा फार कमी कालखंड होता. मग मी काही दिवस डॉपर्समध्ये होतो. मग त्यातल्या काही नाटकांमध्ये साईड-रोल केले. पण तेही फार काळ टिकलं नाही. म्हणजे एकंदरीत माणसं हा प्रकार मला फार जुळवून घेण्याजोगा वाटला नाही. मधल्या काळात काय झालं, ७४ - ७५ मध्ये पेशवेपार्कमध्ये सोनाली आली. मी बघायला गेलो होतो. तेव्हा मी पूर्णपात्रेंना अगदी धीर करून म्हटलं की माझी सोनालीशी ओळख करून द्या, तर पूर्णपात्रे मला तिच्या पिंजऱ्यातच घेऊन गेले, त्यांच्याबरोबर मग मी बराच वेळ होतो पिंजऱ्यात. ओळख वगैरे झाली. ते म्हणाले की, जवळच रहातोस तर येत जा तू. दररोज बघून जात जा. मग रोज पेशवेपार्क. मी राजरोसपणे तिच्या पिंजऱ्यात जाऊन तिच्या अंगावर हात फिरवत असे. तिच्या अंगावरपण मी बसलोय. सोनाली आधी छोटी होती. नंतर अक्षरशः एका रात्रीत ती मोठी झाली.

**तुझी सोनालीशी ओळख किती दिवस टिकली ?**

: एकदा ओळख झालेली कायम टिकली. सोनालीची एक आठवण म्हणजे एकदा काय झालं, मी पिंजऱ्यात जाऊन तिला काही तरी देत होतो, तर तिनं माझं सगळं बोटच खाल्लं. म्हणजे तिनं बोट चावलं तर रक्त यायला लागलं–गरम–गरम आणि मग ती बोटच सोडायला तयार नाही. मग मी तिच्या नाकावर बुक्की मारली आणि कसंबसं बोट काढून घेतलं. त्यानंतर मग मी तिच्या पिंजऱ्यात गेलो नाही. ती नंतरसुद्धा तितकीच प्रेमात होती, तिला काही त्याचं वाटलं नाही; पण मग मलाच भीती वाटायला लागली. मी म्हटलं की, हे अंतर आता योग्य आहे.

**पेशवेपार्कमध्ये तू रोज जात होतास, मग तिथल्या प्राण्यांची आणि तुझी ओळख झाली असेल. प्राणी ओळख ठेवतात का ?**

पेशवेपार्कमध्ये मी अगदी रोज जात होतो. कारण मी शेजारीच रहात होतो. तिथले किती तरी प्राणी माझे चांगले मित्र झाले होते. उदाहरणार्थ दोन बिबळे, २।३ माकडं. बिबळ्यांना तर मी जवळ जाऊन मिठी मारू शकत होतो. अजून मी पेशवेपार्कमध्ये जाऊन सोनालीला साद घातली तर, ती लहान मुलासारखी उड्या

मारायला लागते. दुसरी गोष्ट, प्राणी ओळख कधीच विसरत नाहीत आणि ते ओळख इतकी छान व्यक्त करतात की, आपल्याला लाज वाटते की आपण त्यांच्यासारखे लोळण घेऊ शकत नाही, चाटू शकत नाही....

**पेशवेपार्कमधल्या गैरव्यवहारांबद्दल तू ‘सकाळ ’मध्ये लेख लिहिलास तो त्याच वेळी का ?**

: हो त्याच वेळी. तिथे रोज जाऊन जाऊन माझ्या लक्षात आलं – तिथे काय भीषण परिस्थिती आहे ते. म्हणजे पिंजरे वगैरे. प्राणी पिंजऱ्यांवर डोकं आपटायचे आणि जखमी व्हायचे. दुसरी गोष्ट, माणसांचे गैरव्यवहार इतके चालू होते. म्हणजे सांगायचं दोन अंडी दिली आणि अर्धसुद्धा द्यायचं नाही. पिवळं आपण खायचं–पांढरं द्यायचं. दुधाच्या एका बाटलीत तीन बाटल्या पाणी घालायचं. असले प्रकार तिथं चालले होते. मग मी मस्तपैकी फुलस्केपवर लेख लिहिला, तिथे काय काय अंदाधुंदी आहे वगैरे. त्यात फोटो टाकले पाच-सहा. फोटो मी स्वत: काढले, डेव्हलप–प्रिंटही घरीच केले. फोटोग्राफीची मला आवड होती. फोटोग्राफीचा मी Basic Course केलेला होता. तेव्हा कलर फोटो नव्हतेच. सगळे ब्लॅक अँड व्हाईटच...कॅमेरा तेव्हासुद्धा माझ्याबरोबर असायचाच. मग लेख पूर्ण केला आणि धीर करून सकाळमधे गेलो. तिथे कोणाला भेटायचं माहीत नाही. मग मुणगेकर बसले होते, त्यांच्याकडेच गेलो. त्यांना सांगितलं लेखाच्या संदर्भात बोलायचंय म्हणून. त्यांना आधी सांगितल्यावर इतकं भयंकर कौतुक वाटलं. मग काय आहे बघू म्हणाले. मला तेव्हा लेख लिहायचं वगैरे माहीत नव्हतं. पहिलाच प्रकार होता. मी लेख आखून लिहिला होता. त्यात फोटो चिकटवले होते, त्याच्याखाली कॅप्शन लिहिली होती आणि केव्हा केव्हा काय घडलं, याची तारीखवार फाईल पण तयार केली होती. मुणगेकर म्हणाले, की बुधवारी फोन कर. मी काही फोन केला नाही, कारण वाटलं, हे काही होणार नाही. आणि शुक्रवारच्या अंकात एक छोटा फोटो आणि त्याच्या खाली येत्या रविवारी वाचा. मग मला जरा मूठभर मास चढलं. रविवारी पाहिलं तर त्यांनी संपूर्ण पानभर लेख लावला होता. पेशवेपार्कमध्ये

युवदर्शन – चॅनेल टू




प्राण्यांची आबाळ. दुसऱ्या दिवशी गंमत म्हणजे महाराष्ट्र टाईम्सनं त्याच्यावर अग्रलेख लिहिला– त्या माझ्या लेखावर. तेव्हा मग बरं वाटलं, चला काहीतरी चांगलं झालंय वगैरे. मग एव्हाना २–३ मित्र गोळा झाले होते; पण त्यावर्षी ७४ साली काहीच झालं नाही. मग बरोबर एक वर्षानं ७५ साली पुन्हा एक लेख लिहिला की एवढी बोंबाबोंब करून काहीच झालेलं नाहीये.

**तेव्हा ‘ फ्रेंडस् ऑफ अॅनिमल्स ’ सुरू झालं नव्हतं ना ? मग ही सगळी माहिती तू एकटाच गोळा करत होतास ?**

: फ्रेंडस् ऑफ अॅनिमल्स पुढे झालं. तेव्हा मी एकटाच होतो. काही मित्र बरोबर असायचे पण तेव्हा कामाला काही दीशा नव्हती. पेशवेपार्कमधली माहिती मी स्वत:च जमवत होतो. तिथले सगळे लोक ओळखीचे होते. ते पण काही आतली माहिती द्यायचे. नंतर त्यावेळी मला सकाळनं चांगली मदत केली. की अरे तू लिहित जा, चांगलं लिहितोस वगैरे. मग मी मदर तेरेसांवर लेख लिहिला. माणसावर लिहिलेला तो माझा पहिला आणि शेवटचा लेख. लिहिण्यापूर्वी वर्षभर मी मदर तेरेसांच्या आश्रमात जात होतो मदतीला; पण तिथे इतकं खाणं होतं की मला काही ते आवडलं नाही, पुन्हा तिथली माणसं सेवा करायची आणि रात्री गैरव्यवहार करायची. मग मी ताबडतोब तो नाद सोडला. मग लगेच माझ्या डोळ्यासमोर पुण्यातली मोकाट कुत्री आली आणि त्याच्या वर मी सकाळमध्ये एक लेख लिहिला– मोकाट कुत्र्यांची हत्या. तो लेख चांगला माहितीपूर्ण होता. त्यापूर्वी पक्षी–प्राण्यांवर फारसं लिहिणारं कोणी नव्हतं.

**सकाळमधेच काय, एकूणच मराठीमधे हा विषय फार कमी यायचा.**

: मीसुद्धा मराठीतून हा विषय फारसा वाचलेला नव्हता. गेल्या ४।५ वर्षात वातावरण बदललंय. एकूण निसर्गावर खूप लिहिलं जातंय.तेव्हा मात्र या विषयाचं नाविन्य होतं. मुणगेकरांनी अशा लिखाणाचं खूप जोरदार स्वागत केलं आणि मला आठवतं, ते बसून लिहूनच घ्यायचे. ‘world wide week आहे, ऑक्टोबरमध्ये त्याच्यावर मला काहीतरी चांगलं लिहून दे. ’ मुणगेकर अशा विषयासाठी अगदी फोन करून बोलवून घ्यायचे, लिहायला सांगायचे आणि त्यांच्यामुळे सकाळमधे माझं एक वेगळंच स्थान निर्माण झालं. तो एकुलता एक माणूस होता, ज्याला विषयाचं महत्व कळलं होतं.

**फ्रेंडस् ऑफ अॅनिमल्स हे नाव घेऊन तू कामाला कशी सुरुवात केलीस ?**

मग काय झालं, ७७–७८ मध्ये पेशवे पार्कमधले खूप प्राणी मेले. त्यात माझे काही



गावागावातून सापांची ओळख – नितिन मोघे, विवेक परांजपे

¤

मित्र गेले. माझे अगदी जवळचे मित्र म्हणजे गंगा आणि प्रताप ही सिंहाची जोडी अतिशय हलाखीत मेली. नंतर काही माकडं होती. ती इतकी मस्त होती. बाकी कुणी आलं की चावायची, वाकुल्या दाखवायची पण आमचं नातं फार वेगळं होतं. प्राण्यांची ही परिस्थिती बघून आधी WWF च्या मुंबईच्या मुख्य शाखेमधे मी पत्रानं कळवलं की, इथे प्राण्यांचे असे हाल होताहेत. तर त्यांचं पत्र आल की, पिंजऱ्यातल्या प्राण्यांबद्दल आम्ही काही करू शकत नाही. तेव्हा मला भयंकर संताप आला. एकूणच त्या लोकांच्या उदासीन वृत्तीचा मला फार राग यायचा. आपण त्यांना सांगितलं की अहो मॅगझीन आलं नाही, पावती आली नाही की ते काय तिथे पडलंय घेऊन जा. अशी उदासीन वृत्ती. मग मी विचार केला, ठीक आहे. आपण आपलं स्वतःचंच काहीतरी सुरू करायचं. यांच्याबरोबर नको, मग त्या वर्षी मी कॉर्पोरेशनमधे सुखदेव म्हणून संपर्क अधिकारी होते, त्यांच्याकडे एक पत्रक दिलं. त्यांना सांगितलं की अशी अशी स्थिती आहे. तेव्हा तुम्ही जर या बाबतीत काही केलं नाहीत तर आम्ही आंदोलन करू. तेव्हा पु. स. पाळंदे कमिशनर होते. त्यांचं आणि आमचं या पेशवे पार्क प्रकरणावरून कधीही जमलं नाही. त्यांनी कायम आमची टिंगलच केली या प्रश्नावरून. तेव्हा आम्ही सगळी मुलं १८–१९ ची म्हणजे अगदी तरुण–पेटलेले वगैरे होतो. आताची गोष्ट वेगळी आहे. तेव्हा कॉर्पोरेशनमधे गेल्यावर फक्त भांडणंच व्हायची. पेशवेपार्क प्रकरणात आम्ही अगदी अशा पातळीवर गेलो आहोत. जेव्हा पेपरमधनं फारच आरडाओरडा व्हायला लागला, तेव्हा त्यांनी एक दिवस आम्हाला भेटायला बोलावलं. ते म्हणाले, तुम्ही तुमचं चालू ठेवा, आम्ही आमचं चालू ठेवू. मग आम्ही घेराव घालणे, चालू सभेत पत्रकं टाकणे असले प्रकार सुरू केले होते. मग आम्हाला पकडून न्यायचे. पण तेव्हा पेशवेपार्कची परिस्थिती इतकी वाईट होती की, हे कोणीतरी करायलाच हवं होतं. नंतर मग सुखदेवांना पत्रक दिलं. ते कोणत्या नावानं द्यायचं? मग एकदम 'फ्रेंड्स् ऑफ ॲनिमल्स' नाव सुचलं. हे झालं जुलै १९७८ मधे. तेव्हा विनय नुलकर, निशु बडोदेकर, अमोल आठले, सुहास जोशी, प्रशांत कोठाडिया ही मुलं बरोबर होती. धाकट्या भावाचे मित्र, तेही यायला लागले आणि मग सुमारे एक वर्षभरानी सोसायटी फॉर्म केली. सप्टेंबर १९७८ मध्ये आम्ही पेशवेपार्कबाहेर उपोषण केलं ते बरंच गाजलं.

**उपोषण कशासाठी केलं ?**

: पेशवेपार्कसाठीच. कारण आमच्या म्हणण्याकडे कोणीच नीट लक्ष देत नव्हतं. पाळंदेही. म्हणून मग प्राण्यांच्या वतीनं एक दिवसाचं लाक्षणिक उपोषण केलं.

**तुम्ही मागण्या कोणत्या केल्या होत्या ?**

: मागण्या म्हणजे पहिली गोष्ट– पेशवेपार्कमधे डॉक्टरच नव्हता प्राण्यांसाठी. पिंजरे अतिशय वाईट, पैशाचे गैरव्यवहार. प्रवेशद्वाराची नीट व्यवस्था नव्हती. वॉचमन नव्हता. त्यामुळे तिथले काही प्राणी चक्क चोरले जात होते. म्हणजे कोणाचं लक्षच नसल्यासारखे प्राणी अनाथ झाले होते. पर्वतीच्या बाजूने लोक गाई–गुरं आत न्यायचे आणि दुसऱ्या दारानं बाहेर पडायचे. लोकांनी शहामृगाला दगड घालून मारलं, उंटिणीला भोसकलं, असले प्रकार चालायचे. तेव्हा कॉर्पोरेशनचं पेशवेपार्कमधे नवीन प्राणी आणायचं चाललं होतं. त्यात अधिकाऱ्यांचा चांगला फायदा झाला असता. मग आम्ही कोर्टातच केस दाखल केली. किरण कोठाडियानं आमचं वकीलपत्र घेतलं. आता तो चांगला मोठा वकील आहे; पण तेव्हा तोही लहान होता. मग आम्ही कोर्टाकडून स्टे ऑर्डर आणली की आम्हाला विचारल्याशिवाय एकही नवा प्राणी आणायचा नाही. निकाल आमच्या बाजूनी लागला आणि त्या प्रकाराला चांगलं बूच बसलं.

**आता पेशवेपार्कची अवस्था आणि त्यातला फ्रेंड्स् ऑफ ॲनिमल सोसायटीचा सहभाग काय आहे ?**

: आता मी पेशवेपार्कच्या सुधारणा समितीचा सदस्य आहे. बोंगिरवारांनी मागच्या वर्षी ही समिती नेमली. त्यांनी बरेच चांगले बदल केले. आता आम्ही बरेच शांत आहोत. कारण आम्ही सांगतो तसे बदल होतात. आता आमच्या सोसायटीचा डॉक्टर आहे. आमचे लोक दररोज तिथे चक्कर मारतात. ७९–८०–८१ मधे मी भारतातलीच काय पण सगळ्या जगातली फक्त प्राणी संग्रहालयं बघायला गेलो होतो. आता मी एवढं पाहिलेलं असल्यामुळे मला काहीतरी त्यातलं डोकं असणारच. त्यामुळे मी ज्या सुधारणा सांगितल्या, त्या त्यांनी गुपचूप करून घेतल्या हा त्यातला महत्त्वाचा भाग. पाळंदे आमचं ऐकूनच घेत नव्हते. तेव्हा अण्णा जोशी, मेहेंदळे वगैरे माणसं आमच्या बाजूनं होती, उपोषण केलं तेव्हाही ही माणसं आमच्या बरोबर होती.

**तिकडची प्राणीसंग्रहालयं बघताना तुला काय जाणवलं ?**

: तिकडची प्राणीसंग्रहालयं बघितल्यावर वाटलं, भारतात प्राणीसंग्रहालयं काढणं अतिशय मूर्खपणाच आहे. जिथं प्राण्यांना नीट खायला मिळत नाही अशा ठिकाणी तुम्हाला प्राणीसंग्रहालयं काढण्याचा अजिबात हक्क नाही जर तुमच्याकडे खूप पैसे असतील तर तुम्ही प्राण्यांची निगा,त्यांचं खाणंपिणं नीट सांभाळलं पाहिजे. आधी प्राणी आणून ठेवायचे आणि मग म्हणायचं की इथं माणसाला खायला नाही, तर प्राण्यांना काय देणार ? या म्हणण्याला अर्थ नाही. तुम्हाला कोणी सांगितलं आहे, त्यांना जंगलातून इकडे आणून त्यांचे हाल करायला ?

**तिकडच्या, परदेशातल्या लोकांचा प्राण्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा असतो ? तिकडचे प्राणी खरोखर जंगली असतात का ?**

: कुठल्याही प्राणिसंग्रहालयातला प्राणी खरोखर जंगली नसतो, ते प्राणी तसे राहिले तरच चुकीचं होईल. कारण वातावरणातच वेगळेपणा असतो. जंगलामधे त्यांना येवढ्या मोकळ्या जागेत रहायची सवय असते. त्यामुळे त्यांना अगदी जंगलातल्यासारखं नसलं तरी मोकळी जागा, खाणंपिणं-औषध वेळेवर पाहिजे. इथं हे काहीच नव्हतं. इथं म्हणजे सोनालीनं पिंजऱ्यावर धडक मारली आणि तिला लागलं तर खालचे लोक माझ्याकडे यायचे- 'अहो परांजपे, सोनालीला लागलंय, मलम आहे का तुमच्याकडे'– मग आम्ही जाऊन मलम लाऊन यायचो किंवा 'अहो, अजगराला भूक लागलीय मोठा बेडूक पकडून आणा.' म्हणजे डॉक्टरच नव्हता. अशी सगळी अंदाधुंदी होती, की तिथे काय चाललंय कोणाला पत्ताच नव्हता. मग मी, नूलकर, घारप, बडोदेकर वगैरेंनी आम्ही ठरवलं की, आता सोसायटीला जरा चांगलं स्वरुप देऊ या. मग आम्ही जरा चांगल्या फिल्मस् वगैरे मिळवल्या. आम्ही जे करत होतो त्याला सगळ्या वृत्तपत्रांनी उचलून धरलं. कारण त्यांनी बघितलं की हे जे काही करतायत, जेन्युइनली करतायत. त्यात कोणताही सवंगपणा नाही. त्यामुळेच अक्षरश: आम्ही जे लिहिलं ते छापलं गेलं. येवढं क्रेडिट कोणत्याही संस्थेला मिळालं नसेल.




**सोसायटीचे सुरुवातीचे दिवस...पेशवेपार्कच्या बाहेर**

**फिल्म क्लब आणि सोसायटी यांच्यातर्फे पुढे काय काय केलं ?**

: फिल्म सोसायटीच्या उद्घाटनाला या क्षेत्रातल्या एका मान्यवर लेखकांना बोलावलं होतं; पण ते आले नाहीत. मग आम्हीच त्याचं उद्घाटन केलं आणि फिल्मस् दाखवायला सुरुवात केली. मग गोष्टी झटपट सुरू झाल्या. त्यानंतर विचार आला, आपण कुत्र्यांसाठी काही करावं. मग अँटीरेबीज कार्यक्रम सुरू केला. मग BIAF ची गाडी आणून फिरती ॲम्ब्युलन्स सुरू केली. इतक्या झटझट गोष्टी सुरू झाल्या, मग लोकांचाही विश्वास वाढला. मग मोकाट कुत्र्यांसाठी मोहीम हातात घेतली. पुण्यातली साधारण १५ ते २० हजार मोकाट कुत्री आम्ही कॉर्पोरेशनच्या सहकार्यानं मारली. ते आवश्यकच होतं. मग कुत्र्यांच्या नावानं बिल्ले काढायचो. मोकाट कुत्र्यांना मारण्याच्या मोहिमेमुळे अनेक पार्शी लोक आमच्यावर चिडले, की तुम्ही मित्र म्हणवता आणि कुत्र्यांना मारता. आमचं म्हणणं काय की तुमचं प्रेम आहे नं, मग घरात नीट सांभाळा. असं फुकटचं प्रेम नको. ७९-८० साल आमचं फार जोरदार गेलं तेव्हा आमचा पहिला नेचर कँप गेला होता. त्याच वर्षी मे महिन्यात आम्ही आमचं मासिक सुरू केलं–मग त्यात फक्त पक्षी–प्राण्यांवर माहिती होती. नाव बदलत बदलत नियतकालीक अजूनही चालू आहे. एक फक्त पक्षीनिरिक्षण अंक काढला होता त्याचं नाव 'खग' ठेवलं होतं. खऱ्या अर्थानं माझ्या लिखाणाला सुरुवात तेव्हापासून झाली. त्या मासिकांमध्ये मी बरंच लिखाण केलं.

**नियतकालिकाला प्रतिसाद कसा मिळाला ? आर्थिक गणित जमलं का ?**

: आमचं द्वैमासिक होतं. प्रतिसाद वगैरे ठीक होता; पण त्याचं आर्थिक गणित नीट जमायचं नाही. सगळ्या अशा मासिकांचं जे होतं, तेच आमचंही झालं. मग १९८२ मधे आम्ही त्याचं नाव निसर्ग ठेवलं आणि नंतर ते नियमितपणे मासिक म्हणून चालू राहिलं. अंकाचं रुप पहिलंच होतं. आता रंगीत छपाई सुरू केलीय. आता मात्र इतर व्यापांमुळे मला ते चालवता येत नाहीये.

**पक्षी–प्राण्यांच्या निरिक्षणाला काही एक दीशा घेऊन काम करायला तू कधी सुरुवात केलीस ?**

: साधारण ७६ पासून मी हे करतच होतो. मी पक्षी निरिक्षणाला सुरुवात केली, तेव्हा सोसायटी निघायची होती. त्यानंतर माझा पक्षी निरिक्षणातला रस वाढायलाच लागला. मग एकीकडे फोटोग्राफी सुरू केली. पक्षी निरिक्षक जमायला लागले.

## युवदर्शन – चॅनेल टू




**पक्षी निरिक्षणासाठी तू कोणाचं मार्गदर्शन घेतलंस का ?**

: काय झालं, तेव्हा रक्तच इतकं गरम होतं की आम्ही कोणाचं मार्गदर्शन घेण्याच्या फंदात पडलोच नाही आणि एका परीनं ते फार बरं झालं असं वाटतं. आम्ही तेव्हा मोहन धारियांना अध्यक्ष केलं होतं; पण पुढे त्यांच्या अपेक्षा इतक्या वाढत गेल्या की आम्ही प्रत्येक गोष्ट त्यांना विचारून करावी. पुढे त्यांनी अध्यक्षपद सोडलं.

**पण पक्षीनिरीक्षणासाठी तू कोणाचं खास मार्गदर्शन घेतलं नाहीस का? पक्षांना मराठीतून नावं देण्याची कल्पना केव्हाची ?**

: पक्षी निरीक्षणासाठी माझ्याकडे सलीम अलींचं इंग्रजी पुस्तक होतं आणि शिवाय आजूबाजूच्या लोकांकडून माहिती मिळवायचो. हे मराठी नावांचं आत्ता आत्ता सुरू झालं– साधारण ८२ मधे, जेव्हा मिलिंद वाटवे आमच्या सोसायटीत आला. कारण त्याला मराठीबद्दल विशेष प्रेम होतं.

**तुझी नेचर कॅंपची कल्पना काय होती ?**

: कल्पना अशी सुचली की ७७–७८ मधे मी यूथ हॉस्टेलचा कॅंप लीडर म्हणून काश्मिरला गेलो होतो. २४० कि. मी.चं ट्रेकिंग होतं. तेव्हा मला असं जाणवलं की, लोक येवढ्या लांबून येतात; पण त्यांना तिथल्या निसर्गाची काहीच माहिती होत नाही. सकाळी चालत ट्रेकला सुटतात ते दुसऱ्या ठिकाणी पोचतात. झोपतात – की पुन्हा तेच. मला असं वाटलं की एका ठिकाणी जायचं आणि तिथल्या निसर्गाची–पक्षी–प्राण्यांची–परिसराची ओळख करून द्यायची. आम्ही जवळचा म्हणून वरंद घाटात पहिला नेचर कॅंप काढला. त्यात ६१ माणसं होती. लगेच ८० साली दुसरा कॅंप पावसाळ्यात लोणावळ्याला काढला, तोही छान झाला. मग डिसेंबरमध्ये श्रीवर्धनला गेलो मग म्हटलं आता जरा लांब जायचं आणि मग डायरेक्ट मनालीला कॅंप न्यायचं ठरलं. आमची पद्धत अशी की आधी जाहीर करायचं आणि मग तयारी.

**कॅंप नेण्यापूर्वी तू आधी मनालीला गेला होतास का ?**

: कुठे ? कॅंप जाहीर केल्यावर मग माणसं यायला लागली. मग तयारीसाठी मी आधी एकदा जाऊन आलो. जागा वगैरे बघितली. आत्तापर्यंत आम्ही चार वेळा मनालीला गेलो आहोत.

**नेचर कॅंपसाठी कोणत्या वयोगटाची मुलं तुम्ही नेता ?**

: सगळी पंधराच्या खालची मुली–मुलं कारण ती फार सहज समजून घेतात. त्यांना चांगली शिस्त लावता येते आणि मुख्य म्हणजे त्यांची शिकायची खूप इच्छा असते.

**कॅंपला आलेल्या मुलांची आणि निसर्गाची काही ओळख असते का ?**

: नाही, काही मुलं खूप फिरलेली असततात पण बहुतेक मुलं फिरलेली नसतात.

**कॅंपचा कार्यक्रम काय असतो ?**

: सकाळी लवकर उठायचं मग ब्लॅक कॉफी असते. मग व्यायाम आणि ब्रेकफास्ट. मग बाहेर भटकणं किंवा लेक्चर. त्यात तिथल्या पक्षा-प्राण्यांची ओळख असते. आम्ही सगळ्यांना त्या परिसरात हिंडून जे काही सापडेल ते आणायला सांगतो. मासे- बेडूक- किडे- साप- काजवे जे सापडेल ते. मग आम्ही त्यांना त्याची माहिती देतो. आमची लायब्ररी असते. पुण्याहून आम्ही दोन प्रचंड खोक्यातून खूप पुस्तकं आणतो. कॅंपवर पत्ते– रेडिओ बंद. गाण्याच्या वेळी गाणी बजावणी खूप असतात. रात्री धमाल असते, पण दुपारी नाही, सगळी मुलं दुपारी पुस्तकं वाचत बसलेली आहेत हे दृश्य इतकं छान असतं. मग त्याच्यावर आमची प्रश्नोत्तरांची स्पर्धा असते. १६–१७ दिवसांचा असा पॅक प्रोग्रॅम असतो.

**आता तू निसर्गप्रकाशनतर्फे जो निसर्गकोषाचा पहिला खंड काढलास तिकडे वळूया. मला वाटतं या खंडाच्या निर्मितीत तुझ्या आई–वडलांचा भाग खूप मोठा आहे. कारण बहुतेक पालकमंडळी मुलांना एकाच चाकोरीत ठेवतात. म्हणजे चौथीला स्कॉलरशिप, सातवीला स्कॉलरशीप, दहावीला खूप मार्क अशा या प्रकारात तुम्ही फार काही 'ग्रेट' करू शकत नाही. फार तर तुम्ही हुषार होता. मला असं वाटतं की, तुझ्या या प्रकाशनाचं मूळ तुझ्या या भटकंतीत आहे. ज्या वयात सर्वसाधारण मुलं मान खाली घालून फक्त अभ्यास करतात त्याच वयात तू अभ्यास सोडून बरंच काही केलंस..**

: हो ८१ साली काय झालं, मी पहिल्यांदा कॅमेरा घेऊन युरोपला गेलो, एकटाच गेलो...

**आता विवेक आणखी एक प्रश्न, की तू हे इतकं सहज कसं म्हणतोस की 'युरोपला गेलो.' नाही तर सर्वसाधारणपणे परदेशी जायचं म्हणजे लोकांना केव्हढ्या तयाऱ्या करायला लागतात, आर्थिक जमवाजमव**

**करावी लागते. तुझ्याबाबतीत हा प्रश्न काही आला नाही का ?**

: सध्या तर पोझिशन अशी आहे की, जेव्हा मी भारतात नसतो, तेव्हा बऱ्याच वेळा कुठे तरी बाहेर गेलेला असतो. यात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे घरचं सहकार्य मला खूप मिळालं... हे खूप महत्त्वाचं आहे.

**सहकार्य म्हणजे आर्थिकसुद्धा.**

: हो. आर्थिक सहकार्यसुद्धा. माझ्या वडलांचं संजीवनी चिकित्सालय आहे, ते काही कमी नाही. मधल्या काळात ७७–७८ साली मी जेव्हा वैद्य झालो आणि प्रॅक्टिसला सुरुवात केली, ती इतकी इमाने-इतबारे केली की काही दिवस पैशाचा प्रश्न आला नाही. अजूनही माझ्याकडे खूप पेशंट येतात; पण मला दवाखान्याकडे बघायला वेळच होत नाही. वैद्य असण्यापेक्षा फ्रेंडस् ऑफ ॲनिमल्सचा माणूस म्हणूनच मी आता जास्त ओळखला जातो. दुसरी गोष्ट, मला कसलंही व्यसन नाही. माझं एक व्यसन म्हणजे फिरणे आणि फोटो काढणे. हजारो रुपये माझे कॅमेऱ्यावर गेले आहेत जे लोकांचे सिगरेट आणि दारूवर खर्च होतात. स्वत: करून खाणे आणि हिंडणे याची मला अतिशय आवड आहे. माझ्या काही स्लाईडस् मागच्या वर्षी परदेशात विकल्या गेल्या. नाही तर सारखं फिरायला पैसे आणणार कुठून ? माझ्या स्लाईडस्च्या विक्रीतून मी मागच्या वर्षी संपूर्ण जगाचा प्रवास केला. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सुदैवानं मी सुखी ठरलो. असं नाही की, कधी माझी फार आर्थिक ओढाताण झालीय. या नेचर कँपच्या निमित्तानंही मी खूप फिरलो. अंदमान–सिक्कीम–मनाली वगैरे. आणि या ठिकाणी काढलेले सगळे फोटो या खंडात वापरले आहेत आणि पुढेही वापरले जाणार आहेत. नेचरकँपच्या ठिकाणी जे फिरणं झालं त्याचाही या निसर्गकोषात उपयोग झाला. मला वाटतं, डोळे उघडे ठेवले की सगळं जमतं. युरोपला पहिली टूर मी ८१ साली काढली. त्यानंतर फिरणं सुरू झालं ते थांबलंच नाही.

**तू पहिल्यांदा युरोपला गेलास तेव्हा खंडाची कल्पना तुमची नक्की झाली होती का ?**

कुठली ? कसला खंड आणि कसलं काय!

युवदर्शन – चॅनेल टू




खरं म्हणजे मी आधी फक्त फोटोच काढत होतो. पहिली स्लाईड अशी मी युरोपमध्ये काढली, ती मी अगदी जपून ठेवलीय. तिथे मी 400mm लेन्स विकत घेतली. Bird Photography खरी अशी ८१ मध्येच सुरू झाली. ८१ ते ८४ फोटोग्राफी केली आणि त्याचा आता खंड काढला. म्हणजे त्यामानानं फार झटपट झालं. त्या वेळात माझ्याकडे जवळजवळ १०–१५ हजार स्लाईडस् गोळा झाल्या.

**या चार वर्षात तू कुठेकुठे फिरलास ?**

: जवळजवळ संपूर्ण जग फिरून आलो. दोनदा युरोपला गेलो. अमेरिकेला गेलो. युरोपमध्ये म्हणजे इतरांप्रमाणे नाही. नार्विकचं जे टोक आहे तिथपर्यंत मी गेलो होतो एकटाच.

**एकट्यानो भटकण्यात धाडस आणि धोका पत्करण्याची तयारी, दोन्ही लागत, शिवाय केव्हा काय होईल काही सांगता येत नाही. तुला असे काही वेगळे अनुभव आले का ?**

नार्विकला मी गेलो तेव्हा तीन दिवस तिथे मनुष्य हा प्राणीच नव्हता आणि मला अगदी काय करू आणि काय नको असं झालं. आणखी एक म्हणजे तुमच्याकडे कॅमेरा असतो, तुम्ही अगदी व्यवस्थित तयारी करून जाता आणि कॅमेऱ्यात काही दिसत नाही आणि एखाद्यावेळी तुम्ही अजिबात तयारीत नसता आणि एखादा गरुड समोर अगदी पाच फुटांवर येऊन नाच करून जातो.

**तू इतक्या ठिकाणी फिरलास, तुला परदेशातल्या या क्षेत्रातल्या लोकांचं काय वैशिष्ट्य वाटलं ?**

: मुख्य म्हणजे तिकडे पक्षी–निरीक्षणाला सगळी म्हातारी माणसं बाहेर पडतात आणि सगळी तरुण मुलं अफू–चरस–गांजा यात अडकलेली दिसतात. त्या पार्श्वभूमीवर भारतातली तरुण मुलं खूपच चांगली वाटतात.

**पक्षी निरीक्षणाचं परदेशातलं तंत्र आणि आपलं तंत्र यात काही फरक आहे का ? आपल्या तंत्रात काही सुधारणा हवीय असं वाटतं का ?**

: मला वाटतं, आपल्याकडचं पक्षी–निरिक्षणाचं जे तंत्र आहे ते अगदी बरोबर आहे. आपण बरोबर दिशेने चाललो आहोत. आपल्याकडे जेवढे विविध पक्षी आहेत, तेवढे जगात कुठेच नसतील. पण पक्षीनिरिक्षणाची आवड वाढायला पाहिजे. लहानपणापासून मुलांना पक्षी–प्राणी-निसर्ग यांची आवड लागावी म्हणून पाठ्यपुस्तकमंडळानं काही तरी विचार करून पाठ्यपुस्तकांतून वेगळं साहित्य दिलं पाहिजे. प्राण्यांची गोष्ट म्हणजे आपली लक्ष्मीबाई टिळकांची नेहमीची गोष्ट सांगायची की टिळकांना मांजरं कशी आवडत याला काही अर्थ नाही. पक्षीनिरिक्षण कसं करायचं यावर एखादा धडा टाकता येईल, त्यावर प्रश्न विचारता येतील.

**आता तुझ्या प्रकाशनाबद्दल, एवढा मोठा निसर्गकोषाचा खर्चिक प्रकल्प तू हातात घेतलास, तेव्हा पैसे गोळा करण्याचे काही**




**सोसायटीचा असाच एक नेचर कॅंप**

□

मार्ग तुला दिसत होते का ?

: पैसे जमा करायचे म्हणजे आम्हाला वाटलं होतं की आम्ही इतकं चांगलं काही-तरी करतोय, तर पैशाचा प्रश्न येणार नाही. प्रतिसाद चांगला मिळेल असं गृहित धरून आम्ही सुरवात केली. प्रतिसाद फारसा मिळाला नाही ही गोष्ट वेगळी, तरी आम्ही ना थाढला.

**कोषाची कल्पना डोक्यात आल्यावर, आपणच त्याचं प्रकाशन करायचं असं तुला पहिल्यापासून वाटत होतं का ? की कुणी दुसरा प्रकाशक आणि तुझं लेखन, छायाचित्रण असं डोक्यात होतं ?**

: माझा एक स्वभाव आहे की, सगळं स्वतः करायचं, आता लोक याला काय म्हणत असतील मला माहीत नाही. पण माझं एक आहे, जी गोष्ट शिकून आपण करू शकतो ती दुसऱ्याकडून कशाला करून घ्यायची ? फोटोग्रॅफी जर मी करू शकतो, तर जरा शिकून मीच फोटो काढीन. लोकांकडून कशाला ? स्लाईड्स् त्यापण मीच काढणार. ही जी वृत्ती आहे, ती सगळ्यांनी उचलावी असं काही मला वाटत नाही. स्वयंपाक जर मला चांगला करता येतो, तर मीच करणार. तसंच प्रकाशन– कोष मीच काढणार असं ते झालं. मी स्वतः स्लाईडस् काढण्याचा एक मोठा फायदा म्हणजे पक्षांचे फोटो टिपणं हा काय प्रकार आहे ते सांगून कळणार नाही आणि अशा ५०० जातींचे फोटो मला खंडासाठी हवे होते. म्हणजे अतिशय अवघड काम आहे. पाच-पाच दिवस एकेका पक्षाच्या मागे लागावं लागतं. तो नीट कॅमेऱ्यात यावा म्हणून चार–चार तास एकाजागी थांबावं लागतं. जर बाहेरचा फोटोग्राफर घेतला असता तर शक्यच झालं नसतं इतकी Bird Photography महाग आहे.

**आता निसर्गकोष काढण्याची कल्पना पक्की झाली तिथपासून ते प्रत्यक्ष खंड प्रसिद्ध होईपर्यंतच्या काळातल्या मधल्या पायऱ्या कोणकोणत्या आहेत ? तुमच्या नियमित काही बैठकी वगैरे व्हायच्या का ?**

: नाही. मिटिंग वगैरे काही व्हायच्या नाहीत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे आम्ही चार–पाच माणसांनीच याचं काम केलं. आणि आम्ही नेहमी भेटणारे होतो. त्यामुळे त्या भेटण्याला मिटिंग असं स्वरूप नसायचं. कोषाचं नक्की झाल्यावर चित्रं काढायला राजू देशपांडेला सांगितलं. लिखाणाची बाजू मिलिंद वाटवे बघणार होता त्यामुळे प्रश्नच नव्हता. लिखाणाचं काम मी करू शकलो नसतो. कारण माझं शिक्षण झालं इंग्लिश माध्यमातून, पुन्हा माझी लिहिण्याची शैली वेगळी आहे. म्हणजे मीही लिहू शकलो असतो; पण भाषेला जी खोली हवी ती फक्त मिलिंदमध्ये आहे. म्हणजे माझे जे खंडात लेख आहेत ते सुद्धा मिलिंदनं पुन्हा लिहिले आहेत. याचा फार चांगला फायदा झाला. कारण त्यामुळे त्या संपूर्ण लिखाणाला ओघ आहे. पहिल्यापासून शेवटपर्यंत.

**आणखी एक, म्हणजे सर्वसाधारणपणे असं संपूर्ण कोषाचं लिखाण करण्यासाठी ज्यांना मान्यता आहे असे तज्ज्ञ हवेत असं बोललं जातं. तुमच्या संपूर्ण ग्रुपमध्ये तज्ज्ञ म्हणता येईल असं कोणीच नाही. मग लिखाणासाठी तुझ्या डोळ्यासमोर मिलिंद वाटवेच कसा आला ?**

: आमच्यामध्ये रूढ अर्थानं कोणी तज्ज्ञ नाही. पण असे कोणी तज्ज्ञ असतात असं मी मानत नाही. कारण काही प्रसिद्ध व्यक्ती ज्या आहेत, ज्या पक्षी-प्राण्यांवर लिहिण्यात प्रसिद्ध आहेत आणि या क्षेत्रातले तज्ज्ञ समजले जातात, त्यातल्या कित्येकांनी सर्वच्या सर्व भाषांतरं केली आहेत. ते जरी कबूल करत नसले की ती भाषांतरं आहेत. त्यामुळे प्रसिद्ध लेखक कितीही मोठे असले आणि त्यांचा कितीही गौरव झालेला असला तरी ते भाषांतर करणारेच आहेत. मला त्यांच्याबद्दल खूप आदर आहे तरीही त्यांच्याकडून काही घ्यावं असं वाटलं नाही.

**मिलिंद वाटवे पहिल्यापासून तुझ्या ओळखीचा होता का ?**

: हो मला तो माहीत होता. तो साधा सरळ आहे. गजानन वाटव्यांचा तो मुलगा. त्याच्या अभ्यासाशिवाय आणि गाण्याशिवाय त्याला उगाच कसले छंद नाहीत. तो स्वतः मायक्रोबायलॉजिस्ट आहे. तो माझ्याच वयाचा आहे.

**आता यातल्या लिखाणासाठी वाटवेने कोणते आधार घेतले आहेत ? म्हणजे असं की हे जे कोषाचं काम तुम्ही केलंय ते ऐतिहासिक काम आहे. आता हे लिखाण म्हणजे एक चांगलं रेकॉर्ड आहे. यातल्या माहितीबद्दल तुला असा आत्मविश्वास वाटतो का की यातली सगळी माहिती– अगदी ओळ न ओळ बरोबर आहे, यातला एकही संदर्भ चुकीचा नाही असं तुला वाटतं का ?**

: आता गंमत म्हणजे यातली कित्येक विधानं अशी आहेत की जी मी प्रत्यक्ष अनुभवली आहेत आणि धाडसानं पुढे मांडली आहेत. उदाहरणार्थ सापाला ऐकू येत नाही हा जो समज आहे, ठार खोटा आहे. त्याला व्यवस्थित ऐकू येतं. आता हे माझं म्हणणं मान्य व्हायला कित्येक वर्ष लागतील. गदारोळ होऊ दे त्याच्यावर पण मला माहि-

तीय की मी नागाचा फोटो काढताना 'क्लिक' झालं की नाग मागे वळून बघतो. उगाच म्हणतात की त्याला पुंगी ऐकू येत नाही. असं नाहीये. त्याचं डोक म्हणजे रडार आहे. या ज्या काही गोष्टी आहेत ज्या पुढे जाऊन मांडलेल्या आहेत किंवा काही सिद्धांतही असे आहेत, जे कोणीतरी मांडायलाच हवे आहेत आणि लोकं सुद्धा का मांडत नाहीत, तर इंग्लिश पुस्तकात असं नाही, मग आपण कसं मांडायचं ?

**आता खंडातला जो भाग आहे की, पृथ्वीची उत्पत्ती कशी झाली, उत्क्रांतीच्या अवस्था, ही सगळी माहिती तुम्ही कुठून घेतली, त्या माहितीत तुमच्या अनुभवाची काही भर आहे का ? की इंग्लिशमधील माहिती फक्त सोप्या मराठीत आणली ?**

: आता काही गोष्टी आहेत ज्या कायमच आहेत. आम्ही काय केलं की, सगळी पाठ्य-पुस्तकं नजरेखालून घातली. त्यात हे विषय कसे दिले आहेत आणि कसे द्यायला पाहि-जेत याचा अभ्यास केला आणि मुलांना कोणती माहिती हवी आहे ते पाहिलं आणि नेमकं तेवढंच, थोडं त्याच्यापेक्षा जास्त आम्ही सोप्या मराठीत पुढे ठेवलं, की मुलांना नेमकं काय हवं आहे. उदा. ग्रहण म्हणजे काय, साधारण पृथ्वीच्या उत्पत्तीच्या मूलभूत कल्पना काय, हे त्यात दिलंय. पुन्हा तो चांगला मायक्रोबायलॉजिस्ट आहे. त्याला त्याच्या विषयात दोनदा पारखे पारितोषिक मिळालं आहे. त्याचा पिंड हा संशोधकाचा आहे. त्यामुळे त्याच्या लिखाणाबद्दल मला खात्री होती. यापूर्वी मिलिंद माझ्याबरोबर कँप-लिडर म्हणून आला होता. तिथेही सगळी शिकवण्याची बाजू त्यानं उचलली होती.

**खंडाचं लिखाण संपूर्ण तुझ्या हातात कधी आलं ? आणि त्याच्यापुढच्या निर्मितीचं कसं काय जमलं ?**


: माझ्या हातात म्हणजे आम्ही लिहितच होतो. खरं तर आमचं शेवटपर्यंत काढायचं नाही–काढायचं असं चाललं होतं; पण एक मी सांगून ठेवलं होतं की खंड काढायचाय, फक्त नक्की कधी ते माहित नाही; पण आयत्या वेळी गोंधळ नको. म्हणून साधारण आराखडा तयार करून ठेवला होता. त्या-प्रमाणे काही लेख आम्ही तयार ठेवले होते. माझे एक–दोन लेख, तेही मी तयार ठेवले होते. प्रभाकर खोलेनही काही लिखाण तयार ठेवलं होतं; पण जे लिखाण होतं ते कोषा-मध्ये जाण्याइतकं चांगलं नव्हतं; पण त्यात तसं पोटेन्शियल होतं. कुठे विस्तार करायचा, कुठे जोडकाम करायचं हे ठरलं होतं. आमच्या मग त्याच्यावर खूपच meetings झाल्या. दुसरी गोष्ट जो धाडसी माणूस असतो त्याला कोणाचा तरी आधार लागतो. तो आधार मला नितिन मोघेनं दिला. आजही देतो. म्हणजे माझ्या अशा उड्या पडत असतात; पण त्यातली आर्थिक बाजू नीट सांभाळणं, खर्च अटोक्यात ठेवणं फार महत्वाचं असतं, ते सगळं तो करतो. बँकेचं मला काही माहीत नसतं तो सांगतो इथे सही कर मी करतो. आणि माझा चांगला मित्र असल्यामुळे त्याचा आधार अतिशय महत्त्वाचा वाटतो. म्हणजे हा खंड आम्ही दोघांनी काढला असं म्हणालं तर वावगं ठरू नये. बाकी सगळ्या गोष्टी दुय्यम आहेत.



आणि कँपवरील पक्षीनिरीक्षण...

¤

म्हणजे माझी फोटोग्राफीसुद्धा दुय्यम आहे, पण येवढ्या मोठ्या कामाचं पुढे काय काय होईल याचं visulization असणं फार मह-त्वाचं आहे. उडी घेतली पण पुढे झेपणार आहे का याचं चित्र डोळ्यासमोर आणणं फार महत्त्वाचं आहे. आम्ही एप्रिलमध्ये खंड प्रसिद्ध करणार असं म्हटलं होतं. नोव्हेंबर-मध्ये आमचा अंदमानला कँप गेला होता. आम्ही तिकडून आलो जानेवारीमध्ये. मग आल्यावर विचार केला आता काय करायचं ? बुकिंगमध्ये साधारण दीड लाख रुपये जमले होते; पण त्याच्यात काय करणार ? मग विचार केला, फेब्रुवारीमध्ये बुकिंग बंद करायचं आणि लोकांचे पैसे परत करून टाकायचे. जर जाहीर केलेली वेळ पाळली नाही तर लोकांचा विश्वास उडला असता. प्रतिसाद मग आता आता मिळायला लागला. मग निघेल नाही निघणार अशा अवस्थेत थोडे दिवस गेले. मिलिंदच्या भूमिके-तून हे महत्त्वाचं होतं की त्याची भाषा रुजणं नवा पायंडा पडणं, माझ्या कल्पना



□ नितिन मोघे –विवेक परांजपे –मुख्य जबाबदारी □

पुढे मांडण्याच्या दृष्टिनंही खंड काढण्याचं महत्व होतं. असं करता करता फेब्रुवारीच्या मध्याला मी सिंगापूरला गेलो. तिथे गेलो आणि एकंदर अंदाज घेतला. कागदाच्या, छपाईच्या सगळ्याच किंमती तेव्हा इतक्या प्रचंड वाढल्या होत्या.

**पहिल्यापासून खंडाची छपाई सिंगापूरलाच करायचं तुझ्या डोक्यात होतं का ?**

: हो. अगदी शंभर टक्के. ते का सुचलं मला विचारू नको. कारण मी परदेशातली पुस्तकं पाहिली आणि आपल्याकडची पाहिली. जरी दिल्लीत कितीही चांगलं छापत असले तरी ही क्वालिटी कोणीही देऊ शकणार नाही. कितीही वाद घातला तरी हे नक्की. माझं हे म्हणणं ठाम आहे की ही क्वालिटी मिळणार नाही. म्हणजे फक्त प्रिंटिंग नाही, छपाई होईल चांगली. पण त्याचं बाईंडिंग, एकूण कामाची पद्धत, किती वेगानं काम होणार, त्याची गॅरंटी या सगळ्या गोष्टीं तुम्ही देऊ शकणार नाही.

**पण हे तुझं मत पहिल्यापासून ठाम होतं का ?**

सुरुवातीला आमचं चाललं होतं मद्रासला छापून घ्यायचं. तसं मद्रास, दिल्लीची कोटेशन्स मागितली होती. पण त्यांचं बाईंडिंग इतकं चांगलं नव्हतं, की चार वेळा पुस्तक उघडलं की खराब होणार. त्यामुळे मी त्याच्या विरुद्धच होतो. त्यानंतर मग सिंगापूरला जाऊन मी तिथल्या प्रिंटरना भेटलो. त्यांना कल्पना भयंकर आवडली. इंडियातून असं कोणी तरी छपाईसाठी पुस्तक घेऊन येतंय याचं त्यांना भयंकर थ्रिल वाटलं आणि त्यांनी खूप मदत केली.

**तिकडचे छपाईचे दर आणि इकडचे यात किती फरक आहे ?**

: फारसा नाही. थोडा दर तिकडचा जास्त आहे. पण त्यांच्या दर्जाच्या तुलनेनं त्यांच्या किंमती योग्य वाटतात. तिकडे वेळ फार कमी लागतो. अक्षरशः आठ दिवसात त्यांनी बाईंडिंग केलेली प्रत माझ्या हातात ठेवली, त्यांचा वेग प्रचंड आहे.

**डमी वगैरे तू इकडून लावून नेली होतीस का ?**

: हो. पेस्टिंग वगैरे करून घेतलं होतं. पण तिकडे गेल्यावर सगळं पेस्टिंग मोडावं लागलं. सिंगापूरला मी एकटा गेलो होतो. पहिल्यांदा फेब्रुवारीमध्ये मी गेलो होतो. तेव्हा मी इथून नितिनला बोलावून घेतलं. तिकडचे सगळे दर वगैरे गोळा केले आणि ती रात्र मला चांगली आठवतेय. नितिन म्हणाला, आता काय करायचं बोल ? मी म्हटलं आपल्याला हे झेपणार आहे का ? कारण एवढा लाखो रुपयांचा व्यवहार आहे. एकूण संपूर्ण कोषाचा प्रकल्प आमचा २०–२५ लाखांचा आहे. त्यामानानं ठेवी जमायला पाहिजेत. मग नितिन म्हणाला काढला तर आत्ताच काढता येईल. कारण दोन पर्याय होते. एक तर सगळं विसरून जायचं आणि पुण्याला गेल्यावर लोकांचे पैसे परत करून टाकायचे. त्यातले बरेच पैसे जाहिरातींवर खर्चही झाले होते, आणि दुसरं म्हणजे प्रसिद्धीची तारीख पुढे ढकलायची; पण मग लोकांचा विश्वास कमी झाला असता. पण शेवटी आमच्या ठरलेल्या वेळेच्या आधीच पहिला खंड प्रसिद्धही झाला. आम्ही ५ एप्रिल तारीख जाहीर केली होती आणि २२ मार्चला खंड प्रसिद्ध झाला, पण त्याआधीचे दिवस फार विचारात गेले. सिंगापूरला मी आणि नितिननी ठरवलं की, खंड काढायचा. कारण एकदा ते बारगळलं असतं तर पुन्हा झालं नसतं. २२–२३ तारखेला आम्ही पुण्यात आलो. मग रातोरात सगळ्यांना बोलावलं. मी, नितीन, प्रभाकर खोले, राजू देशपांडे आणि मिलिंद. सगळ्यांना सांगितलं की, आपल्या हातात एवढा वेळ आहे. ६ ता. ला मला पुस्तक घेऊन सिंगापूरला जायला पाहिजे. मग पुढचे चार दिवस मी माझ्या स्लाईडस् तयार केल्या. म्हणजे २२ तारखेला मी सांगितलं की एनसायक्लोपिडिआ लिहायचा. म्हणजे विचार कर. लिखाणही काही पक्कं तयार नव्हतं. कारण काढायचंच नक्की नव्हतं. मग अक्षरशः

**पृष्ठ ११६ वर**

# ॥ कविता ॥

## तुला कधी कळणार ही नाही

आता मी एकटीच
उभी आहे खिडकीशी
आणि दूर दिसणारा समुद्र आता
खूपच निवळलेला.

वाटोळा लखलखीत चंद्र
सावकाश निघालाय समुद्राकडे
आणि मला जाणवतोय त्याचा
अनाकलनीय वेग
संथ लाटालाटांत
क्षणात गवसून निसटणारं चांदणं
आणि समुद्रातून माझ्या दिशेनं
बाहेर आलेला लांब किनारा.

काल इथे आल्या आल्या
तू नेलं होतंस मला समुद्रावर
आणि पाय वाळूत केवढे रुतत गेलेले.
हातामध्ये हात गुंफून
एकमेकांच्या अंगावर कलत
समुद्राकडे जाताना स्वागताला
सामोरा आलेला समुद्रगंध.

सूर्य मावळला आपल्या डोळ्यादेखत
आकाश झपाट्यानं लाल होत गेलं
आणि सूर्य मावळला तिथे
क्षितिजरेषेवर अचानक उगवली
चिमुकली होडी
पांढऱ्याशुभ्र शिडामध्ये
वाऱ्याला धरून ठेवणारी.
माझ्या कानाशी
तू कुजबुजलास
शिडात शिरणाऱ्या वाऱ्यासारखा
'आज नेमकी पौर्णिमा
रात्र आपलीच आहे आत्तापासून
उद्या पहाटे याच समुद्रात बुडणारा
पूर्ण चंद्र मी तुला दाखवेपर्यंत.'


पाण्याची प्रचंड लाट
उसळून आली माझ्या मांड्यांपर्यंत
आपण परत फिरलो तरी
उसळत राहिल्या
आपल्या पाठीमागे
धावत येणाऱ्या लाटा
आपल्या आतपर्यंत
रात्रभर वाढत गेलेली समुद्रगाज
हळूहळू ओसरत गेलेली...

आता असं निश्चल उभं राहिल्यावर
मला जाणवतायत अजून पायाला
चिकटून राहिलेले वाळूचे कण
चंद्र किती जवळ आलाय समुद्राच्या
क्षितिजरेषेवर दिसत्येय होडी
काळवंडलेल्या शिडातून ओघळून
जाणारा वारा.

चंद्र बसलाय नेम साधून
होडी आपल्या टप्प्यात येताच
चंद्र सावकाश खाली उतरेल
आपल्या ताठर जबड्यामध्ये
होडीचं शीड नेमकं पकडेल
आणि कळतंय न कळतंय तोच
होडीसकट समुद्रात गुडूप होईल.

तू शांत झोपलायस अजून
आपली होडी चंद्रानं गिळल्याचं
तुला कधी कळणार ही नाही

—हेमंत गोविंद जोगळेकर






घरात भरलेले थंड तटस्थ
काळोखतुकडे.
मनातून ओसरत चाललेली ऊब.
परके झालेले वरचे आकाश.
दूरस्थ निष्ठूर तारांचा समूह.

येथील प्रत्येक वस्तुंना लगडून आहेत
प्रियपरिचित क्षणांचे घनदाट पुंज
जसे , या खिडकीला आत्ता
रेलले होते कुणी
या पुस्तकात शब्दांचे मिटले फुलोरे
आणि शरीरावर स्पर्शांचे
नक्षीमोर चितारलेले.

मी पुनः आठवत रहाते
ओळखीची लिपी
सावकाश उलगडतील का अर्थांचे जिने
शून्याच्या माडीवरून ?

कुणीतरी हळुवार चालत रहाते
मेंदूतल्या ओहोटवाळूमधून.

–भारती बिर्जे






**मिशीचे तत्त्वज्ञान**

भुरळी मिशी हिरवट दिसायला लागली ओठांवर
आणि मी अडकायला लागलो आरश्यात कित्येक तास.
हिरव्या रंगाची नशा एवढी की
वडिल काही म्हणतायत आपल्याला ते विसरू लागलो.
विसरून गेलो त्यांचा दरारा.
त्यांना घाबरायला हवं– हेही कळेनासं झालं.
इतरांच्या मिश्या पाहण्याचा चाळा सुरू झाला.
तुलनात्मक अभ्यासही.
कळलं ! एकदा कळलं अजुनही आपल्या मिश्या भुरळ्याच.
दाट व्हायला हव्यात– व्हायलाच हव्यात.
कुणीतरी सांगितलं,
पुन्हा पुन्हा काढल्याशिवाय दाट होणार नाहीत.
वडिलांना म्हटलं– सामान द्या तुमचं दाढीचं.
'कश्याला ?' पांढऱ्या मिशांतून प्रश्न.
'मला मिश्या काढायच्या आहेत.'
ते त्यावर म्हणाले– मी मेलो की तू मिश्या काढ.
नाहीतर मला मार ठार आणि मिश्या काढ.
बाप मेल्याशिवाय मिश्या काढायच्या नसतात.

मिश्या दाट करण्याची माझी इच्छा होत गेली घनदाट
मी पाहायला सुरुवात केली आहे ह्या इच्छेच्या रानातून
बाप मरण्याचीच वाट.

–रवींद्र दामोदर लाखे



**विनंतीअर्ज :**

गांधीली येऊन कडकडून चावते
विंचू येऊन डंख मारतो
साप येऊन काडकन् डसतो.

मी सोमाजी गोमाजी कापशे
विनंतीअर्ज सादर करीत आहे

अरे माझ्या
कल्याणकारी व्यवस्थेच्या प्रमुखांनो
तुम्ही या दंश करण्याची
सवय जडलेल्या प्राण्यांचा
बंदोबस्त करू शकत नाही
हे मी अनुभवाने ओळखतो.
तुमची मजबुरी मी
( मान्य करीत नसलो तरी )
समजू शकतो...


पण
मेहरबानी करून
उपचाराची व्यवस्था तरी
आपल्या
प्राथमिक स्वास्थ्य केंद्रात ठेवावी
एवढीच नम्र विनंती...

—नारायण कुलकर्णी—कवठेकर



आपल्या कंठाभोवती दिसू लागल्या
हलक्या लालनिळ्या रेषा,
की जपूनच रहावे आईवडिलांपासून.
प्रथम थांबवावे
सकाळ संध्याकाळ नियमित तीट लावून घेणे.
सरळ उधळून टाकाव्यात
चेहऱ्याभोवती मायेने ओवाळल्या जाणाऱ्या मीठमोहऱ्या.
घरातून बाहेर पडताना मागे वळून पाहूच नये.
त्याहून सुंदर असते समोरचे जग—
जिथे अडवत नाही कुणीही आपले मोकळे श्वास,
जिथले पक्षी मनमुक्त उडताना पहाता येतात,
सरकवत नाही कुणी मध्येच खिडकीभर पडदा.
ह्या जगातले सगळे सुहृद आवश्यक असतात
नसानसातून वाहाणाऱ्या लाल ताज्या रक्ताइतकेच.
इथेच भेटतात दोन खास आपले डोळे
आणि सोबतचा उमदा, आश्वासक देह.
कंठाभोवती दिसू लागल्या लालनिळ्या रेषा,
की जपूनच रहावे आईवडिलांपासून.
नाहीतर घरात चिणून मारले जाईल आपल्याला.
येताजाता टोचल्या जातील संशयाच्या विषारी सुया
आणि आपल्यापाशी उरेल केवळ उपेक्षित स्वत्व—
पर्समध्ये लपवलेल्या एखाद्या खाजगी छायाचित्रासारखे !

—राजस कल्याणकर

# जनरेशन  गॅप

मंगला गोडबोले

**तो** भयंकर संतापलेला होता.

म्हणजे त्याच्या खांद्यातल्या झोळीवरून मला तसा संशय आलेला होताच. पण आपल्या संतापाविषयी जगाची खात्री पटावी यादृष्टीनं त्यानं अंगात कुडतापायजमा घातला होता, हनुवटीवर माफक दाढी वाढवली होती, पायात फटफटचा रबरी सपाता घातल्या होत्या आणि मुख्य म्हणजे आख्ख्या जगाकडे तो भयंकर तुच्छतेनं बघत होता. खांद्यातल्या दहाबारा वर्षात न धुतलेल्या, पिशवीमधून तो कुठल्याही क्षणी बाँब काढेल आणि क्षणात आपली राखरांगोळी करेल याची पूर्ण मानसिक तयारी करून मी भीतभीत विचारलं,

'कशावर रागावला आहात तुम्ही एवढे ?'

'तुमच्यावर. तुमच्या पिढीवर. तुमच्या आमच्यातल्या जनरेशन गॅपवर. तुम्ही इस्कोट केलात आमचा. जन्मताच नख लावलंत आमच्या नरडीला.' मी घाबरून स्वत:ची नखं पाहिली. कधीच फार वाढवत नाही म्हणून बरं, जन्मताच नख लावूनही बाळ एवढं ताडमाड वाढलंय आणि फाडफाड बोलतंय. नंतरचा काही वेळ ते भलतंच बोलत राहिलं. नव्या पिढीतल्या विद्रोहाचा एक दिवस उद्रेक होणार, तो या पृथ्वीवर रक्ताचे पाट वाहवणार, मग तो अश्वत्थाम्याची भळभळती जखम होऊन तरुणांच्या भाळी युगानुयुगे राहणार, मग ज्वालामुखी उसळणार, आगीच्या ज्वाळा भडकणार, जगाला भेडसावणार, मग समुद्र पेटणार, रानं बेचिराख होणार, पाखरं भयभीत होणार, दऱ्यादऱ्यातून आवाज घुमणार, जनरेशन गॅप रद्द करा. जनरेशन गॅप रद्द करा (सगळेच जळणार तर या घोषणा कोण देणार ? पण ते असो.)

ईश्वरशपथ, जनरेशन गॅपमुळे इतकं काही हाणार असेल याची मला त्या दिवसापर्यंत कल्पना नव्हती. पिढ्यापिढ्यांमध्ये थोड्या कुरबुरी होतात, मतभेद होतात, कधीकाळी वाजतंही थोडं फार. एका पिढीतल्या माणसांचंसुद्धा शंभर टक्के पटत नाही, मग दोन पिढ्यांमध्ये मतभेद असायचाच. इथवर मलाही मान्य होतं. पण पुरी एक जनरेशनसुद्धा न बघितलेलं हे पोर 'जनरेशन गॅपवर' एकदम एवढं ज्वालाग्राही का झालं हे मला समजत नव्हतं. मी चुचकारत म्हटलं, 'आपण क्रमाक्रमानं जाऊ या हं. आधी सांगा, तुम्ही नक्की कशावर रागावला आहात ?'

'म्हणजे... असंच आपलं... जनरल... ऑन एव्हरीथिंग.'

'नाही, पण रागवण्यात एवढी शक्ती खर्च करण्यापेक्षा काही आपला पोटापाण्याचा व्यवसाय, नोकरी वगैरे केली असती तर ?'

'नोकरी ? व्यवसाय ? ठेवलंयच काय तुम्ही आमच्यासाठी ? आम्हाला जग जिंकायचंय आणि तुम्ही बेसिक प्लस डी. ए त खूष ! या जनरेशन गॅपमध्ये आम्ही करून करून करणार काय ?' त्यानं हातानं (स्वत:चेच) केस उपटत सांगितलं.

'नाहीऽ तुम्ही जिंका जग. काही हरकत नाही आमची. पण त्याच्यापूर्वी थोडी शिक्षणाची बाजू सांभाळली तर...'

'शिक्षण ? कुठलं शिक्षण ? तुमच्या पिढीनं आमच्या पिढीसाठी बेतलेलं ? शी ! ज्या शिकण्यात क्षण न् क्षण वाया जातो ते तुमचं शिक्षण. पदव्या गाडा आणि कॉलेजं जाळा. जनरेशन गॅपमुळे आमची शिक्षणाची उमेदच पार खचली आहे.' त्यानं डोळे विस्फारले आणि मुठी आपटल्या.

'अभ्यासाचं राहिलं. पण या वयात निदान काही शरीरसाधन, बलसंवर्धन वगैरे...'

'बलसंवर्धन ? कुठल्या त्रेतायुगातल्या कल्पना आहेत तुमच्या ! या जनरेशन गॅपनं अकालीच म्हातारं केलंय आम्हाला. आमच्या कंबरा मोडल्या आहेत आणि पाठीचा कणाच घालवलाय... आणि आमचे पाय...'

'अरे बापरे ! एकदम इतकं काही झालंय म्हणता ? तेसुद्धा एकुलत्या एका जनरेशन गॅपमुळे ? च् च् च् ..चला, जरा उघड्यावर जाऊन हवा खाऊ.'

'हवा ? जनरेशन गॅपमुळे सगळी हवा दूषित झाली आहे.'

'मग काही थंडगार पेय ?'

'जनरेशन गॅपमुळे माझ्या चौफेर वणवा पेटलाय आणि तुम्हाला पेय सुचतंय ? नीरो जळत असताना रोम फिड्ल वाजवत होतं म्हणतात तसं...' संतापाच्या भरात त्याचा संदर्भ उलटासुलटा झाला होता. पण ते सांगायचं धाडस केलं असतं तर त्यानं मलाच उलटंपालटं केलं असतं. काही वेळानं मला सीमाभागात बसल्यासारखं वाटायला लागलं. तिकडे कसं, कशाचंही कारण सीमाप्रश्न चिघळणं हेच असतं. म्हणजे समजा, एखाद्याला फारच लागोपाठ मुलं झाली तर 'काय करणार बुवा ? हा सीमाप्रश्न असा चिघळलाय नाऽ बाहेरचं वातावरण इतकं गढूळलंय की घरातच शेवटी कॉन्सन्ट्रेशन करावं लागतं' ही मीमांसा. आणि एखाद्याला अगदीच एकही मूल झालं नाही' तरीही, 'काय करणार बुवा ? सीमाप्रश्न असा चिघळलाय नाऽ कशातच मन लागत नाही. हा निष्कर्ष ! तसाच काहीसा प्रकार जनरेशन गॅपबाबत होतोय.

मुलं शिकत का नाहीत ?
घरं टिकत का नाहीत ?
साहित्य विकत का नाही ?
प्रेम पिकत का नाही ?

तरुण अकाली का वाकतात ?
म्हातारी माना का टाकतात ?
उद्योजक मागे का पडतात ?
नोकरदार एकाच ठिकाणी का अडतात ?
या आणि अशासारख्या अनंत प्रश्नांना एकच उत्तर. जनरेशन गॅप बरं, जनरेशन गॅप ! पंचवीस वर्षांपूर्वी 'संयुक्त महाराष्ट्रा'-च्या पाठीलापाठ लावून हा विषय वसंत-व्याख्यानमालेत यायचा. नंतर क्रमाक्रमानं 'कोकण रेल्वे' आणि 'जनरेशन गॅप', 'पी. एल. ४८०' आणि 'जनरेशन गॅप', 'गोबर गॅस' आणि 'जनरेशन गॅप' 'हिंदी चिनी भाईभाई' आणि 'जनरेशन गॅप', 'गोवा कुणाचा ?' आणि 'जनरेशन गॅप' असं करताकरता तूर्तास 'सूर्यचूल' आणि 'जनरेशन गॅप' इथवर हुकमी व्याख्यानाची जोडी आलेली आहे. पुढेही बाकीचे सगळे विषय बदलतील पण जनरेशन गॅप अढळ



असेल याचा मला विश्वास वाटतो, कारण त्याच्यावर बोलायला फार काही करावं लागत नाही. आपण तरुण असलं की म्हाताऱ्याना झोडायच आणि म्हातारं असलं तर तरुणाच्या नावानं बोटं मोडायचं काम केल म्हणजे झालं. ' एवढी एक गॅप दूर करा, मग बाकी सगळ चुटकीसरशी झालच म्हणून समजा ' एवढा भाव चेहऱ्यावर आणता आला की बाजी जिंकलीच.

कधीकधी विचार केला की गंमत वाटते. जनरेशन गॅपमुळे ज्ञानेश्वराना (ॲक्चुअली आय वॉन्टेड टू राइट ज्ञानेश्वरी...बट धिस जी. पी. यू नो...इत्यादी) ज्ञानेश्वरी लिहिता आली नाही, जनरेशन गॅपमुळे अभिमन्यूला चक्रव्यूह फोडता आलं नाही किंवा जनरेशन गॅपमुळे महाराजांना हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचं स्वप्न अर्ध्यावर सोडून द्याव लागलं असं काही कुठे वाचनात आलेलं नाही. हं, आता पुढे महाराजाना त्यांच्या युवराजांच्या हृदयातरीच शल्य वगैरे काही घड समजलं नाही अस म्हणतात; पण त्यानंही फारसं काही नुकसान झालेलं दिसत नाही. उलट पुढे विसाव्या शतकात एका लेखकाला जेव्हा जाग आली तेव्हा त्यान त्या शल्यावर तीन अंकी नाटक रचलं आणि शल्याचा गल्ला भरून वाहू लागला. मग आताच एकाएकी सर्वांना ही जनरेशन गॅप एवढी जाचू का लागली ?

त्याच त्या ज्वालाग्राही युवकाचे वडील योगायोगानं एकदा भेटले. भलतेच पॉश आणि तरुण दिसत होते. मुलाच्याच न्हाव्याकडे यांचाही हेअरकट होत असावा हे ओळखायला फार चाणाक्ष असण्याची जरूर नव्हती. दोघाच्या पॅण्टही एकाच कंपनीच्या ! शर्टाचा कट तसा अत्याधुनिक. हातात सिगरेट धरण्याची स्टाइलही तीच. तावातावानं सांगायला लागले. ' आपले फादर एवढे कळकट राहायचे ना, आपल्याला शरम वाटायची. तेव्हाच ठरवल. आपल्या पोराला आपल्या राहणीची लाज वाटली नाही पाहिजेल आहे. पैसे जास्त गेले तरी परवडले; पण ' मीट माय फादर ' हे त्याला न लाजता म्हणता आलं पाहिजे चारचौघात. '

' मग येत का म्हणता ? '

' डॅम इट. लेकाचा मला देव आनंद म्हणतो. मी सरळ ऐकलंय मित्राला सांगताना, आज देवआनंदची चतुर्थी आहे, आज देवआनंदला रात्रभर ' धाप ' लागली होती, देवआनंदला पापलेटमधलं दगडसुद्धा कळत नाही वगैरे ! सांगतो काय, धिस ब्लडी यंग जनरेशन यू नो... '

बघता बघता वर्तुळ किती सफाईनं पुरं झालं ! वडिलांची राहणी, कपडालत्ता किंवा विवक्षित फॅशन हे उगाचच निमित्त. खरं म्हणजे, दोन पिढ्यांनी एका मर्यादेपलीकडे जवळ येणच मंजूर नव्हतं, कोणे एके काळी ह्यांना आणि आता ह्यांच्या मुलांना. ह्यांचे वडील जुन्या पिढीतले. हे जरा आधुनिक. म्हणून हे आज्ञाधारकपणे मुलाला सोळावं वर्षं लागल्यावर मित्रासारखं वागवायला निघाले. ह्यांच्या बाजूनं ठीक होतं ! पण मुलाला एवढा वयस्क मित्र आवडेल का असा विचार त्यांनी कधी केला होता का? राहता राहिला त्यांना देवआनंद म्हणण्याचा मुद्दा. प्रत्यक्षातला देवआनंदशी भांडण असायच काहीच कारण नव्हतं. त्याच्या चिरतारुण्याचं रहस्य वगैरे ऐकायला, वाचायला कोणाचीच ना नव्हती. हरकत होती ती आपल्या वडिलांनी, दस्तुरखुद्द जन्मदात्यांनी देवआनंद बनण्याला. देवआनंदची जागा त्यांनी कायमचीच अडवून ठेवली म्हणजे मुलानं कोणाच्या तोंडाकडे बघायचं ? सुनील आनंदच्या ? '

अशा वेळी ती जुनी आश्रमव्यवस्था भलतीच आदर्श वाटायला लागते. म्हणजे स्वतः जगायला नव्हे दुसऱ्यांची बघायला. आयुष्याच्या वेगवेगळ्या अवस्था आणि त्या त्या काळातली जीवनपद्धती कशी पक्की ठरलेली ! पुन्हा प्रत्येक आश्रमावर ' हा रस्ता रहदारीचा नाही ' ही पाटी कशी ठाकूनठोकून बसवलेली. घूसखोरीचा, अतिक्रमणाचा प्रश्नच यायला नको. शिकायच्या वयात नुसतं शिक्षण ! त्याला इतर मोहांनी खुणवायला नको म्हणून गुरुगृही जाऊन शिक्षण. साइड बाय साइड, सुट्टीत दोन महिने कमवू किंवा उगाच आपलं रेल्वेच ' स्टुडण्ट कन्सेशन ' मिळावं म्हणून इञ्जिनिअरिंग कॉलेजला नाव घालू हा प्रकार नाही. ते काय ते ' रामोऽहरीऽ ' वगैरे करून झाल की रीतसर गृहस्थाश्रम. म्हणजे पुरुषानं कमवाव, बाईनं रांधावं आणि दोघांनी मिळून जमेल तेवढी प्रजा वाढवावी. रात्री निजताना एका कुशीत नवपरिणित बायकोला घेऊन दुसऱ्या कुशीत गजराचं घड्याळ बाळगण्याची आणि बँकेची परीक्षा पास झाल्याबद्दल तिची दोन जादा चुंबनं घेण्याची वेळ यायलाच नको. पुढे इमानेइतबारे संसार करून सपला की समारंभपूर्वक वानप्रस्थाश्रमाची वाट धरायची. एकाच घरात राहून सत्तांतराचं दुःख सोसण्यापेक्षा संसारातून देहानं दूर जाणं हा किती चांगला मार्ग. मन फार तर घटका दोन घटका मागे रेंगाळेल. थोडं दुखावेल; पण कायमचं दूर झाल्यावर दुखण्या दुखवण्याचा सवालच कुठे येणार ? आजच्यासारखी, दहा बाय बाराच्या एकमेव ' शयनगृहात ' जागा मिळवण्यासाठी, भरात आलेल्या मुलगासुनेची आणि भरातून पुरत्या न गेलेल्या सासूसासऱ्याची छुपी स्पर्धा तर नसेल त्यात. आणि अखेरीस संन्यस्ताश्रम! ज्या अज्ञानातून आलो त्यातच विलीन होण्याचा डोळस प्रयत्न. ' वृद्धाश्रम—सोय की सकट ' असले पुरोगामी प्रश्न त्या काळातल्या वृद्धांना बहुधा पडत नसतील आणि तरुणावरही बापाला देवआनंद म्हणण्याचा प्रसग बहुधा येत नसेल, आजच्यासारखा !

खरखोटं देव जाणे, पण जुन्या पोथ्यापुराणामधून जे वाचनात येतं त्यावरून तेव्हाच्या स्त्रीपुरुषांचं आयुष्य आजच्याहून अधिक कप्पेबंद, ठरीव किंवा ठाशीव असावं असं भासतं. प्रत्येक जीवनावस्थेची भूमिका स्वच्छ, मांडणी रेखीव आणि व्यवहारही मर्यादित. उगाच शिंग मोडून वासरात शिरणं नाही आणि उगाच अकाली आढ्याकडे बघत बसणं नाही. आता आपल्याला सगळ्याच अवस्थांमध्ये सगळ्यात हात घालावा लागतो. चौकटी मोडून लवचिकपणा आणायला निघालेले आपण सारखे वेगवेगळ्या भूमिकांमध्ये घरंगळत असतो. मुल फार काळ मुलं नसतात. ती मतं घेऊनच जन्मतात. आईवडिलांना सारखी आव्हानं द्यायला लागतात. तरुण तर बोलून चालून तरुणच ! ते कधी कशाला आग लावतील याचा अंदाज नसल्यानं त्यांना कायमच सांभाळलं जातं. म्हाताऱ्याना म्हातारं म्हणून घ्यायला आवडत नसत. ते जमेल तेवढ्या वयापर्यंत सतत तरुणाच्या कामकाजात, कलाछंदात, ससारात लुडबुडत असतात. अगदीच हातपायानी बंड पुकारलं तरच ते मधल्यावरून बाजूला

व्हायची तयारी तीही कुरकुरतच दाखवितात. साराश म्हणजे आठ ते ऐंशी वयापर्यंत प्रत्येकाला आपण केंद्रस्थानी असावसं वाटतं. जीवघेण्या स्पर्धेतून इतर प्रत्येकाला हरवत, मागे सारत पुढे जावस, जिंकावसं वाटतं. आपल वय, आपली कुवत, शारीरिक शक्ती, बौद्धिक आवाका यानुसार कमीअधिक गतीनं, कमीअधिक धावण कोणालाच मंजूर नाही. मुळात रस्ता हा केवढासा, त्यावर किती माणसांची गजबज आणि त्यातही प्रत्येकाचा रस्त्याच्या मध्यावरूनचं चालण्याचा अट्टाहास. कडेकडेने रमतगमत, आपल्या चालीन चालण्याची बातच नस्से ! जनरेशन गॅप कसली ? मला तर ही साक्षात जनरेशन टक्करच दिसते. गॅप किंवा फट पडणार कुठून ? इथे हरघडी माणस, त्याच्या इच्छा आकांक्षा, त्यांची स्वप्नं आणि सत्य एकमेकावर आदळत आहेत. मग काहीना दुखापत होणार, काहीची मनं मोडणार हे अटळच आहे. गर्दीचे धक्केबुक्के आपल्याला सोसतील की नाही याचा विचार गर्दीत शिरण्यापूर्वी करावा. शिरल्यानंतर गर्दीनं असच केलं आणि तसंच केलं (फार कशाला गर्दीन आपल्याला देवआनद म्हटल) म्हणून कुरकुरण्यानं काय होणार आहे ?

पुढच्या पिढीचं आयुष्य आपल्यापेक्षा सुखासीन आहे. असे प्रत्येक पिढीला वाटतं. काळावरोबर जीवनमान उचावत असतं. राहणीमान सुधारत असतं. नवनव्या सुखसोयी, तान्त्रिक करामती आणि यांत्रिक सुविधा–सवलत वाढत असतात. आपल्या वेळी त्या मिळाल्या असत्या तर आपण खूप काही करून दाखवलं असत असा भ्रमही माणसांना सारखा होत असतो. किंबहुना अवघ्या जनरेशन गॅपचं मूळच मुळात 'आमच्या वेळी' या शब्दात असतं खरं म्हणजे सारखं, आमच्यावेळी, आमच्यावेळी म्हणून गहिवर काढण म्हणजे आजची वेळ 'आपली वेळ' नाही हे जाहीर करणं. पण माणसं किती आवेगानं हा जाहिरनामा देतात. आमच्या वेळी माणसांना माणुसकी होती, आमच्या वेळी पैशाला किंमत होती, आमच्या वेळी घरात मोठ्यांना मान होता असं करता करता आमच्या वेळी साखर गोड होती किंवा आमच्या वेळी पाणी पातळ होतं इथवर काहीची मजल जाते. शेवटी कधी तरी वैतागून विचारावस वाटतं. बापहो, तुमच्या वेळी एवढ सगळं रामराज्य होतं तर आता आमच्या वेळी मध्येमध्ये कशाला तडमडताय? खरी गोम अशी असते की त्यांच्या वेळी त्याना काही रामराज्य वगैरे वाटलेलं नसतच. त्याचं कशाला, खुद्द रामराज्यातल्या लोकाना सुद्धा त्यावेळी ते 'रामराज्य' वाटलं असेल का याबाबत मला शंका आहे. नाही तर, आरामत अश्वमेधाचा घोडा घेऊन गावोगाव फिरणाऱ्या लवकुशांना बघून खुद्द श्रीरामाना सुद्धा मनात वाटलं असेल, ह्याची चैन आहे बुवा ! आतासारखे पक्के रस्ते, पूल वगैरे आमच्या वेळी असते तर ... नाही तर आमच्या वेळी, नुसता पूल बाधायचा म्हटला तरी, वानरं गोळा करा, खारींना अक्षत द्या, त्यांनी पाठीला कणकण चिकटवून वाळू वाहून आणा...! पण प्रत्यक्षात लवकुशांसमोर त्यांनीही फुशारकी मारली असेल, तुमच्या घोड्याचं काय घेऊन बसलात एवढं ? आमच्या वेळच्या खारी सुद्धा काय होत्या महाराजा ? एकेक खार नुसनी सिव्हिल इंजिनिअर. नाही तर तुमचे सिव्हिल इंजीनिअर बघा आजचे. खारीची अक्कल नाही ऐकेकाला...रामानी एवढं म्हणायचाच अवकाश, की झालीच त्याच्यात आणि मुलांच्यात जनरेशन गॅप सुरू ! चागली कचकचीत जनरेशन गॅप !

म्हणून काही व्हायचं का राहिलंय ? मुळीच नाही. रामराज्य झालं, लवकुशाच राज्य झाल, ते थेट 'ज्योतीने तेजाची आरती 'पर्यंत सगळसगळं झालं. ज्यांना गॅप कळलीच नाही ते बिनधास्तपणे पुढे गेले, ज्यांना कळली ते थोडे अडखळून, आवरून सावरून, उड्या मारून पार करून गेले. पण ज्याना पुढे जायच होतं ते गेलेच ! ज्याना 'आमच्या वेळी' असणाऱ्या परिस्थितीचा जास्तीत जास्त फायदा करून घेता आला त्यानी 'तुमच्यावेळी' अमुक नाही म्हणून बोट मोडली नाहीत किंवा अमुक आहे म्हणून हेवा केला नाही आणि आपली पण एक वेळ येईल असा आत्मविश्वास असणाऱ्यानी इतराच्या वेळामध्ये लुडबूड केली नाही. हे समजू शकणाऱ्यासाठी जनरेशन गॅपची इतकी चर्चा पुरेशी आहे. इतरांना मात्र 'जनरेशन थाप' पुढच्या कित्येक जनरेशन्स पुरून उरणार आहे.

□

---


**राजहंस प्रकाशन**

# कुंपण आणि आकाश

**मंगला गोडबोले**

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दु:ख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकामध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !


---

'अ‍ॅड हाऊस'चे श्री. नरेंद्र मुंदडा

# मनोगत

## एका स्वतंत्र व्यावसायिकाचं...

● शुभदा रानडे ●

**मला खरं म्हणजे नट व्हायचं होतं.**

तसे माझ्या भविष्याबद्दल घरचे-दारचे सरसकट सगळे साशक असायचे. कारण एक तर माझा अतिधाडसी, कुठलही आव्हान बिनदिक्कत स्वीकारण्याचा स्वभाव आणि एकदा मनात आलं की, ती गोष्ट कशीही, काहीही करून प्रत्यक्षात आणण्याची मनाची तयारी. त्यातून लहानपणापासून चित्रपटांचं भयंकर वेड-आकर्षण. त्यामुळं महत्त्वाकाक्षा एकच-आपण नट व्हायच. चित्रपटसृष्टी गाजवायची. लहानपणाचं हे खूळ मोठेपणीही कमी व्हायचं चिन्ह दिसेना, तेव्हा माझ्याकडून भविष्यात फार काही घडेल, ही अपेक्षाच कुणाला नव्हती. त्याना समाधान फक्त एकाच गोष्टीचं होतं- घरचाच प्रिंटिंग प्रेस आहे. प्रेसचा जम चांगला बसलेला आहे. तेव्हा कुठं काही जमलं नाही तर निदान घरच्याच व्यवसायात तरी चिकटवून घेता येईल. मग तोच नीट सांभाळला तरी पुष्कळ झालं. त्यामुळं थोडीशी जाणूनबुजून आणि थोडीशी आपोआपच प्रेसच्या कामाची जबाबदारी टाकली जात होती. मे महिना, दिवाळीसारख्या मोसमात पत्रिका, प्रीटिंगच्या कामाचे नुसते ढीगच्या ढीग लागलेले असायचे खूप ऑर्डर्स असायच्या. माणसंच कामाला कमी पडायची. मे महिना, दिवाळी हे नेमके आजच्या शाळाचे सुट्यांचे दिवस. त्यामुळं दिवसभर उनाडक्या, उचापत्या करण्याऐवजी आम्हा तिघाही भावांना वडील कामात अडकवून टाकायचे. सुरुवातीला त्याचा खूप कटाळा यायचा. इतर मुलं मजा करायची, तशीच आपणही करावी अस वाटायचं. सुट्टीची मजा सोडून कामात अडकवून घेण नको वाटायचं; पण हळूहळू जाणवायला लागलं की, हे काम आपल्याला जमतंय, आवडतय. मग सुट्ट्यांची आवर्जून वाट बघायला लागलो. मनापासून सगळ्या गोष्टी शिकण्यात रस घेऊ लागलो आणि अगदी कंपोझिंग, बाइंडिंगपासून सगळं शिकलो.

**इथूनच वेगळी वाट निवडण्याचा निश्चय पक्का झाला होता.**

-हळूहळू वडील प्रेसच्या कामांमध्ये आम्हाला सहभागी करून घेऊ लागले होते. एखाद्या जॉबचं डिझाईन, लेआऊट, कलर-स्कीम, पेपर, प्रिंटिंग बघायला सागत होते. त्याबाबत आपली मतं मांडायला सांगत होते. सुरुवातीला आमची मतं त्याना पटायचीच असं नाही, आणि पटली नाहीत तर ते आपल्या मनासारखच करायचे. एखाद्या जॉबचा विचार करताना विचारांची दिशा कशी चुकते आहे, हे समजावून सांगायचे. कारण कामाच्या गुणवत्तेच्या बाबतीत वडील अतिशय कडक. जरा इकडचंतिकडं झालेलं खपायचं नाही त्याना. त्यामुळे कित्येक वेळा वडील आमची मतं गृहीत धरत नसले तरी ते आमची मतं आवर्जून विचारताहेत, तशी संधी देताहेत, हेही आमच्या दृष्टीनं खूप होतं. त्यातूनच नकळत काय चागलं, काय वाईट याचं प्रशिक्षण मिळत होतं. वडिलांची आणखीन एक खासीयत म्हणजे बोलता-बोलता समोरच्या माणसामध्ये स्वत:विषयी, स्वत:च्या कामाविषयी प्रचंड विश्वास निर्माण करणं. त्यांचा साहित्याकडं विलक्षण ओढा. काव्य उत्तम करतात, त्यामुळं समोर बसलेल्या माणसानं काय हवंय याचा नुसता उल्लेख करायचा अवकाश की, वडील एक-एक अफलातून कल्पना त्याच्यासमोर इतक्या सहजतेनं माडतात की, समोरची व्यक्ती काम देऊनच बाहेर पडते. वडलांच्या या चौफेर व्यक्तिमत्त्वाचा माझ्या आयुष्यावर, करियरवर, व्यक्तिमत्त्वावर निश्चितच खूप परिणाम झालाय. आज मी एखाद्या लेआऊटमध्ये काय कमी आहे किंवा काय पाहिजे, हे केवळ एका दृष्टीक्षेपात सांगू शकतो. कॉपी तयार करण्यासाठी निरनिराळ्या कल्पना लढवू शकतो. जाहिरात कशी प्रेझेंट केली तर पाहणाऱ्यावर नेमका परिणाम होऊ शकेल, याचा अचूक मागोवा घेण्याइतपत माझी नजर आणि विचार पक्के झालेत. अर्थात या गोष्टीची पहिल्यांदा जाणीव झाली ती कॉलेजमध्ये. कारण कॉलेजमध्ये पॉकेटमनीची गरज भासायला लागली तेव्हा मी आणि माझ्या भावाने छोटासा साईड बिझिनेस सुरू केला. वेगवेगळ्या अ‍ॅडव्हर्टायझिंग एजन्सीजना पॉइंट ऑफ परचेस मटिरियल म्हणजे डॅंग्लर्स, स्टीकर्स वगैरे पुरवण्याचा. या अ‍ॅड एजन्सीज मला पैसे द्यायच्या नाहीत; पण क्लायन्टस्‌ना मात्र मटिरियल पुरवायच्या ते दुप्पट-तिप्पट नफा घेऊन. तेव्हाच माझ्या मनात अ‍ॅड एजन्सीजचे वारे घुमायला लागले होते. मनातली नट होण्याची कल्पना हळूहळू माघार घेत होती. अ‍ॅडव्हर्टायझिंग क्षेत्राचा वेग, सतत ताजेपणा, जबरदस्त क्रिएटिव्हिटी वगैरे गोष्टींची झिंग चढत होती; पण वडलांचा मात्र या गोष्टीला सक्त विरोध होता. त्यांना माझं चित्रपटात जाणं पसंत नव्हत, तसं अ‍ॅड एजन्सी काढणंही. कारण पैशाच्या दृष्टीनं दोन्ही बेभरवशाचे व्यवसाय. तेव्हा मी भलतं धाडस करू नये आणि गोत्यात येऊ नये, हे त्याचं स्पष्ट मत होतं. त्याच

सुमारास त्यांनी 'श्रीनिवास कार्डस्' चं युनिट काढल होतं. एवीतेवी माझं कॉलेज-शिक्षण पूर्ण झालंच होतं, तेव्हा या युनिटची सर्व जबाबदारी मी घ्यावी, असं त्यांना वाटत होतं, पण माझा ॲड एजन्सी काढण्याचा विचार पक्का झाला होता वडलांच्या आणि माझ्या विचारात खूप मोठं अंतर पडलं होत ते इथपासूनच. अर्थात त्या आधीही विचारात तफावत होतीच. मी जसजसा मोठा होत होतो, विस्तारलेल्या जगात एक एक पाऊल पुढ जात होतो, थोडाफार अनुभव गाठीशी बांधत होतो, तसतसं हे अंतर अजूनच वाढत होतं. वडलाच्या मार्गानं जात प्रेस चालवण मला पटत नव्हतं आणि माझ्या म्हणण्या-प्रमाण प्रेस चालवणं वडलांना मान्य नव्हतं. ही तेढ वाढतच होती ही तेढ सोडवण्या-साठी एकच मार्ग होता आणि तो म्हणजे मी माझी वेगळी वाट निवडण. त्याप्रमाणे मी ॲडव्हर्टायजिंगच क्षेत्र निवडल. या वाटे-वर यशस्वी व्हायचं, ही मनात घर करून बसलेली बेफाम जिद्द आणि धाडसी महत्त्वा-कांक्षा याच्याखेरीज कशाचीच साथ नव्हती. याच बळावर मी धूसर वाटेवरून चालायला सुरुवात केली.

पण बसलेला पहिलाच फटका इतका जोरदार होता की बस ! ...

ॲड एजन्सी काढायचं एवढं मी निश्चित केल होतं तरी, आहे तेवढ्या त्रोटक अनुभवा-वर काही करायची माझी तयारी नव्हती. म्हणून मी 'दी सेंटर फॉर बिझीनेस स्टडीज –ग्रीनीच–लडन' इथल्या 'ॲडव्हर्टायजिंग ॲंड मास कम्युनिकेशन' या अभ्यासक्रमाला अर्ज केला. प्रवेश मिळाल्याचं पत्र आलं आणि मला अर्धी लढाई जिंकल्यासारखं वाटल अर्धी लढाई अजून जिंकायची होती. कारण तिथ जाण्यासाठी लागणारा पैसा कुठं हाती होता ? वडलानी कानावर हात ठेवले. अर्थात म्हणून मी माघार घ्यायला तयार नव्हतो. किंबहुना त्याच्याकडून मदत मिळ-णार नाही, याची मला खात्री होतीच. त्यामुळ मी माझे सोर्सेस चाचपडून पाहायला सुरुवात केली. सगळे भले बुरे अनुभव आले. मला अजून आठवतय, माझ्या एका मित्राच्या आईनं त्याच्या खात्यातले पाच हजार रुपये नवऱ्याच्या नकळत मला काढून दिले होते; पण या सगळ्या प्रयत्नांवर पाणी पडलं ते व्हिसा न मिळाल्यानं. थॅचरबाईंची पॉलिसी आड आली. त्यात माझा बळी गेला होता. या पराजयानं मी मात्र पुरता कोलमडून गेलो. वैफल्यग्रस्त झालो. माझं स्वप्न, आकांक्षा संपल्या होत्या. डोळ्यासमोरची धूसर वाटही पुसली गेली होती. माझ्या भविष्याबद्दलचा आत्मविश्वास गळून पडला होता. अशाच अनिश्चित अवस्थेत काही दिवस गेले. काय करावं, कशी जमवाजमव करावी, हेच मला सुचत नव्हतं. अशातच एक दिवस मी सरळ उठलो, मुंबईला गेलो आणि मुंबईतल्या नामांकित ॲड एजन्सीज-मध्ये जाऊन भेटायला सुरुवात केली सग-ळ्यांना स्पष्टपणे कल्पना देत असे की, मला तुमच्याकडे नोकरी नको. फक्त सहा महिने मला तुमच्या एजन्सीत काम करू दे. ॲड एजन्सीच्या सर्व बाजूंची तोंडओळख झाली तरी पुरे– हा माझा दृष्टीकोन होता; पण बऱ्याच जणांनी माझ्या हातावर तुरी दिल्या. कुणाकडे माझ्यासारख्या आगंतुकाला जागा नव्हती. कोणी जाहिरात आल्यावर या म्हणून सांगत होते. तर कुणी ॲडव्हर्टायजिंगचा अभ्यासक्रम करून या म्हणून सांगत होते. एकूण काय, कुणाकडे माझ्यासाठी जागा नव्हती. मी आणखीन निराश होत होतो. भविष्याच्या वाटेवर चाचपडत, अडखळत चालण्याचा प्रयत्न करत होतो. त्यात पडत होतो. ठेचा खात होतो; पण पुन्हा पुन्हा उभारी धरत होतो. अशाच प्रयत्नातून अखेर 'प्रेम असोसिएटस्' नावाच्या एका ॲड एजन्सीत मला घेतलं माझी उमेदवारी सुरू झाली. जीव तोडून मेहनत करत होतो. पडेल ते काम करत होतो. ते पाहून 'प्रेम असो-सिएटस्'च्या किशन प्रेमनारायण यानी मला पैसे देऊ केले; पण मी सुरुवातीलाच त्यांना सांगितलं होतं. मी पैसे घेणार नाही. त्या-प्रमाणे त्यांनी देऊ केलेले पैसे मी नाकारले; पण कामात कधी कुचराई केली नाही. सहा महिन्यांच्या अवधीत जेवढं पहाता येणं, शिकता येणं शक्य होत तेवढ केलं. माझ्या कामावर, चिकाटीवर किशन प्रेमनारायण खूष होते. त्यानी मला नोकरी देऊ केली; पण तोपर्यंत माझा भविष्याचा मार्ग निश्चित झाला होता. स्वतःची ॲड एजन्सी काढून स्वतःच्या पायावर उभं राह्यचं होतं. याच आकांक्षेत पुण्याला परतलो. पुन्हा भांडवल गोळा करायला सुरुवात केली. मागचा अनु-भव लक्षात घेऊन भांडवल गोळा करताना पोटात वागबूग व्हायचं. गिल्टी कॉन्शस यायचा. कोणी तरी 'महेश सहकारी बॅंके'चं नाव सांगितलं. ताबडतोब मी बॅंकेच्या चेअर-मनना – श्रीरामशेट कासटना – भेटलो आणि सगळी कहाणी सांगितली. चुटकीसरशी पैशाचा प्रश्न सुटला. पुन्हा एकदा उमेदीचा नेट लावला आणि 'ॲड हाऊस' ही ॲड एजन्सी सुरू केली.


MAKE THEM YOUNG
'HARD CHROME'

We carry out hard chrome plating on worn out Shafts. Sleeves, Guide Bars, Bore Bars and other machine parts and give them new life, of course at very reasonable rates.

M/s. Brite Electroplaters
Plot B–4, 'H' Block,
M. I. D. C. Pimpri, Pune – 18
Tel. : 83 309

—पण तरीही संकटांची परंपरा मात्र संपली नव्हती...

७ मार्च ८१ ला अॅड हाऊसची पहिली जाहिरात पेपरमध्ये आली तेव्हा भविष्याविषयीची साशकता थोडी फार कमी झाली. ध्येयाच्या दिशेनं सुरू केलेल्या वाटचालीवर पहिल पाऊल पडलं होतं; पण संकटांची परंपरा मात्र संपली नव्हती. वडलांना न जुमानता मी अॅड एजन्सी काढली, हा राग त्यांच्या मनात होताच. त्यात भर पडली ती माझ्या आंतरजातीय विवाह करण्याच्या निर्णयाची. हा निर्णय वडील पचवू शकले नाहीत. माझ्याशी आधीच कमी केलेले संबंध त्यांनी त्यांच्या बाजूनं पूर्ण तोडले. माझ्याशी बोलणं टाकलं. वास्तविक संध्या (माझी बायको) आमच्या घरी किंवा वडलांना अनोळखी नव्हती. माझ्या अनेक मित्रमैत्रिणींपैकी ती एक होती. इतर जसे घरी येत होते, तशी ती येत होती. भेटत होती. गप्पा मारीत होती. वडलांना ती माझी मैत्रीण म्हणून चालत होती; पण सून म्हणून नको होती. मी पुन्हा एकदा विचित्र कोंडीत सापडलो होतो. मला दोघंही हवे होते. शेवटी एक काही तरी सोडण्यावाचून गत्यंतर नव्हतं. मी विचार केला आणि संध्याशी लग्न करण्याचा निर्णय पक्का केला. संभाव्य परिणामांची अधुकशी कल्पना होतीच. या निर्णयामुळं मला बाहेरची वाट धरावी लागली. अॅड एजन्सीच जरा कुठं मार्गी लागत आलंय म्हणून निश्वास टाकतो न टाकतो तोच नवी अडचण हात धुवून मागं लागली होती. मी अक्षरश: रस्त्यावर आलो होतो. एजन्सी आणि राहण्यासाठी अशा दोन जागांची सोय होणं आवश्यक होतं. त्यावेळेस मी अशाही जागा पाहिल्या की, जिथं तुमच्या आमच्यासारखी माणसं राहाणं काय, एक क्षण थांबणंही शक्य नव्हतं; पण हातात पैसा नाही, सगळ्या गोष्टी इतक्या वेगानं घडत गेल्या की, विचार करायलाही सवड नाही. अशा कोंडीत सापडलेल्या मला दुसरा पर्यायच नव्हता. सुदैवानं या सगळ्या फरफटीत संध्याचीही साथ देण्याची तयारी होती आणि त्या परिस्थितीत मला तेवढा आधारही पुरेसा होता; पण मी ठरवत होतो त्याप्रमाणे जगण्याची वेळ मात्र माझ्यावर आली नाही. चारुदत्त सरपोतदारांनी (माझे सासरे) 'पूना गेस्ट हाऊस'मध्ये जागा देऊ केली. वास्तविक त्याच माझ्याविषयी खूप चागलं मत होतं अशातला भाग नाही. इतरांप्रमाणेच तेही माझ्या भविष्याविषयी साशंकच होते; पण रेसमध्ये पैसे लावतोच ना आपण, तोच दृष्टीकोन त्यांनी स्वीकारला. 'पूना गेस्ट हाऊस'सारखी ऐन मोक्याची जागा मिळाल्यानं माझ्यापुढचा बिकट प्रश्न मागं पडला होता. आता नेट लावायला हवा होता, तो अॅड एजन्सीचा जम बसवण्यावर.

पुण्या-मुंबईतील अॅडव्हर्टायजिंगच्या क्षेत्राकडे बघण्याच्या दृष्टिकोनात खूप तफावत आहे...

'प्रेम असोसिएटस्'मधील उमेदवारीमुळं अॅडव्हर्टायजिंगच्या क्षेत्राशी मी बऱ्यापैकी परिचित झालोच होतो. पण तरीही प्रत्यक्षात उतरल्यानंतर त्यातल्या खाचखळग्यांची खोली जाणवायला लागली होती. अॅड. एजन्सीची सगळी खाती दोघानीच सांभाळताना धावपळ होत होती. एक-दोनच मोठे क्लायंटस् हातात होते. अजून क्लायंटस् मिळायला हवे होते. त्यामुळं अकाऊंटस् एक्झिक्युटिव्ह, कॉपी रायटर, अकाऊंटंट, मिडिया एक्झिक्युटिव्ह अशा निरनिराळ्या भूमिकातून सतत पायपीट चालू होती. या पायपीटीतून सुरुवातीला तरी हाती फारस काही लागत नव्हतं. मुंबईतील जाहिरातक्षेत्राच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातला अनुभव निराशा करत होता. अॅडव्हर्टायजिंगकडे बघण्याच्या दृष्टिकोनातील तफावत अस्वस्थ करत होती. माल खपवायचा तर जाहिरातीला पर्याय नाही, हे सगळ्यांना मान्य आहे. पण ही जाहिरात जास्तीत जास्त आकर्षक व्हावी, म्हणून धडपडणाऱ्या अॅड. एजन्सीच महत्त्व मात्र पटत नाही. पुण्याच्या तुलनेत मुंबईचं जाहिरातक्षेत्र खूप पुढ गेलय. मुंबईतल्या क्षेत्राला न झेपता येणारा वेग आहे. त्यामुळं अॅक्टिव्ह आहे. तिथ क्लायंटला काय किंवा अॅड. एजन्सीला काय, वेळ घालवायला जागाच नाहीय. सगळे निर्णय कसे फटाफट होतात. कॅम्पेन्स आखली जातात, त्याप्रमाणं काम होतं की, जाहिरात तयार. इथं तसं होत नाही. सगळी स्वस्थपणं, सवडी सवडीनं होतात. एकेका जाहिरातीसाठी तीन-तीन चार-चारदा बैठका, चर्चा करणं, छोट्या छोट्या गोष्टीत खिचखीच करणं या गोष्टी उबग आणतात. अॅड. एजन्सीसाठी आवश्यक असेल तर तो प्रोफेशनल टच. दुर्दैवानं आज तरी पुण्यात प्रोफेशनल टच नाही. इतर अॅड.एजन्सीजच्या जाहिराती मी बघतो, तेव्हा ही गोष्ट प्रामुख्यानं जाणवते कल्पना लढवण्याच्या बाबतीत 'अॅड. हाऊस' कमी नाही. इथ कल्पनांना तोटा नाही. प्रश्न राहतो तो या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचा. उदाहरणादाखल 'स्टॅनरोज'ची नवी जाहिरात नुकतीच मी पेपरमध्ये पाहिली. इलस्ट्रेशनच्या साह्यानं जाहिरात तयार करण्याची कल्पना कित्येक दिवस मनात घोळत होती. अनेकांना मी ट्राय केलं. पण कुणाकडूनच ही कल्पना माझ्या मनासारखी उतरली नाही. 'स्टॅनरोज'ची ही जाहिरात पाहिली आणि सणकन् जाणवलं— आपल्याला हव होतं ते हेच! पण आता त्याप्रमाणे मी काही केलं तर लगेच टीका होईल, ढापाढापी केली म्हणून. तीच गोष्ट मॉडेलसची, फोटोग्राफीची. व्यावसायिक मॉडेलसची संख्या पुण्यात इतकी कमी आहे की बस! उत्कृष्ट फोटोग्राफी असलेल्या किती तरी जाहिराती डोळ्यासमोर असतात. पण तशी फोटोग्राफी करून जाहिरात तयार करायची म्हणजे हाताशी तशी माणस पाहिजेत. पैसा पाहिजे. अर्थात हे सगळेच प्रयोग म्हणजे पैशाशी खेळ असतो. काही काही वेळा पैशाकडे न पाहताही हे प्रयोग मी केले आहेत. हे प्रयोग अंगाशीही येण्याची शक्यता असते. कारण क्लायंटला नाही पसत पडलं की सपल. पण जोपर्यंत एजन्सी स्थिरस्थावर होत नाही, तोपर्यंत ही स्कीम स्वीकारलीच पाहिजे अस मला तरी वाटतं. सुरुवातीच्या काळात मीही स्वत: असे अनुभव घेतले. आज त्या अनुभवाची धग फारशी जाणवत नसली तरी त्या वेळेस मात्र काय परिस्थिती होती, ते सागणंच कठीण आहे.

या क्षेत्राच्या शक्यता मर्यादाची जेवढी जाणीव असायला हवी तेवढी नाही. त्यामुळं कित्येक वेळा भलत्याच गोष्टींची अपेक्षा धरली जाते. बऱ्याच वेळा क्लायंट एजन्सीकडं येतो खरा; पण त्याला स्वत:ला नक्की काय हवय याची जाण नसते आणि अॅड. एजन्सीवर पूर्ण विश्वास टाकायची तयारी

नसते. त्यामुळं गोंधळ होतात. आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत अॅड. एजन्सीचा क्रमांक अगदी शेवटचा. इतर सर्वांचे पैसे चुकते झाल्यानंतर मग अॅड एजन्सी. त्यामुळे किती पैसे अडकून राहतात, त्यालाही काही सुमार नाही. त्यातही काही क्लायन्टस् असे भेटतात की, त्यांचं सगळं लक्ष पैसे कमी कसे करता येतील यावरच असतं. अमुक झालं पैसे कमी कर, तमुक झालं पैसे कमी कर. बरं ज्या मालाची बाजारात जाहिरात करायची तो बाजारात चांगला उठला गेला तर बरंय. नाही तर पुन्हा एजन्सीच्या पैशावरच गदा. या अशा प्रकारामुळं सुरुवातीच्या काळात किती तरी पैसे अक्कलखाती जमा झाले आहेत. अर्थात त्या काळात जी ही किंमत मोजली, तिची फळंही पुढे मिळाली न दमता न हरता केलेल्या या प्रयत्नातूनच यश हळूहळू टप्प्यात यायला लागलं होतं. 'अॅड हाऊस'चं बस्तान नीट बसायला लागलं होतं. जे. बी. जर्दा, प्रवीण मसाले, कासट, डी. के. सांडू, गुटखा अशी क्लायन्टस्‌मध्ये भर पडायला लागली. बैद्यनाथ च्यवनप्राश, स्वराज ट्रॅक्टरसारखे परगावचे क्लायन्ट आपलं काम घेऊन 'अॅड हाऊस'कडे यायला लागले. अर्थातच 'अॅड हाऊस'चं काम पाहूनच. जाहिरातीचं प्रेझेंटेशन हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा यातला. कारण तयार झालेली जाहिरात सर्वसामान्य लोकांना कशी आणि किती अपील होईल हे बघावं लागतं. 'अॅड हाऊस'ची कुठलीही जाहिरात पाहा. स्वच्छ नीटनेटकापणा त्यात असतो. व्हाईट स्पेसचा उपयोगही मोठ्या प्रमाणावर करतो. कारण जाहिरातीत जास्त गुंतागुंत झाली की, वाचकाला कंटाळवाणं होतं आणि डोळ्यांनाही फारस सुखावह होत नाही. त्यापेक्षा मोजकाच मजकूर जास्त अपीलींग ठरतो.

'अॅड हाऊस'ही मुंबई विरहीत महाराष्ट्रातील एकमेव अॅड एजन्सी अशी आहे की, जी डॅंग्लर्स, स्टीकर्स, फिल्म प्रॉडक्शन वगैरे सर्व कामं स्वतःची स्वतः करते. कारण एकदा क्लायन्ट आमच्याकडं आलं की त्याला सर्व प्रकारची सर्व्हिस आमच्याकडूनच मिळाली पाहिजे. त्यासाठी त्यालाही दुसऱ्या कुणाकडून अमुक एक काम करून घेण्यासाठी धडपड करायला नको आणि आम्हालाही छोट्या छोट्या गोष्टींसाठी इतर कुणावर अवलंबून राहायला नको. त्यामुळं प्रेस, टाईप सेटिंग, फिल्म प्रॉडक्शन, स्टॉल इरेक्शन पी. ओ. पी. मटिरिअल वगैरे प्रत्येक गोष्टींचं स्वतंत्र युनिट तयार केलंय. साहजिकच सर्व भाषा आणि सर्व माध्यमातून काम करणारी माझी एजन्सी महाराष्ट्रात वरच्या क्रमांकावर आहे.

**मालक-स्टाफ रिलेशनशिप महत्त्वाची...**


'अॅड हाऊस'नं चार वर्षांच्या कालावधीत जो काही पल्ला गाठलाय तो कुठल्याही प्रकारची तडजोड न करता. गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड करायची नाही हे वडलांचं तत्त्व माझ्या डोक्यात पक्कं भिनलंय. क्लायन्ट कोणीही असो. त्याचं काम चोख झालं पाहिजे, यावर माझा कटाक्ष असतो. एखादं काम मनासारखं झालं नाही तर पैशाची पर्वा न करता मी फाडून टाकतो. त्यामुळं आज तरी माझ्याकडं येणारा क्लायन्ट एक तर पूर्ण विश्वासानं येतो किंवा थोड्या अनुभवानंतर त्याचा विश्वास बसतो. याचं एक उदाहरणच सांगतो. माझ्याकडं मागं एकजण अकाऊंटस् एक्झिक्युटीव्ह म्हणून काम करत होता. काही दिवसानंतर तो माझ्याकडची नोकरी सोडून गेला. दुसरीकडे त्याला नोकरीही मिळाली. पण मनानं मात्र तो 'अॅड हाऊस' मध्ये राह्यला. काहीही झालं की तो 'अॅड हाऊस'शी तुलना करत ताडून पहायचा त्यामुळं सारखं त्याच्या मनात येतं, नरुशेटना हे चाललं नसतं. असलं काम त्यांनी कधीच अप्रूव्ह केलं नसतं वगैरे शेवटी तो ती नोकरी सोडून पुन्हा माझ्याकडे आला. पण काही बिझिनेस एथिक्समुळं मी त्याला नकार दिला.


कुठल्याही व्यवसायाचं यश हे मालक आणि स्टाफ यांच्यातील परस्पर सामंजस्यावर, चांगल्या संबंधावर अवलंबून असतं असं मला वाटतं. आणि अॅड एजन्सीचा जम बसवायचा तर टीमही उत्तम हवी. या टीममधील सगळ्यांचा एकमेकांशी नेमका रॅपोर्ट हवा. तरच अपेक्षा जुळतात आणि कॅम्पेन व्यवस्थित उभं राहू शकतं. यातला एखादा कोन जरी बदलला तरी कॅम्पेन फिस्कटायला वेळ लागत नाही. दर सहा महिन्याला माणसं बदलणार असतील तर काही उपयोग नाही. त्यांना तयार करण्यातच वेळ आणि शक्ती वाया जाते. पण तरुण रक्तावर माझा विश्वास आहे. जाहिरातक्षेत्र विलक्षण क्रिएटिव्ह आहे. इथं प्रत्येक क्षण जगण्याचा, नाविन्याचा आहे. मन ताजं-तरतरीत असेल तर कल्पनाही वेगानं फुलतात. माझा सगळा स्टाफ ताज्या दमाचा आहे. बरोबरीचे असल्यानं मित्रत्वाचं नातं आहे.

'अॅड हाऊस'नं आज बरंच अंतर काटलं असलं तरी अजून किती तरी पल्ला गाठायचा आहे. 'अॅड हाऊस'ची चंदीगढला तर शाखा निघालीच आहे. अजून भारतभर शाखा काढायच्या आहेत. एजन्सीचं बस्तान नीट बसलंय; पण म्हणून तिथंच थांबायची माझी तयारी नाही. आज मी एजन्सीच्या कामात पूर्ण वेळ लक्ष घातलं नाही तरीही चालू शकेल. त्यामुळं मी आता फिल्म प्रॉडक्शनमध्ये उतरायचं ठरवलंय.

**चकचकीत स्वरूपाचं आकर्षण...**

अॅडव्हर्टायझिंग क्षेत्राविषयी आज जे प्रचंड आकर्षण आहे, या क्षेत्राच्या वरवरच्या चकचकीत, ग्लॅमरस स्वरूपामुळं अजूनही बऱ्याच जणांना वाटतं, या क्षेत्रात आल्यानंतर मॉडेल्स फिरवायला मिळतात, पार्ट्या झोडायला मिळतात, दारू प्यायला मिळते वगैरे. पण हे दिखाऊ, फसवं स्वरूप आहे. आतली परिस्थिती खूप निराळी आहे. क्रिएटिव्ह, अॅक्टिव्ह, ग्लॅमरस अशा स्वरूपाच्या खालचं क्षेत्र तितकंच अनिश्चित आहे. इथं करोडो रुपयांची उलाढाल करणारी एजन्सी एका रात्रीत बुडण्याची शक्यता असते. आज गाद्यागिर्द्यांवर लोळणारा केव्हाही रस्त्यावर येऊ शकतो. आर्थिक बोजाचा मनस्ताप प्रचंड असतो. या मनस्तापापायी कित्येक वेळा मनात येतं. हे सारं बंद करावं आणि झकामारीको एक किराणा मालाचं दुकान घालावं. पण...?


शार्प
एज



□

**राजेंद्र बर्वे**

□

सकाळी नऊ वाजून अठ्ठावीस मिनिटं.

बॅलार्ड पिअरच्या वालचंद हिराचंद मार्गावरच्या वालचंद टेरेसच्या अलिकडच्या गल्लीत आपली फियाट गाडी पार्क करून जो मिरांडा वेगानं आपल्या ऑफिसच्या इमारतीकडे निघाला, तेव्हा त्याचं लक्ष भोवताली नव्हतं. खरं म्हणजे त्याला मुंबईतल्या जुन्या भागातल्या ब्रिटिश पद्धतीनं बांधलेल्या इमारती आवडत; पण आज सकाळी त्याचं कशाकडेच लक्ष नव्हतं.

'ओ ! शिट !!' त्याच्या इमारतीमधली ती जुनी 'घुंईऽऽ' आवाज करून चालणारी लिफ्ट बंद पडली होती, आणि आता त्याच जुन्या इमारतीमधले उंचच उंच जिने चढत त्याला जाव लागत असल्याने जो अधिकच वैतागला होता. सकाळपासनंच त्याचं सगळं बिनसत होतं. दाढी करायला शेव्हिंग किट काढलं तर सेवन ओ क्लॉक ब्लेड संपलेल्या. त्यानं चडफडत खाली उतरून पानवाल्याकडनं ब्लेडस आणल्या. तिथे अर्थातच हव्या त्या ब्लेड मिळाल्या नाहीत. मग इंडिअन ब्लेड...त्यामुळे गळ्यावर, कल्ल्यांपाशी कटस्, शेव्ह लोशन झोंबणं...मग ट्रॅफिक जॅममध्ये अडकणं...ऑफिसात आल्यावर लिफ्ट बंद...

जोरानं श्वास घेत जो ऑफिसच्या दारापाशी पोचला तेव्हा त्याला आपल्या वैतागाचं खरं कारण समजलं. शनिवार रात्रीच्या पार्टीचा हँग ओव्हर अजून . . सोमवारी सकाळीही उतरला नाही...

जोनं ऑफिसच्या दाराशेजारच्या भिंतीवरची 'अॅड व्हेंचरर्स अॅड एजन्सी' अशी पितळी अक्षरं वाचली. त्या अक्षरांची चकाकी निरखली. ऑफिसात गेल्यावर वेटिंग लाऊंज आणि रिसेप्शनवरची कंपनीला गेल्या वर्षभरात मिळालेली अॅवार्डस् पाहली तेव्हा त्याला हलकं वाटलं; पण ते हलकं वाटणं आपल्या केबिनमध्ये जाऊन बसेपर्यंतच पुरलं.

त्याच्या कपड्याच्या सॅटन आणि शेव्ह लोशनच्या घमघमाटान त्याच्या रिसेप्शनिस्ट कम सेक्रेटरीला नेहमीसारखंच उत्तेजित वाटल आणि तसं वाटल्यावर तिन नेहमीसारखाच अधिक रेंगाळणारा कटाक्ष जोकडे टाकला आणि जोनं नेहमीप्रमाणंच तिकडे दुर्लक्ष केल.

जो कॉफी करायला बोलवेल या आशेन मिस पिंटो, सेक्रेटरी बसून राहली गेले सहा महिने मिस पिंटोन जोवर छाप मारण्याचा प्रयत्न केला होता. सगळ्या मिटिंग्जचे कागदपत्र ती सुंदरपैकी टाइप करून ठेवीत असे. आठवड्यातनं एकदा, विशेषत. शनिवारी ती लोकट ब्लाऊज घालीत असे पण जोनं तिला कधीच प्रतिसाद दिलेला नव्हता.

जो मिरांडा आतल्या आत अस्वस्थ असला, तरी त्याला येणारे फोन मात्र सगळेच्या सगळे उत्साहवर्धक होते. त्याच अभिनंदन करणारे फोन होते. या वर्षीच कॅग पारितोषिक जोनं मिळवलं होतं. त्या निमित्तानच 'मॅक्डोवेल सॉफ्ट ड्रिंक्स'वाल्यानी शनिवारी रात्री पार्टी दिलेली होती. उत्कृष्ट निर्मिती मूल्यं, यशस्वी कॅम्पेनबद्दल त्याला हे बक्षीस मिळालेलं होत. बाजारात अनेक स्पर्धक पेयं असताना देखील सहा महिन्यातच मॅक्डोवेलच्या त्या नव्या पेयानं मार्केट कॅप्चर केलं होतं, आणि आता एक्सपोर्ट ऑर्डरही येत होती.

पण मिरांडाला कॅग मिळण्याचा आनंद विशेष होता...आणि दोन दिवस आलेल्या काहीशा कंटाळल्या मनोवस्थेचं कारणही विशेष होत. दोघाची कारण एकच होती.

जो मिरांडा वर्षापूर्वीच बिग ब्रदर्स या बहुदेशीय जाहिरात कंपनीत कॉपी रायटर होता. त्या कंपनीत असतानादेखील लोण्याच्या जाहिरातीकरता त्याला हेच कॅग पारितोषिक मिळालं होतं. लोण्याची कॅम्पेन मिरांडानंच हँडल केली होती. प्रेस अॅडच्या ले आऊटपासनं अॅड फिल्मपर्यंत सगळ्या आयडिआ जोच्या होत्या; पण मुंबईतल्याच एका गुळगुळीत कव्हरवाल्या मासिकाला मुलाखत देताना बिग ब्रदर्सचा एमडी सॅमी रंगूनवालानं कॅम्पेनचं श्रेय उपटलं होतं.

मिरांडा वैतागला. भांडला आणि मग त्यानं कंपनीच सोडली. बॉम्बे मार्केट रिसर्च एजन्सीशी त्याचा पूर्वीचा संबंध. लोण्याच्या कॅम्पेनमध्ये त्यानी मिरांडाला बरीच मदत केली मिरांडाला त्याची ऑफर होती, आम्ही अॅडव्हर्टायझिंगमध्ये उतरतोय. आम्हाला जॉईन करा .. 'यू विल बी द हेड'. मिरांडाला पटलं. कामात ढवळाढवळ करणार नाही याची भरघोस हमी. पण मिरांडानं एकाच गोष्टीचा आग्रह धरला—माझ्यावर कोणीतरी एक 'बॉस' असू दे. 'मी फार आळशी आहे मला डेडलाइनच्या घोस्टची भीती कोणी दाखवली नाही तर आय काण्ट वर्क!' तीही अट मान्य.

मिरांडानं ठरवल पुन्हा एकदा कॅग खेचून आणायचं. बिग ब्रदर्सचा नक्षा उतरवायचा. सॅमी रंगूनवालाच वाकडं नाक ठेचायच!

बिग ब्रदर्सची काही गिऱ्हाईकं मिरांडानी आपल्याबरोबरच आणली. आणि लगेचच सॉफ्ट ड्रिंकच मोठं कॅम्पेन.. त्याची जबर तयारी ..आणि मागोमाग ..कॅग.

आता बिग ब्रदर्सबरोबर बरोबरीचं नातं प्रस्थापित झालं. नाव चारलोकात झालं. 'आय हॅव इस्टॅब्लिश्ड मायसेल्फ .. व्हॉट नेक्स्ट?' जोला एकदम रिकामपण आलं. कटाळा आला...पुढे काय...?

इतक्यात...

फोन वाजला. मिस पिंटोचा पलिकडनं आवाज, 'मिस चौधरी...ऑन दी लाईन... सर...'

मिरांडाच्या अपेक्षेप्रमाणे मिस चौधरीनं फोन केलाच.

मिस चौधरी..मोना चौधरी बिग ब्रदर्समधली मिरांडाची कलीग. कमर्शिअल आर्टिस्ट..विज्युअलायझर...आणि आता...

मिरांडा 'हॅलो!!' म्हणून गप्प.

मोना वॉज पोअरिंग...उत्साहानं बोलायला सुरुवात केली...आणि मग सॉरी... सॉरी......सॉरी म्हणून शनिवारी येऊ न शकल्याबद्दल परत परत काँग्रॅट्स् म्हणत राहली.

मिरांडानं अंधुकसं 'थँक्यू' केलं. शनिवारच्या पार्टीत त्यानं फक्त मोनाचीच वाट पाहली होती. त्याला मोनानं सॉरी ..सॉरी अस मन लावून म्हटल्यानं थोडं बरं वाटलं होतं पण आपलं हे बरंही वाटणं शब्दातन... आवाजातनं व्यक्त न होऊ देण्याची खबरदारी घेत त्यान रोकडा सवाल केला.

'मोना, इकडे कधी येतेस बोल. कॅग वगैरे सगळ इन्सिडेण्टल आहे.'

.........

'नही यार, यही ठीक है बस्!' असं मोनान क्षणभर थाबून म्हटलं आणि मग संभाषणच तुटलं आणि मग 'बाय, बाय' न म्हणताच त्यानी फोन ठेवला.

मिरांडानं फोन ठेवला आणि तो सहजच उठून केबिनच्या दारापाशी आला.

बाहेर आल्यावर मिस पिंटोन लगेच उठून रेंगाळणार स्मित आणि कटाक्ष मिरांडाकडे फेकला.

'इझ् शी हॅव एनी ब्रेन? ऑर जस्ट ए होल?' मिरांडाच्या मनात आल.

लॉबीमध्ये मनोज आणि पूजा दोघंही क्रॉसवर्ड सोडवत बसले होते. शब्दांवर चांगली कमांड यावी म्हणून मिरांडानंच त्याना हे काम दिल होतं. ते दोघंही त्याचे ट्रेनी असिस्टंट होते.

'जो, व्हॉट्स् आफ्रिकन डान्स ऑफ डेथ?' पूजानं विचारलं आणि ऑक्सिडाइझ्ड सिल्वरच्या बांगड्यांनी भरलेल्या हातान आवाज करीत तिनं कपाळावरची ताबूस झालेली बट मागे सारली.

'आ.. आफ्रिकन यू सेड्?'

'इज दॅट व्हू डू?'

मिरांडानं त्याच्याकडे न बघता म्हटलं.

मनोजनं मान खाली करून पटकन अक्षरं मोजून शब्द लिहिला,

'बाय जोव्ह, यू आर जिनियस्!'

पण मिरांडा एव्हाना आत जाऊन स्विव्हेल चेअरवर बसलाही होता.

'सो ..मोना अजून यायला तयार नाही!'

इतक्यात ... इंटरकॉमनं 'पीऽऽपीऽऽ' आवाज केला.

'येस्...एम् डी ऑन लाइन...

मेहरा अँड सन्सच्या नरिमन पॉइंटवरच्या ऑफिसात खूपचंद मेहरा आपल्या मुलाची वाट पहात होते. आपल्या वातानुकूलित आणि प्रशस्त ऑफिसच्या गुबगुबीत खुर्चीत बसून त्याना चैन पडत नव्हतं. ते सारखे उठून खिडक्याचे जाड जाड पडदे बाजूला सारून बाहेर पहात होते. श्रीचद कधी येईल असं त्यांना झाल होतं.

खरं पाहता श्रीचद आणि त्याची भेट सकाळी सहज होऊ शकली असती पण कफ परेडहून सहारच्या विमानतळावर पहाटे पहाटे जायच आणि पुन्हा ऑफिसला वेळेवर परत यायच त्याच्या जिवावर आलं. आणि श्रीचंद काही परदेशातन पहिल्यादीच परतत नव्हता. श्रीचदपेक्षा तो करीत असलेल्या डीलचं काय झालं याची त्याना अधिक उत्सुकता होती.

श्रीचदला कपनीचा मॅनेजिंग डायरेक्टर करण्यापूर्वी सेल्स मॅनेजर म्हणून पहिलं काम दिल आणि इग्लडला विल्किनसन कपनीबरोबर बोलणी करायला, करार करायला पाठवून दिल.

'डील जवळजवळ झाल्यासारखच आहे पापाजी!' अस त्यानी लंडनहून केलेल्या ट्रककॉलवर म्हटलं, पण त्याच्या स्वरात हवा तो जोर नाही अस खूपचदना वाटत राहिलं. त्यानी श्रीचदच्या आईपाशी हे म्हणूनही दाखवलं. पण त्यावर तिन 'इतक्या लाबून काय नीट ऐकू येणार? तुमच्या काही न काही समजुती' म्हणून त्याना उडवून दिल. पण खूपचदना मात्र शनिवारी झोप लागली नाही. श्रीचदऐवजी किंवा त्याच्याबरोबर आपण जायला हव होतं असंही त्याना वाटायला लागल. एकूणच श्रीचदच्या 'अमेरिकन मॅनेजमेट इन्स्टिट्यूट'च्या डिप्लोमावर त्याचा फारसा विश्वास नव्हता. कोणत्याही नावाजलेल्या डिप्लोमापेक्षा आपण धद्यात टक्के-टोणपे खाऊन जे शिकलोय, जो अनुभव गाठीशी बाधलाय त्याला तोड नाही अस त्याना वाटे. श्रीचदला तिकडे पाठवायलाही ते राजी नव्हते; पण त्याच्या आईनं हट्टच धरला तेव्हा त्यांना नाइलाज झाला.

सकाळी श्रीचदच्या आईनच त्याच्या जुहू बीचवरच्या अपार्टमेंटमधनं तो सुखरूप परतल्याचं फोन करून सागितल तेव्हाही खूपचद धुश्शातच होते हा मुलगा काहीतरी नव नवं करण्याच्या नावाखाली दणका खाणार असं त्याना वाटत राहिलं त्यानी श्रीचदला लच टाइमला मला भेट असा निरोप दिला.

श्रीचंद हा त्याचा एकुलता एक मुलगा. लग्नानतर बऱ्याच वर्षांनी झाला. त्यामुळे दोघाच्या वयात बरच अंतर होत आणि दृष्टिकोनातही. कॉलेजात असताना श्रीचदचा ओढा चळवळ्या स्टुडटस् युनिअनकडे आहे अस त्याना कळल आणि ते अस्वस्थ झाले होते. आपला मुलगा कसल्या तरी मूर्ख आदर्शांमागे लागून आपण निर्माण केलेला हा प्रचंड उद्योग साभाळू शकेल की नाही याबाबत ते साशक झाले आणि म्हणूनच अमेरिकेला जाऊन मॅनेजमेंट कोर्स करून हा मुलगा शहाणा होईल, अधिक व्यवहारी होईल की, नुसताच पुस्तकी होईल याविषयी त्याना खात्री वाटत नव्हती अमेरिकेतन परतल्यावर व्यवहारामध्ये श्रीचदन खूप लक्ष घातलं नव्हत; पण परदेशी कपनीशी तत्रज्ञानाच्या बाबतीत कोलॅबोरेट करून नवीन प्रॉडक्ट आणावं ही खूपचंदनी सोडून दिलेली कल्पना उचलून धरली आणि त्याचा पाठपुरावा करीत त्याची शेवटची स्टेज गाठली होती.

परदेशी कपन्या सचोटीन व्यवहार करतात, या पॉप्युलर दतकथेवर त्याचा विश्वास नव्हता. त्या कपनीशी व्यवहार करताना तिथल्या डायरेक्टरना खाजगीरित्या काही कमिशन द्यावं लागतं, रोकड पैसे द्यावे लागतात हा सगळा व्यवहार रोखठोकपणे न करता तरीही पूर्ण हमी देऊन करावा लागतो आणि नेमकं हेच श्रीचदला जमेल की नाही, याविषयी खूपचदना विश्वास वाटत नव्हता. ते अस्वस्थ होते

*श्रीचद येत असल्याचं त्यांच्या खाजगी* सेक्रेटरीनं सागितलं. त्यानंतर मात्र त्याना रहावेना. ते उठून केबिनबाहेर आले आणि त्याचे हात दोन्ही हातात धरून आत घेऊन आले.

खूपचंदच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि डोळ्याखालची वर्तुळ, थकवा काढून टाकला तर श्रीचंदचा भास झाला असता. दोघही देखणे होते. श्रीचदनं फिक्या ब्राउन रगाचा सूट घातला होता. आतला मॅचिंग चॉकलेटी टाय, कोटाच्या बाहीमधनं मधनच डोकावणारे भरून रंगाच्या खड्याचे कफलिंक्स् आणि अगावर ब्रूटचा दाट सुगध.

खूपचदनी श्रीचदच्या नजरेला नजर दिली. श्रीचदच्या डोळ्यात आत्मविश्वास होता. ही इज शुअर ऑफ हिमसेल्फ. खूपचदना वाटलं, उगाच शका घेतल्या.

त्याला समोर बसवून मग ते सगळी हकिकत ऐकायला सज्ज झाले.

डील अगदी सहज पार पडल होत. त्यात फारशी अडचण नव्हती. नफ्याची टक्केवारी दोन्ही पार्टीजना मान्य होती.

'मग तरी तुझा आवाज इतका...आय मीन्..तुला शंका कसल्या होत्या?' खूपचदनी विचारलं

श्रीचद बसल्या बसल्या खुर्चीत मागे रेलला आणि दोन्ही हात आपल्या डोळ्यासमोर धरून बोटाची टोक त्यानी एकमेकाला जोडली आणि थोड्या वेळानं म्हणाला,

'दे आर राइट इन वे, पापाजी!' त्याचं म्हणण स्पष्टच्. आपल्याच कंपनीच्या इतक्या ब्लेडस् बाजारात आहेत. आपण प्लॅटिनम एज म्हणून नवी ब्लेड नुकतीच आणली. या मार्केटमध्ये नवी ब्लेड आणायची तर ती तितक्याच जोरदारपणे आणली पाहिजे. जबरदस्त कॅम्पेन्स करायला हवीत. इथल्या अॅडस् आक्रमक नसतात दे सेल, दे डोण्ट कॅम्पेर! कॉप्या बाळबोध असतात अस त्याचं म्हणण त्यात मर्दानी आक्रमकपणा नसतो. त्यानी आपल्या अॅडस्वर तर फारच टीका केली. जाहिरातीकरता इतका खर्च करायला तयार असलात तरच हे डील वर्क करेल. इफ द कॅम्पेन फेल्स् वी शॅल विड्रॉ.'

'मग तू आपल्या सर्व्हेजच्या फिगर्स सागितल्या नाहीस' खूपचदना आपल्या मुलावर काहीतरी स्कोअर करतोय असं वाटल.

श्रीचंदन उत्तर न देता खिशातनं डनहिलच कोर पाकीट काढन. त्यावरचा पातळ कागद काळजीपूर्वक काढून टाकला एक सिगरेट निवडली आणि सोनेरी लायटरनी ती पेटवली. एक झुरका घेतला आणि तोंड वळवून दूरवर धूर सोडला.

'पापाजी त्या फिगर्स इतक्या रोझी आहेत. कोणाचा विश्वास बसेल त्याच्यावर?

पापा दे आर जायटस्. तुम्हाला इण्डस्ट्रिअल एस्पिओनेज म्हणजे काय माहित्येय ? आपली बित्तंबातमी त्याच्याकडे होती. अँड आय डोण्ट ब्लेम देम. आपलीच काय, आपल्या टॉप मॅनेजमेंटची माहिती ही त्याच्याकडे होती.

आय हॅव अॅग्रीड टू देअर टर्म्स !' श्रीचंद मग न बोलता सिगरेट ओढीत राहिला.

खूपचंद उठून उभे राहिले आणि पुन्हा खिडकीपाशी आले. पडदे बाजूला सारून त्यांनी बाहेर पाहिलं. त्या विसाव्या मजल्यावरनं दूरवरचं दिसत होतं. सगळी मुंबई आपल्या पायाखाली असल्याचा भास होत होता.

दुपारची वेळ असल्यानं माणसं झटकल्यासारखी रस्त्यावर गर्दी करून उभी होती. खाद्यपदार्थांच्या छोट्या हातगाड्यांवर गिऱ्हाइकांची झुंबड होती. नव्या विधानसभेवर झेंडा डौलात हलत होता आणि अरबी समुद्राचं पाणीही निळशार दिसत होतं.

श्रीचंद पावलं न वाजवता त्यांच्या मागे येऊन उभा राहिला.

'पापाजी, मला कळतंय तुम्ही कसला विचार करता आहात ते. सिंधमधून इथे आलात तेव्हा चार फुटक्या कवड्या होत्या तुमच्याकडे. जबर परिश्रम करून हा धंदा उभारलात बघता बघता मेहरा कंपनीनं मोनोपॉली केली या धंद्यात.

पण पापाजी, तो काळ वेगळा होता. यू कुड डिपेंड ऑन माउथ टु माउथ पब्लिसिटी. आताच्या काळाची गरज वेगळी आहे; पण पापाजी आपल्या दोघांची उद्दिष्टं एकच आहेत.'

खूपचंद नेमका हाच विचार करीत होते; पण त्याचं बोलणं ऐकून ते एकदम गर्रकन वळले. त्यांना वाटलं, 'हा आपलाच मुलगा आहे. आपल्याच धडाडीनं बोलतोय. विथ द सेम स्पिरीट !'

'ओके. बबलू, बेस्ट ऑफ लक. आय अॅग्री विथ यू.'

श्रीचंदनं त्यांच्याकडे पाहिलं आणि खूपचंदनी त्याला मिठी मारली. श्रीचंदचे डोळे आता लकाकत होते.

'पापा, मला माहिती होतं, यू वुड अॅग्री. वी शॅल ब्लास्ट द मार्केट विथ द न्यू ब्लेड!'

खूपचंदनं त्याच्या पाठीवर थोपटून टेबलापाशी नेलं.

'यु डिझर्व सम प्रेझेंट !' त्यांनी टेबलामधनं सीसीआयचं श्रीचंदच्या नावाचं नव्यानं काढलेलं मेंबरशिप कार्ड काढलं.

श्रीचंद खूष झाला.

'पण पापाजी, आय वॉंट लंच...रूफ टॉप रॉंदेव्हू' खूपचंदनी थांब अशी खूण करून कंपनीच्या मार्केटिंग मॅनेजर पॉलला इंटरकॉमवरनं बोलावलं.

त्याला कल्पना होतीच. खूपचंदनी ब्रिटिश कंपनीशी झालेल्या करारातला महत्त्वाचा मुद्दा गाळून म्हटलं.

'जबर कॅम्पेन करायला हवी. कोण आहे ?'

पॉल जरा विचारात पडला आणि एकदम म्हणाला,

'अॅडव्हेंचरर्स...

एमडीच्या ऑफिसातनं मेहरा कंपनीच्या पॉलशी बोलून, मिराडाला बाहेर पडताना कोणी पाहिलं असतं, तर त्याच्या चेहऱ्यावरचा बदल लगेचच जाणवला असता. त्याच्या डोळ्यात पुन्हा चमक आली होती.

तो मनातले ताजे विचार घोळवतच आपल्या केबिनमध्ये येऊन बसला.

मेहरा कंपनीसारखी प्रस्थापित कंपनी ओबीएम, लिंटास वगैरेंकडे न जाता आपल्याकडे आली याचा आनंद तर त्याला होताच; पण त्याहीपेक्षा परदेशी कोलॅबोरेशनची ब्लेड बाजारात प्रथमच आणायची. जुन्या ब्लेडशी स्पर्धा करायची. ब्लेड यशस्वी झाली की, इतर शेव्हिंग अॅसेसरीज् मार्केट करायच्या. नवे प्रॉडक्टस्...नव्या कल्पना...लोकांच्या मुळातल्या कल्पना बदलायच्या. शेव्हिंग हॅबिटस् बदलायच्या एका नव्या जेट सेट युगात त्यांना न्यायचं म्हणजे जबर चॅलेंज्... जबर आव्हान...डोक्याला प्रचंड खाद्य.

मिराडानं मोना चौधरीला फोन जोडला आणि मोना फोनवर येईपर्यंत, तिच्याशी काय बोलू नि काय नाही यानी तो बेचैन झाला.

'आज संध्याकाळी तू काहीही करत नाहीएस. मला ताजच्या सी लाऊंजमध्ये भेटत्येस.'

'अरे पण, काय ही तुझी दादागिरी ?'

'नो नॉनसेन्स. नाही...नाही मोना प्लीज मला आज भेट. आजच संध्याकाळी तुझ्या बायोडेटासकट.

'अरे पण माझा बायोडेटा ? कशाला ? आणि बायोडेटाच्या कॉपी इथे नाहीत माझ्याजवळ.' मोना जरा चिडूनच म्हणाली.

'मोना प्लीज, व्हाय डोच्यू अंडरस्टॅन्ड'

'बरं, येते बाबा !'

संध्याकाळी मिस् मोना चौधरी साडेसहाला सी लाऊंजमध्ये जोची वाट पहात होती. दोन सिगरेटी ओढून झाल्या तरी त्याचा पत्ता नव्हता.

मिस मोना चौधरी आणि मिराडाची बिगब्रदर्समध्ये असल्यापासूनची मैत्री. त्याना खूप व्हिज्युअल कल्पना एकदम सुचत. रंगसंगती, ट्रान्स्परन्सीमधले दोषही एकाच वेळी दिसत तरी दोघं रंगाच्या सूक्ष्म शेडवरनं अनेक तास वादही घालत. त्याच्या खोल्या बिगब्रदर्समध्ये असताना जवळच असत. ऑफिसमध्ये ते नेहमीच बरोबर असत; पण त्याच्या वागण्यात कलीग्ज असणं हेच अधिक होतं. मैत्रीचं नात होतही; पण वैयक्तिक गोष्टी ते एकमेकाशी अजून बोललेले नव्हते.

मोना आपल्या व्यक्तिगत आयुष्याविषयी कोणाशी फारसं बोलतही नसे. तिच्या घरी वीकएण्डस्ना कोणी जात येत नसे. पार्टीजना ती जायची नाही असं नाही, पण बऱ्याचदा टाळत असे. मोना कामात तल्लख होती. ती विवाहित की अविवाहित इतकंही फारसं कुणाला ठाऊक नव्हतं.

मिराडा आणि मोनाची दोघानीच एकत्र भेटण्याची ही पहिली वेळ नव्हती; पण बाहेर रेस्टरॉमध्ये मात्र प्रथम.. त्याच्या भेटी फोनवरच अधिक. आणि मैत्री अधिक होत होती ती मिराडान बिगब्रदर्समधलं काम सोडल्यावरच.

मिराडाही स्वभावानं फारसा बोलका नव्हता आणि काम सोडून इतर गोष्टी तो मनमोकळेपणानं बोलतोय असं मोनालाही कधी वाटलं नव्हतं. त्यामुळेच त्याच्या फोनवरच्या दादागिरीनं मोना जरा चिडचिडली. पण मिराडाच्या बोलण्यातलं आर्जव जाणवलं आणि ती तयार झाली आणि मिराडाची

उत्सुकतेनं वाटही पहात होती.

मोनाला प्रसाधनाची फारसी आवड नव्हती. ती बहुधा जीन्स, ट्राउजर्स आणि वर सैलसर कुर्ता किंवा शर्टासारखं काही तरी घाली. हाताल–कानात काहीच नसे. ओठावरनं फारतर पातळसर लिपस्टिक. तिच्या चेहऱ्याचं ठळक वैशिष्ट्य म्हणजे तिचे दाट काळे केस. जे तिनं खांद्यापर्यंत कापले होते. ते कधी मोकळे, कधी पोनीटेल तर कधी नुसतेच रुमालाची गाठ मारून ठेवीत असे; पण आपल्या केसांचं हे दाटपण, काळेभोरपण मिराडाला कितपत जाणवलय, अपील झालय ते तिला अजून स्पष्ट कळलेलं नव्हतं.

तेवढ्यात मिराडा आला. त्यानी शोधक नजरेनं इकडेतिकडे पाह्यलं आणि सीलाऊजच्या डाव्या कोपऱ्यातल्या उंचच उंच खिडकीपाशी असलेल्या टेबलापाशी मोना गटवे ऑफ इंडियाकडे टक लावून पहात असलेली दिसली.

मिराडा तिच्या समोरच्या खुर्चीत नीट बसला

'काँग्रॅट्स्' मोना म्हणाली आणि त्याच वेळी मिराडा म्हणाला,

'सॉरी फॉर विईंग लेट. ट्रॅफिक जॅम !'

दोघही एकदम बोलून एकमेकाकडे पाहून हसली.

मोना म्हणाली, 'कॅगबद्दल नाही रे, तुझ्या नव्या कॉंट्रॅक्टबद्दल !'

मिरांडाचा चेहरा उजळला आणि तो मनमोकळेपणे बसला. मागे उभ्या राह्यलेल्या स्टच्युअर्डला त्यानी

'दोन लडन डाएट' असं सागितलं.

बीअरचे फेसाळलेले मग रिकामे होताना मिराडानं अॅडकॅम्पेनबद्दलची मेहरा कंपनीची अपेक्षा सागितली. मोना लक्षपूर्वक ऐकत होती. एकूण चागल बस्तान बसलय आणि हा आता बहुतेक नीटसा सेटल होणार.

पण उघडपणे म्हणाली,

'छान, पण माझा बायोडेटा कशाला ?'

'डोण्ट बी नटस् मोना, आय नीड यू, आय नीड युअर हेल्प.'

मोनाला ऐकून बर वाटलं पण ते दिसू न देता ती म्हणाली,

'हे बघ, तू कॅगचं अॅवॉर्ड मिळवलंस ते माझ्याशिवायच ना. अॅंड टु हेल विथ कॅग. ती कॅम्पेन ग्रेट होती. द विज्युअलस स्टुपेंडस मग आता मी कशाला हवी तुला ?'

'मोना, तुला कळत कस नाहीए. त्या अॅडस्चा प्रकार वेगळा होता. तिथं फिलमस्वर, इथं तसं चालणार नाहीए. इथे प्रेसअॅडस् सगळ्यात महत्त्वाच्या आहेत. विशेषतः ब्लेडची अॅड मस्ट बी द फर्स्ट थिंग दॅट पीपल शुड सी इन द मॉर्निंग. मला जबर कॅम्पेन करायचीय, पण त्यांचा कॉर्नर स्टोन असेल प्रेसअॅडस्. टाइम्स, एक्सप्रेस, डेली अॅंड फॉर दॅट आय नीड यू. तुझा लेआऊटचा सेन्स सुपर्ब आहे. मला...मला तुझी टेरिबल गरज वाटत्येय. प्लीज मोना.'

मोनाला त्याचा मुद्दा तो बोलत असताना उमगत होता; पण शेवटी तो काय म्हणतोय, म्हणजे माझ्या टॅलंटकरता मी हवीय त्याला! नॉट अदर वाईज

मोना विचारात पडली. आणि आपल्या हातातल्या पुरषी घड्याळाच्या पट्ट्याशी उगीचच चाळवाचाळव करीत राह्यली.

मग तिनं केसांच्या बटा सैल केल्या, दोन्ही हात कानामागे घेऊन केस एका हातात घट्ट आवळून रुमालाची गाठ मारली आणि मानेला झटका देऊन तयार झालेलं पोनीटेल थोडंसं उडवलं.

मोनाचा चेहरा आता लहानसर दिसत होता आणि तिच्या कॉफी रंगाच्या चेहऱ्यावरचे डोळे अधिकच मोठे वाटायला लागले.

मोनानं हलकेच जोकडे पाह्यलं. तो तिची प्रत्येक हालचाल निरखून पहात होता आणि आपल्या चेहऱ्यात झालेल्या या फरकाची जाणीव त्याला झालीय हे तिला कळलं. तिनं आता सरळ नजरेला नजर दिली आणि तिला एकदम हसू आलं.

मिरांडाला एकदम सेल्फ कॉन्शस वाटलं. मोनानं त्याच्याकडे हसून बघत म्हटलं,

'मिशाना लागलेला फेस पुस आता.' मिरांडा अधिकच सेल्फ कॉन्शस झाला आणि गोंधळून गेला. त्याला काय करावं कळेना.

मोनाला अधिकच हसू आल पण ते आवरत तिनं टेबलावर पडलेला पेपर नॅपकीन त्याला दिला.

तो थॅंक्स पुटपुटला आणि बराचवेळ आपली मिशी पुसत राह्यला.

मिरांडा दुसऱ्या दिवशी ऑफिसात आला तो बायोडेटा घेऊनच. तशी मोनाच्या बायोडेटाची गरज नव्हती. पण फायलीला असावा. मोनाला त्यानं इक्वल ग्रेड, पर्क्स सगळं तसंच ऑफर केलं आणि पगारात काही शे वाढच झाली होती.

मोनानं मोकळेपणानं अधिक पगार हवा असल्याचं मग सांगितलं; पण अधिक पगार आपण कधीही ऑफर करू शकत होतो. मोना आताच यायचं कसं कबूल झाली. वॉज इट माय रिक्वेस्ट. तिला लावलेला मस्का.

मिराडाला अर्थ उमगेना. त्यानं परत परत विचार केला, मोनान होकार भरल्यापासनंच त्याला तिला हा प्रश्न विचारायचा होता. पण मोनाच म्हणाली, 'मी इथे का येतेय हे प्लीज विचारू नकोस !'

याचा काय अर्थ ? मिराडा त्यामुळे अधिकच गोंधळला.

मेहरा कपनीकडनं फॉर्मल लेटर आणि अॅडव्हान्स यायला जरा उशीर लागला. कॅम्पेनचं वेळापत्रक अजून निश्चित झालं नव्हतं. त्यांना सगळ्याच गोष्टी मोठ्या प्रमाणावर करायच्या होत्या. अर्थात प्रेसअॅडस्नी सुरुवात करायची याबाबतीत दुमत नव्हतं.

पण पधरा दिवसातच सरकारी यंत्रणा नीट राबवून ब्रिटिश कपनीबरोबर करार झाल्याचं समजलं. लगोलग कपनीनं बंगलोरला फॅक्टरीचं काम सुरू केल्याची बातमीही आली. ब्रिटिश टेक्निशिअन्सची तुकडी येणार होती. काम सात–आठ महिन्यात पूर्ण करून प्रॉडक्शन शक्य तितक्या लवकरच सुरू करायच असं ठरल.

मेहरा कंपनीनं कोलॅबोरेशनचा कोणालाच पत्ता लागू न देण्याची शक्य तितकी खबरदारी घेतली, तरी कुजबूज सुरू झाली होती. पण त्याचं ठरल की, उद्घाटनाची जाहिरात येईल त्यावेळीच कोलॅबोरेशन केल्याचं जाहीर करायचं.

मिरांडा बसल्या बसल्या प्लॅनिंग करीत होता. पहिला विचार प्रेसअॅडस्चा. आणि आता काय ? मोना येतेय !

त्याच संध्याकाळी बॉम्बे अॅडव्हर्टायझिंग क्लबची द्वैमासिक मीटिंग होती आणि त्यानंतर बुफे डिनर. ओबेरॉय टॉवर्सची सनसेट रूम.

अशा पार्टीजना मिरांडाच्या गाडीत सगळ्यांना एस्कॉर्ट मिळे. आणि ब्रह्मचारी मिरांडा त्यांना त्यांच्या दूरच्या उपनगरातल्या घरी आनंदानी सोडी आणि कितीही प्याला असला तरी शुद्धीत गाडी चालवे.

रात्री नऊ साडेनऊला डिनरला सुरुवात झाली. कॉकटेलची पहिली राऊंड उरकेस्तवर मंडळी जरा अबोलच. पाचपन्नासच्या क्राऊडमध्ये नेहमीचे छोटे छोटे ग्रुप्स तयार झाले.

मोनानं बिग ब्रदर्समधन ॲडव्हेंचरर्समध्ये आली, त्यानतर प्रथमच जो बिग ब्रदर्समधल्या मंडळीना भेटणार होता मिरांडाला कॅंग मिळाल्यानंतरही बिग ब्रदर्सना भेटायचा पहिला प्रसंग होता.

मोना सगळ्यांशी हसून खेळून पण मोजकं बोलत होती. जो आपल्या दोनतीन मित्राबरोबर व्हिस्कीच्या ग्लासशी चाळा करीत होता आणि बोलता बोलताच सगळ्या ग्रुप्सपासनं अलग पडत होता.

मोनानं मिरांडाला पार्टीमध्ये शोधलं तेव्हा तिला तो दिसेना आणि खूपच शोधल्यावर तिला त्याची टेरेसवरची पाठमोरी आकृती दिसली.

ओबेरॉय टॉवर्सवरन खालची पिवळी धम्मक सोडियम दिव्याची लाबच लांब रांग दिसत होती आणि त्या दिव्याचा प्रकाश समुद्राच्या पाण्यावर पडून तेही अंधारात चमकत होते.

मोना मिरांडाच्या मागे येऊन उभी राहिली.

मिरांडाला मोना आल्याचं कळलं पण तो गप्पच होता.

त्यानं खाली पाहिलं.

एक टॅक्सी थाबली. त्यातनं पांढऱ्या रंगाचा पायघोळ झगेवाला अरब उतरला आणि सिमेंटच्या बाकावर बसला एखाद मिनिटात तिथे एक बाई येऊन बसली. त्या बाईच्या अगावरचे चमकदार दागिने दूरवरूनही खोटे असल्याचे जाणवत होत. मग ती दोघेही टॅक्सीत बसली आणि निघून गेली.

'जो', मोना म्हणाली.

'या माणसांपासनं सावध रहा!'

'आं, काही म्हणालीस?' मिरांडा तिच्याकडे पहात म्हणाला.

'मी म्हटलं या बिग ब्रदर्सपासन सावध रहा तुझ्याविषयी विलक्षण मत्सरान बोलतात ती माणस! आणि सॅमी त्यांना फूस लावतो. पण मी मागते तुला, दे आर रुथलेस पीपल!'

मिरांडानं व्हिस्कीचा एक घोट घेतला आणि ग्लास उचावून व्हिस्की किती शिल्लक आहे ते पाहिलं. मग मोनाकडे वळून म्हणाला,

'बॉटम्स अप्!'

त्याच्या बोलण्यातली थट्टा मिरांडाच्या लक्षात आली

'डोण्ट जोक, तुला कळत कसं नाहीए जो. की कळतंय नी दाखवत नाहीएस. त्यांना मत्सर वाटतोय तुझा. तू इतका यशस्वी आहेस. तू कचऱ्याची ॲड केलीस तरी इट विल सेल लाइक हॉट केक! त्याना तुला कुठे तरी ह्याणून पाडायचंय?

जोचे चेहऱ्यावरचे स्नायू ताठरले. पण ते अपुऱ्या प्रकाशामुळे मोनाला दिसले नाहीत.

रात्री दीड वाजता मिरांडान आपली गाडी भरधाव सोडली. मोनाला ताडदेवला ड्रॉप करून तो पाल्र्यापर्यंत जाऊन वरळी सी फेसला आपल्या फ्लॅटवर परतला तेव्हा सव्वादोन वाजले होते. त्यानं फ्रीज उघडून आणखी एक पेग बनवला. बाल्कनीत उभ राहून समुद्रावरच्या काळोखाकडे पहात गटकन् पिऊन टाकला. मग आत पलगावर येऊन बसला आणि मग इतक्या वेळ दाबून ठेवलेला त्याचा राग पुन्हा उसळून वर आला.

'ब्लडी स्वाइन्स, फकिंग स्वाइन्स!' पण मग त्याला क्षणभर भीती वाटली. बिग ब्रदर्समधली माणस ॲडच्या जगात अधिक स्थिरावलेली, बरेच वरपर्यंत हात पोचलेली होती. त्यामानान आपण कुणीच नाही...

मिरांडाच्या वरळी सीफेसच्या फ्लॅटपासनं फार दूर नसलेल्या ताडदेवच्या जुन्या वस्तीतल्या आपल्या घरी पोचल्यावर मोना अधिकच अस्वस्थ होती. डायव्होर्सचे कागद घरी येऊन आठवडा झाला होता ते सही करून पाठवायचे म्हणजे आयुष्यातला एका प्रकरणावर कायमचं शिक्का मोर्तब होणार होतं.

खरं म्हणजे असे सबध सपण्यात आणि संपवण्यात तिलाच अधिक इंटरेस्ट होता आणि तिच्या दृष्टीनं ती अचीव्हमेंट होती. तिच्या लग्नाच्या कोणत्याच स्मृती गोड नव्हत्या. होत्या त्या कडू आणि नकोशाच होत्या

अजूनही सासरच्या घरातल्या प्रसंगाची आठवण झाली तरी तिच्या अगावर शहारे येत.

मोनाचं घर-माहेर—खानदेशातलं एक गाव. वयाच्या अठराव्या वर्षीच तिच्यावर लग्न लादलेलं. मोनाची इच्छा पुढे शिकण्याची. तिला वाटलं लग्नानंतर शिकायला कदाचित मिळेलही, कोण जाणे? पण सासरचं वातावरण अगदीच वेगळ. भल मोठं कुटुब. सासरी जरा रुळते अस वाटतय तोच जाणवल हे की सतत टोमणे मारून, देण्याघेण्यावरन उणदुण काढून बोलताएत. मोनान निमूट सहन केल. काम खूप पडतंय, ठीक आहे. तिला वाटल, नवरा तरी सुशिक्षित आहे, सुसस्कृत असेल. तिन धीर करून नवऱ्याला सागितल 'मला शिकू द्याल?' आणि त्यानतर जे घडायला लागल ते मोनाच्या अपेक्षेपलिकडच होत.

तिच्या नवऱ्यान तिला उडवून तर लावलच पण आईबहिणीना तिच्यावर नजर ठेवायला सागितली. मोनान कसबस म्हटल की, थोडी पुस्तक तरी वाचते. मधन मधन चित्र काढाविशी वाटतात! भास्करन त्याच उत्तर म्हणून मारहाण करायला सुरुवात केली.

दिवसभर कामाचा रगाडा. रात्री नवऱ्याची बळजबरी आणि मारहाण. विचार करायला उसतच नाही. लग्न होऊन वर्ष झाल. मोनाला दिवस गेले नाहीत म्हणून मारहाणीला आणखीनच धार आली. येता—जाता वाझोटी म्हणून शिव्या प्रत्येक श्वासाबरोबर तिला जाणीव व्हायची ती आपल्या पोतेऱ्यासारख्या आयुष्याची.

मोनान निर्धार केला, इथं राह्यच नाही. इथनं पळून जायला हवं. मोना माहेरी परत. आईच्या कुशीत ढसढसा रडली. चार दिवस भुर्रदिशी गेले. दोन घास सुखाचे गेले. मोनाला वाटल 'सुटलो!' पण त्यानंतर लगेचच वडलानी गोष्ट काढली. सासरी कधी पोचवू?

मोनाच्या छातीत धस्स झालं. पुन्हा त्या ...नरकात? जोवघेण्या मानहानीच्या संसारात? मोनाला तेव्हाच जाणवलं की आपल्या हाताना नवं वळण येताय. हातात पेन्सिल धरली की भराभरा आकार उमटतात. चार रंग पाहिले की ते हवेहवेसे वाटतात. हा काही तरी नवा सूर उमगतोय. हा संसार,

सासर काय न माहेर काय, त्याचा या मनातल्या उमलत्या धगीशी काय संबंध ? मनात खूप अंधुक कल्पना होत्या; पण निर्णय पक्का होता. आता सासरी पण नको अन् माहेरी पण नको. घरी भांडूनतंडून मुंबई गाठली. पण घरच्यानी आर्थिक तरी तोडलं नाही.

मोनानं मुंबईला स्कूल ऑफ आर्टमध्ये नाव घातलं. कमर्शिअल आर्ट डिप्लोमा. आणि तिचा सूर लागला. होस्टेलवरचे हालातले दिवस आणि संदिग्ध मनाची तळमळ. त्यातनंच तिनं वाट काढली आणि नेटानं डिप्लोमा मिळवला. नवे संबंध जोडले. नव्या ओळखी केल्या. डिझाइन्स केली. कष्टानी लहान-मोठी कामं मिळवली आणि मग त्याच्या जोरावर बिग ब्रदर्समध्ये नोकरी

वर्किंग विमेन्स होस्टेलमधली छोटी खोली सोडून, मग ताडदेवला एका जुन्या घरात दोन खोल्या भाड्यानं मिळवल्या.

बिग ब्रदर्समधली मोठ्या पगाराची नोकरी. झकपक वातावरण. मोना हळूहळू बदलत होती. राहणीमानात फरक जाणवत होता. मोकळं स्वतंत्र वाटायला लागलं. हलकं वाटायला लागलं. कुठेतरी पाय रोवून आपण उभे आहोत आणि आता गवसलेली शांत लय ही आपल्या कष्टानं उभारलीय. खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यानं मिळवलीय असं वाटलं. आता पुन्हा कोणामध्ये गुंतायचं ?

पण मोनानं आपल्या मनाचे हे बंध कितीही आक्रसले तरी तिला जाणवलं की, जो मिरांडामध्ये काही तरी...गुतून जातोय, की तोही या वातावरणात असतात तशांपैकी एकजण. यांची नाती वरवरची याचे संबंध दिखाऊ गरजेपुरते......हे झगझगीत जग दुरूनच पाहिलेलं बरं. त्याच्यात अडकायचं ? कोणावर विश्वास टाकायचा ? इथं कोणी कोणाला खरंखुरं जाणून घेऊ शकतं का ? आपण त्याच्याबरोबर पार्टीजना जातो, तसे कपडे घालतो पण त्याची कृत्रिम, दिखाऊपणाची मूल्यं आपली नाहीत . या जाणिवा खूप अंधुक आहेत...पण खऱ्या आहेत... आपण स्वतंत्र झालो पण......एकटे होत चाललो आहोत......कोणाशी जवळिकीनं वागायचं ?

जो शी खरंच संवाद साधता येईल का ? नव्या ॲडस्, नवी कॉन्ट्रॅक्टस्, खूप पैसा या पलिकडे काही तरी ह्यूमन एलिमेंट त्याच्यात असेल ना ? असावं ! वाटतंय खरं ! !

आता हे डायव्होर्सचे कागद आलेत. म्हणजे ते प्रकरण कायमचं मिटलय. ते आयुष्य...ते संबंध कायद्यानं तुटणार !

मोनानं शांतपणे कागदपत्रं चाळली आणि त्यावर सह्या केल्या आणि दिवा विझवला !

गोल्डन ड्रॅगन रेस्टॉरंटमध्ये मेहरा कपनीच्या श्रीचंद मेहराबरोबर ओव्हर डिनर भेटून पुढची बोलणी करायला मिरांडा स्वतः खूष नव्हता. असली फॉर्मल बोलणी करण्याचं एमडीवर सोपवून तो आपली कामं करीत असे; पण एमडीनं फारच आग्रह केला म्हणून तो तयार झाला

पण असली बोलणी करण्याच्या कामात मिरांडाला रस वाटत नसे इतकच एक कारण नव्हतं. मिरांडाला आपल्या एजन्सीला हायर करणारी कंपनीची माणसं आपल्याकडे पाहताना पदरी असलेल्या कुशल कामगाराकडे कौतुकमिश्रित पेट्रनाइज करत पाहतात तसच पाहतात असं मनापासनं वाटे. ही माणसं ॲडव्हर्टायझिंग ही स्वतंत्र इंडस्ट्री आहे असं पहातच नाहीत. बरोबरीच्या भावनेनं वागवत नाहीत. असं वरिष्ठ दर्जाचं असल्यासारखं पेट्रनाइज करून पाहिलेलं त्याला मुळीच आवडत नसे. त्यामुळे त्याला श्रीचंदला भेटण्याची इच्छा नव्हती.

पण श्रीचंदच्या चतुरस्त्र, डायनॅमिक, मॉडर्न विचारानी तो प्रभावित झाला. त्याच्या कामाची पद्धत आवडली. 'हा डॉमिनेट करणार नाही. ही रिस्पेक्टस् माय आर्ट ॲंड क्राफ्ट !' मिरांडानं मनाशी म्हटलं. याच्या बोलण्यात ऑलमोस्ट मैत्री आहे. पण मग डेसर्ट सर्व्ह करताना खूपचंद मेहरा आले आणि मिरांडा अस्वस्थ झाला.

'येस द सेम लुक... द सेम काइण्ड ऑफ टॉलरन्स !'

मग त्याचं बोलण्यावरनं लक्षच उडालं. एकच वाक्य सारखं मनात घोळत राहिलं.

'इट मस्ट बी व्हेरी अपीलिंग !'

मिरांडा विचार करीत होता.

अपीलिंग व्हॉट ? कशाला आव्हान ? या जाहिरातीनं कशाला आव्हान करायला हवं? कोणत्या भावनेला ?

मिरांडान यांत्रिक पद्धतीनं त्या छोट्याशा कपातली कॉफी संपवली.

...आणि न ठरवताही बाहेर पडल्यावर सगळेजण गाडीत न बसता रस्ता क्रॉस करून पलिकडे आले.

ताजमहालच्या मागच्या बाजूचा काळोखलेला रस्ता. मोकळा फूटपाथ...... झिपऱ्या केसांच्या हिप्पींचा उघड्यावरच चाललेला प्रणय... एखाद दुसरी वेश्या... आणि पलिकडे शांत गंभीर समुद्र.

आत दूरवर एक दीपस्तंभ आपले पखासारखे प्रकाशझोत झपकावीत उभं होतं.

खूपचंद त्या दिव्याकडे बोट दाखवून मिरांडाला म्हणाले,

'त्या दिव्यासारख आपण काही तरी करून दाखवलं पाहिजे, समथिंग ग्रेट, आय कॅचिंग !'

त्याना वाटलं आपण फारच ओरिजिनल बोलतोय.

मिरांडाला वाटलं, काय मिडिऑकर बोलतो हा माणूस. त्यानं खूपचंदना काहीच रिस्पॉन्स दिला नाही·

श्रीचंद म्हणाला,

'चलो, जाऊ या आता !'

एमडीनं मिरांडाला हातानी टोकलं.

मिरांडा वैतागलेला. त्यानं त्यांना तिथच गुडबाय केलं.

मेहरा कंपनी सणकलीच; पण एमडीनं त्यांना सांभाळून घेतलं, नीट हॅण्डल केलं आणि ते तिघे निघून गेले.

मिरांडा उजवा पाय समोरच्या कट्ट्यावर ठेवून ओठंगून उभा राहिला. येणाऱ्या जाणाऱ्या लाटांचं निरीक्षण करीत समुद्रावरनं येणारा वारा अंगावर झेलत.

कशाला आव्हान केलं पाहिजे ? अपीलिंग व्हॉट ?

'लेटस ट्राय द ओल्ड ट्रिक !' तो तिथन निघून ताजला वळसा घालून मेरीवेदर रोडला लागला आणि त्या रस्त्यावरच्या दुसऱ्या पानवाल्याच्या गादीपाशी येऊन उभा राहिला.

तिथं चारपाच माणसं उभी. सगळी शांत. कोणीही एकही शब्द बोलत नव्हता.

मिरांडानं खिशातनं पन्नासाची नोट गादीवाल्याकडे सरकवली. त्याच्या बदल्यात एक लांबुळकी सिगरेट त्याला मिळाली.

ती घेऊन त्यानं टॅक्सी पकडली. टॅक्सीत

शिरल्यावर घरचा पत्ता नीट सांगितल्यावर मगच ती सिगरेट पेटवली... एक जबर दम मारला आणि चरसच्या चंदेरी... रंगीबेरंगी दुनियेत तो गुंग झाला.

अपीलिंग व्हॉट ?

सांताक्रूज विमानतळावर उतरून [लग-बगीनं टॅक्सी पकडणाऱ्या अनेक प्रवाशांपैकी हिंदुस्थान इन्स्ट्रूमेंटस् – एच आयचे जनरल मॅनेजर व्यंकटरमण हे एक होते. त्यांना विशेष घाई होती कारण टॅक्सीनं दादरला जाऊन तिथून मग टॅक्सीनंच पुढे नासिकला हेड क्वार्टर्सला जायचं होतं. अर्थात अशी ही घाई असणारे असतीलच; पण व्यंकटरमणना मात्र नासिकला वेळेवर पोचणं आवश्यक होतं. कारण त्यांची एकुलती एक मुलगी जानकी हिचं लग्न आता एकच दिवसावर आलं होतं.

आणि असं असलं तरी व्यंकटरमण मनातल्या मनात जानकीविषयी विचार न करता दिल्लीला घडलेल्या त्या घटनांमध्येच अधिक गुंग होते...

दिल्लीच्या इंडस्ट्री मिनिस्ट्रीच्या भव्य इमारतीच्या सगळ्यात वरच्या मजल्यावरच्या केंद्रीय मंत्र्यांच्या केबिनबाहेर व्यंकटरमण वाट बघत बसले होते, ते फक्त सात–आठ तासांपूर्वीच.


आपली ब्रिफकेस त्यांनी सोफा चेअरजवळ ठेवली आणि टी पॉयवरचे अंक ते चाळत होते. समोर बरीच मंडळी बसली होती. सेक्रेटरी मंडळींची वर्दळ होती.

व्यंकटरमणनी खाजगी चिटणिसांकडे पाहून म्हटलं,

'मे आय यूज द फोन ?' त्यावर त्यानं हसून त्यांना कोणता नंबर हवा सर, असं अदबीनं विचारून, इंडिअन एअर लाईन्स म्हणताच चटकन् नंबर फिरवून फोन लावून दिला.

दिल्ली-मुंबई परतीचं बुकिंग कन्फर्म्ड होतं. इतक्यात केबिनच्या दारापाशी मंत्री श्री. पाठक स्वतःच आले आणि त्यांनी व्यंकटरमणना हाक मारून आत घेऊन गेले.

व्यंकटरमण एकूण सौजन्यानं दबूनच गेले. पण अरेरावी करून कामं करून घेण्याची पद्धत सोडून गोडीगुलाबीनं काम करून घ्यायची पॉलिसी दिसतेय, व्यंकटरमण मनातल्या मनात म्हणाले.




उद्योगमंत्री श्री. पाठक मंत्रीपद घेऊन काही आठवडेच झाले होते आणि व्यंकटरमणनी जवळजवळ आठ-दहा महिन्यांपूर्वी पाठवलेल्या एका रिपोर्टच्या आधारे मंत्र्यांनी त्यांना बोलावून घेतलं होतं.

व्यंकटरमणना जरा आश्चर्य वाटलं. कारण दहा महिन्यांपूर्वी पाठवलेला रिपोर्ट सरकारी दप्तरात धूळ खात पडणार याची त्यांना खात्री होती; पण रिपोर्ट करताना मात्र व्यंकटरमणना तो फार प्रॉमिसिंग वाटला होता.

सरकारी अधिपत्याखाली असलेल्या या कॉर्पोरेशनमध्ये ते सर्वोच्चपदावर येऊन चार-पाच वर्षं उलटली होती आणि त्यांनी कॉर्पोरेशनचा चेहरामोहरा प्रयत्नपूर्वक बदलला होता. हिंदुस्थान इन्स्ट्रूमेण्टस् आता नफ्यात चालणारं कॉर्पोरेशन होतं. आता अवजड यामध्ये एचआयचं नाव सर्वतोमुखी झालं होतं; पण व्यंकटरमणना वाटायचं की, एचआय शुड बी अ हाउस होल्ड नेम. त्याकरता एचायन सर्वसामान्य माणसाला लागणाऱ्या वस्तू बनवल्या पाहिजेत. उत्कृष्ट स्टॅंडर्ड आणि जबर खपू शकणाऱ्या.

व्यंकटरमणना कॉर्पोरेशन एक्स्पॅंड करायची होती. ब्रँचआउट करायची होती. त्यांनी मार्केट सर्व्हे घेतला. बाजारातली मेहरा कंपनीची ब्लेडस्‌मधली मोनोपॉली त्यांनी जोखली. नव्या अत्याधुनिक तंत्रानं ब्लेडस् तयार करून मेहरा कंपनीला टक्कर द्यायची. भरघोस नफा. भरघोस उत्पादन.

त्यांनी आपल्या शिस्तशीर पद्धतीनं कॉर्पोरेशनकरता रिपोर्ट तयार केला आणि पाठवून दिला. सरकारी खात्यात त्याच्यावर विचार व्हायला लागून व्यंकटरमण रिटायरही झाले असते. आपल्या कारकिर्दीत हे घडणार नाही आणि वर्षभरात तर ते शक्यच नाही, अशी त्यांची खात्रीच.

व्यंकटरमणनं आशा सोडली आणि मुलीचं लग्न जुळवायला सुरुवात केली. वरसंशोधन कठीण गेलं नाही. जावई उत्तम मिळाला. जानकीच्या नवऱ्याला भालचंद्रन्‌ला झाम्बिअन सरकारकडनं नुकतंच बोलावणं आलं होतं. लग्नाची तारीख ठरली. विधुर असलेल्या व्यंकटरमणनी कसोशीनं खरेदी केली. लग्न आता उद्या परवावर आलं आणि दिल्लीहून टेलेक्स 'अर्जंट भेटा.'

तरीही व्यंकटरमणनं डेप्युटी मॅनेजरला पाठवलं असत; पण बोलणं प्रॉजेक्टसबंधी आहे, असं कळल्यावर ते निघाले.

...मंत्र्याना इंटरेस्ट होता. एखाद्या विदेशी कंपनीबरोबर बोलणी करावी आणि परदेशी तंत्रज्ञान वापरून अत्याधुनिक प्रतीची ब्लेड तयार करावी. हे म्हणणं तर त्याना फारच अपील झालं. सहकार्याकरता जिलेटो ही इटालिअन कंपनी निवडावी ही सूचना-ही त्याना पटली. सरकारी पातळीवर गोष्टी झरझर उरकण्याची हमी त्यानी दिली.

व्यंकटरमणनी घाईघाईनं, मुलीचं लग्न उरकून इटलीला रवाना व्हावं. तिथं बोलणी करून महिन्याभरात प्राथमिक काम उरकावी. पुढल्या महिन्यात जागेची निवड... कामाला शक्य तितक्या लवकर सुरुवात करावी.

कामाचा उरक पाहून व्यंकटरमण सर्द...

त्या अवस्थेतच त्यांनी कॅनॉट प्लेसमध्ये खरेदी उरकली आणि ते वेळेवर एअरपोर्टला पोचले. विमान सुटलं.

पण एकदा पट्टे आवळल्यावर शेजारी बसलेल्या व्यक्तीला पाहून ते चमकलेच. तो मंत्र्याचा सेक्रेटरी होता. व्यंकटरमण काही म्हणणार तोच तो त्याना म्हणाला,

'पुढची बोलणी करायला आलोय. ही अगदी खाजगी स्वरूपाची हं' असं म्हणून तो चिकट हसला.

व्यंकटरमणना त्याचा कुजबुजता स्वर ऐकून अस्वस्थ वाटलं. हृदयाचा ठोका एकदम चुकला. हा काय नवा ससेमिरा!

'इथं सेफ आहे. कोणाला कळणार नाही ना!' तो थोड्या वेळानं म्हणाला.

एअर होस्टेसनं सूप सर्व्ह केलं.

'मी त्यांच्याच वतीनं बोलतोय. साहेब अगदी खूष आहेत तुमच्यावर. तुमच्या चातुर्याचं कौतुक करत होते अगदी. ही वॉटस् यू!'

पुन्हा तेच चिकट स्मित.

व्यंकटरमणच्या हातात सुपाचा चमचा तसाच राह्यला. अस्वस्थतेची जागा अनामिक भीतीनं घेतली. कसली नेमकी भीती वाटत्येय कळेना!

'तुम्हीच नाही. ही वॉटस् मि. भालचंद्रन ऑल्सो.'

व्यंकटरमणनी त्याच्याकडे आता सरळ संशयानं पाह्यलं.

'तुम्ही कशाच्या संदर्भात बोलताय?' त्यानी स्वरात शक्य तितकी कमी थरथर आणीत विचारलं.

'ओह् इटस् सिम्पल!' त्यानं पुलावाचा एक मोठा घास तोंडात कोंबला आणि उजव्या हातानं ओठाना लागलेलं तूप पुसलं.

'तुम्ही एचायचा नवा एक्सपॅन्शन प्रोजेक्ट दिला ना!' तो म्हणाला.

'नॉट एक्सपॅन्शन... अन्यू ब्रँच ऑल टुगेदर.'

'तेच ते!'

'ते पाठकसाहेबाना फार पसंद पडलंय. पाठकसाहेब म्हणजे ज्युनिअर पाठकसाहेब. म्हणजे माझे चुलत मेव्हणे. त्याना हे सारं पसंद पडलं.'

आता व्यंकटरमण कान टवकारून ऐकत होते. 'ज्युनिअर पाठकसायबाना काहीतरी नव प्रॉमिसिंग हवंय. त्याना जबर सुरुवात करायचीय. मोठ्या सायबानी हा रिपोर्ट त्याना वाचायला दिला ही वॉज हॅपी. ही वॉंटस् यू टू पर्सू. तुम्ही सगळं वर्कआउट करा. संपूर्ण जबाबदारी घ्या नाहीतरी आजपासून सात आठ महिन्यानं तुम्ही रिटायर होणार. म्हणजे तुम्ही अजून दोन-तीन महिने काम कराल मग तुमची रजा बरीच शिल्लक आहे ती घेणार. अँण्ड वी गेस, तुम्हाला तुमची मुलगी इथे असलेली आवडेल. सो वी शॅल ऑफर मि. भालचंद्रन अ प्रॉमिसिंग करिअर.

आमची खात्री आहे, तुम्ही एचायमधनं आता रिझाइन करा. तुमचे सगळे बेनिफिटस् गॅरंटीड आहेत. वर्क ऑन दिस प्रॉजेक्ट अॅज ए सेपरेट प्रोजेक्ट. यु आर एमडी देअर. आमच्या पाठक साहेबाना सगळी माहिती असते हं'

त्यानी नॅपकीननं चेहरा पुसला आणि मग मान खसाखसा पुसली. त्याच नॅपकीनमध्ये नाक शिंकरलं.

'पाठकसाहेबाना सगळी माहिती असते. तुम्ही पूर्वी रिचर्डसनमध्ये होतात मला वाटतं सत्तरएकाहत्तमध्ये. तिथनं बाहेर पडलात. लेबर प्रॉब्लेम बराच झाला. मॅनेजमेंट कोसळली. पैशाचा गैरव्यवहार झाला. तुम्ही सुटलात पण...आम्हाला खरं काय ते माहित्येय.'

त्यानं व्यंकटरमणकडं पहात चिकट स्मित केलं.

व्यंकटरमणना संतापाची तिडीक 'इट. अमाऊण्टस् टु ब्लॅक मेल...!'

पण ते शांत राह्यले. तो म्हणतोय त्यात तथ्य आहे.

मुंबई येत असल्याची सूचना मिळाली आणि दोघानी पट्टे आवळले.

पण गोष्टी चटकन जमायला हव्यात. तुम्ही इटलीला जाऊन आल्यावर प्रकृतीचं कारण सांगून रजा घ्या. तुम्हाला नासिकची लोकल माहितीही आहे लॅंड परचेसिंग करा-


*With Best Compliments From :*

SHREEPAD INDUSTRIES

*Mfrs. Of :*

Kumaun Brand Magnetic &
Engineering Tools.

Parvati Indus'rial Estate,
Pune 411 009 (India)

※

*Phone No. ( O 212 ) 441765*

यचंय आणि पैशाची काळजी नाही. सी टु इट दॅट द प्रोजेक्ट टेक्स ऑफ.'

दोघंही बोलत बोलत टॅक्सी स्टॅंडपाशी आले.

व्यंकटरमण टॅक्सीत बसल्यावर तो आत वाकून म्हणाला,

'लग्नाच्या शुभेच्छा साहेब पाठवतीलच. बरं तुम्हाला काय प्रेझेंट आवडेल? कॅश ऑर काइण्ड?

'काइण्ड' व्यंकटरमण म्हणाले आणि टॅक्सी सुटली.

सुरुवातीला गैर वाटणारी गोष्ट लगेचच कशी ल्युक्रेटिव्ह वाटायला लागली आणि आपण काइण्ड तरी किती पटकन म्हटलं.

व्वा! म्हणजे रिटायर व्हायच्या आत नवा जॉब हजर.आणि कदाचित भालचंद्रनला इथला जॉब आवडेलही म्हणजे एकटेपणाही संपेल. जानकी आपल्या जवळच राहील उरलेल्या आयुष्यात कामाच्या रगाड्यामध्ये स्वतःला बुडवलं की, कटकट मिटली. नाही-तरी अम्मा गेल्यावर आणि असतानाही काम जबर काम हीच आपली सहधर्मचारिणी होती. व्यंकटरमण सैलावले आणि झपाट्यानं मागे पडणारा मुंबईचा परिसर पाहू लागले

डिस्कोथेक : स्टुडिओ २९.

स्टुडिओ २९ च काळं कुळकुळीत दार ढकलून जो मिरांडा आत शिरला आणि आत उभ्या असलेल्या रिसेप्शनिस्टन

'हाय देअर!' केल.

जोनं उजवा हात उचावून अभिवादन केलं आणि तो डाव्या बाजूच्या दरवाजानं आत शिरला. रात्रीचे साडेअकरा वाजल्यानं बार बराच भरला होता.

जोन भिरभिरत्या नजरेन डिस्को फ्लोअ-रच्या पलिकडच रिकाम टेबलं हेरलं आणि तो तिथं जाऊन बसला.

फ्लोअरवर दोन-तीन जोडपी नाचत होती आणि रंगाची उधळण करणारे असंख्य दिवे उघडझाप करीत क्षणाक्षणाला नवनवं मायाजाल निर्माण करीत होते

स्टुडिओमध्ये डिस्को संगीताचे ड्रम दुम-दुमत होते. ठक्याची लय कमी-जास्त होत होती आणि ध्वनीची वलयं अंगाखांद्यावर येऊन आदळून, अंगाचा थरार करताहेत असं वाटत होतं.

फ्लोअरच्या वरच्या बाजूला लावलेली आकाशातल्या विजेच्या लहरीसारखी लव-लवती प्रकाशनलिका क्षणभरच लखलखून गेली आणि नवी रेकॉर्ड सुरू झाली.

मिराडानं थम्सअपचा घुटका घेतला आणि इकडेतिकडे पाहालं.

त्या अंधुक मावळत्या विझत्या प्रकाशात आजूबाजूची सगळी माणसं रंगीत फ्लॅट कट आऊटस् सारखी वाटत होती.

जो नकळतच डिस्को संगीताचा ताल धरत होता.

...एवरी बडी वॉटस् टुबीऽऽ टु गे अदर टु गे अऽऽदर ...

जो त्या नादविश्वामध्ये गिरक्या घेत होता आजूबाजूला डोळ्यांना खुणावणारं, कानांना बधीर करणार, शरीराला हेलकावे देऊ शकणारं इतक काही गरागरा फिरत होतं की जोला आपल्या एकटेपणाचा विसर पडत होता.

जोन खूप ठरवलं होतं स्टुडिओ २९ मध्ये परत परत जायचं नाही. तिथ जाऊन आलं की दुसऱ्या दिवशी काहीतरी चमत्कारिक एक्झॉशन येत. सगळ्या जाणिवा बधीर होतात आणि कामात नीट लक्ष लागत नाही, पण तो सध्याकाळी घरी गेला आणि एकटे-पणा त्याला खायला उठला.

घरी एकटं राहण्याच तो खूप टाळत असे. आपल्या उण्यापुऱ्या तेहतीस वर्षांच्या आयु-ष्यात त्याला एकटेपणा जाणवायला लागून दोन-तीन वर्षच झाली होती. आईवडील मॅंगलोर जवळच्या छोट्या खेड्यात. मुंबई-तच शिक्षण. पुढच्या नोकऱ्या मग फ्लॅट... आता स्वतःचं ऑफिस...इतकी वर्ष कामाचा इतका झपाटा की विचार करायला वेळच नाही मिळाला.

आता मात्र ऑफिस सपल्यावर तो फोर्ट-मध्येच रेंगाळ, एम्पायर, स्टर्लिंगला सिनेमा पहायचा, कोपऱ्यावर वायकिकीत जाऊन फ्रॅंकी, पिझ्झा असल काहीतरी उडतउडत खायच. मधनंमधनं पीएम रोडवर मोकॅम्बो-मध्ये जाऊन सथपणे बिअर पान. घरी पोचायचंच मुळी उशिरा. घरी पोचल की आडवं. झोपलं.

त्याच्या एका सहकाऱ्यानं त्याला हिंदी नाटकाच्या थिएटर ग्रुपमध्ये ओढायचा प्रयत्न केला. ते नको वाटल म्हणून त्यान पदमसी-बरोबर सोफियाला इंग्लिश नाटकं पाहाली; पण कोणाशीच आयडेंटिफाय करता येईना. सगळीच माणसं वरवरची. 'हाय', आऊच!, फक्, असले शब्द च्युइंगमसारखे सारखे चघळायचे. कोणात रसरशीतपणा नाही. कुठेही होलसम रिलेशनशिप नाही.

एकटेपणावर उपाय म्हणून तो नरिमन पॉईण्टपासनं, चौपाटीवरन समुद्राच्या कडे-कडेनं चालत असे. अनेक व्हिज्युअल्स, कॅम्पेन-मधल्या पॉलिसीज इथेच सुचल्या.

आजही तो तसाच स्वतःला दमवत चालतचालत चौपाटीपर्यंत गेला. तिथनं घरी.

आज शनिवार. दुपारीपासन रिकामपण. घरी गेल्यावर चार भिंतीत अडकल्यावर तर एकटेपण अगदीच खायला उठल. व्हिस्कीचे दोन पेग पोटात रिचले. पोटात चुरचुरल. बस्.

कोणाची तरी कंपनी हवी. समवन हू कॅन शेअर मी! कम्पॅनिअन शिप हवी. अशी रिलेशनशिप शक्य आहे का? कोणाशी तरी? सुरुवातीला वाटलं की ही चारू जरा तरी विचार करणारी असेल. आर्ट फॉर्म्सचा चागला सेन्स तिला असेल. तिची बॅकग्राऊण्ड चागली होती. चागली म्हणजे काय? उच्चभ्रू. हाय सोसायटीमधली. पेडररोडला फ्लॅट, सेंट कोलंबोमध्ये शिक्षण; पण कॉमिक्सच्या पलीकडे काही वाचलेलं नाही. वशिल्यानं एजन्सीत घुसतात. त्याना कसला थिअरि-टिकल नोहाउ नाही. गप्पा मारायच्या इक्वालिटीच्या; पण अगदीच पोकळ. असल्या मूर्ख कंपनीपेक्षा एकटेपणा बरा.

मिरांडाला चारूची आठवण झाली. तिच्याबरोबरच्या शारीरिक सुखाची आठवण झाली ..तिचं सेक्सी शरीर; पण सगळे नखरे सगळे कमावलेले. दे फेक ऑरगॅज्म्स् ऑल्सो! ...आणि-नकोसच वाटलं. असल्या पोरी कलीग्ज म्हणून असणार!

त्याला क्षणभर मोनाची आठवण झाली आणि तो अस्वस्थ झाला. तिच्यात काही-तरी गूढ आहे शी इज कॉम्प्लिकेटेड!! त्याला मोनानं हसतहसत बिअरच्या फेसाच्या मिशा पुसायला सांगितल्याचं आठवलं आणि तो बेचैन झाला.

संगीताची लय गरागरा वाढत होती. लखलखून जाणारी वीज पुन्हा लवलवली

आणि क्षणभरात डिस्को फ्लोअरवरच्या छतामधनं सुंदर लहानमोठे साबणाचे फुगे यायला लागले. त्या तरल पारदर्शक फुग्यांमध्ये भोवतालची रंगीबेरंगी रोषणाई प्रतिबिंबित झाली आणि वातावरण अधिकच धुंद झालं.

जो टेबलवरनं उठला आणि डिस्को फ्लोअरवर उतरला.

वन...टु...थ्री...फोर...

अंगातनं संगीताचे ठेके सळसळून जात होते. अंगातनं ड्रमबीटची कंपनं थरथरत होती.

जोचं शरीर लयबद्धपणे त्या फ्लोअरवर लवलवत होतं. अंगातल्या प्रत्येक अवयवामध्ये संगीत भरून जात होतं.

अवतीभोवती एकटेदुकटे नाचणारे किती तरी होते. जोडपी फ्लोअरवर उतरत होती. मधनंच एखादा ट्रॅव्होल्टा टाइप नाचणारा यायचा माणसं त्याच्याकडे थोडावेळ पाहायची आणि मग आपले आपले नाचायचे.

रेकॉर्ड बदलली. क्षणभरच सगळं स्तब्ध झालं.

मग नव्या रेकॉर्डची सुरुवात जेटच्या उड्डाणाच्या आवाजानं झाली...हेही संगीतच ...कानठळ्या बसणारा आवाज दुमदुमत गेला आणि मग कोवळ्या सुरातलं वाढत्या लयीतलं संगीत.

जोचं भान आता संगीतमय होत होतं... तालावर पडणारे पाय ..आणि त्यात हरवत जाणारं एकटेपण ... खूप उशिरापर्यंत ... अगदी पहाटेपर्यंत...

अंगात आता फक्त थकव्याची जाणीव... जबर थकवा...अंगाचा लगदा झाला नुसता ...जो पहाटे केव्हातरी जेमतेम घरी आला. आडवा झाला, तो जागा रविवारी दुपारीच एकदम... !

व्यंकटरमण इटलीहून परतले आणि दीर्घमुदतीच्या रजेवर गेले. जिलेटो कंपनीशी बोलणी झाली होती. त्याच्या टर्म्स आणि कण्डिशन्सच्या फायलीचा व्यंकटरमणनी नासिकला परतल्यावर अभ्यास केला आणि दिल्लीला हजर.

आता डायरेक्ट भेट ज्युनियर पाठकबरोबर. त्यानाही सगळं पटलं. व्यवहारातलं, पैशाविषयी त्याना फारसं कळतय असं व्यंकटरमणना वाटलं नाही; पण त्यांच्याबरोबर त्याचे दोन मित्र होते. त्यांच्या डिग्र्या तरी मोठमोठ्या होत्या तेव्हा त्याना कळलं असावं. पाठक इटलीला कागदपत्रावर सह्या करायला एक–दोन दिवसातच निघणार होते.

पस्तीस वर्षांच्या आपल्या आयुष्यात ज्यु. पाठकानी बऱ्याच लटपटी केल्या होत्या. त्याच (डेहरा) डून स्कूलमधलं रेकॉर्ड दिव्य होत. शाळेतनं त्याना काढून टाकलं होतं. मग सत्ताधारी पक्षाचा वर्कर म्हणून वयाच्या अठराव्या वर्षापासनं काम करू लागले. पण तिथेही बरेच उपद्व्याप केल्यामुळे बिहारमधनं पोटनिवडणुकीला त्यांना तिकिट नाकारलं होतं. खरं म्हणजे त्यांच्यावरच्या सगळ्या गुन्हेगारी खटल्याना बिहार सरकारनं दाबून टाकलं होतं; पण सत्ताधारी पक्षाच्या बदलत्या धोरणामुळे खासदारकीचा चान्स हुकला. पण सिनिअर पाठकांच ज्युनियर मंत्रीपदं जाऊन कॅबिनेट दर्जा आणि महत्त्वाचं खातं मिळालं. ज्युनियर पाठकाना सत्ता भोगण्याचं स्वप्न सोडून द्यावं लागलं; पण राजकीय सौदागिरीत सिनियर पाठकाचा हात धरणारं कोणी नव्हतं. त्यानी पक्षश्रेष्ठींकडे तगादा लावून ज्यु. पाठकांकरता या नव्या उद्योगाकरता सारं काही बिनबोभाट सँक्शन करून घेतलं आणि मग ते लगबगीन कामाला लागले. कारण मंत्रीपदावर अर्ध्या रात्रीतही गचांडी मिळू शकते. जोवर आपण मंत्री आहोत तोवर फॅक्टरी मार्गी लागायला हवी !

त्यामुळे ज्यु पाठक व्यंकटरमणवर खूष होते. ही इज ए पर्फेक्ट ब्युरोक्रॅट. याला फॅक्टरी सुरू करेपर्यंत ठेवायच मग इच्चू... पाठकानी व्यंकटरमणना अशोका हॉटेलमध्ये खाना दिला.

ज्यु. पाठकानी जागेची चाचपणी केली होती. एवायचा नासिकला एक भला मोठा प्लॉट रिकामा होता. अडगळीची, निरुपयोगी जागा म्हणून ती जाहीर करायची आणि लगेच फुटकळ भावानं विकून टाकायची.

'अ‍ॅण्ड डोण्ट बॉदर अबाऊट द स्टेट गवर्मेन्ट !'

ज्यु. पाठकाचा शब्द चढत जाणाऱ्या व्हिस्कीमुळे आता तोंडातल्या तोंडात घोटाळत होता.

'खरं म्हणजे, पाठकसाहेबानी जागेचं सगळं काम आठ दिवसात संपवलय. जमीन विकत घेतल्याच्या कागदावर आजच सकाळी सही केली त्यांनी.' पाठकांचा मित्र म्हणाला आणि ओशाळ, दिखाऊ हास्य हसला.

व्यंकटरमण सुखावत होते. चॉकलेट पुडिंगचा मोठा घास घेत ते म्हणाले,

'जिलेटो कंपनीला बरेच इंटरेस्ट आहेत


*With Best Compliments From :*

SUPER PROFILES

*Managing Partner :* DILAWAR

Superior Profile Cutters & Iron Merchants.

S–13/A, Parvati Industrial Estate,
Pune 411 037

Phone : 47 08 23

त्याना ब्लेडवर थावायचं नाहीए. शेव्हिंग ॲसेसरीजही विकायच्या आहेत. हे सगळ आपण ब्लेड कशी विकायला सुरुवात करतो त्यावर अवलबून आहे. वी मस्ट स्टार्ट विथ ए बँग !

नासिकला परतल्यावर आपल्या शिस्तशीर पद्धतीनुसार व्यकटरमणनं नवं ऑफिस उघडल. त्याचा चोख प्रशासनावर विश्वास होता. तो तर त्याचा हुकमी एक्का.

उतरत्या वयात एक नवच खेळणं हाती मिळाल, आणि लहानसहान नाही. मोठं.

आता कसली चिंता नाही. सारखं काम करायच. म्हणजे पूर्वीसारखच एकदा कामाला जपून घेतलं की रिकामपणाची, एकटेपणाची सावलीही आपल्या जवळनं फिरकत नाही. अम्मा व्यंकटरमण जिवत असेपर्यंत त्या कधीमधी घरी राहायला लावत पण जानकीनं ते पथ्य पाळलं. आता तर घरी जायचं कशाला वेळेवर ? कोण आहे आपली वाट बघणारं ? वाट बघतं ऑफिस आणि काम ! काम हेच आपलं अर्धांग.

जानकीचं झाम्बिआहून पत्र आलं. दोघं मजेत होती. चला आता कसलीच चिंता नाही फक्त कामच काम !

मुंबईच्या इंडस्ट्रिअल वर्तुळात मेहराकपनीविषयी कुजबूज सुरू झाली होती. श्रीचद मेहरानं कंपनीचं मॅनेजिंग डायरेक्टरचं पद हाती घेतल्यापासनं कंपनीमध्ये नवा हुरूप आल्याचं म्हटल जात होतं. श्रीचद मेहराच्या आकर्षक व्यक्तिमत्वाविषयीही बोलल जात होतं.

'बिझिनेस टुडे ' च्या मुबईतल्या ऑफिसमध्ये बसून मासिकाचा वार्ताहर मोहन उदेसिंग अस्वस्थ झाला होता. गेले आठ दिवस त्यानी धडपड, फोनाफोनी करून श्रीचंदची मुलाखतीचो वेळ निश्चित केली होती. मुलाखत उत्तम रीतीनं पार पडली होती. श्रीचद त्याच्याबरोबर ओव्हर ब्रेकफास्ट, लच आणि डिनर असा बोलला होता. पहिली मुलाखत थोडीशी फॉर्मल झाली. नंतर दोघही एकमेकाच्या व्यक्तिमत्त्वान प्रभावित झाले आणि त्यांच्या वागण्यात मोकळेपणा आला, मैत्रीची छटाही त्याला आली.

श्रीचंदचा ब्लेड इंडस्ट्रीचा चागला अभ्यास होता एकूणच भारतीय उद्योगधंद्यातली मदी, तेजी याविषयी त्याची खास मतं होती. सरकारी टॅक्सेस, इन्डायरेक्ट टॅक्सेस, नवी इलेक्ट्रॉनिक इंडस्ट्री याविषयी चांगली माहिती त्याला होती. मोहननही आपलं होमवर्क उत्तम केल होतं. मेहरा कंपनीचा सगळा इतिहास त्यानी अभ्यासला होता. कंपनीविषयी बऱ्याच खाचाखोचा माहिती करून घेतल्या होत्या सहा–सात वर्षांपूर्वी खूपचद मेहरांनी हिन्दी फिल्ममध्ये भांडवल गुतवलं होतं पण त्यात जबर आपटी खाल्ली होती आणि नतर ब्लेड सोडून इतर कुठे पाऊल टाकायचं नाही, अशी मनाशी खूणगाठ मारली हेही मोहनला ठाऊक होत.

मोहनला श्रीचदन उच्च शिक्षण आणि मॅनेजमेंटच अत्याधुनिक तत्र आत्मसात केल्याबद्दल विशेष कौतुक वाटलं. भारतीय मॅनेजमेंट सीनमध्ये भाडवल गुंतवणारे आणि मॅनेजमेंट जाणणारे फारच थोडे जण होते. अशापैकी एक श्रीचद.

आणि अशी मैत्री, समानतेचं नातं त्याच्यात निर्माण झाल्यामुळे श्रीचंदनी मोहनला मेहरा कपनीनं परदेशी कपनीशी कस कोलॅबोरेट करून नवी ब्लेड बाजारात आणण्याचं ठरवलंय ही बातमी मुलाखतीत न आणण्याची विनती केली. ' आय वॉंट टू सरप्राइज पीपल ! ' मोहननी मान्य केलं.

अशा मुलाखती झाल्यावर महिन्याभरातच 'बिझनेस टुडे ' च्या कव्हरवरती श्रीचदचा देखणा चेहरा झळकला.

ज्यु. पाठकाच्या मित्रांच्या वाचनात अर्थातच हा अक आला. श्रीचदच्या मुलाखतीवर, त्यातल्या प्रत्येक वाक्यावर त्यांनी चर्चा केली. आणि सगळयाचं एकमत झालं की श्रीचदनी, स्पष्ट म्हटलं नसलं तरी मेहरा कंपनी परदेशी कपनीबरोबर कोलॅबोरेट करत असणार. म्हणजे ज्या वावड्या उठल्यात त्याना पुष्टीच मिळाली. पण श्रीचंदनी हे प्रश्न टाळून, परदेशी कंपनीबरोबर नेमक्या टर्म्स, कंडिशन्स कळू दिल्या नव्हत्या. अर्थात त्या कळणं किती आवश्यक आहे हे ज्यु. पाठकाच्या डोक्यात त्यांनी भरवल त्याना पटलं आणि ते कामाला लागले. ते म्हणजे सिनियर पाठकच ते काम करू शकणार होते...!

नरीमन पॉईंटवरच्या एका उत्तुंग इमारतीच्या सतराव्या मजल्यावरच्या बिग ब्रदर्सच्या मीटिंग रूममधलं वातावरण नेहमीप्रमाणं खेळकर नव्हतं. खोलीच्या मध्यभागी असलेल्या अंडाकृती टेबलाभोवती कॉपीरायटर, विज्युअलायझर, आर्टिस्ट मडळी बसली होती. खोलीला मोठ्या खिडक्या होत्या आणि नेव्ही ब्लू रंगाचे लाबलचक पडदे लावले होते, त्यामुळे बाहेरचा खूप खालचा खळाळता निळा समुद्र तिथनं दिसत नव्हता. खोलीच्या भिंतीवर जागोजागी जाहिरातीमधल्या फोटोग्राफसचे मोठमोठे ब्लोअप्स लावले होते. त्यामधला सगळयात मोठा ब्लोअप म्हणजे एका साबणाच्या जाहिरातीतल्या अवखळ मुलीचा होता अंगावर धबधब्याचं उसळतं पाणी खेळत, ती मुलगी टु पीस बिकिनीत बसली होती. तिच्या डोळयात चमक होती, खट्याळपणा होता. तर हातात लांब किंग साईज सिग्रेट घेऊन आभाळाकडे बघणाऱ्या एका तरुणाच्या चेहऱ्यावर राकट मर्दानीपणा होता. हे दोन ब्लो अप्स मिटिंगरूमकरता मिराडान मुद्दामच तयार करवले होते आणि त्याच्यामुळे एमडीच्या खुर्चीच्या वर टांगलेल्या ' मि. बिग ' याच्या हसऱ्या फोटोकडे कोणाच लक्ष वेधलं जात नसे.

नेमक्या त्याच फोटोखाली मिटिंगकडे पाठ करून सॅमी रंगूनवाला–एमडी उभा होता त्याच्या हातात पाइप होता. तो एव्हाना विझला होता.

खोलीतल वातावरण बरंच तंग होत. सगळी मंडळी एकमेकाकडे चोरटे कटाक्ष टाकत होती; पण फारसं कोणी बोलत नव्हतं.

सॅमी रगूनवाला बराच नाटकी होता आणि त्याच्या नाटकाचा त्याच्या हाताखाली काम करणाऱ्याना कटाळा आला होता. अर्थात सॅमीला हे कुणीही सांगू शकलेऊ नव्हत. एकटा मिराडाच सॅमीला इग्नोअर करू शके.

आजच्या मिटिंगमध्ये वातावरण गोठल्यासारख असणं सॅमीला अपेक्षित होत; पण त्यामुळेच तो अधिक वैतागला होता. डाव्या हातान आपल्या गालावरच्या लांबट राखाडी रगाच्या गलमिशाना खाजवीत तो उभा राहिला होता.

' मी कालच दिल्लीहून परतलो. कंपनीला

मोठ कॉण्ट्रॅक्ट मिळतय विशेष म्हणजे हे काम ऑलमोस्ट सरकारी आहे! ... पॉज...

सॅमीन सगळ्यावरन नजर फिरवली.

'मि. पाठक म्हणजे ज्युनिअर पाठक... उद्योगमंत्री टी. ए पाठकांचे चिरंजीव नवी कंपनी काढताएत शेल्हिंग पीपल नावाची. त्याच काम आपल्याकडे येणारे.'

पॉज...

पुन्हा सगळ्यावरन नजर.

'मी काय सांगतोय त्यामुळे तुम्हाला आनंद होत नाहीए. इटस् ए बिग थिंग. आपल्याला मेहरा कंपनीसारख्या प्रस्थापित कंपनीशी टक्कर द्यायचीय. त्यांचंही फॉरेन कोलॅबोरेशन असाव. बट वी हॅव टू ब्लास्ट देम .. यु नो...

असं म्हणून सॅमीन गिरकी घेऊन त्याच्याकडे पाठ फिरवली होती. त्यानंतर पाच मिनिट कोणीच बोलल नाही

इतक्यात, पुन्हा एक गिरकी घेऊन सॅमीन सगळ्यांकडे रोखून पहात म्हटल,

'मला वाटल होत ते खरय, मेहरा कंपनीन अॅडव्हेंचररसंना हायर केलय . म्हणजे दॅट मिराडा... अॅंड यू आर शिट स्केअर्ड ऑफ दॅट बास्टर्ड! तुम्ही त्याला फेस करू शकत नाही...'

'कमॉन बॉईज, यू हॅव सम ग्रेसेल्स लेफ्ट इन युअर ब्रेन...!'

खर पाहता, मिरांडाची इतकी धास्ती वाटण्याच कारण नव्हत. मिराडाला जबर टॅलंट होता शकाच नाही; पण अशी टक्कर देणारे कॉपीरायटर, व्हिज्युअलायझर मिराडा पाठोपाठ कंपनी सोडून गेले होते. सगळ्यांचं एकच कारण. सॅमी स्टील्स क्रेडीट. आपण स्वत. स्वतंत्र काम का करू नये? सॅमीन मग घाईनं माणसं भरली. त्यांना अनुभव नव्हता. तिकडे मिराडाचा दबदबा वाढत होता आणि सॅमीची नाटकच चालू होती.

सॅमीलाही मिरांडाला फेस करण्याची सध्या तरी इच्छा नव्हती; पण आपणच हातपाय गाळून बसलो तर कोणीच काम करणार नाही.

सॅमीच्या या नाटकाचा कोणावर फारसा फरक पडला नाही तरी महिन्याभरापूर्वीच्या रिक्रूटला मात्र कंठ फुटला.

'ऑफकोर्स सर...! मला खात्री वाटत्येय. आपण हे चॅलेंज सहज स्वीकारू. मिराडा असेना का तिकडे!!'

त्या रिक्रूटन अभिमानानं आपल्या सहकाऱ्याकडे पाहून मग सॅमीकडे नजर टाकली. निदान सॅमीन तरी प्रोत्साहन द्याव; पण सॅमी नुकताच हसला.

गेल्या आठदहा महिन्यातली बिग ब्रदर्संची दोन छोटी कॅम्पेन्स फ्लॉप गेली होती आणि दोन गिऱ्हाईकानी काम द्यायच बंद केल होतं. बिग ब्रदर्ससारख्या बहुदेशीय अमेरिकन कंपनीच्या मानानं हे अपयश काहीच नव्हतं; पण या दोन फ्लॉपच्या जिकडे तिकडे चर्चा सुरू झाल्या होत्या आणि सॅमीला पुन्हा काही तरी मोठ करून दाखवायच होत. शुअर टु विन अशी कॅम्पेन! शुअर टु विन बाय एनी मीन्स!!

पण या नव्या रिक्रूटच्या बोलण्यानं वातावरणामधला ताण थोडा कमी झाला. सगळेजण थोडेसे विसावले आणि हळूहळू चर्चेला तोंड फुटल. कॅम्पेनविषयी माणसं बोलू लागली.

सॅमी सैलावून ऐकत होता. त्यान एकच गोष्ट स्पष्ट केली.


To Reduce Coal Consumption in Boilers
Install :
Arjunwadkar Low Ram Mechanical Stocker
For Fuel Economy.
Cast Iron Vertical Tube Feed Water
( With Tube Cleaning Arrangements )
CAST Iron Fin Protected Steel Tube Economiser.

Arjunwadkar Associates
Founders and Engineers
A – 21 'H' Block, M. I. D. C.
PIMPRI
PUNE 411018
Tel. : 84570

'बॉईज, कॅम्पेनची भिस्त प्रेसअॅडसवर आहे! माणस सकाळी उठून दोन गोष्टी करतात. दे शेव्ह अॅंड रीड द न्यूजपेपर. दोघांना एकत्र करायला हव. सो रीच टू देम थ्रू न्यूजपेपर्स म्हणजे दणदणीत फुल पेज अॅडस्!'

दुपारी अडीच वाजता मिरांडा मोनाच्या केबिनमध्ये डोकावून म्हणाला,

'सध्याकाळी थावशील. जरा बोलू या.'

मोना 'अं?' म्हणून पहात राह्यली.

'सध्याकाळी इथ थांब, जरा अॅडसबद्दी बोलू या. मला... काही... अॅनी वे... थांब तू'

मोना ओठांवर पेन्सिल आपटत विचार करीत थाबली. जो निघणार इतक्यात म्हणाली,

'प्लीज, आजच थांबायला हवय का ?'

जोनं कपाळावर आठ्या चढवत म्हटलं,

'हो, आजच... यू डोण्ट नो, डेड लाईन किती जवळ आलीय आणि आज का नको? व्हाय नॉट टुडे... टेल मी;'

'अरे भांडायला काय लागतोस.' जोच्या आवाजातला त्रासिकपणा लक्षात येऊन मोना म्हणाली.

'थांब जरा, मला फोन करायचाय एक, त्याचं काय उत्तर येतं ते पाहू. त्याप्रमाणे मग थाबीन!'

अस म्हणून मोनानं टेबलावरचा फोन उचलला.

मोनाच्या आवाजातल्या ठामपणानं जोचा त्रासिकपणा वाढला आणि तो तिच्याकडे पहातच राह्यला.

रिसिव्हर हातात घेऊन मोना त्याच्याकडे पाहून म्हणाली,

'जो... प्लीज! मला... मला फोनवर बोलायचंय!'

जोनं रागानं दार बद केलं आणि तो आपल्या खोलीत जाऊन भराभरा सिगरेटी ओढायला लागला.

थोडया वेळानं मोना त्याच्या केबिनपाशी येऊन म्हणाली,

'फॉर हेवन्स सेक. सिगरेट ओढू नकोस आता. मी थाबल्येय!' आणि तिनंही दरवाजा जोरात लावून घेतला.

सध्याकाळी मोनाच्या स्टुडिओ कम रूममध्ये जो आला तेव्हा सगळं ऑफिस रिकामं झालं होतं. जोनं तिच्या खोलीत येताना एक मोठी जाड, लांब चोपडी आणली होती ती टेबलावर आपटल्यासारखी ठेवत तो बसला मोना दोन्ही गुडघे टेबलाला लावून खुर्ची झुलवत इंडिया टुडे वाचत बसली होती.

आणि जोकडे पाहताच तिनं वाकून टेबलाचा खालचा खण उघडला आणि तशीच एक चोपडी बाहेर काढली.

त्या दोन्ही चोपडयांचं काम एकच होतं. दोघानीही त्यात आपल्या आवडलेल्या, न आवडलेल्या प्रेस अॅडसूचा अॅनालिसिस लिहून ठेवला होता. आपल्याला नव्यानं सुचलेल्या कल्पना, व्हिज्युअल कल्पना, कॉपीज लिहिलेल्या होत्या.

त्या चोपडया पाहून त्या दोघांनाही एकमेकांच्या चोपडयात काय असेल याची कल्पना आली आणि दोघही हसली.

मोनानं उठून इलेक्ट्रिक शेगडीवर किटलीत कॉफीच आधण ठेवलं आणि ती पुन्हा येऊन बसली.

तिच्या गळयात बारीक साखळीनं अडकवलेला चष्मा होता.

मोना मिराडाचं कॉपीबुक चाळू लागली.ती वाचनात गुग आहे हे पाहून मिरांडान कॉफी करून वाफाळणारे कप टेबलापाशी आणले आणि कॉफी मोनाला ऑफर केली.

मिराडा मोनाच्या चेहऱ्याकडे पहात होता. तिच्या भुवया जाड होत्या आणि डोळयांच्या कडाना थोडी लवही होती; पण तिनं भुवया रेखण्याची, ती लव काढण्याची कधीच धडपड केली नव्हती. आणि संध्याकाळ झाली असली तरी दिवसभरच्या थकव्याचं कोणतंच चिन्हं तिच्या चेहऱ्यावर नव्हतं.

मिरांडाला एकदम जाणवल, मोना चष्मा लावायला लागली बिग ब्रदर्समध्ये असताना कधी लावत नसे!

'मोना, चष्मा लावतेस?'

मोनानं चष्मा नाकावर ओढून त्याच्यावरनं जोकडे पहात रोखून म्हटल.

'हो लावते कधी कधी. का?'

'नाही नाही, पूर्वी कधी लावत नव्हतीस म्हणून विचारलं!' जो.

'हं, मी युजवली कॉंटॅक्ट लेन्सिस वापरते. मला वाटलं तुला कळलं असेल मी कॉंटॅक्टस् लावते म्हणून! पटकन् ओळखता येत ना! विशेषत: डोळयात नीट पाह्यलं तर दिसतच ना!'

'खरच!' मिराडानं आश्चर्य वाटून खांदे उडवले.

'खादे उडवू नकोस. डोळयात कधी पाह्यलंयस माझ्या.' असं म्हणून तिनं डोळे वटारून जोकडे पाह्यलं आणि पुन्हा वाचू लागली.

जोनं मोनाचं बुक उचलून चाळलं. काही डिझाइन्स निरखून पाह्यली; पण त्याचं मन लागेना. मोना मात्र लक्षपूर्वक त्याचं बुक पहात होती.

जोनं उठून कॉफीचे कप विसळले आणि तो पुन्हा येऊन बसला.

मोनाला जोनं कॉफीचे कप विसळले हे आवडल पण ती काही बोलली नाही तिनं त्याच बुक फट् असा आवाज करून बद केल आणि जोकडे पाहून खादे उडवले.

जो तिच्याकडे पहात म्हणाला, 'मोना मी जरा लाऊड थिकिंग करतो. ओके?'

'या ब्लेडची अॅड कशी करावी? या प्रश्नाच सगळयात सोपं उत्तर कोणत?

मोनान 'हूं' म्हटल

'अगदी सोपं, सरळ उत्तर म्हणजे ही ब्लेड फॉरीन कोलॅबोरेशननं तयार होणारी पहिली ब्लेड आहे. ही त्या ब्लेडची युनिक क्वालिटी आहे, राईट!'

'राइट' मोना म्हणाली तिला वाटलं की जो नेहमीप्रमाणे युनिक सेल प्रमोशनवर घसरणार. वस्तूचा एकमेवाद्वितीय गुण उचलून तो विकायचा! ओल्ड ट्रिक–तिला वाटलं जोकडनं अधिक अपेक्षा आहेत. इतक्यात तो म्हणाला,

'बट दॅटस् सिपल टू स्ट्रेट. त्यात काहीच नवीन अप्रोच नाही सेल द युनिक कॅरेक्टर!'

'यू मीन युनिक सेल्स प्रमोशन.' मोना सरळ म्हणाली.

'हो, पण त्यात काही अपील नाही असं मला वाटत या गुणामुळे माणसं एकदा ब्लेड विकत घेतील'

'देन व्हाय नॉट?' मोना त्याच्याकडे पहात म्हणाली.

'पण एकदाच विकत घेतील या कोलॅबोरेशनचं नाविन्य दोन दिवसात सपणार लोकांना काहीतरी आतपर्यंत भिडणारं हव. मी अगदी पहिल्यापासनं विचार करतोय. या

ब्लेडला काहीतरी अपील असावं. पण कशाला अपील कराव ?'

मोनानं प्रश्नार्थक चेहऱ्यान त्याच्याकडे पाहुल.

जरा वेळ थाबून, सिगरेटचे झुरके घेऊन जो म्हणाला,

'मोना, या ब्लेडला काहीतरी अपील हवं. तस कॅरेक्टर हवं.काहीतरी नोबल. असं, ज्याच्यात फेथफूल क्वालिटी आहे ! फेथफूल ...लाइक...लाइक...अ...अ डॉग !'

मोना तत्क्षणी म्हणाली,

'डॉग ! ? ऑर...अ हॉर्स !!'

जोच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

'येस ... व्हाय नॉट अ हॉर्स ! मोना. करेक्ट! मला या घोडयाच्या प्रतिकामुळे गोष्टी थोडया सोप्या वाटतात. मला या ब्लेडला नोबल कॅरेक्टर द्यायची. ही ब्लेड वापरण इज ए नोबल ॲक्ट... द ॲक्ट ऑफ शेव्हिंग ...इज नोबल !'

'ओके', मोना म्हणाली.

'तुला नाही अस वाटत की...द ॲक्ट ऑफ शेव्हिंग ..वॉज द प्रोसेस ऑफ ग्रूमिंग. हे तर खरंय की माणूस जसजसा सुसंस्कृत झाला तसतसा त्यानं स्वतःचा चेहरा अधिक गुळगुळीत केला. तो दाढी करायला लागला. त्याच्याकडचं धारदार शस्त्र त्यानं अधिक सोपं, साधं बनवलं आणि तेच म्हणजे ब्लेड ...पण तरीही...काही तरी...!'

मोना जोकडे निरखून पहात होती. तिच्या छोटयाशा टेबलावर एक दिवा टागलेला होता आणि त्या दिव्याभोवती झोकदार लॅंपशेड होती. त्यामुळे दिव्याचा प्रकाश फक्त टेबलावर पडत होता आणि मोनाला जोचा चेहरा त्यामुळे स्पष्ट दिसत नव्हता. जोच्या बुबुळांचा रंग तपकिरी, ताबूस होता. त्याचे नाक, ओठ खूप रेखीव नव्हते, पण त्याच्या सावळया चेहऱ्यावर काळीभोर मिशी खुलून दिसत असे. मोना जोच्या डोळयात प्रकाशाची जी प्रतिबिंबित वर्तुळं दिसत होती, त्याच्याकडे पहात होती. तिला वाटल जो खूप प्रामाणिक आहे. आपल्या व्यवसायात अगदी ...अगदी इन्वॉल्व झालेला आहे. तो अगदी सिन्सिअर आहे. ऑनेस्ट आहे ! आणि थोडा ...कलंदर आहे...त्याला,

'मोना, काय बघत्येस ?' जो तिच्याकडे पहात म्हणाला.

मोना चपापून म्हणाली,

'बघत्येय ? बघत्येय कुठे ? ऐकत्येय ना ...तू म्हणत होतास ... ए हॉर्स इज ए ऑनेस्ट...सिन्सिअर...!'

'ऑनेस्ट ?... सिन्सिअर ? मी ऑनेस्ट म्हटलं ?' जो गोंधळून म्हणाला.

मोना जीभ चाऊन म्हणाली,

'*आय मीन नोबल !*' बोल तू. तू अगदी ऑनेस्टली बोलतोयस.'

'तर...हां थोडा हा सुसंस्कृत होण्याच्या प्रक्रियेचं प्रतिक आहे ओके ? पण तरीही ब्लेड इज नॉट ओन्ली सोफिस्टेकेटेड...तिला शार्प धारदार एज असतं. इट कटस्. त्यात काहीतरी प्रिमिटिव्ह...? नाही...'

'पण जो, घोडयाचा सगळा डौल त्याच्या हालचालीत आहे. त्याचे खूर...त्यामुळे उडणारी धूळ...वेगाचा येणारा अनुभव ... त्याचे थरथरणारे स्नायू...यात खूप मूव्हमेंट आहे नाही. स्टिल फोटोग्राफीत तो पकडता येईल...पण ते फिल्ममध्ये अधिक शोभून दिसेल !'

जो पुन्हा विचारात पडला. दहा मिनिटांनी म्हणाला,


With Best Compliments From :

Jaisun & Company

440/A-2, Pune Satara Road,
Bibwewadi, Pune 411 037

Phone : Res. : 61170
: Office : 31906

'तू म्हणतेस ते खरंय मोना. आपण याच लायनीवर विचार करू या. लेट मी स्लीप ऑन इट. ओके...आणि निघू या...आता?'

'मी आलेच हं!' असं म्हणून मोना केबिनबाहेर गेली.

मोनाची पर्स, चष्मा, छोटासा रूमाल तिथच टेबलावर पडला होता. त्या पिवळसर रंगाच्या रुमालाला नाजूक पांढरी शुभ्र लेस लावली होती आणि एका बाजूला लालचुटूक छोटसं फूल होतं.

जोला तिच्या पर्सवरनं हात फिरवावासा वाटला. तिच्या रूमालाचा अत्यंत मंद सुगंध घ्यावा असं वाटलं. त्यानं हात पुढे करून तो रुमाल उचलून खिशात टाकला.

मोना परत येऊन रूमाल शोधू लागली. 'अरेच्चा! रुमाल कुठे गेला माझा?' पडला की काय म्हणून टेबलापाशी शोधू लागली. 'छान होता रे अगदी. त्याच्यावर गोडसं फूल होतं.' ती पुटपुटली.

'हां...घे!' म्हणून जोनं आपला रूमाल तिच्याकडे दिला. चेहरा पुसून तिनं अभावित-पणे रूमाल पर्समध्ये टाकला आणि दोघंही उठली. जो म्हणणारच होता 'अग माझा रूमाल दे परत!' पण तेवढ्यात तो थाबला.

ती दोघही केबिनबाहेर आली आणि ऑफिसच्या बाहेरच्या दाराला कुलूप लावून बाहेर पडली. मोना लिफ्टच बटण दाबत उभी राहाली. जो तिच्याकडे बघत म्हणाला,

'मेमसाब. लिफ्ट बंद हो गया. चलो चलते चलते!'

जिन्याच्या दोन पायऱ्या उतरून दोघही थाबली आणि मागे जाऊन कुलूप ओढून नीट बसलय का ते पाहालं.

खाली उतरल्यावर जोनं बेलार्ड पिअर-वरनं गाडी पीएम रोडवर आणि मग ओव्हर-सीज समोरन नरीमन पॉइंटवर आणि मोनाकडे पहात म्हटलं,

'मरीन ड्राईव्हवरनं?'

'ऑफ कोर्स!' मोना म्हणाली.

'मोना, तुझं म्हणणं शभर टक्के खरंय. घोड्याची अॅड फिल्म बनवली पाहिजे. विथ अ कॉमेन्ट्री...लाइक. 'द हॉर्स...इज मॅन्स फ्रेण्ड...नोबल असलं...काही तरी.पण मोना, मघाशी मी बोलत होतो तो मुद्दा तसाच राहालाः वी मस्ट अपील टू समथिंग प्रिमि-टिव्ह...फक्त सोफिस्टिकेशन नको. मे बी... आपण अर्बन असण्याचा मुखवटा घालतो... पण आपल्यालाही काहीतरी रॉ...अर्जेस आहेतच.'

मोना त्याच्याकडे न पहाता म्हणाली, 'नाही ..मला नाही कळत. तू या गोष्टी कशा एकत्र करतोयस.'

जो रस्त्यावरची नजर ढळू न देता म्हणाला, 'आय मीन, समथिंग फिजिकल. काहीतरी...पर्सनल ... नाही ... मला नीट सागताएत. कारण नीट समजत नाहीए.'

मिरांडा वेगानं गाडी पळवीत होता. चौपाटीवरच्या दिव्यांचा पिवळट प्रकाश मोनाच्या चेहऱ्यावरनं झपझप करून जात होता.

मोना खिडकीतनं येणाऱ्या वाऱ्यामुळे डोक्यावरचे उडणारे केस डोक्यावर हात ठेवून सावरत होती. जोकडे तिरके डोळे करून तिनं पाहालं

जो आपला खालचा ओठ दाताखाली चावून गाडी चालवत होता आणि त्याच लक्ष गाडी चालवण्याकडेच होतं.

'जो, यु नो व्हॉट?'

जोनं जेमतेम 'हु' म्हटल.

'यु आर नॉट अ मेल शवनिस्ट पिग!'

'आय अॅम नॉट व्हॉट?' जोनं तिच्या-कडे पहात म्हटल.

'नथिंग!' मोना म्हणाली

'आय अॅम नथिंग' असं म्हणून जोनं खादे उडवले आणि स्टिअरिंग व्हीलवरचा डावा हात सोडून स्वतःच्या डोक्याकडे बोट दाखवलं.

'धिस इज एमटी?'

त्याचा चेहरा आणि अॅक्शन पाहून मोना हसली.

'बोलवावं याला घरी?' पण ती काही बोलली नाही.

जोनं विलसन कॉलेजजवळनं गाडीला उजव्या बाजूला टर्न दिला आणि तो गाव-देवीवरनं नाना चौकापर्यंत आला.

'नेक्स्ट टर्न!' मोना म्हणाली.

सिग्नल पार केल्यावर डाव्या बाजूला ...फुटपाथच्या कडेशी जोनं गाडी थांबवली. मोना बाहेर येऊन खाली वाकून जोकडे पहात म्हणाली,

'इथन अगदीच जवळ राहाते मी. पिरोजा मॅन्शनमध्ये...' आणि क्षणभर थाबली.

इतक्यात मागच्या गाडीचा हॉर्न कर्कश्श-पणे वाजला आणि मिराडान 'ओके बाय' म्हणून गाडी सुरूही केली.

व्यंकटरमणनी शेव्हिंग पीपलच्या ऑफिस-मधल्या टेबलापाशी बसून रिसिव्हर जोरात क्रेडलवर आपटला. नासिकहून दिल्लीचा कोड नबर फिरवल्यावर फक्त एंगेज्ड टोन येत होता. सकाळी दहा वाजल्यापासन त्यानी ज्यु. पाठकना फोन करायचा प्रयत्न चालवला होता. प्रथम त्याचा खाजगी चिटणीस कुळकर्णीनं प्रयत्न केला; पण त्याला लागेना म्हणून मग त्यानीही फोन करायला सुरुवात केली.

व्यंकटरमणचा राग एंगेज्ड टोनच्या प्रत्येक 'टुई ऽऽ टुई ऽऽ बरोबर वाढत होता. व्यंकटरमणना चिडचीड दोन गोष्टीसाठी वाटत होती.

एक म्हणजे नासिकच्या स्थानिक 'दैनिक' नावाच्या वृत्तपत्रामध्ये पहिल्या पानावर 'नव्या फॅक्टरीचे बांधकाम' म्हणून फोटो-सकट वृत्त छापलं होत. त्याना मराठी कळत नव्हतं तरी फोटोवरन तो एचआयच्या प्लॉटवर खणलेल्या खड्ड्यांचा फोटो आहे हे कळलं. त्यांनी कुळकर्णीकडनं त्या बातमीच भाषांतर करवल. बातमीत सनसनाटी अस-ल्याचा आव आणलेला असला तरी फारसा दम नव्हता; पण तरी फोटोसकट बातमी होती. ही बातमी आणि तिचा फॉलोअप इथं नाही मुबईच्या वर्तमानपत्रात. प्रथम मराठी मग इग्रजी! बातमी वरपर्यंत सुद्धा पोचू शकेल! थेट पीएमपर्यंत अॅंड देन ब्लास्ट द कपनी. अॅंड देअर आय अॅम लाइंग जॉबलेस-शिट.

दुसरं कारण म्हणजे आता काय करावं? ज्यु पाठकाना फोन लागत नव्हता. वरनं पॉलिसी डिसिजन यायला हवा. त्यानी ठर-वायला हव मग ते मी तत्परतेनं पार पाडीन. दॅटस् माय जॉब. पण आता काय करावं?

आणि हे प्रकरण आजच उपस्थित व्हावं का? कालच सचिवालयात जाऊन त्यानी बरीच लाल फितीत अडकणारी कामं केली होती. एनओसीचे क्लिअरंट, बरीच सर्टिफिकिटं त्यानी मार्गी लावली आणि आता दोन दिवस साइटवर जाऊन काम पहायचं हे मुख्य काम.

त्यातल्या त्यात त्याना एका गोष्टीचं

समाधान वाटत होतं की, आपण निदान मराठी खाजगी चिटणीस नेमला हे बर केलंय...

...इतक्यात त्यांच्या टेबलावरच्या फोनची घंटा जोरात वाजली आणि ते दचकले.

दिल्लीचा लाइटनिंग कॉल लागला.

ज्यु पाठकांचा आवाज इतक्या दुरूनही झोपाळलेला आणि थोडा बरळणारा होता.

व्यंकटरमणनी त्याना अडचण सांगितली. ज्यु. पाठक स्तब्ध झाले आणि त्यानतर त्यांच्या आवाजात स्पष्टपणे चीड जाणवत होती.

त्यानी व्यकटरमणना रागावून इनएफिशिअंट म्हटल आणि त्या वृत्तपत्राच्या सपादकाला खूष करायला सांगितल. 'बाय दॅट बास्टर्ड... थ्रो फ्यू ॲंडस् ॲट हीम !'

आणि रिसिव्हर आदळल्याचा आवाज झाला.

व्यंकटरमणनी शिव्या न ऐकल्यासारखं करून कुळकर्णीला आत बोलावल... त्याक्षणीच.

व्यकटरमणना कळलं की आपण इथले सर्वेसर्वा आहोत पूर्वीपेक्षा आपल्याला अधिक स्वातंत्र्य आहे. निर्णय स्वत.चे स्वतः घ्यायचे आहेत. कॅरिआऊट करायचे नाहीएत, फायली तयार करून वर पाठवायच्या नाहीत. त्या इथच वाचायच्या. म्हणजे वाटल होतं त्यापेक्षा काम सोपं नाही. सोप असं नाही या कामाची सवय नाही. संकुचित स्वातंत्र्यातच वावरायची सवय झालीय आता मोकळेपणात वावरायचं आहे !

त्या सध्याकाळी 'दैनिक' चे मालक श्री. सुदाम पवार आणि व्यंकटरमण याची कुळकर्णींनी भेट घडवली. पवाराच्या बगल्यातच भेट झाली. फारसा फापट पसारा न घालता कुळकर्णींनी मुद्याला हात घातला. एचायची फुलपेज जाहिरात महिन्यातनं दोनदा रविवारी देण्याची ऑफर केली. आश्चर्य म्हणजे पवाराचा फारसा आग्रह दिसला नाही. त्याना एचायचे जीएम आपल्याकडे काम काढून आले याचा आनंद झाला होता आणि आता सत्ताधारी पक्षाच्या पक्षश्रेष्ठीपर्यंत आपले हात पोचण शक्य आहे याची त्याना खात्री झाली पवारांनी स्थानिक पातळीवरच्या पक्षश्रेष्ठीशी सूत जमवायचा प्रयत्न केला पण ते अजून नीटसं जमलं नव्हतं आणि आता केन्द्रीय मंत्र्याच्या चिरंजीवांपर्यंत सरळ संधान बांधणं शक्य झालंय!

पवाराच्या लक्षात आल की व्यकटरमण जरा टेन्स दिसताएत.

पवारानी बातमी छापल्याबद्दलचा खुलासा उद्याच छापू म्हणून कबुली दिली कबुलीच का त्यानी लागलीच फोन केला; पण उपसपादकानी 'फ्रंटपेज कम्पोझ झालंय, साहेब आपणच नासिकमध्ये नव्यानं उघडलेल्या कोऑपरेटिव्ह बॅंकेत चेअरमन झाल्याची बातमी फोटोसकट फुलपेज छापलीय, तुम्हीच सांगितल होतत साहेब. आतलं पान मोकळं आहे पण तिथे छापू का ?' अस विचारल आणि पवारानी त्याला तिथल्या तिथं दटावल, 'नको, एक तर असली बातमी मला न विचारता छापलीत आणि त्याचा खुलासा आतल्या पानावर छापू का म्हणून विचारताय ? ही बातमी परवाच्या अकात येऊ दे आणि स्पष्ट लिहा व्यायला दिलगीर का काय म्हणतात ते...!!'

मग पवारही खुलले. व्यकटरमणही विसावून बसले. व्हिस्कीच्या दोन-तीन राउण्ड झाल्या. पवारांनी व्यकटरमणना कोंबडीचं जेवण घ्यायची विनती केली; पण त्यानी मांसाहार चालत नसल्यामुळे नाही म्हटलं आणि हे ऐकल्यावर तर पवार फारच खूष झाले व्यकटरमणविषयी त्याना आदर वाटायला लागला. 'तुम्ही मद्रासी खरे ब्राह्मण ! एकदम प्युअर कास्ट !! आम्हाला तुमच्याबद्दल आदर आहे. नाही तर इकडची भटं... कोंबडी म्हटली की त्याची लाळच गळायला लागते... शिदळीचे...

व्यंकटरमण दुसऱ्या दिवशी ऑफिसात आले तेव्हा त्यांच्या कपाळावरचे गंधाचे टिळे अधिकच स्पष्ट झालेत असं कुळकर्णीला वाटलं. पण फरक पडला होता तो त्याच्या चर्येत. व्यकटरमण वॉज एन्जॉइंग हिज फ्रिडम !

मिरांडा म्हणाला होता की, आय शल स्लीप ऑन दी प्रॉब्लेम. पण त्याचे दोनतीन दिवस बेचैनीत गेले. डेड लाइन दरवाजा ठोकायची फक्त बाकी होती. मुळातली दृष्य कल्पना कागदावर शब्दात मांडायची मग आर्टवर्क, मॉडेल... प्रिंटस् .. एक ना दोन अनेक काम होती.

जो अगदी हैराण झाला त्यातच मोना दोन दिवस आजारी म्हणून येऊ शकली नाही.

जो चौथ्या दिवशी घरी लवकर पोचला. नवव्या मजल्यावरच्या बालकनीत येऊन उभा राहिला. त्याला बाजूच्या इमारतीमधल्या छोटया-मोठया बालकनी दिसत. समोरच्या इमारतीमधली नवव्या मजल्यावरची एक चिमुरडी जो तिथं उभा असला की हात हलवून टाटा करायची आणि जोनं प्रत्युत्तर


## जिल्हा कृषि औद्योगिक सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, नासिक.

**तार : डिसट मार्केट** **फोन नंबर : ७२५०६, ७३२४३**

शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असलेली नासिक जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील एक अव्वल दर्जाची सहकारी संस्था, सहकार महर्षी कै. भाऊसाहेब हिरे यांनी स्थापलेली नासिक जिल्ह्यातील जनतेच्या सेवेचे व्रत अंगिकारलेली अग्रगण्य संस्था.

लोखंड, अँगल्स, गज, पत्रे, सिमेंट आणि सिमेंट पत्रे, खते,
अन्नधान्ये, साखर, तेल, व्हिजिटेबल ऑईल, रवा,
मैदा, डाळी, कापड यांची विक्री.

**माधवराव पाटील** जनरल मॅनेजर
**भाऊसाहेब पोपटराव खरात** व्हा. चेअरमन
**चांगदेव भागवत होळकर** चेअरमन

म्हणून हात हालवला की लाजून घरात पळून जायची. जोन अपेक्षनं समोर पाह्यलं. समोरचा ब्लॉक कडेकोट बंद होता. आता त्याला आणखीनच एकटं वाटायला लागलं.

त्यानं उगाचच घरात आत बाहेर केलं. आरशासमोर उभं राहून केस विंचरले. चेहरा आरशाजवळ नेऊन नीट पाह्यला. क्षणभरानं तो दूर झाला आणि त्यानं झटकन अंगावरचा गाऊन उतरवला आणि नाइट पायजमाही काढला. वरचा पातळ सदराही काढून टाकला आणि आपल्याच प्रतिबिंबाकडे पहात तो उभा राह्यला. अंगावर फक्त अंडरवेअर. दोन्ही हात कमरेवर आणि जो आपल्या शरीराकडे पाहतोय त्याचं शरीर पिळदार नसलं तरी ताठ होतं छातीवर तुरळक केस होते त्यानं मग थोडा व्यायाम केला. शरीराला घाम सुटला आणि ते चकचकू लागलं पायांना रग लागली दंडाच्या स्नायूंत कळ जाणवली. तरी जोनं व्यायाम सोडला नाही. श्वासाचा आवाज जोरात येऊ लागला आणि चेहराही लाल होत होता. थोड्या वेळानं जोला अगदीच दम लागला आणि तो खोलीतल्या दिवाणावर येऊन बसला. बाजूला पडलेल्या टॉवेलनं अंग पुसलं.

व्यायाम करून करून शरीरातला कणन् कण आता थकला होता. जोनं आरशात पाह्यलं. तेव्हा तो थकवा पाहून त्यानं सुस्कारा टाकला आणि तिथेच तो आडवा झाला... त्याला पटकन डुलकीही लागली... आणि काही मिनिटातच तो नेणिवेच्या जगात पोचला...

...एक काळोखी गार खोली .. अगदीच पूर्ण काळोख नाही .. दिव्याची मंद उघडझाप... तांबूस रंगाचा मऊ प्रकाश कुठून तरी झिरपतोय... संगीताचे सूर जाणवत नाहीएत...पण अंगात लय भिनत्येय भिरभिरणाऱ्या डोळ्यांना ओळखीच्या खुणा जाणवताएत... तो तिथं एकटाच... शरीर तालावर हिंदकळतय .. डिस्को संगीताचा ताल नाही... पण शरीरात भिनलेली लय .. मस्त आहे... पण इथं कोणीच कस नाही ? छे .. कुणीच नाही ! डिस्कोथेक अगदीच रिकामा कसा ?... इथही एकटेपणा .. सोडत नाही ?... प्रकाशाची उघडझाप चालूच... आणि अचानकच... गरागरा फिरणारे प्रकाशझोत खोलीभर पसरतात... त्या प्रकाशाचं निळसर वर्तुळ भिंतीवर चढताना त्याला असंख्य फाटे फुटतात... आणि ऑक्टोपससारखे त्याचे पाय विळविळत खोलीभर पसरतात .. आता खोलीत फक्त दोघ... एक जो आणि वळवळणारा प्रकाशाचा ऑक्टोपस... जोला ऑक्टोपसच अस्तित्व जाणवतं... निश्चय केला तरी लक्ष तिथच जात...भीती वाटत्येय का ? न्... नाही .. तो ओळखीचा ऑक्टोपस... पण त्याचा चेहरा नीट पाहू या .. त्या अस्ताव्यस्त पसरलेल्या पायांमधून त्याला ऑक्टोपसच तोंड दिसेना. प्रकाशाची वर्तुळं नुसतीच गरगरत राह्यली .. आणि क्षणभर एक प्रकाश–ठिपका त्या ऑक्टोपसवरून फिरला आणि त्याच्या मध्यभागी रेंगाळला... हा तर माझाच चेहरा... हा तर मीच... नीट पाहू या पुन्हा एकदा... हे खरं की भास ..? प्रकाश ठिपका विझलाय .. कुठे गेला तो ?... जो त्या खोलीत गरागरा धावतो .. कुठाय तो ? .. हरवला... ! इथ ..?

नाही ? ही तर भिंत हे तर झाड आहे इथं हे काय जाणवतय? हा स्पर्श कोणाचा? कसला ? नीट पाहू या...हा तर गुळगुळीत, चकचकीत पृष्ठभाग...हात सर्रकन सरकतोय ... आणि एक आकृती दिसत्येय ... प्रतिबिंब ? कोणाच ? माझंच ! हो मीच ना तो ? अरे तेही हरवलं...आता आरसाही नाही ! फक्त तुकतुकीत काळीकुट्ट भिंत... त्या भिंतीवरनं हात चाचपडत फिरतात...ही भिंत मघाची नाही...हा निळसर फिका रंग. ही तर आपल्या बेडरूमची भिंत इथच तर आरसा आहे .. जो धडपडून पुन्हा पुन्हा शोधतो ... नाही नाही सापडलेच पाहिजे माझं प्रतिबिंब...चाचपडलं तर नक्कीच सापडत...प्रतिबिंब हवंच...हा येस... सापडला आरसा . जो धडपडून उभा राहतो ...खूप निरखून पाहतो...मी सापडलो .नक्की हे माझंच प्रतिबिंब...याच्यातच मी सापडणारे ... आणि या प्रतिबिंबात हे काय ? हा आपल्या कमरेभोवती हात कोणाचा ? विळखा होणारा हात. लांब मडक निमुळती बोटं...त्याची नीट वाढवलेली नखं ... हा हात.. त्याचा गोरटेला रंग खूप परिचयाचा आहे ... जो अंगाकडे निरखून पाहतो ... अंगावर फक्त अंडरवेअर...कमरेवर हात... आणि कमरेवर तो हात ... बोटांची टोकं त्वचेमध्ये रुतत आहेत ... .. जो हाताकडे पाहता पाहता एकदम चेहऱ्याकडे पाहतो... प्रतिबिंबाच्या चेहऱ्याकडे ...... हा चेहरा कोणाचा, माझा नाही ! कोणाचा हा ग्रीक चेहरा ... नीटस ... राकट...कुठं पाह्यलाय त्याला...मायकेल अँजेलोच्या चित्रातला हा आदम......अर्वाचीन पुरुष आणि हा हात त्याच्या स्त्रीचा...ईव्हचा ! आणि ईव्हच्या हातात हे काय आहे ? लाल गुलाबी... गोल ?...अॅपल ?अॅपलच ना ते ! नाही.. हा तर छोटासा हातरूमाल ... त्यावर ते नाजूक लालचुटूक छोटस फूल...कोपऱ्यातलं . रूमालाचा मंद सुगंध...परिचित.. हवा हवासा....

जो जोरात श्वास घेतो आणि दचकून जागा होतो...डोळे उघडून पाहतो तर खोलीतला दिवा तसाच उघडा.. गपकन् प्रकाश डोळ्यात शिरतो आणि जो डोळे मिटून उभा राहतो...आरशात पुन्हा प्रतिबिंब दिसतं... कमरेवर काही तरी रिकामं वाटतंय ? हातरूमाल कुठाय ? म्हणजे ते स्वप्न ! जो उभा राहतो आणि त्याला जाणवतं, आपल्याला एकदम लैंगिक उत्तेजन झालंय.

जो डोळे चोळत विचार करतो. डोक्यात काहीतरी भिरभिरतय...उत्तर सापडतंय... किती दिवस शोधतोय हे उत्तर ! इट मस्ट बी अपीलिंग ! अपीलिंग युवर इन्स्टिंक्टस् ! तुमच्या आदिम प्रेरणा...प्रत्येक माणसातलं आदिमानवत्व ... प्रत्येक पुरुषाला हवी असणारी स्त्रीची साथ ... प्रत्येक नराची इच्छा...जबर इच्छा...पक्षी असो, प्राणी असो ... माणूस असो. आपल्या मर्दाला प्रसन्न करून घ्यायचं ..आपली ऐट.. आपला रूबाब...साऱ्याच मूळ एकच...ती हवी. तिनं एकदा वळून पहाव...आपला ऐटबाजपणा... .. रूबाब . पहावा ... अंगावरनं हात फिरवावा .. समथिंग व्हेरी एक्सायटिंग .. क्लोज टू मी .. मॅन अँड वुमन .. द इटर्नल इन्स्टिंक्टस् !

बिझिनेस टुडेच्या नरिमन पॉईंटवरच्या लहानशा ऑफिसात बसलेल्या मोहन उदेसिंगनं स्वतःवर खूष होऊन फोन ठेवला. मुंबईचे प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ श्री. पालखीवाला यांनी मुलाखत द्यायचं कबूल केलं होतं. मोहननी त्यांना फोनवरच आपण मुलाखती-

मध्ये कोणत्या स्वरूपाचे प्रश्न विचारणार, त्याची कल्पना दिली. वस्तुत: पालखीवालांनी अनेक वर्ष प्रेसला मुलाखत द्यायचं टाळलं होतं. इंडियन मर्चंटस् चेंबरमधल्या द्वैमासिक बैठकीत त्यांचं भाषण होईल तितकंच; पण मोहननं त्या भाषणांचा रेफरन्स देऊन पालखीवाल्यांना इम्प्रेस केलं, आणि आता ते मुलाखतीला तयार झाले होते.

मोहन वॉज सेट फॉर ब्रिलियंट करिअर. पालखीवाल्यांची एक्सक्लुजिव्ह मुलाखत म्हणजे फीदर इन कॅप ! द मॅनेजमेंट विल बी हॅपी ! अँड मस्ट वी केप्ट हॅपी !

मोहनची बोटं सफाईनं टाइपरायटरवरनं फिरत होती. श्रीचंद मेहराच्या मुलाखतीने त्याचं मुंबईतलं वजन वाढलं होतं. अभिनंदन करणारे फोन..आणि त्यापेक्षा प्रेसक्लबमध्ये मिळणारे कुत्सित कटाक्ष ही त्यांची पावती होती.

मोहन उदेसिंग अगदी तरुण होता. वय जेमतेम सत्तावीस. इकॉनॉमिक कॉरस्पाँडंट म्हणून 'इकॉनॉमिस्ट'पर्यंत पोचायची जबर इच्छा...पत्रकारितेची आवड...म्हणून अकौंटंटच्या चांगल्या नोकऱ्या लाथाडून तो इथं शिरला होता, ते खूप वरपर्यंत पोचायच्या इर्षेनेच.

मोहन पंधरवड्यातल्या शेअर्सच्या चढत्या उतरत्या भावांवर कॉमेंट टाइप करताना पुन्हा एकदा फोन वाजला.


मोहननं हात लांब करून फोन उचलला.

फोन दिल्लीहून आला होता. एसटीडी कॉल...श्रीमती मोहिनी अग्रवाल ऑन दी लाईन.

श्रीमती मोहिनी अग्रवाल प्रोप्रायटर 'द इंडिअन प्रेस अँड पब्लिकेशन्स' यांची आणि मोहनची भेट अजून झालेली नव्हती... कारण मोहनचा या पोस्टकरता इंटरव्यू झाला तेव्हा मोहिनीबाई प्रोप्रायटर झाल्याच नव्हत्या. त्यावेळी श्री. अग्रवाल–वय ८५ वर्षे जिवंत होते; पण दोन महिन्यापूर्वीच त्यांचं निधन झालं आणि मोहिनीबाईंनी प्रोप्रायटरशिप घेतली होती.

मोहिनीबाई 'बिझिनेस टुडे' आणि 'इंडियन डेली' या प्रचंड खपाच्या साखळी वर्तमानपत्राच्या चालक आणि मालक होत्या.

'होल्ड ऑन...मॅडम अग्रवाल ऑन दी लाईन !' अत्यंत स्पष्टपणे दक्षिणी उच्चार




असलेल्या सेक्रेटरीनं मोहनला सांगितलं आणि मोहनच्या काळजाचा एक ठोका त्यांनी दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला तरी चुकलाच. मोहनला क्षणार्धात दोन महिन्यातली मोहिनीबाईची कारकिर्द आठवली...

महत्त्वाकांक्षी, हाताखालच्या स्टाफला मॅन्युप्लेट करण्यात पटाईत...उर्मट वाटेल इतका आत्मविश्वास...त्यांनी प्रोप्रायटरशिप घेतल्यावर 'इंडियन डेली' चं नाव जगभर गाजवणाऱ्या श्री. अरुणनी तडकाफडकी दिलेला राजिनामा.

मुंबईच्या ऑब्झरवरनं त्याला जबर कव्हरेज दिलं. त्या आठवड्यात जिकडे तिकडे फक्त अरुणचीच चर्चा. मोहिनी ग्रेटेस्ट मॅनिप्युलेटर !

मोहन या साखळी वर्तमानपत्राच्या प्रचंड साम्राज्यातला एक लहानसा घटक. या सगळ्या साधारणपणे 'घुमसटून टाकल्या जाणाऱ्या' वातावरणाचा त्याला अजून जाच झाला नव्हता. वृत्तपत्रमालक आणि संपादक यांचे संबंध...संपादकीय स्वातंत्र्य...यात आपण काय स्टँड घ्यावा हे अजून मोहनला कळलं नव्हतं.

श्रीमती मोहिनी अग्रवालचा साधा सरळ आवाज कानावर आला आणि मोहन लक्षपूर्वक ऐकू लागला. फोन दोन-तीन मिनिटंच झाला. त्यांनी मोहनला श्रीचंद मेहराशी झालेल्या सगळ्या बोलण्याच्या नोटस्, कॅसेटस् घेऊन उद्या सकाळीच दिल्लीला बहादूर शहा जफर मार्गावरच्या कॉर्पोरेट ऑफिसात बोलावलं.

आणि आता मोहन श्रीमती मोहिनी अग्रवालच्या प्रशस्त केबिनमध्ये शिरत होता. त्यांच्या खुर्चीमागे असलेला इंडियन डेलीच्या रोजच्या अंकाच्या खपाचे विविध आकडे होते. मोहिनी अग्रवाल आणि अनेक देशीविदेशी प्रसिद्ध व्यक्तींबरोबरचे फोटो होते. मोहन त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसला आणि लक्षपूर्वक ऐकू लागला,

मोहिनी अग्रवाल यांचं व्यक्तिमत्त्व सौम्य होतं, तरी त्यांच्या सोनेरी काडीच्या चष्म्यामागच्या डोळ्यामध्ये कमालीचा रोखठोकपणा होता

'श्रीचंदची मुलाखत तू छापलीस. अभिनंदन. मला तुझ्यामध्ये एक यशस्वी पत्रकार दिसतोय. मुलाखतीच्या निमित्तानं तुम्ही

अनेकदा भेटलात असही तू म्हटलयस. ओव्हर ब्रेकफास्ट, डिनर वगैरे एकूणच तुमची मैत्री झालेली दिसली. यातलं टेप झालेलं सभाषण म्हणजे ती मुलाखत. राइट!'

मोहनने मान डोलावली.

'मला संपूर्ण बोलणं ऐकायचंय. वर्ड टू वर्ड. ओमिटींग नथिंग.'

'मी कॅसेटस् आणलेल्या आहेत.' असं म्हणून मोहनन हातातल्या लेदर पाऊचमधन दोन कॅसेटस् काढल्या.

मोहिनीबाईनं चष्मा काढला आणि पुसून पुन्हा चढवला.

'मला मूर्ख समजतोस की काय? मला तुमच ऑफ दी रेकॉर्ड बोलणं ऐकायच आहे. नॉट दीज कॅसेटस्' त्यानी कॅसेटस्कडे बोट दाखवून म्हटलं.

'बट् मॅडम् दॅट वॉज कॉन्फिडेन्शिअल.'

मोहिनीजी आपल्या टेबलावर पुढे वाकल्या आपले कोपरे टेबलटॉपवर ठेवून त्यानी मोहनकडे रोखून पाह्यलं.

मोहनच्या छातीत एकदम कलकलल. हाताला घाम सुटतोय असं वाटल,आणि त्या थंड हवेतही त्याच्या टेबलावरच पाणी गटकन् प्यावस वाटल. यालाच मालक–पत्रकार सबध म्हणतात का? इज धिस व्हॉट इज मेण्ट बाय मॅनिप्युलेशन! शी इज थ्रेटनिंग मी ऑर व्हॉट! त्याला काय कराव समजेना.

श्रीमती मोहिनी अग्रवाल याच्या लहान–खुऱ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखणं कठीण होतं. पण क्षणभरातच त्यानी पवित्रा बदलला. त्याच्या चिंचोळया जिवणीवर स्मित होतं.

'मोहन, तू रिझाइन करायचा विचार करतोयस की काय? होय ना!'

आणि आता तर त्या जिवणी रुदावून हसत होत्या.

'तो रस्ता बंद करू शकते मी. मी तुला कुठेही रिस्पेक्टेबल जॉब मिळणार नाही याची खात्री देते आणि फॉरिनला जायचा विचार करशील तर त्याही मार्गात अडथळा आणू शकते. अगदी सहज तुला फक्त तालुका पातळीवरच्या फुटकळ लगोटी वर्तमानपत्रात क्षुल्लक उपसपादकीय नोकरी मिळेल.' अस म्हणून त्या थाबल्या. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव आता पुन्हा कठोर झाले.

'इथं राह्यलास तर मात्र ब्राइट करिअर आहे आम्हाला आंतरराष्ट्रीय आर्थिक परिसवादाकरिता एक इकॉनॉमिक कॉरस्पॉंडट हवाय. पंतप्रधानाच्या विदेशी दौऱ्याबरोबरही आपला एक पत्रकार असतोच. आय थिंक यू स्टॅंड गुड चान्स!'

मोहन आता या नव्या विचारात पुरता गर्क झाला होता. त्याला काय बोलायचं कळेना प्रॉस्पेक्टस् चागले होते. अँड शी मीन्स एव्हरी वर्ड शी सेज, इनक्लुडिंग द प्रेज अँड प्रॉमिस!

इतक्यात फोन वाजला. मोहिनीबाईंच्या कपाळावर आठ्या पडल्या.

'मला वाटतं मिस्टर रवींद्रन,मी तुम्हाला स्पष्ट शब्दात बजावल की मला डिस्टर्ब करू नका म्हणून. कळतं ना तुम्हाला इंग्रजी! की मला तमिळ शिकायला हवं! ओके ..

'कोण? मिस्टर पाठक! ज्युनिअर पाठक! मग आधी का नाही सांगितलत. पुट हिम थ्रू...

...ओ हॅलो जी! कैसे हैं आप!

'हा जी!'

'हा जी!'

'बराबर, येस ही इज राइट हिअर. नो प्रॉब्लेम...ओह् येस्. आज शामको ही मिलेंगे हा जी! ठीक है वही मिलेंगे!'

मोहिनीजीनी फोन ठेवला आणि मोहनकडे पाह्यल.

मोहनला अजूनही त्यांच्या बोलण्याचा सदर्भ लागला नव्हता. ज्युनिअर पाठकना मी इथं आल्याच सागितल,' त्या अर्थी तोच या प्रकरणामागे आहे शी इज यूजिंग मी अॅण्ड सम वन इज यूजिंग हर... सो... व्हॉय नॉट?

'ओके. मॅडम्' मोहन म्हणाला. 'हिअर आर द फॅक्ट्स!'

'इथ नाही मोहन. संध्याकाळी इथच परत ये. आय शॅल पिक यू अप आणि आपण पाठकना भेटू तेही इथ नाही. सम व्हेअर एल्स. ओके!'

मोहन उदेसिंग,अग्रवालजी आणि पाठकजी बरोबरची भेट उरकून मुबईला विमानानं एअर बसनं परतला. तेव्हा त्याला अपरिचित अशी अनेक माणसं त्या प्रचंड विमानात होती. मोहनची संध्याकाळची भेट व्यवस्थित झाली. लेक हाउसचं विस्तीर्ण लॉन...डेकचेअर्स...सोबतीला बिअर.मोहन रात्री उशिरा हॉटेलवर परतला आणि पहाटेचं विमान पकडून मुबईला परतत होता. मोहिनीजीनी या कामाकरता विमान प्रवास, थ्री स्टार हॉटेलचा खर्च बोलावतानाच मान्य केला होता

मोहनन पाय लाब करून आळस दिला. तासभराची डुलकी त्याला लागली आणि प्रथमच त्याच आपल्या शेजारच्या प्रवाशाकडे लक्ष गेल.

साठीच्या आसपास असलेला तो गृहस्थ हातातली बॅग घट्ट धरून बसला होता आणि त्याच्या चेहऱ्यावर चिंताग्रस्त भाव होते. त्यांना मिनिटभरही चैन पडलं नव्हतं.

मोहनन तिरका कटाक्ष टाकून त्या प्रवाशाकडे पाह्यल. त्यांचा चेहरा, चेहऱ्यापेक्षा चेहऱ्याची ठेवण त्याला परिचित वाटली. मोहननं खूप विचार केला. त्याला आठवेना. थोडया वेळानं तो या प्रवाशाला विसरूनही गेला.

मोहनच्या शेजारी बसलेला हा प्रवासी म्हणजे श्री. खूपचद मेहरा होते.

विमान मुंबई–विमानतळावर पोचलं. आणि प्रवासी घाईघाईन विमानतळावरनं बाहेर पडले. खूपचद आपल्या शोफर ड्रिव्हन गाडीत बसले आणि मोहन टॅक्सीत बसला.

श्री. खूपचंदनी गाडी कफ परेड ऐवजी श्रीचंदच्या जुहूच्या फ्लॅटकडे घेण्याची सूचना दिली आणि ते गाडीत आरामात विसावले. त्याना कधी एकदा श्रीचंदशी सगळया गोष्टी बोलून टाकतो असं झालं होतं.

खूपचंदना काळजी वाटावी असं काही दिल्लीला गेल्या चार दिवसात घडलं होत.

मेहरा कंपनीचं सत्ताधारी पक्षात वजन होत. निवडणुकीच्या वेळी आणि वेळोवेळी स्थानिक, राष्ट्रीय नेत्याच्या षष्ठब्दपूर्तीच्यावेळी निघणाऱ्या स्मरणिकांमधनं भरघोस जाहिराती ते देत असत. त्याच्या जोरावर त्यांना सरकारी कत्राटं मिळत.

पण खटपट करूनही खूपचदना सत्ताधारी पक्षाच्या अत्युच्च मत्रीगणाशी सरळ संपर्क साधता आला नव्हता त्यांचे ते प्रयत्न फसले होते आणि मग त्यांच्या लक्षात आल की आपल्याला कोणाशीही सरसंधान बांधता येऊ नये म्हणून आपल्याच 'मिडलमॅननं' केलेले

प्रयत्न यशस्वी होत आहेत.

तसं करण्यामागे मिडलमॅनचा स्वार्थ होता. त्याचं कमिशन बुडल असतं!

मेहरा यावेळी दिल्लीला ग्रेटर कैलाश-मधल्या छड्डांच्या दुमजली घरात अशीच कामं घेऊन गेले होते. छड्डा हे त्यांचे मिडलमॅन. मंत्री–त्याचे चिटणीस, यांच्याकडे छड्डांचा मोठा लग्गा. छड्डानी त्याची कामं दोन महिन्यापूर्वीच यथास्थित करून दिली होती. त्यामुळेच त्यांची नवी फॅक्टरी मार्गी लागली होती आणि अशीच उरलीसुरली कामं घेऊन मेहरा छड्डाकडे गेले होते

पण छड्डांचा पत्ताच नव्हता. छड्डा काही कामानिमित्त परदेशी गेले, आदल्या रात्रीच, असं त्यांना सांगण्यात आलं; पण मेहराचा त्याच्यावर विश्वास बसेना कारण दोन दिवसापूर्वीच तर फोनवर बोलणं झालं होतं आणि ही भेट निश्चित झाली होती.

मेहरा निराश होऊन छड्डाच्या बगल्यातनं बाहेर पडले आणि त्यांना दारातच छड्डांच्या सहाय्यकानं गाठलं ह्याचं नाव चोप्रा. छड्डाच्या पुढेमागे करण्यात, त्यांची बॅग साभा-ळणे, फोन लावून देणे, असली कामं करताना या चोप्राला मेहरानी पाह्यलं होतं. त्याला किंचितसं ओळखलं आणि मग चोप्रा त्यांना तिथन पुन्हा जनपथपर्यंत सोबत करीत आला आणि वाटेत त्यांनी दोन दिवसात घडलेल्या घटना सागितल्या.

छड्डा हे मेहरांच्या दृष्टीनं मिडलमॅन असले तरी ते आपली सगळी कामं, द्वारका-धीश स्वामी म्हणून पंतप्रधानाच्या निकट-वर्तीयापैकी एक, त्यांच्यामार्फत करून घेत या द्वारकाधीश स्वामी महाराजाच्या चरणी समस्त मंत्रीगण लागलेले असत. या स्वामी-जीच्या मठावर अचानक सीबीआयची धाड पडली आणि ते सीआयएचा हस्तक असल्याचं बोलल जाऊ लागलं द्वारकाधीश स्वामीना या धाडीची पूर्वसूचना मिळाली. त्यांनी आपल्या गोटातल्या निकटवर्तीयाना फोन केला आणि छड्डा गायब झाले.

मेहरानी चोप्राची सगळी गॉसिप स्टोरी ऐकली आणि त्यांनी काढायचा तो निष्कर्ष काढला. आपला सरकार दरबारातला हुकमी एक्का नष्ट झालेला आहे स्वामीजी परत दिल्लीत कधी अवतरतील याचा नेम नव्हता. चोप्रानं पुन्हा पुन्हा सांगितलं की स्वामीजीचे हात इतके वरपर्यंत पोचले होते की, त्याच्या-वर कारवाई करणे सरकारला फारच महा-गात पडेल आणि स्वामीजी महिनाभरातच परततील. छड्डाजीही येतील आणि सगळं सुरळीत होईल

चोप्रानं आपला असिस्टन्स दिला. मेहरांची कामं झाली; पण चोप्रा वॉज ए स्मॉल फ्राय. त्याच्या मदतीनं काय काय करता येणार?

खूपचंद मेहरा अतिशय अस्वस्थ झाले आणि...

'दॅटस् द स्टोरी!' खूपचंदनं कॉफीचा कप टेबलावर ठेवत म्हटलं.

श्रीचंदनं त्याच्याकडे पहात टेबल नॅप-कीननं आपले ओठ टिपले आणि तो उठून उभा राह्यला.

खूपचंदचा अस्वस्थ चेहरा, त्यांच्या नजरे-तली विवशता पाहून श्रीचंदही अस्वस्थ झाला आणि फेऱ्या घालू लागला.

खरं म्हणजे ज्यु. पाठकानीही नवी ब्लेड बाजारात आणायचं ठरवलय आणि त्याच कामंही जबरदस्त वेगानं चाललय, याची त्याला कल्पना होती; पण त्याला मनात एका कोपऱ्यात बरं वाटल होतं.असं वाटल, मोनो-पॅलीत काम करण्यापेक्षा स्पर्धा चांगली. इट कीप्स यू ऑन दी टोज्! म्हणजे आपल सगळ कौशल्यच पणाला लागतं. तुमची बुद्धी, चातुर्य, प्रत्येक मूव्ह ही जबर चलाखीने करावी लागते... दॅटस् द फन!

खूपचंदना त्यानं अजून आपल्याला लाग-लेली बातमी सांगितलेली नव्हती. पण त्यानी दिल्लीहून आणलेली बातमी विचित्र होती. आधार तुटल्याचं फीलिंग देणारी होती.

खूपचद मेहरा फेऱ्या घालणाऱ्या श्रीचदच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात होते आणि अस्वस्थपणाचा नवा झटका त्याना आला. त्यांनी आयुष्यात अनेक चढउतार पाह्यले होते. नव्हत्याचं होतं आणि होत्याचं नव्हतं होताना पाह्यलं होत. चारदोन वर्षांपूर्वी हिंदी फिल्ममध्ये पैसा गुतवून खाल्लेली आपटी ते विसरू शकत नव्हते. आजचं हे साम्राज्य, हे वैभव, नोकरचाकर, गाड्या–घोडे हे क्षणा-र्धात नष्ट होऊ शकेल असं त्याना वाटलं. ते उभे राह्यले.

श्रीचदला हाक मारून म्हणाले,

'ठीक है बेटे, जो होता है सो देख लेंगे' आणि आपल्या आवाजातल्या त्या आश्वा-सक टोनमुळे त्यांनाच नवल वाटलं.

दोघंही श्रीचदच्या इमारतीमधनं बाहेर पडले गाडीत बसेपर्यंत दोघंही अबोल राह्यले; पण गाडीत बसता बसता वळून त्यानी श्रीचद-कडे पाह्यलं आणि म्हटल,

'वी हॅव टु बी व्हेरी केअरफुल बबलू, दे कट विथ शार्प एज!'

मोना लगबगीनं दार उघडायला बाहेर आली. शमाच आली असेल कारण तीच यायची बाकी होती. बाकी सगळेजण आले होते. आणि साडेआठ वाजले तरी तिचा पत्ता नव्हता. शमावाचून अडलं होतं असं नाही; पण शमा, गौतम आणि मोना याचा जेजेला मोठ्या ग्रुपमधला अधिक इण्टिमेट असा छोटा ग्रुप होता. आणि गौतमला छोटीशी पार्टी म्हणून मोनानं मुद्दाम तिला फोन करून बोलावल होत. अजूनपर्यंत आली नाही म्हणजे बहुतेक अस्लमकडे परत गेली असणार. अस्लम म्हणजे शमाचा वीकनेस होता. किती समजवावं पोरीला या, असं मोनाला वाटलं. दरवेळी अस्लमकडनं निघून येताना परत त्याच कधी तोंड पाहणार नाही असं म्हणायची आणि दोन दिवसानी येरे माझ्या मागल्या.

गौतम तर आल्या आल्याच म्हणाला,

'ती कसली येते ग? एक नंबरची मिश्री आहे एकटं राहायचं म्हणजे हिम्मत लागते, आणि मोना हे तुला सांगायला हव.'

मोना आता दार उघडत होती आणि तिला आश्चर्याचा धक्काच बसला.

'अरे?! तू? तू कसा काय आलास आणि माझा पत्ता कुठून मिळाला तुला?'

मोनान प्रश्नांचा भडिमार केला आणि दरवाजात उभ्या असलेल्या जो मिरांडाला बावरायलाच झालं.

'अरे आत ये ना बाहेर का उभा आहेस?' असं म्हणून त्याचा हात धरून मोनानं घरात घेतल आणि दरवाजा लावून घेतला.

मिरांडा अगदी अचानकच तिच्याकडे आला. मोनाला आश्चर्य वाटणं साहजिकच होतं. तो तिला न कळवता, काहीही आगाऊ सूचना न देता आला होता. संध्याकाळी मोना लवकरच निघाली होती आणि जो एका क्लाएंटबरोबर बसला होता. त्यामुळे तिनं इंटरकॉमवरनं 'जाते' एवढंच त्याला

सागितलं होतं.

मिरांडा सध्याकाळी घरी आला आणि त्याला पुन्हा एकदा एकटेपणानी घेरलं. आतापर्यंत कोणत्याच कॅम्पेननं त्याला इतकं हैराण केलं नव्हतं. मोनाची मदत होती. म्हणूनच आपण हैराण झालोय, असंच त्याला वाटलं. या ॲडमुळं आपण मोनाला जिंकून घ्यायचंय अस त्याला प्रथमपासनं वाटल आणि त्यामुळे कोणतीच कल्पना त्याला बरी वाटायची नाही. परवाच्या स्वप्नातली प्रतिमा मात्र त्याला पुन्हा पुन्हा आठवत राह्यली. आणि त्या प्रतिमेतच ॲडची व्हिज्युअल आयडिया आहे हे त्याला उमगल आणि प्रतिमेमधला स्त्रीचा हात म्हणजे आपल्याला विळखा घालणारा मोनाचा हात हे त्याला जाणवल आणि तो पुन्हा हैराण झाला.

'नाही, हे मोनाला सांगायलाच हवं'त्यानं बाल्कनीत उभ राहून ठरवल आणि कपडे बदलून चौथ्या मिनिटाला तो इमारतीबाहेर पडला तेव्हा साडेसात वाजले होते.

वरळी सी फेसच्या मुख्य रस्त्याला जाऊन भिडणाऱ्या रस्त्यावरनं तो चालू लागला. महापालिकेन रस्त्याच्याकडेनं लावलेली रोपटी त्याला दिसली. झाडं अशी डोळ्यासमोर वाढताना पाहणं त्याला आवडायच.

'द प्रोसेस ऑफ ग्रोथ इज एन्जान्टिंग' त्यान एका कॉपीत म्हटलं होतं. आज ते आठवूनही त्याला उत्तेजित वाटल नाही.

तो चालतच राह्यला.

समोरच्या झगझगीत प्रकाशाच्या बाकदार हॉर्नबी वेलार्डला वळसा घालून तो चालत राह्यला; पण त्या प्रखर प्रकाशापेक्षा पलीकडचा काळोखी समुद्रच त्याच्या मनाला अधिक भावत होता. स्वतःला दमवत दमवत तो हजीअली जंक्शनवर आला आणि त्यानं ताडदेवचा रस्ता धरला.

एका सिग्नलपाशी त्याला थबकलेलं पाहून अंधारातनं एक स्त्री पुढे झाली. त्या अंधारातही तिच्या चेहऱ्यावरचं चिकट स्मित त्याला दिसल

'हॉटेल रोझ' असं ती पुटपुटली आणि त्याला खुणावत अंधारात पुन्हा गडप झाली.

त्या दृश्यानं जोच्या अंगावर शहारा आला. होस्टेलला राहात असताना त्याचे मित्र त्याला अनेकदा वेश्यांबरोबर त्यानी केलेल्या करामतीचं रसभरीत वर्णन पकडून पकडून ऐकवायचे; पण 'सेक्स फॉर दी सेक सेक्स' या विचारान तेव्हाही त्याला किळसच वाटायची. त्याचे मित्र त्याला आग्रह करायचे, पण जोला कधीच जावसं वाटल नाही. त्याला उत्सुकता नव्हती अस नाही; पण जिथं कम्पॅनिअनशिप नाही तिथं सेक्स नाही असा त्याचा हिशोब होता. आणि जिथे सेक्स हा कम्युनिकेशनचा एक मार्ग नाही तिथं रिलेशनशिप नाही. बरोबरीचं नातं नाही. माणूस आणि माणूस असा सबंध नाही. आय वॉन्ट समवन इक्वल टू मी ! असं कोणी नसल तर एकटेपणाही परवडला. जो तिथन जोरात निघाला आणि मग आठवून आठवून मोना त्या दिवशी गाडीतन उतरली तो कोपरा शोधला. मग फिरोजा मॅन्शन कुठेय विचारताच त्याला अगदी आतपर्यंत कोणीतरी आणून सोडलं आणि आता जो मोनाकडे पहात उभा राह्यला होता.

'अरे बस ना !' दिवाणावर पडलेली वर्तमानपत्रं, मासिकं उचलून मोनानं त्याला बसायला सांगितलं.

'इटस् मेस ऑल ओव्हर' म्हणून ती तिथल्या तिथ जरा आवरू लागली.

जोनं 'आय ॲम सॉरी फॉर बार्जिंग इन !' असं म्हटल पण ते मोनाला ऐकू गेलं नाही, कारण तेवढ्यात

'कोण आलं ग ?' असं म्हणत मोनाचा मित्र गौतम आठवले दरवाजात येऊन उभा राह्यला आणि जो दिसल्यावर चकित होऊन पहातच राह्यला.

मोनाला जाणवलं 'धिस रिक्वायर्स हॅन्डलिंग'

'गौतम, मीट जो. जो मिराडा. माय बॉस ! ही वॉज सपोज्ड टू जॉईन टुडे !'

'जो, मीट गौतम. तुम्ही ओळखता? जो गौतम इज इन लिंटास.'

'अ...म् हो.. मी पाह्यलंय त्यांना.' जो अडखळत म्हणाला.

त्याना त्या खोलीत बसवून मोना आत सटकली.

गौतम आणि जो दोघं गप्पा मारत बसले. गप्पाना 'ॲपेला'च्या फेल्युअरशिवाय दुसरा विषय नव्हता.

मोना पुन्हा बाहेर आली ती तोंडबिंड धुवून. कपडे बदलून. तिनं सुती धुवट रंगाची साडी नेसली होती आणि केस विंचरून मागे घट्ट आबाडा घातला होता. येताना तिच्याबरोबर एक मुलगीही होती. त्यानी येताना जेवणाचे पदार्थही आणले होते.

गौतमनं पुढे होऊन ट्रे टीपॉयवर मांडले आणि तिघानी मिळून फर्निचरची मांडणी केली आणि मोनान जोच्या हातात डिश दिली.

'सुलभा, मीट जो, माय बॉस !'

'नो, हर फ्रेंड' जो एकदम म्हणाला आणि मोनान त्याच्याकडे चमकून पाह्यलं आणि आपलं असं पाहाणं त्या दोघाच्या लक्षात येईल म्हणून लगेच नजर दुसरीकडे वळवली.

'आम्ही दोघं लग्न करतोय आणि मोना आम्हाला पार्टी देतेय. 'केळवण' म्हणताना तुम्ही भटं?' गौतम सुलभाकडे पहात म्हणाला.

मोनान दोघाकडे पाह्यलं आणि ती हसली.

जो त्या तिघाकडे पहात होता. तिघं मोकळेपणी बसून गप्पा मारत होती. इन्फॉर्मल ...कॅज्युअल.

जोला हळूहळू अंदाज येत होता. ती दोघंही मोनाशी जवळकीनं बोलत होती आणि मोना त्याना पेट्रनाइज करत्येय असंही त्याला वाटलं.

'मोना पक्की पारशीण झालीस हं

'सूप, हॉट डॉग्ज, सॅंडविच सगळा पारशी बेत आहे. मला वाटलं कोंबडीबिमडी करशील ?'

'नाही हं. कोंबडी कोण करणार? अरे किती वेळ जातो. मला नाही आवडत. हे बरं आपलं सुटसुटीत. सुलभा काही ऐकू नकोस याचं. तू पण असंच कर काही तरी.'

'नाही हं' सुलभा किंचित गंभीरपणे म्हणाली. 'मी सगळा स्वयपाक करीन. अगदी साग्रसगीत. गौतमला आवडतो तस्सा !'

मोना सुलभाकडे पहात म्हणाली,

'तसं वाटतं ग तुला. पण वर्षभरात कटाळशील आणि सुलभा, हौशीनं करणं वेगळं आणि जबरदस्तीनं करणं वेगळं. आणि गौतम आज म्हणतोय हे कर ते कर म्हणून, तो ही कंटाळेल तू स्वैपाकात अडकलीस तर. नाही तर काय?' मोनान नकळत जोकडे नजर टाकली.

जो संभाषणात फारसा भाग घेत नाहीए असं वाटून मोना म्हणाली,

'जो, प्लीज बी कम्फर्टेबल्. तुला कपडे बदलून हवेत का? लुंगी देऊ? त्या तुझ्या टाइट जिन्समध्ये अनकम्फर्टेबल वाटत असेल.'

जो सेल्फ कॉन्शस होत म्हणाला,

'नको.'

इतक्यात गौतम म्हणाला,

'मोना, त्या दिवशी तू का नाही आलीस? झानुसीची फिल्म इतकी छान होती. इट वॉज वंडरफुल. सुलभाला नाही आवडली अर्थातच. पण मी तिला म्हटलं, म्हणजे सुलभाला पक्की मार्क्सिस्ट आहेस म्हणून,'

'अरे त्या दिवशी मला ऑफिसात खूप काम होतं, म्हणून आम्ही दोघंही थांबलो होतो.' जोकडे पहात मोना म्हणाली.

मिरांडाला एकदम आठवलं. हां म्हणजे हा फोन करायचा होता होय तिला आणि तिनं आपला ठरलेला प्लॅन मोडला. आवडती फिल्मही सोडली!

मोना जोकडे पहात म्हणाली,

'झानुसीच्या फिल्म पाह्यल्याएस ना तू जो!'

जोनं होकारार्थी मान डोलावली.

'दे आर ग्रेट. पण कधी कधी वाटतं, व्यक्तित्ववादाला ही काही मर्यादा आहेतच ना. माणसानं किती स्वतःच्या गुहेत राह्यचं. आय मीन मॅन इज ए सोशल ॲनिमल. अगदी सोशल नसला तरी कोणाबरोबर तरी रिलेशनशिप हवी. व्यक्तित्ववाद खराच पण एकटेपणा, व्यक्तित्ववाद हा कोणाच्या तरी संदर्भातच असतो ना. मला नाही पटत इतका व्यक्तित्ववाद. हे म्हणजे कोणाशी रिलेट करायची तुम्हाला भीती वाटते म्हणून तुम्ही एकटे राहता. हा सगळा युरोपिअन प्रकार मला अजून काही खोलवर पटत नाहीए.'

'नाही तर काय?' सुलभा पटकन म्हणाली. 'मला तर हा सगळा न्युरॉटिकपणा वाटतो. तुम्ही व्यक्ती म्हणून स्वतःला किती आक्रसून घेणार. तुमचा आणि सोशल सिस्टिमचा काही संबंध आहे की नाही. तुम्ही त्या सिस्टिमच्या शोषणाशी कसलीच बांधिलकी मानीत नाही का? हे स्वतःचं असलं कौतुक म्हणजे कॅपिटॅलिस्ट विचार झाले.' सुलभा आणखीनच फणकारली.

'बघ, मी म्हटलं नव्हतं तुला? ही मार्क्सिस्ट आहे म्हणून. एकदा मार्क्सवादाशी लग्न केलंत की पती हा परमेश्वर तसा मार्क्सवाद सगळ्यांचाच बाप तुम्ही मानायला लागता. कसलं पर्स्पेक्टिव्ह येत नाही. आता शमा अस्लमकडे पुन्हा पुन्हा राहायला जाते याचं कारणही सुलभा तू आर्थिक शोषणाच्या पातळीवरनंच देतेस ना!'

सुलभानं आणखीन फणकारून मान हलवली.

मोना म्हणाली,

'हे मात्र चुकीचं आहे हं सुलभा. शमाचं एका अर्थाने बरोबर आहे. ती एकटी राहू शकत नाहीए आणि इन स्पाइट ऑफ एवरीथिंग शी स्टिल लव्हज् अस्लम. त्यामुळे त्यानी वाईट वागवलं तरी ती परत जातेच आणि अस्लमचंही तिच्यावाचून अडतंच ना आणि एकटं राहाणं कठीण असतं रे. अर्धीमुर्धी, फाटकी तुटकी रिलेशनशिप घेऊनही माणसं जगत राहतात. ती संपवण्याची हिंमत होत नाहीए. शमा आणि अस्लमचं असंच काही तरी तिरपागडं झालंय. त्यापेक्षा ना, खरं म्हणजे सगळं संपवलेलं बरं'

'मोना, त्याबाबतीत मी तुला फारच मानतो बुवा. यू आर करेजिअस्!'

जोनं मोनाविषयीचे हे उद्गार ऐकले आणि मोनाकडे त्यानं पुन्हा पाह्यलं. मोनानं अत्यंत सरळपणे त्याच्या नजरेला नजर दिली. कोणत्याही प्रकारचा सेल्फ कॉन्शसनेस त्यात नव्हता. मोना अशी त्याला आज प्रथमच दिसली. मोनाचं घरातलं हे रूप आणि तिच्या पार्श्वभूमीविषयीचे सूचक उद्गार...त्याला सगळंच नवं, लोभस, हवंहवंस, आकर्षक.

आणि प्रथमच जोनं संवादात भाग घेतला.

'खरंय तू म्हणत्येस ते मोना. एकटं राहाणं सोपं नाहीए. तुम्हाला खूप स्वातंत्र्य असतं. बट इटस् टू मच ऑफ रिस्पॉन्सिबिलिटी. तुम्हाला अगदी आतून कम्पॅनिअनशिप हवी असते. मुंबईसारख्या शहरात हे स्वातंत्र्य मिळू शकतं. तुम्हाला हवी तशी ॲनॉनिमिटी मिळते; पण त्यामुळे एकटेपणाही वाट्याला येतो. ते... ते फारच कठीण असतं. आय... आय नो इट सो वेल!'

जोनं मोनाकडे पाहून म्हटलं. जोच्या उत्तरामुळे मोना अधिकच विचारात पडली. जोविषयी आपल्याला जाणवतं ते खरंय. ही इज टू लोनली. पण आपण केवळ लोनली आहोत, एकटेपणानं हैराण झालोत म्हणून कोणाचाही हात जो पकडेल की... ही शॅट वेट फॉर द राइट पर्सन!...

आता बरेच वाजले होते. गौतम आणि सुलभा उठून उभे राह्यले आणि मोना भानावर आली.

गौतम मोनाकडे पाहून म्हणाला,

'चलतो आम्ही आता. बापरे, इथनं टॅक्सीनं भायखळा. तिथनं सुलूला कल्याण फास्ट, मला कुर्ल्याला उतरून बस पकडायची. लॉंग वे टू गो!'

मोनानं लगेच आवराआवरीला सुरुवात केली.

'गौतम, शमाला सोमवारी परत फोन करून बघ आणि भेटू या.'

'अच्छा, मोना'

'बरंय सुलू.'




'बाय जो, बाय मोना.'

मोनान दार लावून घेतलं. जो आत दिवाणावर बसून होता. आणि तिनं लगेच ट्रे, भांडी आत न्यायला सुरवात केली. मोनाच्या हालचालीकडे पहात जो म्हणाला,

'आय अॅम सॅारी मोना, तुमच्या अगदी प्रायव्हेट गेट टुगेदरमध्ये मी उगाचच...'

मोना टीपॉयवर वाकली होती आणि कॉफीचे कप उचलत होती. त्याच्याकडे रोखून पहात म्हणाली.

'जो, डू यू मीन व्हॉट यू से !'

जो तिच्याकडे पाहातच राहिला. तिच्या कपाळावर सूक्ष्म आठयांचं जाळं पसरलं होतं; पण त्याक्षणी ती त्याला अधिकच आवडली.

'नो, आय डोंट मीन इट !'

'देन जो, से व्हॉट यू मीन. नो फॉर्मेलिटीज. प्लीज. आय अॅम टायर्ड ऑफ देम !'

जोला आता राहावेना. तो उठून उभा राहिला.

'मोना, आय काण्ट से व्हॉट आय मीन!' असं त्यान 'से' वर जोर देत म्हटल... आणि... मोनाच्या जवळ तो आला...

.. 'आय मीन धिस.' अस म्हणून त्यान मोनाचे दोन्ही हात धरले, आणि तिच्या कपाळावर हलकेच ओठ टेकले.

'मोना, यू मीन लॉट टू मी !'

'टेल यू व्हॉट ? मी इथ कशाला आलो माहित्येय. हेच सांगायला मोना तू माझ्या मनातल्या अगदी आतल्या गूढ प्रेरणा जागवत्येस. यू अपील टू माय बेसिक इमोशन्स. धिस हॅड नेव्हर हॅपण्ड इन द पास्ट. मोना माझं कॅम्पेनचं काम होत नाहीए. कारण प्रत्येक कल्पना तुझ्यापाशी येऊन रेंगाळते आहे. मोना...' अस म्हणून त्यान मोनाला जोरात मिठी मारली आणि तिचे केस ओढून तिचा चेहरा आपल्या चेहऱ्यापाशी आणला... तिच्या ओठांवर आपले ओठ टेकले...

'मोना...यू आर द ओन्ली वन हू अपील्स टू मी... अॅज ए फेलो ह्यूमन बीइंग.. एक नर म्हणून नाही...

.........

पण हे सगळं केवळ कल्पनेतच राहिलं. जो म्हणाला... आय काण्ट से... आणि तिथंच खिळून राहिला. मोनाजवळ जाऊन तिला स्पर्श करणं. तिला कवेत घेण...तिच्याबरोबर...सेक्स ... इट्स् लाईक इनसल्टिंग हर.. हर स्पिरीट... हर सोल...!

जो तिथंच खिळलेला पाहून मोनाही थबकली. पण तिला जोजवळ जायचं नव्हतं. आय डोंट नो... व्हॉट ही मीन्स.. या बिझनेस जगातले सगळेच सबंध वरवरचे असतात... जो तसा वाटत नाही; पण तोही तसलाच एक 'स्युडो' निघाला तर. एका रानटी माणसापासनं सुटका झाली आता या अत्याधुनिक, सोफिस्टिकेटेड माणसामध्येही तसलाच रानटीपणा नसेल ना ! त्यापेक्षा ते जवळ येणच नको. मित्रत्वाच, मोकळेपणाच नातं ठीक आहे; पण त्याच्यापुढची पायरी नको... कदाचित जो नसेलही तसा... पण काय सांगावं.. ?

मोना पुन्हा काम करू लागली.

ती आतल्या खोलीत गेली आणि जो भानावर आला. त्याला काय करावं कळेना. आता अकरा वाजायला आले होते.

मोना बाहेर आली तेव्हा जो निघालाच.

'निघतो मी' आणि असं म्हणून त्यानं अभावितपणे शेकहॅंड करता हात पुढे केला. मोनानं झटकन कमरेला लावलेल्या फडक्याला हात पुसून पुढे केला.

जोचा हात अत्यंत फर्म आणि वॉर्म होता. त्या शेकहॅंडमध्ये विश्वास होता आणि तिला नकळतच तिचा हात त्याच्या हातात रेंगाळला.

जोनं मोनाकडे बघत म्हटलं,

'थॅंक्स मोना...! '

'वेलकम्' मोना हात सोडवून म्हणाली.

'थॅंक्स मोना, नॉट फॉर द डिनर, नॉट फॉर जॉयनिंग माय ऑफिस...बट कमिंग इन टू माय... लाइफ ! जातो मी !'

असं म्हणून जो निघाला.

'आय थिंक ही...ही मीन्स इट' मोना मनात म्हणाली.

जोला लगेच कॅब मिळाली त्याच्या एकटेपणाला काही वेळ तडा गेला होता; पण अस्वस्थपणा कमी नाही तर वाढलाच होता. त्यांनी मनाशी विचार केला. प्रॉब्लेम एक... द ब्लडी कॅम्पेन...प्रॉब्लेम दोन...हॅड डू आय रिअली मीन एनीथिंग टू मोना !

त्या रात्रीही त्याला स्वप्न पडायची तशी पडलीच.

बिग ब्रदर्संच्या ऑफिसात सॅमी रंगूनवाला आपल्या स्टाफला घेऊन बसला होता. शॅव्हिंग पीपलची फायनल प्रेस अॅड तयार झाली होती.

'अॅड' तयार. वेळ लागला नव्हता. सॅमीच्या लायब्ररीमध्ये अनेक परदेशी गुळगुळीत कव्हरची मासिक होती. सॅमीन ती चाळून त्यातल्या पाचसहा अॅडस् निवडल्या आणि व्हिज आर्टिस्टच्या पुढयात टाकल्या.

दोन तीन दिवसात रफ स्केच आणि मग कलर स्कीम तयार झाली. लेआऊट डिझायनिंग झाल.

नव्या 'जेट सेट युगाची' पहाट म्हणून स्काय स्क्रेपर्सच्या पार्श्वभूमीवर सूर्य उगवतोय हे दृश्य दुसऱ्या दिवशी. आदल्या दिवशी संपूर्ण पान मोकळ ठेवायला लावायचं आणि 'वॉच धिस स्पेस' अस म्हणायचं. दुसऱ्या दिवशी सूर्योदय तिसऱ्या दिवशी त्या सूर्यामध्ये ब्लेडचं चित्र. चौथ्या दिवशी हीच जाहिरात रिपीट करायची.

खालची कॉपी ठरलेली. जेटसेट युगाचा उदय होतोय त्याला तोडीची उत्कृष्ठ दर्जाची ब्लेड म्हणून जाहीर करायच.

सॅमीनं स्कायस्क्रेपर्संची कल्पना उचलून धरली होती आणि विशेष सूचना म्हणून त्या इमारतीच्या जाळयात अनेक फॅक्टरीज दाखवायच्या. त्यात नजरेत भरेल असं चित्र मेहरा कंपनीच्या फॅक्टरीच काढायचं.

सॅमीनं खूष होऊन सगळं अप्रूव्ह केल... आणि नेहमीच्या स्टाइलनं गिरकी घेऊन स्टाफच अभिनंदन केलं.

'मार्केट रिसर्चनुसार देशभर या अॅडचा इम्पॅक्ट जाणवायचा असेल तर एकाच वेळी या जाहिराती झळकवायला हव्यात.' सॅमीनं ज्यु. पाठकाना टेलेक्स पाठवला

...आणि असा इम्पॅक्ट फक्त 'इंडियन डेली' सारख साखळी वर्तमानपत्रच साधू शकणार होतं. असाही निर्वाळा दिला.

'इंडियन डेली'च्या पंधरा विविध शहरातनं प्रसिद्ध होणाऱ्या आवृत्त्यांमधनं चार दिवस जाहिरात छापायची ती ही 'फुल पेज' म्हणजे लाखो रुपयाचा व्यवहार होता.

सॅमीनं हिशेब करून पाठकांना कळवलं. दोनदा दिल्लीला त्यांची भेट झाली.

सॅमी वॉज हॅपी. त्याला मिळणारं कॅम्पेन हे हजाराच्या पलिकडचं झाल आणि प्रत्येक जाहिरातीच्या कोपऱ्यात 'बिग ब्रदर्स अॅंड'

असं छापलं जाणार असल्यानं कंपनीलाही प्रचंड प्रसिद्धी !

सॅमीनं 'इंडियन डेली'मध्ये जाऊन हे काम करण्याचं ही पाठकांना ऑफर केलं; पण पाठकांनी आपल्या खास उर्मट लकबीनं त्याना उडवून लावलं.

'कीप आऊट आफ इट' सॅमीनं अपमान गिळला. आणि तो मुंबईला परतला. त्याला एव्हाना कुणकूणही लागली. मेहरा कंपनीनं 'ॲडव्हेंचरर्स'कडे कॅम्पेन तयार नाही म्हणून तगादाही लावला होता.

'म्हणजे आपण बाजी मारली!' सॅमी उद्गारला,

सॅमी रंगूनवालाला ॲडव्हेंचरर्सविषयी ऐकू आलेली कुणकुण अगदी अचूक होती. ती कुणकुणच नव्हती, तर श्रीचंद मेहरानं वैतागून ॲडव्हेंचरर्सना फोन करून आपली नापसंती स्पष्ट शब्दात कळवली होती. 'मिराडाचा बॉस' आता गरम तव्यावर बसल्यासारखा तळतळत होता. त्यानं जोला आपल्या केबिनमध्ये बोलावलं आणि श्रीचंदचं बोलणं ऐकवलं. जो हैराण होऊन गप्प बसला. त्यानी व्हिज्युअल आयडिया मांडली की अक्षरशः चार दिवसात कम्प्लीट काम करून देतो अशी कबुली दिली आणि तो मोनाच्या स्टुडिओरूमपाशी आला.

मोनाला या सगळ्या प्रकाराची जाणीव होतीच आणि जोचा हैराण चेहरा पाहून तर खात्रीच झाली.

'जो, काय झालय तुला? व्हॉट नॉनसेन्स इज धिस? तू काहीच का लिहीत नाहीस. कुठे गेली तुझी प्रतिभा! मला तर हा प्रकार अगदीच अगम्य वाटतोय. आऊट विथ इट जो. समथिंग इज रॉंग!'

जो नं तिच्याकडं नुसतंच पाह्यलं.

'नाही जो, असं चालणारच नाही.मुळीच. ते 'बिग बास्टर्डस्' आपल्यापेक्षा स्मार्ट निघतील हं. मला साग काय झालंय काय तुला? गेले आठ–दहा दिवस मी पाहत्येय तू डिस्टर्ब्ड आहेस.'

मोना एकदम जोरजोरात बोलायला लागली होती तो थाबली.

'इज इट समथिंग पर्सनल? तुला एक सागू जो. माझा स्वत.चा अनुभव सागते. इटस् नॉट वाइज टू मिक्स पर्सनल लाइफ विथ वर्क. वर्क इज वर्क.'

जो ला काही तरी आतून जाणवलं. येस हे पर्सनल तर आहेच. मला तुझ्याविषयी जे वाटत ते या कॉपी लिहिण्याच्या मार्गात येतय. असं अजून कधी झाल नव्हतं.

'जो प्लीज, से समथिंग'

जो च्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पहात मोना म्हणाली

जो तरीही काही बोलला नाही. यातन काही तरी मार्ग काढायला हवा. मला सापडलेली कल्पना ही माझ्या व्यक्तिगत आयुष्याला मी बाधून टाकलीय आणि मोना म्हणत्येय डोण्ट मिक्स द टू! बट व्हाय नॉट?

जो च्या डोक्यात आता अचानक कलकललं. डोकं बधीर झाल्यासारखं वाटल. येस हा माझा व्यक्तिगत अनुभव आहे पण हे फक्त मलाच माहिती आहे. मी कशाला कोणाला सागू की माझ्या स्वप्नातली प्रतिमा मी कागदावर उतरवलीय येस. राइट आणि तिथनच मला जर स्फूर्ती मिळाली असेल तर फाइन. लेट मी डू इट. आणि आता केलच पाहिजे. आता वेळ नाहीए.

जो एकदम म्हणाला,


With Best Compliments From :

SPARKONIX ( India )

A–82, H Block, MIDC, Pimpri, Pune – 18.

Grams : SPARKONIX Tel. : 83236

Mfrs. of : Spark Erosion and Special Purpose Machines, Geophyscial and Special Welding Machines.

'मोना तू कर्मशिअल आर्टिस्ट आहेस ना.' मोना गोंधळली.

'अं ? काय ? हो हो. सो व्हॉट ? '

'नाही. जे क्रिएटिव्ह आर्टिस्ट असतात ते आपल्या कलाकृतीमध्ये आपल्या व्यक्तिगत आयुष्यातल्या अनुभवाचं चित्रण करतात ना. आणि कर्मशिअल आर्टिस्ट नाहीत !'

मोनाला एकदम हसू आलं. तिला जो हे सगळं काय विचारतोय हे कळेना पण तो म्हणतोय तर त्याच्या युक्तिवादाला उत्तर द्यावं असं तिनं ठरवलं. आणि ती म्हणाली,

'जो डोण्ट बी सिली. अरे आर्टिस्ट हा आर्टिस्ट असतो. तो रंग, रेखा, डिझाइन यांचं माध्यम वापरत असतो हा क्रिएटिव्ह हा कमर्शिअल हे भेद आपण सोईकरता मानतो. पण मुळात असं काही नसतं. कल्पना अभिव्यक्त करायचं हे एक माध्यम आहे मग ती कल्पना कुठली का असे ना ? तुझी व्यक्तिगत असेल नाही तर एखादी वस्तू असेल. ते गौण आहे . . . आणि व्यक्तिगत कल्पना कमर्शिअल आर्टमध्ये वापरत नाहीत की काय ? अरे कितीतरी उदाहरणं आहेत तशी. पण कशाला हा वाद उकरून काढतोयस ?'

जो ला उत्तर मिळालं होतं. तो उठला आणि थँक्यू असं जेमतेम पुटपुटून बाहेर पडला आता कधी एकदा हे डोक्यातलं चक्र कागदावर मांडतो असं झालं होतं.

जो ऑफिसात थांबला नाही . . . घरी आल्यावर आपल्या डेस्कपाशी घाईघाईनं आला रॅकमधनं पांढराशुभ्र कागद काढला त्याच्या डोक्यात त्या अॅडचं पूर्ण डिझाइन, ले आऊट आणि कॉपी खदखदत होती.

त्यानं पेन्सिलनं आयात आखला. हाताच्या रेघोट्यांनी एक मानवी आकार काढला. एका बाजूला मोकळी स्पेस. . .

हा मानवी आकार म्हणजे एक पुरुषी देह होता. मिरांडाला स्वप्नातल्या प्रतिबिंबात दिसलेला. आदम. ओठाच्या कोनापासनं गाल आणि खालच्या जबड्याचा काही भाग. चेहऱ्यावर दोन दिवसाची वाढलेली दाढी. स्पष्ट. मग भरदार मान, मानेमधला खळगा. पिळदार शरीर. दोन्ही खांद्यावर घट्ट स्नायूंच्या खुणा. पिळदार दंड. गोरे दंड. ताम्बूस झालेले उन्हात रापून. हातावर आणि छातीवर भरपूर केस.

कमरेवर हात आणि हाताची बोटं, नखं लांब.

रुंद छाती छातीचा निमुळता होत जाणारा छातीचा खालचा भाग. रंग केतकी ताम्बूस गोरा. सडपातळ पोट. पोटावर केसाची मध्यभागी येऊन जाडसर होणारी लव खाली उतरते आणि पोटाच्या खालच्या कुरळ्या केसाच्या पुंजक्यात मिसळून जाते. त्या पुंजक्याची अस्पष्ट जाणीव.

या अत्यंत मर्दानी अशा पुरुषाच्या उघड्या देहावर आडवा येणारा एक अत्यंत नाजूक, गोरापान कोवळा असा हात. स्त्रीचा. त्या हाताचा अंगठा आणि बोटं यांनी त्या छातीचा आधार घेतलाय, ती बोटं त्या भरदार मांसात रुतली आहेत असा भास. लांबसडक बोटं, तुकतुकीत नखं कातीव. (नखांवर नॅचरल पॉलिश)

जाहिरात रंगीत असायला हवी. पार्श्वभूमीचा रंग आकाशी निळा ती आकृती उठावदार दिसेल असा त्रिमितीपूर्ण भासायला हवा

पुरुषाचा रंग गोरा पण त्यावर ताम्बूस छटा कोवळ्या उन्हाची तिरीप आल्यावर येईल असा ओठ जाडसर, गुलाबी नको रापलेले काळपट. शरीरयष्टी पेहलवानी नको. पण भरदार हवो. गळ्यात शोभून दिसल्यास काळा गोफ.

स्त्रीच्या बोटात हिऱ्याची चमकदार लहानशी अंगठी. ती चमकेल.

कॉपी अशी...

'तुमचे केस ही तुमच्या पौरुषाची अभिजात खूण आहे. तुमच्या दाढीचे दाट केस हे तुमच्या ताठ पुरुषीपणाचं लक्षण आहे. तुमच्या अंगावरचे हे केस म्हणजे तुमच्या लैंगिक आदिमतेचे (सेन्सुअल प्रिमिटिव्हनेस) प्रतीक आहेत. या तुमच्या केसांना कुरवाळून त्याची निगा राखायला तितकी मुलायम अशी ब्लेड तुम्हाला सादर करतोय. या ब्लेडचा स्पर्श जितका धारदार आहे तितकाच कोमल आहे. . तुम्हाला लैंगिक सुखाची आठवण करून देणारा आहे. '

या ब्लेडनं तुमच्या राकट मर्दानीपणाला देखणं पॉलिश येईल.

दाढीच्या या ब्लेडचा स्पर्श इतका रेशमी आणि हवाहवासा वाटणारा असेल की ती तुम्हाला रेझर सर्वांगावर फिरवायचा मोह होईल .. तुमच्या प्रेयसीच्या हातासारखा... या नव्या अत्याधुनिक तंत्रज्ञानानं बनवलेल्या ब्लेडच्या शार्पनेसला प्रतिस्पर्धी फक्त म्हणजे तुमच्या 'स्त्री'चा शार्प तरीही हवाहवासा वाटणारा स्पर्श !

'पर्सनल' नं दाढी करण्याचा राकट मर्दानी अनुभव घ्या...आणि विसरा तुमच्या रक्ताळलेल्या सकाळी... फर्गेट युवर ब्लडी मॉर्निंग्ज !'

जो झपाटल्यासारखा लिहीत होता, मांडणी करीत होता.

'तुमचा 'पर्सनल' प्रिव्हिलेज आम्ही मानतो. तुमचा 'पर्सनल' प्रेफरन्स हा आमचा आम्ही प्रिव्हिलेज मानतो. असं कॉपीच्या खाली लिहायचं. प्रत्येक वाक्यातला 'पर्सनल' शब्द मोठ्या अक्षरात लिहायचा.

कॉपी उजव्या बाजूला येईल. मिरांडानी रंगाची डिटेल्स लिहिली. मग त्याला वाटलं कॉपीमध्ये अशी रंगसंगती हवी की पहाट होत्येय असा भास व्हावा...आणि त्या पुरुष आकृतीवर ही ताम्बूस छटा आहे...आणि कॉपीच्या सुरुवातीला अगदी वर

'पौरुषत्वाची नवी पहाट उगवताना... असं लिहावं म्हणजे खालचं 'फर्गेट युअर ब्लडी मॉर्निंग्ज' अधिक रिलेवंट होईल.

.........

..... ...

मिरांडा खूप वेळ काम करीत राहिला होता .

'आणि हे जसं मला दिसलं, जाणवलं, भावलं तसंच मोनाला जाणवणार आहे. कळणार आहे तिला अगदी खोल अचूकपणे समजणार आहे '

जोनं हातातलं स्केचपेन ठेवलं. मोनाची अगदी अनावर आठवण झाली मोनाला खूप जोरात हाक मारावी इतकी जोरात की तिला आपल्या घरीही तो आवाज ऐकू जाईल आणि मग धावत येणाऱ्या मोनाला छातीशी घट्ट धरावं, तिच्या अबाड्याचं छोटं शेपूट ओढावं आणि तिच्या मोठ्या नजरेत आपली नजर मिसळावी.

मोना ओठ मुडपून आपल्याकडे पाहून स्मित करेल... 'ओह ! ... मोना... ! !

श्रीचंद मेहरानं मिरांडानं बनवलेली अॅड पाहिली आणि तो खूष झाला. त्याला हवा तो जोर त्या जाहिरातीत दिसला. पुरुषाच्या मनातल्या आतरिक अहंकाराला, पुरुष असण्याच्या अत्यत शारीर अशा अनुभवाला आव्हान करेल अशी लैंगिकता, सेन्सुअल क्वालिटी या जाहिरातीत आहेत असं त्याला वाटलं. प्रेयसीचा हात अगावर फिरावा तशी ब्लेड ही कल्पना आवडली.

खूपचंद मेहरानी अॅडची कॉपी बाजूला ठेवली आणि श्रीचदकडे पाहून म्हणाले,

'व्हिज्युअली अपीलिंग असली तरी लोकाना काय आवडेल ते आपण कसं सागू शकणार? आपला हिंदी सिनेमा काय वाईट होता? सगळा मालमसाला, टॉप स्टार्स त्यामध्ये खच्चून भरले होते तरी पडलाच ना?'

श्रीचंदला त्याच्या या नकारात्मक भूमिकेचा राग आला. त्याला हिंदी फिल्मची जुनी रेकॉर्ड ऐकायची नव्हती.

दिल्लीला जाऊन आल्यापासनं ते असेच उदास राहतात. कधी अगदी रिझाइन्ड वाटतात, कधी अगदी चिडून बोलतात...रात्र रात्र झोप लागत नाही म्हणतात.

श्रीचदनं गळ्याकडचं बटण सोडून टायची गाठ सैल केली आणि आपले पाय समोरच्या काचेच्या गोल टीपॉयवर ठेवले.

त्याला त्याची समजूत कशी काढावी कळेना.

'पापाजी, मला तुमचा हा निगेटिव्ह अप्रोच पटत नाही. आपण सट्टयातली माणस. आपण कॅलक्युलेटेड रिस्क घेतो. तुम्ही म्हणताय तस असतं तर पचवीस तीस वर्षांपूर्वी तुम्ही शभर रुपयाच्या भांडवलावर धदाच काढला नसता तुम्हाला झालंय काय?

खूपचंदना थोडासा हुरूप वाटला; पण क्षणभरच आणि मग त्याना गहिवरून आलं. काहीतरी चमत्कारिक वाटायला लागल. श्रीचदच्या पाठमोऱ्या देखण्या आकृतीकडे पाहून डोळे पाण्यानी डबडबले. पण श्रीचंदच्या लक्षात आलं की, आपण रडतोय तर तो अधिकच रागावेल म्हणून त्यानी रूमाल काढून डोळे टिपले आणि नाक शिकरून स्वस्थ बसले.

श्रीचदला त्याच्याकडे पाहून वाटलं की, त्यांना रडू येतय. तो त्याच्या अगदी जवळ आला आणि उभ्याउभ्याच आपल्या मांडीवर त्यांच डोकं टेकवल. खूपचदनं मुलाच प्रेम गप्पपणे अनुभवलं. आणि तो म्हणाला,

'पापाजी, तुम्हाला एक सांगू. तुम्ही काश्मिरला का जात नाही? जरा विश्रांती घ्या. मी इकडचं सगळं साभाळतो. पापाजी आय शॅल मॅनेज एवरीथिंग. मी शब्द दिलाय विल्किनसनला. दे आर वॉचिंग अस लाइक हॉक्स. तुम्ही श्रीनगरला जा. गो टु द माउन्टन्स. तुम्हाला खूप बरं वाटेल.'

खूपचदना श्रीचदवर विश्वास टाकवत नव्हता. त्याच्या मनातल्या या नव्या आधुनिक पद्धतीचा जबर पगडा आहे. त्याला धंद्याचा सेन्स नाही; पण ते काही बोलले नाहीत. आपली इच्छा झालीच तर अडचण होतेय. त्यांनी मान वळवून श्रीचदकडे पाहयल आणि मान डोलावली.

तुम्ही सरळ आता बंगलोरलाच जॉइन व्हा. एकदम फॅक्टरीच्या उद्घाटनाला!

श्रीचद, मिरांडा आणि मोना यांची ब्लेझ प्रोजेक्टर रूममध्येच भेट झाली. मिरांडा आणि मोनान जाहिरातीच्या कलर स्लाइडस् ऑडिओ व्हिज्युअल शोज सगळंच तयार केल होतं. तेच आता श्रीचंदबरोबर पाहायच होतं.

प्रेस अॅडची उत्तम क्वालिटी सगळ्याच कॅम्पेनमध्ये टिकून राहयली होती. दिल्ली दूरदर्शनवरनं प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या आधी दाखवण्यात येणाऱ्या कलर स्पॉटस्ची स्लाइड, कॉमेंट्रीही दाखवली.

'बट एव्हरीथिंग वेटस्' पहिली बाजी मारायची ती मोठमोठ्या प्रेस अॅडस्वरनं आणि त्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट माध्यम म्हणजे इंडियन डेलीच्या देशभर प्रसिद्ध होणाऱ्या लाखो आवृत्ती. एकाच दिवशी सगळ्या जनतेला गुंगवून टाकणारी जाहिरात करायची. पहिल्या दिवशी फुलपेज मोकळ ठेवायच फक्त 'वॉच धिस स्पेस' म्हणायच.

श्रीचदला टाइम्स आणि काही वेगवेगळ्या शहरातले मोठे पेपर्स यामध्ये ही जाहिरात करायची होती; पण मिराडान आठवण करून दिली.

'टाइम्स ईज आउट म्हणजे तिथ लॉकआउट नाही का?'

'ओह...आय ऑलमोस्ट फरगॉट!'

'आणि इतर प्रादेशिक वर्तमानपत्रापेक्षा साखळी वर्तमानपत्राचा प्रभाव अधिक असतो दे आर नॅशनल डेलीज्!'

श्रीचदन इंडियन डेलीच्या देशभरच्या आवृत्त्याकरता जाहिरातीसाठी बुकिंग करायची व्यवस्था करण्याचा फोन आणि टेलेक्स दिल्लीला पाठवून दिला. क्षणाचाही विलब न लावता.

'द इंडिअन डेली'च्या अॅडव्हर्टायझिंग मॅनेजर घोष पुढे एक पेच पडला होता. एकाच तारखेला, एकाच दिवशी एकाच महिन्यात पधराच्या पंधरा आवृत्यांकरता दोन खास फुलपेज जाहिराती आल्या होत्या. दोघानाही त्या दिवशीचा सेंट्रल स्प्रेड हवा होता. कलरप्रिंटही हवा होता. दोघाची ही सुरवात आदल्या दिवशी तेच पान रिकामं ठेवून करायची होती. त्या दोन्ही जाहिराती ब्लेडस्च्या होत्या.

जाहिरातीचं मॅटर एकाच दिवशी एक सकाळी एक दुपारी अशा फरकान आलं. दोन्ही कपन्या तुल्यबल होत्या. एक प्रस्थापित बलाढ्य कपनी, दुसरी नवीन पण मंत्र्याच्या मुलाची! दोघाविषयी दबदबा निर्माण होत होता

'द सिच्युएशन इज अनप्रिसिडेण्टेड!' अर्थात घोषना या पेचप्रसगामुळे आनंदच वाटला होता अॅडजस्टमेंट करून दोन्ही जाहिराती मिळणार आहेत. आज टाइम्सला लॉकआऊट नसता तर एक कॅम्पेन सरळ टाइम्सकडे गेली असती. अर्थात त्याच्याकडे इतकी उत्कृष्ठ दर्जाची छपाई यत्र नाहीत, तेव्हा आपल्याकडेच सगळं परत आल असतं पण टाइम्सचे दरवाजे बद असल्याचे हे फायदे आपल्याला उपटता येतायत. या विचारानी ते खूष झाले आणि त्या मूडमध्येच मोहिनी अग्रवालजीच्या केबिनमध्ये पोचले. या जाहिराती आपण तलवार गाजवूनच आणलेल्या आहेत असाच त्याचा अविर्भाव होता.

श्रीमती अग्रवालनी त्याना अर्थातच थड प्रतिसाद दिला. घोषना असं वाटल की हे त्याना आधीच माहिती होतं यात काही विशेष नाहीए असा त्याचा रोख होता. 'ठीक आहे' दोघाना मॅटर्स मिळाली अस कळवा

'दोघांना?' घोषनं विचारल.

श्रीमती अग्रवालजींनी समोरची फाइल एव्हाना उघडली होती आणि घोषच्या प्रश्नाकडे त्यांनी लक्षच दिलं नाही.

घोष वैतागला पण आवाजातला वैताग पूर्णपणे टाळण्याचा प्रयत्न करीत म्हणाला,

'मॅडम, या दोन्ही जाहिराती एकाच दिवशीकरता आहेत. दोन्ही एकदमच अॅडव्हर्टाइझ करायच्या का ?'

मोहिनीजींनी मान वर केली आणि घोषकडे पहात म्हटलं,

'मि.घोष. दॅटस् अप टू द बोर्ड टू डिसाईड दॅटस् ऑल !'

अग्रवालजींच्या केबिनमधनं डिसमिस झालेला घोष आपल्या केबिनपर्यंत आला तेव्हा त्याही अवस्थेत त्याला हसू आलं !

'बोर्ड ऑफ डायरेक्टर्स म्हणे !'

'मॅडम यू रूल धिस वर्ल्ड, लाइक द बिग्रर मिसेसजी !' बोर्ड मिटिंग इज पपेट शो !!

घोष असं मोठ्यानी म्हणाला नाही. कारण ते त्याला म्हणणं शक्य नव्हतं एवढं मोठं कलकत्ता पान त्यांनी तोंडात कोंबलं होतं.

घोषनं आपलं 'मॅटर' मिळाल्याचं पत्र पाठवण्याचं काम चोख पार पाडलं. हा निरोप पार व्यंकटरमण, मिरांडापर्यंतही पोचला.

अॅडव्हर्टिझमेंटचं काम आपल्या हातातन निसटल्याच दु:ख व्यंकटरमणना पुन्हा एकदा झालं. कारण हे काम आपल्या भाच्याकडे सोपवायचं असं त्यांनी पक्कं ठरवलं होतं. पण पाठकांनी दाद दिली नाही आणि आता काम संपल्याचा निरोपही आला होता.

बट बारिंग दॅट, व्यंकटरमण वॉज हॅपी. काम भरपूर होतं. बुडवून टाकणारं. आता आणखी पॉवर हातात होती.

मुलीची झाबिआहून पत्रं येत होती. पहिल्या नातवडाची चाहूलही लागली होती. पण व्यंकटरमणना त्याबद्दल अभिनंदन करणारं पत्र लिहायलाही वेळ मिळाला नव्हता. इतकं काम ! आणि काम म्हणजे व्यंकटरमण खूष !

एका विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यावरची संध्याकाळ. तांबूस पिवळा सोनेरी प्रकाश आणि त्यात चमकणारी पांढरी वाळू. वातावरण स्तब्ध, ट्रॅंक्विल. समुद्राची अगदी मंद गाज. लोकेशन एस्टाब्लिश्ड्... सॉफ्ट फोकस पडद्याच्या डाव्या बाजूनी तांबड्या लाल रंगाचे घोडे उधळत येतात... एक दोन तीन चार ...लॉंग शॉट... फेड आऊट ..

घोड्यांच्या खुराचा क्लोजअप. घोड्याच्या पायाच्या थरथरणाऱ्या स्नायूंचा टाइट क्लोज अप... कॅमेरा सरकत... घोड्याच्या आयाळीपर्यंत येतो... घोड्याच्या हालचालीमुळे आयाळीचे केस विस्कटतात... पुन्हा मिड शॉट... फेड आऊट होत... वेगवेगळ्या प्रतिमा एकमेकांत मिसळतात .. लॉंग शॉट... किनाऱ्यावर आपल्याच मस्तीत पळणारे घोडे.. त्यांच्यावर तांबूस सोनेरी प्रकाश .. क्लोज अप... धापा टाकणाऱ्या घोड्याच्या फ्लेअर्ड नॉस्ट्रिल्स... लॉंग शॉट घोड्यांच्या हालचाली ..फेड आऊट.

कॉमेंट्री...प्रत्येक पुरुषाच्या आयुष्यातली पुरुषत्वाची होणारी जाणीव...अशीच असते ...वाइल्ड...येट नोबल...रस्टिक...येट... सोफिस्टिकेटेड...टू मॅच द मूड.. मॅच द मॅनलीनेस ... द न्यू ब्लेड पर्सनल !

काळ्या पडद्यावर उलगडत जाणाऱ्या पाकिटातन एक ब्लेड बाहेर येते ... पात्यावर प्रकाश परिवर्तित होतो ... त्याची चमकती चांदणी हलते असा भास ...

'पर्सनल' अ हाऊस ऑफ मेहरा प्रेझेंटेशन ... इन कोलॅबोरेशन वुइथ ... विल्किनसन्स !

पडद्यावर एकदम पांढरा प्रकाश पडला... प्रोजेक्टरचा बर्र्र्र्ऽऽ असा आवाज प्रोजेक्टर रूममधनं आला क्षणभरात हॉलमध्ये लाइटस आले.

श्रीचंद मेहरा उठून उभा राहिला. जोचा हात हातात घेऊन म्हणाला,

'सुपर्ब !' वी आर फ्रेण्डस ! काइण्ड ऑफ इक्वल...!

जोनं श्रीचंदचे शब्द ऐकले.

'ही मीन्स इट ! त्याला आपण बरोबरीचे वाटतो. दॅटस् इट !'

अॅड फिल्म कॅम्पेन प्रेसमध्ये सुरू झाल्यानंतर मुंबई-दिल्लीला झळकवायची होती. टी. व्ही. स्पॉटस् आता दिल्ली दूरदर्शन केन्द्रावर येऊन पडले होते.

व्यंकटरमणच्या नासिकमधल्या कामाला आता दिवसरात्रीच भान राहिलं नव्हतं. आता अॅडबरोबर मार्केटला ब्लेड आणायची असल्यानं कामाला वेग आला होता. पाठक आता नासिकलाच मुक्काम करून होते.

बंगलोरच्या मेहरा कंपनीच्या फॅक्टरीतही असंच धामधुमीचं वातावरण होतं. गेट सेट गो म्हणण्याची बाकी होती. उद्घाटनाचा कार्यक्रम बंगलोरच्या फाइव्ह स्टार हॉटेलात पार पाडायचा होता आणि मग त्या रात्री एक डिनर होतं. कर्नाटकचे मंत्रीसंत्री, मुंबईतले पत्रकार, दिल्लीचे पत्रकार, यांना खास पार्टी आणि फॅक्टरीमधनं फेरफटका... मेहरा कंपनीनं खास पीआरओ नेमला होता आणि श्रीचंदच्या आठवड्यातनं दोन तरी फेऱ्या बंगलोरला होत असत. आता फक्त फायनल इव्हेंट बाकी होता.

श्रीचंद मेहरानं विल्किनसनच्या मॅनेजिंग डायरेक्टरला गळ घातली होती आणि या उद्घाटनाच्या खास सोहळ्याला त्यानं यायचं कबूलही केलं होतं. त्याप्रमाणे तो दिल्लीला अशोकात उतरलाही होता. दिल्लीत चार दिवस मुक्काम, साईटसीईंग ... काही कामाच्या भेटीगाठी ...मग बंगलोरला प्रयाण ...फॉर दी बिग इव्हेंट.

श्रीचंद आणि मिरांडाची फोनवर गाठभेट झाली. बंगलोरला यायचं त्याला आमंत्रण मिळालं. त्या रात्री मिरांडा आपल्या फ्लॅटच्या बाल्कनीत उभा राहून व्हिस्की पीत होता.

समोरच्या छोकरीनं 'टाटा' 'टाटा' केलं आणि मिरांडानं उत्साहानं तिला प्रतिसाद दिला. ती नेहमीप्रमाणं लाजून घरात पळाली आणि जोनं बॉटम्स अप म्हणून ग्लास खाली ठेवला.

मोनाविषयी आपण काय करायचं ? तिला कसा अॅप्रोच करायचा ? कसं आपलं म्हणणं सांगायचं ? आय डोण्ट नो. जो हैराण झाला. 'मोना प्लीज अंडरस्टॅंड ! माझा या लग्न बिग्न गोष्टीवर विश्वास नाहीए. आय फील मला त्या मॅरेज सर्टिफिकेटचं सॅंक्शन नकोय. आय डोण्ट बिलिव्ह इन दॅट क्रॅप. आय वॉंट टू लिव्ह विथ यू. बस् लेटस् लिव्ह टुगेदर ! आपल्याला एकमेकांबद्दल प्रेम आहे अॅंड

मोना, मला तुझ्याबद्दल मनापासनं आदर आहे. एक माणूस म्हणून. तू मोठ्या कष्टानं स्वतःला सावरलंयस. आय रिस्पेक्ट युअर वुमनहूड. तू त्या मूर्ख, वरवरच्या फटाकड्या पोरीपेक्षा किती वेगळी आहेस ..मोना... तुलाही मी तसाच वाटतो ना...प्लीज मला ...मोना...

...जो बाल्कनीत खिळून तसाच उभा राहिला होता वेळेचं त्याला भान नव्हतं...

पण तेव्हाच घड्याळाचे अकरा टोले पडले आणि मोनानं घरातली आवराआवर संपवून दिवाणावर अंग टाकलं. तिनं मनाशी पक्कं ठरवलं होतं. आय मस्ट नो व्हॉट जो मीन्स टू मी ! आय लाइक हिम ! पण कोण म्हणून ? मित्र ? *की आणखी काही ? आणि* आणखी काही असलं तर आपला इंटरेस्ट आहे का ? जो खूप सेन्सिबल आहे श्रीचंदनं त्याला ' इक्वल ' म्हटल्यावर तो खूष झाला आणि त्यानी आपलं हे सिक्रेट मलाच सांगितलं. आय नो त्याचं म्हणणं बरोबर आहे. मला वाटतं या व्यवसायातल्या माणसांना असंच वाटत असणार.. विशेषतः पुरुषाला ...मला कधी तसं वाटलेलं नाहीए...पण... मी समजू शकते.. जोमध्ये डेप्थ आहे... चांगली संवेदनक्षमता आहे !...पण आता विश्वास टाकायला भीती वाटत्येय. कबूल कर की स्वतःशी. नाही कळत मला...पण असं जाणवतं की दुसऱ्या माणसाला आपली खूप खूप आतून गरज वाटली, ओढ वाटली ...तरच त्याच्याजवळ जाणं शक्य आहे.... नाहीतर नकोच...या झगझगीत शो बिझमध्ये...अशी गरज कोणाला भासते का ? भासलीय का ? हे कसं समजणार मला ? आणि त्याला तरी...?

मोनान अस्वस्थ होऊन छातीवर ठेवलेला इव्हज् वीकली उघडला, चाळला आणि हात लांब करून बेडस्टँडचा दिवा विझवला....झोप काही येणार नाही...पण डोळे मिटून पडून तर राहायला हवं !...

मोना दिवाणावर झोपेची आराधना करीत असताना श्रीचंद जुहूच्या आपल्या प्रशस्त फ्लॅटमधल्या वातानुकूलीत बेडरुममध्ये डबलबेडवर पडला होता. त्यानं उजव्या बाजूला वळून आपल्या बायकोकडे पाहिलं. तिच्या मऊ रेशमी केसाच्या लडी गोऱ्या खांद्यावर पडल्या होत्या तिनं मान खाली झुकवली होती आणि तिचा चेहरा अस्पष्टच दिसत होता. श्रीचंदनं सुस्तपणे तिच्या केसाचा मुका घेतला. तिची झोप किंचित चाळवली आणि ती श्रीचंदच्या कुशीत शिरण्याकरता सरकली. पण त्यापूर्वीच श्रीचंद उठला आणि त्यानं सोफाचेअरवर पडलेला आपला सिल्क किमोनो अंगाभोवती गुंडाळला. त्या किमोनोच्या थंड स्पर्शानं श्रीचंदच्या उघड्या अंगावर शहारा आला. श्रीचंद तिथनं दूर जाऊन स्युएड सोफ्यावर बसला. त्यानं तिथं पडलेल्या डनहिलच्या पाकिटातनं लांब सिगारेट काढली आणि सोनेरी सिगरेट लायटरनं पेटवली. सिगरेटचा प्रदीर्घ झुरका घेऊन तो अंधुक प्रकाशात *समोरच्या ड्रेसिंग टेबलावरच्या आरशात* दिसणारं स्वतःचं देखणं प्रतिबिंब पाहू लागला...

संभोगानंतर येणाऱ्या सुस्तीत...डनहिलचे झुरके... मस्त... ट्रँक्विल... तेव्हा.. साडेअकरा वाजत होते...

...आणि तेव्हाच त्याच्या बेडरूममधला लाल फोन अचानक खणखणला... दबत्या आवाजातली ती खास बेल होती तरीही


Tel. : 8232 Gram. : PRAKALP

With Best Compliments From :

Prakalp Private Limited

Plot No. 3, Industrial Area,
Chikhalthana – 431 210
Dist. : AURANGABAD

Manufacturers of GRADED C. I. CASTINGS

श्रीचंद दचकलाच... कपाळावर आठ्या आणीत फोन उचलला.

'हॅलो... श्रीचंद मेहरा हिअर' त्यानं दबल्या आवाजात म्हटलं.

'इज दॅट मिस्टर मेहरा? मेहरा अॅड कंपनी?'

'येस! हू इज इट?' श्रीचंदच्या आवाजात त्रासिकपणा होता.

'मी नवी दिल्लीहून बोलतोय. मी श्रीमती मोहिनी अग्रवालजीचा सेक्रेटरी.

'येस, मोहिनी अग्रवालजी... ऑफ द इंडियन डेली!'

'बोला, काय काम आहे एवढ्या रात्री? सकाळी का नाही करत फोन?

'सर् फार अर्जंट काम आहे सर. श्रीमती आग्रवालजीच्या सूचना मला मिळाल्यापासनं मी तुम्हाला फोनवर गाठायचा प्रयत्न करतोय. त्या म्हणाल्या कितीही उशीर झाला आणि मेहरा कुठेही असले तरी त्यांना निरोप द्याच.

'च, बोला कायते?' श्रीचंद म्हणाला.

'सर...!'

येस...

'सर्, अग्रवालजी दिलगीर आहेत या गोष्टीकरता की आम्ही तुमची उद्या रिलीज होणारी फुलपेज अॅड...पर्सनल नावाच्या ब्लेडची...घेऊ शकत नाही!'

'व्हॉट?...व्हॉट द हेल? व्हॉट द हेल यू मीन?' श्रीचंद किंचाळलाच.

श्रीचंदच्या बायकोनं 'ऊं ऊं' करीत कुस बदलली...तिच्या अंगावरचं पांघरूण अधिकच घसरलं आणि तिचं अंग आणखीन उघड पडलं.

श्रीमती अग्रवालजीचा सेक्रेटरी अधिकच बावचळला आणि त्याच्या इंग्रजी बोलण्यातले खास दक्षिणी उच्चार अधिकच तीव्र झाले.

'आम्ही तुमची अॅड देऊ शकत नाही. आज तुमची जागा मोकळी सोडलेली होती आणि उद्या जाहिरात तिथं छापली जाणार होती. राईट?'

'राईट, बॉल्स, व्हॉट नॉनसेन्स इज धिस? तुम्ही अस इर्लेवन्थ अवरला रिफ्यूज कसं करू शकता? आय शॅल.. स्यू यू...' श्रीचंदचा चेहरा संतापानं लाल होत होता त्याचे गळ्याचे स्नायू ताणले गेले होते कपाळावरची शीर फुगली होती आणि श्वासही जोरात येत होता.

सेक्रेटरीचा काहीच प्रतिसाद आला नाही त्यावर श्रीचंद किंचित सावरला आणि तो काही बोलणार इतक्यात...

'मि. मेहरा, सर.. प्लीज लिसन.. प्लीज अॅडरस्टॅंड...

आयनो...तुम्ही रेटस् रिव्हाइज केले आहेत ...पण सो व्हॉट .मी दुप्पट रेटस् केलेत तरी मी तुमची दिडकी ही द्यायचं शिल्लक ठेवणार नाही.

'नो सर, प्लीज...आम्ही अॅड रिफ्यूज करतोय कारण...कारण सेन्सरनं ती रिफ्यूज केली...सर, तुमच्या जाहिरातीचा स्पॉट उद्या 'चित्रहार' पूर्वी दाखवला जाणार होता त्याच्यावरच सेन्सॉरनं हरकत घेतलीय. येस सर. दे ऑब्जेक्टेड टू इट! त्यानी आम्हाला कळवलं आणि मग इथही तोच निर्णय घेण्यात आला की जाहिरात अश्लील आहे म्हणून!

'ऑब्सिन! व्हॉट शिट!!' श्रीचंदला रागानं आता कपाळाला घाम यायला लागला होता. त्याच्या हातातली सिगरेट जळूनजळून तिची राख कार्पेटवर सगळीकडे सांडत होती.

'मि. सेक्रेटरी, हॅलो...दॅट इज शिट यू आर टॉकिंग...मी . मी ताबडतोब दिल्लीला येतोय... येस आय शॅल मीट.. मिसेस अग्रवाल.'

'सर... दॅट मे बी टू लेट... आमची पानं प्रेसला गेली आहेत... द पेपर्स आर रोलिंग सर...!'

असं म्हणून फोन बंदही झाला. श्रीचंदनं रागारागानं फोन पुन्हा पुन्हा टॅप केला... हॅलो...हॅलो असं चढत्या आवाजात म्हटल पण फोनचं कनेक्शन तुटल होतं... श्रीचंदनं रिसिव्हर क्रेडलवर आदळला आणि तो जवळजवळ कोसळलाच.

एव्हाना त्याच्या बायकोला जाग येऊन ती बाथरूममध्ये जाऊन बाहेर येत होती. आपले गाऊनचे पट्टे कमरेशी बांधत तिने श्रीचंदकडं पाह्यलं तेव्हा तिच्या काळजात चर्रर्र झालं. श्रीचंद हवा गेलेल्या फुग्यासारखा तुटून पडला होता. फोनवरचं संभाषण तिनं पुसटसं ऐकल होतं. काही मिनिटापूर्वी आपल्याला भरगच्च सुख देणाऱ्या या पुरुषाला झाल तरी काय असं?

ती श्रीचंदजवळ जाऊन उभी राह्यली

'डार्लिंग, काय झालं सांग ना!'

श्रीचंदनं उत्तरादाखल मानदेखील वळवली नाही. ती वळली आणि तिनं आवाज न करता फ्रीज उघडून त्यातली सोड्याची बाटली काढली आणि व्हिस्कीचा छोटा पेग बनवून त्याच्याकरता आणला आणि त्याच्या हातात कोंबून तो प्यायलाच लावला.

तो थंड जळजळीत द्रव घशातून पोटात उतरला. पोटात आकसल्याची जाणीव झाली. श्रीचंदनं सिगरेट शिलगावली पण ती पेटवताना आपली थरथरणारी बोटं पाहून तो अधिकच अस्वस्थ झाला. त्यानं पाच–सहा दीर्घ झुरके घेतले आणि त्या बंद खोलीत सगळं धुरकट झालं. मग त्यानं बायकोला एकेक करून टेलिफोनवरचं संभाषण ऐकवलं. आणि बोलता बोलताच त्याला मार्ग सुचला...एक अस्पष्ट किरण...दिल्लीतला कॉन्टॅक्ट!... पोलिटिकल. वरनं दबाव आणायचा... पैसे चारायचे... बाय हूक ऑर क्रूक... पहिली घडपड . दिल्लीला फोन...

दिल्लीच्या आपल्या कॉन्टॅक्टचं काय झालया याचाही त्याला विसर पडला.

तो परत परत फोन फिरवत राहायला एसटीडी कॉल... नो रिस्पॉन्स.. 'पीsss असा एन्गेज्ड टोन फक्त ऐकू येई .. त्यानी एक्सचेंजला फोन केला.. ट्रंक लावला... लाइटनिंग ट्रंककॉल...

'नम्बर नॉट रिस्पॉंडिंग सर' ऑपरेटरचा आवाज आला आणि श्रीचंदला त्याच क्षणी जाणवलं..आपला दिल्लीतला कॉन्टॅक्ट संपलाय...स्पेंट फोर्स...

आता फोन?

पापाजी?

'प्रिया, प्लीज श्रीनगर मिळतय का पहा?'

'पापाजीशी बोलयचय?'

श्रीचंदला खूपचंदचा दिल्लीहून आल्यानंतरचा चेहरा आठवला. डिप्रेस्ड्...कसल्यातरी विचित्र शंकेनं ग्रासलेला. त्यांना पुन्हा.. अॅड व्हाय? मी स्वत. निर्णय घेऊ शकतोय? प्रिया डोण्ट...ट्राय...

श्रीचंदनं पुन्हा एकदा फोन उचलून

माडीवर घेतला. आता मार्केटिंग मॅनेजर पॉल.

पॉलचा झोपाळलेला आवाज. श्रीचदचं बोलणं ऐकून मात्र त्याची झोप पार उडली.

'सर, अॅड अश्लील असल तर त्याला तो मिरांडाच जबाबदार आहे. ही इज टू बी ब्लेमड् सर, मला स्वत.ला ती अॅड फार... अ... चालू वाटली होती. बट यू वेअर प्लीज्ड.'

पॉलच्या शब्दात, आवाजात कुठेतरी सूक्ष्म समाधान आहे अस श्रीचदला वाटल आणि तो पुन्हा संतापला.

'व्हॉट दहेल ? आता आपण काय करू शकतो ?' श्रीचंदच्या आवाजात रागाबरोबर उद्विग्नता आली.

'सर फार कठीण आहे. पण एक मार्ग आहे सर, आपण नवीन जाहिरात करून दिली से एक दोन दिवसात... 'से जस्ट... फ्यू वर्डस्...'

श्रीचदला ही कल्पना डोक्यात एकदम.. स्ट्राइक झाली. येस् मिराडाला पुन्हा नवी जाहिरात...

बाल्कनीत उभ्या असलेल्या जोन व्हिस्कीचा दुसरा पेग रिचवला. हवेतही आता सुखद गारवा आला होता. आजूबाजूच्या इमारतीमधले दिवे विझले होते आणि जो टेपडेकवर वॉल्टझ् ऐकत होता. एवढ्यात कर्कशपणे वाजणारा फोन त्यानं ऐकला.

श्रीचद मेहराचा आवाज पटकन ओळखला. पण एवढ्या रात्री ?

'हॅलो' देअर...जोच्या आवाजात चिअरफुलनेस होता...

'तुझी अॅड रिजेक्ट झालीय !'

'व्हॉट ?'

श्रीचदन मग त्याला दिल्लीच्या फोनच सगळ संभाषण ऐकवल.

आता मिराडालाही सताप आला आणि जाहिरात अश्लील असल्याचा आरोप श्रीचदच करत असल्याप्रमाणे त्याच्यावरच तो तुटून पडला

'प्लीज गेट इट स्ट्रेट फ्रॉममी... मि. मेहरा. मी माझ काम केलय, तुम्ही ते अप्रूव्ह केलत. आय अॅम नॉट बिइंग म्रॉडेस्ट बट दॅट वॉज द बेस्ट अॅड आय मेड आणि तू त्याला अश्लील म्हणतोस ? ऑन व्हॉट ग्राऊण्डस् ?'

श्रीचदनं ही तितकच चिडून म्हटलं की मी म्हणत नाहीए टीव्हीच अॅड सेन्सॉर म्हणतंय! .. पॉल. . .

'जो प्लीज लिसन, आर यू देअर !

तू नवीन जाहिरात का बनवून देत नाहीस ? समथिंग सिम्पल् !

'इम्पॉसिबल !' जो ओरडला. माझ नाव खराब करून घेऊ! नॉट ऑन माय डेड सोल !

'जो प्लीज लिसन्... तुझं नाव खराब होणार नाही. पण मला वाटतं समथिंग टेरिबल मे हॅपन ! आणि जो. इफ यू डोण्ट माइण्ड... आपण साधी जाहिरात देऊ. तू एक साधारण कॉपी लिही... वी शॅल प्रेस देम...मी हवं तर जाहीर करीन की ही अॅड .. तुम्ही बनवलेली नाहीत म्हणून... इट वॉज ड्रॉप्ड अॅट द लास्ट मोमेंट !'

जो श्रीचदचं बोलणं ऐकत होता. त्याचा सुरुवातीचा राग कमी झाला. श्रीचदवर चिडण्यात अर्थ नाहीए तोच अडचणीत आहे. आणि या प्रकाराला तोही जबाबदार नाहीए. आतापर्यंत श्रीचंदच फक्त आपल्याशी बरोबरीनं वागलाय. व्हाय नॉट गो विथ हिम !

'ओके श्रीचद... मी माझ्या असिस्टटना विचारात घेतो.'

'पण आता वेळ शिल्लक नाहीए. मी प्लेन चार्टर करून निघतोय. एफ यू आर देअर... मला एअरपोर्टवर भेट. एअर लाइन्सच्या बुकिंगपाशी... अराऊण्ड टू अे एम्...'

आणि आता तिथच जो, मोना आणि श्रीचद उभे होते. विमान सुटायला अजून तासभर अवकाश होता.

कोणी एकमेकाशी फारसं बोलायच्या मन.स्थितीत नव्हत... जोनं मोनाकडे वळून पाहिल आणि मोनाच्या चेहऱ्यावर एवढ्या रात्रीही तोच ताजेपणा दिसला.

जोनं जेव्हा श्रीचंदला माझ्या सहकाऱ्याशी बोलायचय अस म्हटलं तेव्हा ही मेण्ट मोना आणि त्याप्रमाणे तो आपले एक–दोन दिवसांचे कपडे पॅक करून मोनाकडे आला

जोच्या चेहऱ्यावर चीड सताप आणि काही तरी विचित्र, अटळ घटना घडत्येय त्यामध्य आपण सापडलो आहोत, त्यातनं सुटकाही होत नाहीए असे भाव तिला दिसले

जोनं झपाट्यानं सगळ सांगितलं. त्याचा आवाज रागातून फाटत चालला होता. घोगरा होत होता आणि आता त्याच्या चेहऱ्यावर फक्त वेदना होती.

'माझी जाहिरात अश्लील ?'

'मोना टेल यू फ्रँकली... मला काही कळत नाहीए !'

'जो तू खरच श्रीचंदबरोबर का जात नाहीस. तुला कळेल तरी काय घडलय ते. इथं राहून तुला चैन पडेल का ? नाही ना. मग तू जा...आणि खरं सागू तू जमलं तर कॉपीही लिहून दे. समथिंग व्हेरी सिम्पल्.'

'मोना, आय अॅम गोइंग... मी त्याच तयारीनं आलोय. पण मी एकटा जाणार नाहीए. आय विल नीड यू. तू पण चल माझ्याबरोबर !'

'मी ? !'... मोना थाबली, याच क्षणी जाणवून घ्यायला हवय .. मी त्याला खरच हवीय का ? का म्हणून ?... कोण म्हणून? सहकारी म्हणून ?

मोनानं काही भासवू न देता म्हटलं,

'कॉपी लिहायला मदत म्हणून ?'

मिराडाच्या चेहऱ्यावर पुन्हा एक श वेदना दिसली.

'मोना प्लीज. नॉट अॅज अ कलीग ! आय वॉंट यू...मोना प्लीज समजून घे... मला तू हवीएस...सोबत म्हणून... टु शेअर माय प्रॉब्लेम्स...मी'

जोला अधिक बोलवेना. त्याला शब्दच फुटेना. त्यान मोनावरची नजर हलवली आणि तिला वाटल त्याच्या डोळ्यात पाणी तरारलय !

मोना अधिक काही बोलली नाही. तिनं बॅगेत कपडे भरायला सुरुवात केली.

जोनं एकदम उठून तिच्या दोन्ही खांद्यावर आपले पजे ठेवले आणि तिच्याकडे पहात म्हटल, 'थँक्यू मोना !'

मोनान त्याच्या नजरेला नजर दिली आणि त्याच्याकडे पाहून पुसट स्मित केलं. त्याच्या पकडीमधून हलकेच निसटून ती बॅग भरायला लागली.

जोन ती काम करता करता घरात काही आवरायचय का ? अस विचारल.

मोना त्याच्याकडे न पाहता म्हणाली, 'डोण्ट वॉंदर...मी झोपायच्या आधी सगळं आवरूनच पडते.'

..'आणि मोना, मी पाडेला फोन केलाय. ऑफिसात उद्या एमडीला आपण दिल्लीला गेल्याचं तो सागेलच.'

मोनाच्या ताडदेवच्या छोट्या घरातनं बाहेर पडून आता तासभर झाला होता. त्या दोघाची झोप उडाली होती. कॉफीशॉप-मधन कॉफी पिऊन काऊटरपाशी ते आले तेव्हा श्रीचद तिथं पोचला होता.

श्रीचदचा दुखावलेला देखणा चेहरा पाहून मोनाला अधिक गलबलून आल. बराच वेळ कुणीच काही बोलल नाही.

मग श्रीचदनं दिल्लीला गेल्यावर कोणा-कोणाला भेटायच, काय बोलायच हे सागि-तल. त्यांचा लीगल ॲडवायझर दिल्लीला कोणत्यातरी कामालाच आलेला होता आणि तो तिथच भेटणार होता. सगळ्या गोष्टी झपाट्यानं करायच्या...पिटिशन फाइल करायच हवं तर... नाही तर...नवी ॲड... पण उद्‌घाटन वेळच्यावेळी पार पाडायच.

श्रीचदचे डोळे मधनंच शून्यात पहायला लागत. तो विचारात गर्क होऊन बोलायचही थाबवत असे.

जोला परत परत ॲडफिल्ममधले ते समुद्र किनाऱ्यावर उधळणारे घोडे आठवले. त्यांचा उमदेपणा, स्फुल्लिंगासारख त्याचं लाल तांबूस तेज, सूर्योदयावेळचा (प्रत्यक्षात सूर्यास्तावेळचा) सोनेरी प्रकाश आणि प्रेस ॲडमधली थ्री डायमेन्शन वाटणारा ती पुरुषाकृती. त्याची कॉपी.इटस्‌ एक्सक्विसिट!

मोनाकडे पहात त्यानं सुस्कारा टाकला.

खराब हवामानामुळे विमानाचं प्रयाण पुढे ढकलता ढकलता ते सकाळी साडेआठला पोचले.

...आणि तेव्हा त्या सगळ्याचे चेहरे ओढलेले वाटत होते. विमानतळावर अजून लीगल ॲडवायझर–रिजनल मॅनेजरचा पत्ता नव्हता. विमानतळावर खूप गर्दी आणि धादल होती. खादीधारी माणसं सांडल्यासारखी दिसत होती. कोणत्यातरी मोठ्या नेत्याच प्रयाण होणार असल्यासारखं दिसत होतं.

श्रीचदनं पोचल्याबरोबर प्रथम छड्डाचा फोन लावला. नशीब एन्गेज्‌ड टोन नाही. फोन उचलल्यावर श्रीचदला तेच उत्तर मिळालं. छड्डा अजूनही परदेशी आहेत परत आले नाहीत.

श्रीचदनं मग आपल्या डीलर्स एजटना फोन केले. दोघेही भेटले पण एवढ मोठ काम? सरकारी दबाव? डेलीवर? ऑन दॅट लेडी...अग्रवाल?

त्यांनी असमर्थता प्रकट केली. त्यांना श्रीचंदला अशी शक्यताच कशी वाटली याचं हसू आल आणि त्याचे डेस्परेट प्रयत्न पाहून विषाद वाटला.

मिरांडा आणि श्रीचंद फोन करीत असतानाच मोनानं स्टॉलवरन इंडियन डेलीचा ताजा अंक आणला आणि तिनं घाईनं सेंट्रल पेज उघडल. उजव्या बाजूच पान. त्या पानावर...वी ऑर लॉंचिग...द न्यू ब्लेड... द शेव्हिंग पीपल... अशी ठळक अक्षरं होती.

ती पळत पळत त्या दोघांना घेऊन आली आणि लाऊंजच्या सोफ्यावर त्याना बसवून ती जाहिरात दाखवली.

श्रीचदच्या चेहऱ्याकडे आता तिला पहावेना. त्याच्या डोळ्यात जखमी पाखराची धडपड होती.

त्याच्या हातातल वर्तमानपत्राच ते पान चुरगळत गेल.

त्याला शब्द फुटेना. डोळ्यात दुःख आणि क्रोध या भावनाची लपाछपी चालली होती.

'इटस्‌ ए प्लॉट टू फिनिश मी! बास्टर्डस्‌ द मदर फकिंग स्वाइन्स!'

मोनाला ऐकवलं नाही. त्यांनी जाहिरातच विड्रॉ केली नव्हती. सगळ्या कॅम्पेनवर बोळा फिरवला होता. कॅम्पेन आता कोलॅप्सच झालीय. आता काळ त्याच्या बाजूला आहे. त्याची ब्लेड...कोलॅबोरेशनमधली पहिली ब्लेड ठरणार!

जो आणि मोनाला त्याच क्षणी जाणवल की, ॲड अश्लील आहे ही सगळी चालबाजी आहे. त्यांना ॲड सरळ रिफ्यूज करण कठीण गेल असतं म्हणून हा बहाणा!

जोला सॅमी रगूनवालाचा चेहरा आठवला त्याच सरळ येऊन टोकाशी वाकडं झालेलं नाक आठवल आणि त्याच्याही मुठी वळल्या.

मिरांडा आपलं डोकं हातात धरून बसला.

मोनानं कॉफी काउंटरवरन दोन कप कॉफी पेपरकप्समधनं आणली ते नको नको म्हणताना त्याना प्यायला लावली.

श्रीचदला किंचित्‌ हुशारी वाटली. घड्याळात पहात तो म्हणाला, 'हे बास्टर्डस्‌ अजून आले नाहीत. स्साले!'

जो आपल्याच विचारात होता. त्याला आपली आता आवश्यकता संपलीय असच वाटत राह्यलं. जाहिरात खरोखर काही आक्षेपार्ह नाहीए. हे *सगळं हलकट कारस्थान* त्या बिग बास्टर्डस्‌चं असणार अस त्याला परत परत वाटल आणि आपल्या भोवतालचं हे सगळं एक भास आहे अस तर नाही!

तो विमानतळ, चित्रविचित्र पोशाखातली ती माणसं, परदेशी पाव्हण्याची सळसळीत धावपळ आणि व्हीआयपी कक्षाजवळ वाढत जाणारी खादीधाऱ्याची गर्दी, हे दिल्लीचा विमानतळ अनेकदा पाहूनही तो त्या क्षणी त्याला विलक्षण अपरिचित वाटला.

जोन त्याच गोंधळल्या अवस्थेत बाजूला पाह्यलं, तेव्हा श्रीचद आणि त्याचे दिल्लीतले सहकारी आले होते. तिघांची जोराजोरात चर्चा चालली होती.

मोना गप्पपणे ऐकत होती.

'बट्‌ लेटस्‌ मूव्ह आउट ऑफ हिअर. अग्रवालजीशी अकराला अपॉइण्टमेंट आहे. आणि इथं यायला उशीर झाला. कारण कोणीतरी व्हीआयपी रशियाला चाललाय त्याची मिरवणूक यायची आहे.'

त्यान विमानतळाबाहेर पडून दिल्लीकडे लागायला उशीर लागतच होता कारण ट्रॅफिक बदोबस्तात मिरवणूक चालली होती.

'हे कोणाचे चिरंजीव?'

असतील कोणाचे तरी? कोणाचा का दिवटा असेना...सगळेच स्साले चोर!'

इंडियन डेलीच्या ऑफिसात पोचायला उशीरच झाला.

मोहिनी अग्रवालजीनं आपल्या सोनेरी काडीच्या चष्म्यातनं खोलीत येणाऱ्या प्रत्येक माणसाला न्याहाळल आणि तोच चष्मा सारखा करीत त्या म्हणाल्या,

'आय ॲम सो सॉरी. मि. मेहरा. मला व्यक्तिगत विचाराल तर खरंच या ॲडमध्ये काहीच गैर वाटत नाही; पण काय करू? आमच्या बोर्डान तसा निर्णय घेतला न मी अर्जंट मिटिंग बोलावली मला टी.व्ही. सेंटरकडनं ही बातमी लागल्याबरोबरच मी मिटिंग बोलावली आणि सगळ्यांनी एकमतांनी ठरवून मला कळवल की, पेपरची रेप्युटेशन टिकवायची असेल तर...'

श्रीचदच्या लीगल ॲडवायझरचा मनातल्या मनात तळतळाट होत होता. द बीच

इज टु श्रूड ! तिनं सगळ्या गोष्टी फुलप्रूफ केल्यात. आता जर कोर्टात याना ब्रिच ऑफ कॉंट्रॅक्टवर खेचलं तर ते म्हणणार, द कंपनी हॅज राइट टू रिजेक्ट ! ओके. कोर्टात हे सिद्ध करावं लागणार हे काम या माणसानी हलकटपणे केलंय. टु डिफिकल्ट टु प्रूव्ह ! आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर या कठपुतळ्या आहेत हे सिद्ध कसं करणार ! शी वील एस्केप ऑल चार्जेस !

श्रीचंदनं त्याच्याकडं पाहयलं तेव्हा त्याच्या नजरेवरनंच त्याला काय ते कळलं.

'मला सांगा...मी माझ्या बोर्डच्या कशी विरूद्ध जाऊ हो. माय हॅंडस आर टाइड !'

'हात बांधलेले आहेत म्हणे !' श्रीचंदचा अस्वस्थपणा वाढत होता. त्याला एकच प्रश्न विचारायचा होता. मग शेव्हिंग पीपलची ॲड कशी आली ? जाहिरात अश्लील ठरवली ती टी.व्ही. सेन्सरनं. ओके. मग ताबडतोब दुसरी. सबस्टीट्यूट !

श्रीचंदनी तो प्रश्न विचारलाच.

मोहिनीजी बसल्याजागीच ताठ झाल्या आणि श्रीचदकडे रोखून पहात म्हणाल्या,

'मी या प्रश्नाचं उत्तर द्यायचं नाकारू शकते पण...'

असं म्हणून त्यांनी स्मित केलं आणि 'खरं म्हणजे या दोन्ही जाहिराती आमच्याकडे एकदमच आल्या. तुमचो प्रथम आली म्हणून तुम्हाला प्रेफरन्स दिला. तुम्हीं काही तासानीच रेस जिकली होतीत...मग तुमची रिजेक्ट केल्यावर त्यांचीच घेणार नं ! कंपनीनी त्याना का नाकारावं ? कोणत्या कारणासाठी ?'

'आणि...तुम्ही तुमच्या उद्घाटनाची ॲड आणून द्या...आम्ही छापू ना !'

श्रीचंदनं उत्तर न देता उभा राह्यला आणि निघाला. श्रीचंदच्या लीगल ॲडवायझरनं मग फॉर्मेलिटीज पाळून त्यांचा निरोप घेतला.

बाहेर आल्यावर कोणीही संभाषण न करता इमारती बाहेर पडले. श्रीचंद आणि त्याचा लीगल ॲडवायझर यांचं आपसात बरंच बोलणं झालं...

बराच वेळानं श्रीचंद जोकडे पहात म्हणाला,

'मला वाटतं आम्ही...आम्ही काहीच करू शकत नाहीओत. टी.व्ही. सेन्सॉरनं का




रिजेक्ट केली माहीत नाही.'

लीगल ॲडवायझर म्हणाला, 'दे आर मिअर पपेटस्. वरनं फोन आला की कॉंस्ट्रेटेड बुल्स माना डोलावतात.

'आम्हाला कळत नाहीए काय ॲक्शन घ्यावी ते ! पण तुम्ही एक दोन दिवस थांबा...अजून काही तरी शक्य आहे...मी कंपनीच्या गेस्ट हाऊसवर तुम्हाला सोडतो...

पण त्याआधीच जो म्हणाला,

'फरगेट इट. आम्ही करू आमची व्यवस्था. आम्ही जनपथमध्ये उतरतोय. तिथनंच तुम्हाला कॉण्टॅक्ट करू.' आणि प्लीज.. कधीही बोलवा...तुम्ही टी.व्ही. सेन्सरला भेटणार का ? मी प्रयत्न करू का ?'

'नो थॅंक्स, आम्ही ट्राय करू'

हॉटेल जनपथच्या पाचव्या मजल्यावरच्या दोन स्वतंत्र खोल्यात मोना आणि मिरांडा उतरले आणि थोड्याच वेळात आंघोळ करून सैलसर मॅक्सी घालून मोना जोच्या रूममध्ये आली.

संध्याकाळ व्हायला आली. खोलीच्या छोटयाशा बाल्कनीत डेक चेअर्संवर दोघंजण बसून राह्यली जोनं रूम सर्विसवरनं बिअर आणि सॅंडविचिस मागवले.

जोनं मोहिनीजींबरोबरच्या भेटीचा पूर्ण वृत्तांत मोनाला दिला.

हवेत गारवा जाणवायला लागला. फेसाळलेले बिअरचे मग रिते होऊ लागले.

जोनं थकून खुर्चीच्या कडेवर मान टेकवली आणि पाय लांब करून डोळे मिटून तो स्वस्थ बसून राह्यला.

मोना हातात बिअरचा मग तसाच घेऊन जोकडे पहात होती. त्याचा सावळा लहानखुरा चेहरा. नेटके नाकडोळे ..नाकाखालची मिशीची काळी रेघ. आणि त्या खुर्चीत अंग आक्रसून बसलेला जो.

मोनानं बिअरचा मग खाली ठेवला आणि ती जोच्या मागे येऊन उभी राह्यली, आणि त्याच्या डोक्यावर आपली बोटं ठेवली. जोला हलकेच जाग आली आणि त्यानं मान हलवून डोळे अस्पष्ट उघडले आणि हात उंचावून मोनाचा उजवा हात खाली घेतला. तिची लांबसडक गव्हाळ बोटं, नाजूक नाहीत, खूप मऊही नाहीत, पण अगदी आश्वासक. जोन मान झुकवून त्या बोटांवर ओठ टेकले.

मोनानं त्याचं मस्तक कुरवाळलं आणि जो उभा राहिला, उभा राहताना अडखळला आणि मोनानं त्याला सावरलं. आपल्या हाताचा विळखा त्याच्याभोवती घातला

दोघंही एकमेकांना धरून तिथंच उभी होती. वाऱ्याची मंद झुळूक आली आणि मोनानं जोच्या छातीवर आपलं डोकं टेकलं.

दोघंही आत आली आणि मोना बेडवर लवडली.

जोच्या शरीरावरनं मोनाचा हात फिरत होता अलगद ... आणि जोच्या श्वासानं तिच्या अंगावर रोमांच येत होते. तिचा स्पर्श...तिला जाणवणारा विश्वास.. जोला अधिकाधिक उत्तेजित वाटत होतं.

जो हलकेच मोनाच्या कानात म्हणाला, 'तुला काही सांगायचंय ?'

मोनानं मंद स्मित केलं.

जोला जाणवलं. शब्दाची शक्ती संपली. पण सांगायचं खूप बाकी आहे. ते शब्दात सांगता येणार नाही. सेक्स इज कम्युनिकेशन.

मोनाच्या गव्हाळ रंगाच्या पोटावरनं जोचे ओठ फिरत होते आणि त्यानं हात लांब करून मोनाचे केस मोकळे केले. त्या केसांचा मंद सुगंध. मोनाला जोच्या शरीराची ओळख होत होती. पाठीवरची जन्मखूण... तिचं मांसल मार्दव त्याच्याभोवती लपेटलं जात होतं. अंगामधली वाढती रग. सळसळून जाणारी उष्ण धग. तिच्या गूढ पोकळीतला उबदारपणा, त्याची लयदार हालचाल. लयकारीचा वाढता ताल आणि मग एक क्षणी...फुटणारा बांध एकरूप, एकाच लयीत उत्फुल्ल आनंदाचा उसळता क्षण आणि घरंगळत एकमेकांपासन विलग होणाऱ्या हातांमधली तृप्ती. अंगांगातील सुखद शिथिलता.

आणि त्या शिथिलतेमधनं सुस्ती आणि दीर्घ शांत झोप.

दिल्लीमधल्या दोन दिवसांत शेल्हिंग पीपलची जाहिरात उलगडत गेली. ती जो, मोनासकट हजारो, लाखो भारतीयांनी पाहिली. बसमधल्या गर्दीच्या प्रवासात, मुंबईच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात, ऑफिस-मध्ये पोचल्यावर मित्राशी गप्पात...विषय... हमखास...ट्राय करायला हवी. नवी ब्लेड शेव्हिंग पीपलची !

श्रीचंद आणि जोची भेटझाली फोनवर.

आणि या घटनांचा शेवटचा अध्याय मिराडापुढे उलगडला.

विल्किनसननं कोलॅबोरेशन विड्रा केलं. 'वी आर नो मोअर विथ यू. आम्ही आपल्या कराराप्रमाणे कोलॅबोरेशन विड्रॉ करू शकतो. ब्लेडची कॅम्पेन जबर हवी ! तुम्ही बाजी हरलात. पहिल्या फेरीत तर हॅंडस् डाऊन !

आमचं महत्त्वाचं कलम मोडलं !

आय ॲम सॉरी. पण नाइलाज आहे आमचं स्टॅंडर्ड आम्हाला टिकवलं पाहिजे.

हे ऐकताना, पॉइंट ब्लॅंक ऐकताना श्रीचंदच्या पायाखालची जमीन सरकली. तो कोसळलाच.

मेहरा कंपनीनं पुन्हा भेटीगाठी केल्या. पण कशाचा उपयोग झाला नाही.

कोलॅबोरेशन संपलं !

आता हे सारं कसं गुंडाळायचं याच्या चर्चाही सुरू झाल्या. विल्किसनच्या एमडीनं त्यांना त्यात भरपूर सूट दिली पण बोलणी चालू होती. एमडीनं मेहरा कंपनीची जाहिरात पाहायची इच्छा व्यक्त केली.

जोनं दिल्लीतच आपण तयार केलेलं मॅटर दाखवलं. पारदर्शिका दाखवल्या ॲडफिल्म दाखवण्याची व्यवस्था करू शकतो असं सांगितलं.

श्रीचंदला वाटलं कदाचित त्यांनी काही परिणाम होईल ! पण नाही म्हणजे नाही !

श्रीचंदचे सगळे बेत गडगडले होते. शेअर बाजारात भाव घसरले बातमी झपाट्यानं पसरली, बाजारात चर्चा सुरू झाली.

श्रीचंद आणि मोना—जोची चुकामुक दिल्ली विमानतळावर झाली. ती दोघं मुंबईला परतत होती आणि श्रीचंद बंग-लोरला निघाला होता.

त्यानंतर आठ दिवसांनी मोना घाईघाईनं जोच्या केबिनमध्ये शिरली. तिच्या चेहऱ्या-वरून ती खूपच संतापलेली वाटत होती. 'ब्लडी बिग बास्टर्डस् !'

आज संध्याकाळी ते पार्टी देताहेत आणि दे हॅव गटस् टू कॉल मी !

जो समोरची खुर्ची टेबलाखालनं ओढून आपटून मोना त्यावर बसली.

जोनं तिच्याकडे पाहिलं.

आणि मोनाला एकदम रडूच कोसळलं. संतापानं, दुःखानं.

तिला आवरताही येईना.

मिराडानं न बोलता खिशातला रुमाल तिला दिला.

'मोना, दे आर व्हलचर्स ! ते शिकार करीत नाहीत. ते दुसऱ्याच्या शिकारीवर ताव मारतात. दे आर व्हलचर्स. नथिंग एल्स '

'आणि तो रुमाल ठेव तसाच. माझा एक रुमाल तुझ्याकडे आहे ना तसाच.'

'जो.' मोनानं त्याला हाक मारली जोला वाटलं आता मोना कोणत्याही क्षणी येऊन आपल्याला मिठी मारेल

त्या आधीच तो म्हणाला,

'कम, लेटस् लीव्ह आज तुला माझ्या वरळीचा समुद्रमहाल दाखवतो !'

मोनानं नाक पुसत त्याच्याकडे पाहिलं !

बंगलोरच्या फिलोमिना नर्सिंग होममधला हृदरोग्यांचा तीव्र दक्षता कक्ष. स्वच्छ पांढऱ्या चकचकीत फरशांनी शाकारलेल्या भिंतीमधल्या कक्षात खूपचंद मेहरा कॉटवर टेकून बसले होते.

आणि त्यांच्या बाजूला श्रीचंद. दोघं गप्प. डॉक्टरांच्या सूचना कडक!

धंद्याच्या गोष्टी बोलायच्या नाहीत. हार्ट अटॅक पुन्हा येण्याची शक्यता आहे.

त्या खोलीचे पांढरे शुभ्र पडदे वाऱ्यानं फडफडले. कक्षामधल्या शुभ्र पोषाखातल्या नर्सनं येऊन खूपचंद मेहरांची नाडी तपासली. श्रीचंदनं तिच्याकडे आशेनं पाहिलं.

ती 'ठीक आहे' असं जेमतेम पुटपुटत निघूनही गेली.

श्रीचंदनं खूपचंदच्या हातावर हात ठेवला आणि थोपटल्यासारखं केलं. दोघांची दृष्ट-भेट झाली.

खूपचंदना ते काश्मिरला जाण्यापूर्वीची त्यांची भेट आठवली मोठ्या उमेदीनं उभा असलेल्या श्रीचंदची पाठमोरी आकृती आठवली. विश्वासाचे काही क्षण, जवळीक, आधार.

खूपचंदना प्रेमाचा उमाळा आला. कोरड्या ओठांची थरथर झाली. नाक ओल-

सर झाल. डोळयाच्या कडावर पाणी तरारलं.'

ते श्रीचदकडे पाहून काही म्हणणार तोच मघाची नर्स 'टाइम हो गया' म्हणून सूचना नव्हे जाण्याची आज्ञा देऊन गेली.

श्रीचदन खूपचदचा हात हातात घेऊन हस्तादोलन केल. खूपचदना श्रीचंदच्या हाताचा स्पर्श कणखर वाटला. श्रीचदला त्याच्या डोळयात क्षणभर तीच चमक दिसली. दिल्लीला जाऊन येण्यापूर्वी जी उभारी असे तीच पुन्हा. अगदी निसटती. आणि तो निघाला.

त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ते पहात राहिले. त्याच्या चालीतला दमदारपणा जाणवला. तो ताठ आहे कोण हा? मीच तर नव्हे ना. चाळीस वर्षांपूर्वी कफल्लक अवस्थेत पाकिस्तानातन आलेला... तोच आवेश, ताठपणा.

त्याना ग्लानी आली. येस. हा माझा मुलगा आहे. म्हणजे मीच.

त्याचा देह घरगळत खाली आला आणि निश्चेष्ट पडला.

जोच्या टेबलावरचा फोन खणखणला,

विल्किनसनचा मॅनेजर ताजमध्ये उतरलाय

भेटू इच्छितो.

ओव्हर डिनर,

ओके

वेळ आहे?

ऑफ कोर्स!

त्या संध्याकाळी ताज इण्टरकॉंटिनेण्टलच्या उच सुळक्यावरच्या सगळयात वरच्या मजल्यावरन दिसणारी मुबई अधिकच झगमगीत वाटली. आत समुद्रात उभ्या असलेल्या बोटीवरची रोषणाई अधिकच जल्लोषमय वाटली.

अपोलो बारच्या सगीताच्या तालावर त्याची बोटं नकळतच त्या उंच ग्लासाभोवती हलत होती. गेल्या काही दिवसात घडलेल्या विचित्र घटनाची कडवट चव खरं पाहता अजूनही तोडात रेंगाळत होती. बट टाइम द बेस्ट हीलर!

जोनं व्हिस्कीच्या दुसऱ्या राउडनतर आपल ड्रिंक अत्यत सावकाशपणे प्यायला सुरवात केली होती. आयुष्यातल्या घटनाच्या झपाटणाऱ्या वेगातं तो बधीर झाल्यासारखा झाला होता आणि त्यामधनच तो अधिक फिलॉसॉफिकल होत चालला होता या विजेच्या वेगान पुढे धावणाऱ्या शहरामध्ये असे क्षण अनुभवाला येतात जेव्हा त्या जीवनातली जीवघेणी स्पर्धाच नकोशी होते, अगावर येते, आणि मग जोला आठवल. कोणतंही नवं ॲवॉर्ड, नव यश मिळालं तरी त्याच्या आनदाला एक विषादाची छटा असते. नावलौकिक, पैसा आणि चैन याच्या मागं धावताना असही वाटत की सुख खरो-खरच यात दडलय का?

असाच विचार जोच्या मनात तिसऱ्या राऊडला सुरू झाला. तो तोडान विल्किनसनच्या मॅनेजरबरोबर कुशल सभाषण करीत होता. भारतातल्या ॲडव्हर्टायझिंग सीनवर आपली मत माडत होता. एवढयात,

मला तुमचा जॉब आवडला. ब्रिलियट. फोर्सफुल. कॉपीला अजून पॉलिश लागेल. पण ते फारस कठीण नाही. तुमच्यात स्वत.चे विचार आणि कल्पना आहेत. मी मुद्दामहून तुमच्या ॲडस् मागवल्या, जुन्याही मिळवल्या.

'कॅन यू जॉईन अस्?'

जोच्या डोळयासमोरन तो अंधुक प्रकाशातला बार गरॅकर सरकला. बोटीत बसल्यासारखं सगळंच डुचमळल आणि त्यानं अभावितपणे मोनाचा हात धरला.

'ॲड सर व्हेन यू से यू, यू मीन बोथ ऑफ अस्!'

'आफ कोर्स!'

मोनानं गरकन लाजून मान वळवली आणि तिच्या सैलसर आबाडयाचं छोटं शेपूट हललेले जोला दिसलं आणि जो ते कोणत्याही क्षणी ओढेल आणि...नतर काहीही करेल अशा भीतीनं पुन्हा मान वळवून डोळे मोठे करून ती त्याच्याकडे पाहू लागली.

चार महिन्यांनी...

... मोहन उदेसिंगच्या कानावर मेहरा कपनीच्या स्कॅंडलची बातमी केव्हाच लागली होती. खरं म्हणजे त्यानं श्रीचदला फोन करून भेटण्याचा अनेकदा प्रयत्न केला पण तो कधीच गवसला नाही...

पण आज सकाळची टाइम्समधली ती बातमी वाचून त्याच्या मनातली शेवटचं शका दूर झाली.

इंडियन डेली पब्लिशर्सच्या दिल्लीच्या इमारतीवर 'डेली हाऊस'वर आज अनेक वर्ष सरकारन खटला लावलेला होता. कित्येक वर्ष रेंगाळलेलं ते काम होतं. अनेक वर्षानतर सरकारनं ती केस काढून घेतली आणि डेलीवरच्या सगळया सरकारी केसिस गेल्या चार महिन्या अशाच काढून घेतल्या होत्या; पण सगळयात रेंगाळणारी चिकट केस आज सपुष्टात आली.

मोहनला आतापर्यंत वाटत होतं की आपल्या मनातला हायपोथिसिस हा लॉंग शॉट आहे. तो खरा असण्यापेक्षा खोटा ठरण्याची शक्यता अधिक पण आजची बातमी वाचली आणि त्याला पटलं.

मोहनची टाइपरायटरवरची बोटं थबकली आणि त्याला दिल्लीला घडलेल्या त्या बैठकीची आठवण झाली...

महरौली फार्मवरचा अग्रवालचा बगला ...उतरती सध्याकाळ ..हिरवकच लॉन... पांढऱ्या डेक चेअर्स.नाजुक डिझाइनची साडी नेसलेल्या मोहिनीजी, सफारी सुटातले ज्यु पाठक. आणि तो स्वत:.

श्रीचंदविषयी पूर्ण माहिती. त्यानी सागितली. विल्किनसन बरोबर करार झालाय हे हे सागितले... अजून काही .. कराराची डिपेल्स...

सॉरी, त्यानी सागितली नाहीत!

'तुम्ही विचारलीत?' मोहिनीजीचा रोखठोक प्रश्न.

...हो पण थाबा...जरा...

...आठवू दे.

त्यानी तेव्हा सागायला रिफ्यूज केले; पण नतर आम्ही ॲडसीनबद्दल बोलत होतो. ॲडव्हर्टायझिग बूम, क्वालिटी वगैरे...तेव्हा तो म्हणाला,

'इनफॅक्ट, विल्किनसनची सगळयात महत्वाची अट अशी की... इफ द कॅम्पेन फेल्स ...वी शॅल विड्रॉ द कॉन्ट्रॅक्ट... कॅन यू बिलिव्ह इट' बट दे मीन इट! ते कॉन्ट्रॅक्ट विड्रॉ करतील; पण तितकीच खात्री मला आहे की आम्ही हे जिकूच. वी हॅव हायर्ड बेस्ट हॅंडस्. पण करारातला हा सगळयात महत्वाचा आणि तितकाच वीक पॉइण्ट आहे!

'मला त्यावेळी काही खास महत्त्वाचं वाटलं नव्हतं बट देअर इट इज!' मोहन म्हणाला आणि विसावला होता.

ज्यु. पाठकांच्या चेहऱ्यावर आलेलं समाधान, त्याचे विचारमग्नतेनं बारीक झालेले डोळे त्याला दिसले नव्हते आणि त्याआधी ज्यू. पाठकानी मोहिनीजीशी संपर्क साधल्यावर पाठकाना मदत करून आपला फायदा कसा करून घेता येईल त्या योजनेने बारीक झालेले डोळे पाठकानाही दिसले नव्हते.

......

आणि आज या शक्यतेची शेवटची कडी सापडली. डेलीची सरकारकडने थोडी थोडी सुटका...मेहराची अँड दाबून...पाठकला प्रोजेक्ट केल... आखून खेळलेला यशस्वी झालेला डाव.. त्यात अनेक दुय्यम पात्रं. त्याची भूमिका सर्वात मोठी. पडद्यामागचीच जवळ जवळ... टी व्ही सेन्सॉर बोर्ड...पॅक ऑफ पपेटस...अनामिक ... बिनडोक्याची माणसं...कोण ठाऊकही नाहीत !

त्याचा निर्णय ? ...अँड मधला ब्लडी (फर्गेट युवर ब्लडी मॉनिंग) शब्द अश्लील आहे. सेन्सॉरला कायद्यानं अधिकार आहे. कायद्याच्या चौकटीत बसून मोहिनीजी डेलीची कायद्याच्या कचाट्यातनं सुटका करून घेतली !

मोहनला अजूनही सगळे धागे हाती लागले नव्हते पण त्याचा रफ स्केच हा ब्लू प्रिंट होता.एक झक्क कव्हर स्टोरी...स्कूप ऑफ द इअर !

गेट टु द रुटस् ! मोहनला आतनं आवाज आला. कशाला किमत आहे या जगात ? कर्तुत्व ! हिम्मत ! कौशल्य ! ञ्कावेबाजपणा को वशिला. हा फक्त जीवघेणा खेळ आहे. कधी माजर उदराला खेळवते तसा तर कधी

दे कट विथ शार्प एज.

'दॅटस इट ! शार्प एज.' मोहनच्या डोक्याला मुग्या येत होत्या. प्रचड स्कूप त्याच्या हाती लागत होतं. त्यातला मोठा हिस्सा आणलाय. फेस इट. अॅडमीट इट टू द पीपल, दे विल फरगिव्ह यू ! तू माफीचा साक्षीदार हो आणि फेड या सगळ्यांची वस्त्रं !

मला त्या परदेशी वाऱ्या नकोत...आय हॅव गॉट स्टोरी आफ माय लाइफ टाइम. शार्प एज.

मोहननं टाइपरायटरमध्ये अडकवलेले कागद काढले आणि ड्रावरमधन आपल खाजगी लेटरहेड काढल. ते शातपणे आत चढवून आपला राजिनामा टाइप करायला सुरुवात केली... ही स्टोरी हाणायची असेल तर आपल्यालाही हे जुने बध तोडायला हवेत. येस एका क्षणात. आणि तेही झटक्यात... ही बिलिव्हड् इन कटिंग विथ शार्पएज !

□


## आपण तरुण आहोत
## म्हणूनच

आपल्या आयुष्याच्या उतार वयात ठराविक उत्पन्नाची तरतूद करणे आयुष्याच्या या उमेदीच्या काळातच शक्य आहे. आपल्या निवृत्तीचे दिवस हे सुखासमाधानाने घालवावयाचे असतील तर आमच्या सदाबहार व निरंतर ठेव योजनेत आपली बचत गुंतवा व मुदतीनंतर एक महिन्याने बँकेकडून दरमहा तहहयात उत्पन्न घेत रहा.

अधिक माहितीसाठी आमच्या
नजिकच्या शाखेस भेट द्या.

# जनता सहकारी बँक लि., पुणे

मुख्य कचेरी : १४४४ शुक्रवार पेठ
थोरले बाजीराव रोड, पुणे – ४११ ००२
फोन : ४४ ३२ ५८

भा. रा. किराड
कार्याध्यक्ष

ह. ना. कुंदेन
कार्यकारी संचालक


# लहान वय मोठं पद



• गिरीष प्रभुणे •

सध्या हिंदुस्थानात तारुण्याचे वारे वहात आहेत. त्यात हे वर्ष 'युवक वर्ष' म्हणून जाहीर झालेले ! आणि 'माणूस'ने पचविशीत पदार्पण केलेलं ! अशा वेळी माणूसच्या 'तरुणतरुणी' विशेषांकासाठी अशा ऐन तारुण्यात कर्तृत्वाने आपले क्षेत्र गाजविणाऱ्या तरुण–तरुणींच्या मुलाखती घ्यायचे ठरले.

सर्वत्र असे तारुण्याचे वारे वहात असले तरी एकीकडे बेकारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. 'तरुण पिढीला काही करायला नको' असे नारे पालकमंडळी देतच असतात. विध्वंसक कृत्ये करायला – आंदोलनातून, मोर्चांमधून तरुणांना नुसते गोंधळ घालायला हवेत असे विचारवंत काळजीने म्हणत असतात. आसामच्या तरुणांनी दीर्घकाळ चालविलेले आंदोलन. पंजाब – गुजराथचे राष्ट्रीय प्रश्न आणि पदोपदी अस्वस्थ दिसणारा तरुणवर्ग हे एकीकडचे चित्र तर दुसरीकडे आपल्या ज्ञानलालसेने – संशोधकवृत्तीने, धाडसी–तडफदार वृत्तीने तारुण्याच्या जल्लोशात–उत्साहात समजदारपणे, दमदारपणे सर्व प्रश्नांना सामोरे जात–नव्या दिशा–नवी क्षितीजे शोधणारे, टवटवीत, प्रसन्न वृत्तीने परिस्थितीवर मात करणारे तरुण आणि तरुणीही !



श्री. रामचंद्र अ. देखणे

## अष्टपैलु व्यक्तिमत्त्व

कार्यालयात खूपशी गर्दी. वेगवेगळ्या ठिकाणांहून वेगवेगळ्या कारणासाठी आलेले अनेक थरातील लोक त्यात दिसत होते. संतप्त युवक होते. त्यांचं म्हणणं 'आमच्या भागात लाईट–पाणी नाही आलं.' काहीजण आले होते, त्यांना त्यांच्या घराचा ताबा केव्हा मिळणार हे विचारायला. त्यात वृद्ध पेन्शनरही होते. कुणी नवीन स्कीमसंबंधी माहिती विचारायला आलेले. प्रत्येकाचा चेहरा त्रासलेला. काहीजणांनी खूप हेलपाटे मारलेले असतात तरी त्यांचं काम झालेलं नसतं. समोरची तरुण अधिकारी व्यक्ती प्रत्येकाशी हसतमुखानं बोलत होती. प्रत्येकाला समजावून त्याच्या अडचणी दूर करीत होती. सुरुवातीला आलेले संतप्त युवक जाताना हसत गेले होते. आपलं काम झाल्याच्या समाधानात किंवा होणार आहे या समाधानात जाणारा जात होता. एका व्यक्तीला तर साधा फॉर्म हवा होता तो मिळत नव्हता. त्यांनी खूप हेलपाटे घातले होते. तर यांनी स्वतः उठून त्याला जागेवर बसवलं. वृद्ध गृहस्थ होते आणि त्यांना हवा असणारा फॉर्म. त्यासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती एका हळुवारपद्धतीने सांगितली की ती व्यक्ती जाताना अत्यंत आनंदात गेली.

मी पहात होतो. आपलं काम कमालीच्या उत्साहानं करणारे, प्रत्येक बारीक सारीक कामात तितक्याच आत्मियतेनं भाग घेणारे रामचंद्र अ. देखणे. पिंपरी–चिंचवड नवनगर प्राधिकरणाचे जनसंपर्क अधिकारी ! एका अत्यंत कटकटीच्या खात्यातील कटकटीच्या जागेवरील तरुण उत्साही अधिकारी !

पहिल्या इयत्तेपासून पहिल्या नंबरानं पास होणारे देखणे बी. एससी. (केमिस्ट्री) आणि एम. ए. ला विद्यापीठात पहिले आले. नुकताच 'भारुड' या लोककला वाङ्मयावर पुणे विद्यापीठात पी. एच. डी. साठी त्यांनी प्रबंध सादर केला आहे. शिरूर तालुक्यातील दुष्काळी भागातील कारेगावचे देखणे. अत्यंत गरिबीतून वर आले. केवळ २९ व्या वर्षी त्यांनी आपल्या जीवनात यशस्वी होऊन दाखविले. पुणे आकाशवाणीवरील 'वारसा' या श्रुतिकामालेतील लेखन, असंख्य कथा, एक कादंबरी, एक कथा-संग्रह प्रकाशित झालेत. संपूर्ण महाराष्ट्रभर संतवाङ्मयावर असंख्य व्याख्याने त्यांनी दिलीत. 'भारूड' हा त्यांचा आवडता विषय. ते भारूड स्वतः करतात. त्यातील संगीताचे सर्व प्रकार ते

हाताळतात. अल्पवयात अशा प्रकारे सर्व प्रकारात यशस्वी होणाऱ्या देखण्यांची ज्ञान-पिपासा शमलेली नाही.

महाविद्यालयीन शिक्षणात प्रथमवर्षानंतर खंड पडला. ७३ साली दुष्काळ पडला, त्यावेळी त्यांच्या कुटुंबानं दुष्काळी कामं केलीत. देखणे यांनी स्वतः खड्डे खणण्याचे काम त्यावेळी केले. त्याबद्दल बोलताना श्री. देखणे म्हणाले, 'घरातील संस्कारामुळे अत्यंत वाईट परिस्थितीतही मी माझे शिक्षण पूर्ण केले. लहानपणी माझी आई मला म्हणत असे, 'घोड्यावरून जाणाऱ्यानं पायी चालणाऱ्याकडे पहावं.' या ठिकाणी जन-संपर्क अधिकारी म्हणून लागण्यापूर्वी एका कारखान्यात तीनही पाळ्यात काम केलंय. वृत्तपत्रातील जाहिरात वाचूनच मी या नोकरीसाठी अर्ज केला. त्यासाठी मला कोणत्याही प्रकारच्या वशिल्याची आवश्य-कता भासली नाही.'

खरं तर स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असणाऱ्या देखण्यांना वशिल्याची गरजच काय ?

सरकारी नोकरीतील आपल्या अनुभवा-संबंधी बोलताना श्री. देखणे म्हणाले, 'आज काल तरुणांचा ओढा खाजगी क्षेत्राकडे असतो; पण मी सरकारी नोकरीत आलो. एकतर या कामात असंख्य प्रकारच्या लोकांशी संबंध येतो. मी जर कारखान्यात असतो, तर ठराविक क्षेत्रातच मला काम करावे लागले असते. सरकारी क्षेत्रातील पगार आता पूर्वी-सारखे राहिले नाहीत. खाजगी क्षेत्राएवढेच ते जवळपास आहेत. माझ्यावर कोणाचेच दडपण नाही. स्वतःचे काम चोख करणाऱ्याला कोणतेच दडपण येऊ शकत नाही.'


शासकीय कामातील भ्रष्टाचारासंबंधी विचारले असता श्री. देखणे किंचित हसून म्हणाले, 'तसा भ्रष्टाचार आज कुठं नाही ? सर्वत्र आज या रोगानं पछाडलंय. शासकीय यंत्रणेवरचा हा आरोप तितकासा बरोबर नाही. एखादीच व्यक्ती भ्रष्टाचारी असते. सर्वच खात्यातून भ्रष्टाचार चालत नाही. कितीतरी चांगली माणसे निस्पृहपणे काम करताना आढळतील. आपल्या तुटपुंज्या पगारात मानानं जगणारी माणसे मी पाहिलीत. आपले काम सोडून इतर उचापती करणाऱ्यांना या सवयी असतात. माझ्याकडे असंख्य तक्रारी घेऊन लोक येत असतात; पण भ्रष्टाचाराची एकही तक्रार आली नाही. मात्र शासकीय कामातील प्रोसिजर-मुळे कामाला–बिलाला वेळ लागतो. अशा वेळी कॉन्ट्रॅक्टर मंडळीच भ्रष्टाचाराला कर्मचाऱ्यास प्रवृत्त करतात. दडपणामुळे काही वेळेला तो भ्रष्टाचारी बनतो. काही वेळेला तो परिस्थितीने त्यात ओढला जातो.'

रामचंद्र देखणे त्यांचे अनुभव सांगत असताना येणाऱ्या लोकांना एकीकडे मार्गदर्शन करीत होते. रोज दिवसभरात शंभर ते सव्वाशे व्यक्तींना मार्गदर्शन करावे लागते. गुरुवारी तर यात्रेसारखी गर्दी असते.

आपल्या कामासंबंधीचे अनुभव सांगताना श्री. देखणे म्हणाले, 'वरिष्ठांशी काय किंवा कनिष्ठांशी काय संघर्षाचे प्रसंग आले नाहीत. येऊ दिले नाहीत. कारण माझे काम माण-सांच्या स्वभावांचे अंदाज घेऊनच करावे लागते. शिवाय माझे मुख्य काम हेच आहे. संघर्ष मिटविण्याचे-टाळण्याचे-होऊ न देण्याचे कामात कुचराई केली तरच असे संघर्षाचे प्रसंग ओढवतात. हे काम हे माझ्या आवडीचे असल्यामुळे छोट्या कामासाठीसुद्धा मी माझे सर्व कौशल्य वापरतो. माझ्या संतसाहित्याच्या अभ्यासाचा मला या कामी उपयोग होतो. एकास एक न्याय आणि दुसऱ्यास दुसरा असे होऊ देत नाही.

आपल्या ज्ञानाचा व्यासंग वाढवीत असताना त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या कामात करून घेऊन आपणच आपल्या कामात अधिक रस उत्पन्न करून घेणे हे देखणे यांना साध्य झालंय. एकीकडे बदलत्या राजकीय नेत्यांशी जुळवून घेणे, दुसरीकडे शासकीय कामाचा झपाटा आणि तिसरीकडे जनसंपर्काचे अवघड काम, याबरोबरच आपला छंद–अभ्यास–साहित्य–लेखन यातील सातत्य सांभाळणे ही अवघड कसरत रामचंद्र देखणे अगदी सहज-पणे करीत असतात. एखादे गुंतागुंतीचे काम सोडविण्यासाठी त्यांचे सहकारी त्यांच्याकडे येत असतात. 'एखादे काम पेंडिंग ठेवणे मला आवडत नाही.' असे म्हणून देखणे म्हणाले, 'मी पहिल्यापासून एक सवय लावून घेतलीय. माझ्यामुळे कोणते काम अडून राहिलंय असं घडता कामा नये. माझ्याकडच्या सर्व कामांची वर्गवारी करून मी ती वेळात करतो. त्यामुळे कामानंतर डोक्यावर कोणतेही टेन्शन रहात नाही. आपल्या इतर कामातही आपण मोकळेपणाने वावरू शकतो आणि ही शिस्त म्हणा, हा संस्कार म्हणा माझ्या शालेय जीव-नात घरी आणि शाळेत झाला.'

स्वतःविषयी आत्मविश्वासाने बोलणारे खूप आढळतात; पण त्याला पात्र असणारे रामचंद्र देखणे यांच्यासारखे युवक क्वचितच आढळतील.



श्री. दिलीप टिपरे

## तारुण्य : जबाबदारी पेलण्याचे वय

---

अवाढव्य मशिनरींची घरघर चालू आहे एका मोठ्या नरसाळ्यात साबुदाण्यासारखं मटेरियल आहे. त्याच्यावर प्रक्रिया होऊन नायलॉनचे सूक्ष्म–बारीक धागे, असंख्य धागे पुढे सरकत आहेत. त्यातील एक एक धागा वेगवेगळा गुंडाळला जातोय. पुनः त्याच्या तीन तीन धाग्यांची एक एक दोरी बनत आहे. अशा तीन तीन अशा पाचची एक. पुढे असे वाढत वाढत जाऊन एक बारा इंची जाडीचा प्रचंड दोर तयार होत आहे आणि हे सर्व सलगपणे एकमेकात सांधत–पीळ देत. मारवाडी स्त्रिया टिपऱ्या खेळताना जसे फेर धरतात तशी सर्व मशिनरी फिरत आहे. एका सूक्ष्म धाग्यापासून एक अजस्त्र असा प्रचंड ताकदीचा दोर तयार होतो तो 'गरवारे वॉल रोप' या कंपनीत आणि या कारखान्याचे व्यवस्थापकीय मॅनेजर आहेत

एक उत्साही तरुण दिलीप शंकर टिपरे. बी. एस्सी. फर्स्टक्लासमध्ये पास झाल्यावर डी. बी. एम. करून गरवारे वॉल रोपमध्ये मॅनेजर या पदावर नेमणूक झाली. लहानपणापासूनच स्वतः काही वेगळे करावे असे वाटणाऱ्या श्री. टिपरे यांनी अल्पवयातच आपल्या गुणवत्तेच्या आधारावर हे पद मिळविले. आपल्या नोकरी लागण्यासंबंधीच्या अनुभवाविषयी बोलताना श्री. टिपरे यांनी सांगितले,

'माझ्या समवयस्क मित्रांना नोकरी कमी त्रासाची हवी असते. अनुभव घ्यायची तयारी नसते. त्यांना एकदम टॉपला जायला हवे असते. मी स्वतः यापूर्वी एका कारखान्यात काम केले. त्या ठिकाणी पगार कधीच वेळेवर होत नसत; पण मला त्याठिकाणी सर्व अनुभव मिळवता आला. कामगारांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करता आला. कामगारांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास झाला. त्यामुळे या ठिकाणी मला त्यावेळच्या अनुभवाचा उपयोग झाला. माझा संबंध सतत कामगारांशी येत असतो. कामगार, त्यांचे प्रश्न, त्यांच्या कामातील अडचणी–त्यांची सोडवणूक–कामगारांमधील किरकोळ वाद वेळीच मिटवावे लागतात. नाहीतर तेच पुढे त्रासदायक ठरतात. आमच्या कारखान्यात सुरू झाल्यापासून संप झाला नाही याचे कारण हेच आहे.' श्री. टिपरे अभिमानाने परंतु सहज म्हणाले.

टिपरे बोलता बोलता येणाऱ्या फोनवरही बोलत होते. मध्येच टेलिफोन ऑपरेटरला काही सूचना करीत होते. सुपरवायझरला बोलावून कामासंबंधी विचारीत होते. क्लार्कला एक अर्जंट पत्र टाईप करायला सांगत होते. त्यांच्या शेजारच्या काचेतून कारखान्यातील आतल्या भागाचे संपूर्ण दृश्य दिसत होते. त्यामुळे एकाचवेळी सर्वत्र त्यांचे लक्ष रहात होते.


'या ठिकाणी काम करताना वयापेक्षा अनुभव आणि शिक्षण याचाच उपयोग होतो. मी स्वतः या कारखान्यातील सर्व कामे करून पाहिली आहेत. सर्व कामगार प्रशिक्षित–सुशिक्षित आहेत. आज आमच्या प्रॉडक्शनचा दर्जा यू. एस. ए. मध्ये तयार होणाऱ्या मालापेक्षा उच्च आहे. रोप निर्यातीचे पारितोषिक आमच्या कारखान्याला नेहमीच मिळत आले आहे. शिपिंगसाठी लागणाऱ्या जाळ्यांसाठी आवश्यक असणारा दोरा आम्ही बनवतो आणि आमचा अशा प्रकारचा दोरा जागतिक स्पर्धेत उतरला आहे. याचे कारण आमचे कामगार' श्री. टिपरे म्हणाले.

संप न करणारे कामगार हे आश्चर्य वाटेल पण या मागचे रहस्य म्हणजे त्या कामगारांच्या अडचणी अत्यंत तत्परतेने सोडविणारे टिपरे हे आहेत आणि त्यामुळेच कामगार आपल्या कामात कुचराई करीत नाहीत. या कामी सहकार्य करणारे म्हणून त्यांचे वरिष्ठ सहकारी तेलंग यांचा त्यांनी उल्लेख केला.

आपल्यावरील जबाबदारी संबधी बोलताना श्री टिपरे म्हणाले. 'मी एका महत्वाच्या पदावर ऐन तारुण्यात असताना आहे. याचा मला निश्चित आनंद होतो. हे वयच जबाबदाऱ्या स्विकारण्याचे आणि पार पाडण्याचे असते. मी सतत नव्या अनुभवासाठी धडपडत असतो. इतरत्र कारखान्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर लक्ष ठेवून त्याचा अभ्यास करीत असतो. इतरांशी चर्चा करीत असतो. त्यातून विचारांची देवाण घेवाण होते. जितका प्रश्न अवघड तितका तो सोडविण्यात मला आनंद वाटतो. कोणताही गंभीर प्रश्न हा मुळात गंभीर नसतो. कोणताही क्षुल्लक प्रश्न दुर्लक्ष केल्याने केव्हाही गंभीर होऊन त्रासदायक होऊ शकतो. त्यामुळे मी सतत जागरुकतेने काम करीत असतो.'

नव्या औद्योगिक धोरणांविषयी बोलताना श्री. टिपरे म्हणाले, 'जगात सर्वत्र आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. आपणास जर जगाच्या बाजारपेठेतील स्पर्धेत यशस्वी व्हायचं असेल तर या सर्व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. गणकयंत्रांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नाहीतर आपण जगाच्या खूप मागे राहू. त्याचा परिणाम मनुष्यबळावर काहीही होत नसतो.'–

श्री. दिलीप टिपरे आत्मविश्वासाने म्हणाले स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून आपल्या अनुभवाचा पुरेपूर उपयोग कार्यकुशलतेकडे करणारे तरुण उत्साही टिपरे हे गरवारे ग्रुपमध्ये एक लोकप्रिय अधिकारी समजले जातात.



श्री. यशवंत लिमये

## सतत नव्याच्या शोधात....

वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी पन्नास लाखाची वार्षिक उलाढाल करणारे चार छोटे–मोठे उद्योग स्वकर्तृत्वाने सांभाळणारे श्री. यशवंत लक्ष्मण लिमये हे एक आगळे व्यक्तिमत्व आहे. पुणे–भोसरी–औरंगाबाद अशी त्रिस्थळी यात्रा उत्साहाने करीत आपला कार्यभार ते सांभाळीत असतात.

वयाच्या आठव्या वर्षापासून श्री. लिमये वेल्डिंग करायला शिकले. वडिलांच्या वर्कशॉपमध्ये ते काम करीत असत. आई घरीच बालवाडी घेत असे. त्यामुळे अभ्यासाकडे पूर्ण लक्ष. बी. ई. (मेटॅलर्जी) फर्स्ट क्लास फर्स्ट–सुवर्णपदक विजेते असलेल्या लिमये यांनी एम. बी. ए. (उत्पादन) केलं आणि वडिलांच्या छोटया वर्कशॉपचं लवकरच मोठ्या उद्योगात रूपांतर केलं. स्कूटर, मोपेड, मॅटेडोर, रिक्षा यांना लागणारे सुट्टे भाग तयार करण्याच्या या कारखान्यात त्यांनी आपल्या संशोधी वृत्तीने खूपच प्रगती केली आहे.

आपल्या कामासंबंधी बोलताना लिमये म्हणाले, 'प्रत्येक कामाचे डिझाईन मी स्वतः करतो. काळजीपूर्वक पहातो. इतरांना जे काम अवघड वाटतं त्यावर आम्ही आमच्या कारखान्यात प्रयोग करून सहज बनविण्याचे तंत्र प्रगत करतो आणि त्यामुळे बजाजला लागणाऱ्या सुट्टया भागांसाठी आम्ही आमच्या

कामात यश संपादन केले आहे.' त्यासाठी श्री. लिमये यांनी एक मशिन दाखविले. 'या मशिनवर जो जॉब तयार होतो तो पूर्वी कंपनी एका इम्पोर्टेड मशिनवर करीत असे. त्यामुळे खर्च वाढत असे. शिवाय त्यात काही बिघाड झाला तर कामाचा खोळंबा होत असे. आम्ही त्या मशिनचा अभ्यास करून हे मशिन आमच्याइथे तयार केले आणि त्यावर तयार केलेले जॉब कंपनीस दिले. चार लाखाच्या मशिनवर तयार होणाऱ्या जॉबपेक्षा कोणत्याही कसोटीत आमच्या मशिनने बनविलेला जॉब कमी पडला नाही. आमचे मशीन पंचवीस हजारास तयार झाले.'

अशा प्रकारे स्वतःचे वेगळेपण या कामात तयार करून लिमये यांनी ऐन तारुण्यातच या क्षेत्रातील मान्यवरांचा विश्वास संपादन केलाय. त्यांच्या कारखान्यात सर्व तरुण वर्गच दिसत होता. 'काम हवे असं म्हणणाऱ्याला मी काम देतो. त्याच्या ज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी, त्याच्यातील संशोधन वृत्तीला मी वाव देतो. आम्हीच नवनव्या अवघड कामांसाठी ठिकठिकाणी 'अ‍ॅप्रोच' होत असतो.'


त्यांच्या समोरच्या टेबलावर एक डिझाइन पसरले होते आणि त्यांचे तरुण सहकारी त्यावर चर्चा-विचारविनिमय करीत होते

सतत कामात मग्न असणाऱ्या लिमयांना संगीताची आवड आहे. त्यासाठी ते सर्व व्यापातून वेळ काढत असतात. एखादे दिवशी सकाळी आठपासून रात्री तीन तीन वाजेपर्यंत काम करावे लागते. असे केल्यानेच कामातील समाधान मिळते असे त्यांचे म्हणणे आहे.

लिमये आपल्या कामात येणाऱ्या अडचणींसंबंधी बोलताना म्हणाले, 'आज शासनाने वेगवेगळे कायदे केलेत. मिनिमम वेजेस अ‍ॅक्ट बनविलाय. पण मिनिमम वर्क अ‍ॅक्ट नाही बनविलेला. तो असायला हवा. शासन शासकीय उद्योगांना वेगळा नियम लावते आणि खाजगी उद्योगांना वेगळा. आज सर्वत्र भ्रष्टाचार वाढलाय. पण आपली काही चूक असेल तरच पैसे द्यावे लागतात. आपले काम जर नियमाबरहुकूम असेल तर भ्रष्टाचार होणार नाही. मला कारखान्यासाठी रिक्षा हवी होती. त्यासाठी परवाना हवा होता. मला पैसे मागितले गेले, मी ते दिले नाहीत. माझे काम झाले नाही. असे होत असते.'

आपल्या पुढील योजनांसंबंधी बोलताना यशस्वी उद्योजक लिमये म्हणाले– 'ज्या कामगारांमुळे आम्हाला फायदा होतो त्यांचे सहकारी तत्त्वावर एक वर्कशॉप सुरू करण्याचा मानस आहे. इतरत्र सहकारी तत्त्वावरील उद्योगांना अपयश आले असले तरी आम्ही ते यशस्वी करून दाखवू. जबाबदारीची जाणीव प्रत्येकास आल्यावरच या क्षेत्रात पाऊल टाकणार आहे. त्यामुळे कामगारांवरील नैतिक जबाबदारी वाढेल. त्यांची प्रगती होईल.'

यशवंत लिमये बोलत होते. भविष्यातील योजना मांडत होते. त्यांच्या कारखान्यातील मशिनरीच्या आवाजात त्यांच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वासपूर्ण भाव हे अधिक उठावदार होत होते. आपल्या उद्योगातील प्रगत तंत्रज्ञानाच्या अभ्यासासाठी ते ही मुलाखत छापून येईपर्यंत जपानला गेलेलेही असतील. त्यांच्या सुविद्य पत्नीचे त्यांच्या या सर्व व्यापात सहकार्य असते. त्या मायक्रोबायॉलॉजी वर पी. एच. डी. करीत आहेत. यशवंत लिमये यांच्या जपान यात्रेसंबंधी शुभेच्छा व्यक्त करून मी निरोप घेतला.



भालशंकर भागवत सुपडू

## गुणवत्ता हीच कसोटी

आपल्या गुणवत्तेमुळे अल्पवयातच बडोदा बँकेत अधिकारी पदावर पोहोचलेले भालशंकर भागवत सुपडू (३२) हे कॉलेजच्या प्रथम वर्षाला असतानाच बँकेची परीक्षा पास झाले. बी. ए. अर्थशास्त्र उत्तीर्ण होऊन सध्या ते लॉचा अभ्यास करीत आहेत. स्पर्धापद्धतीतून या पदावर पोहोचलेले श्री. भालशंकर हे दलित समाजातील एक अत्यंत कष्टपूर्ण जीवन जगत आजच्या पदावर पोहोचले. 'बँकेतील नोकरी, त्यामुळे समाजातील विविध स्तरावरील लोकांशी संबंध येत असतो आणि आमचे कामच असे आहे की ते आजचे आजच करावे लागते. त्यामुळे एक प्रकारची गती आमच्या कामाला असते. त्या गतीनेच काम करावे लागते. जरा थोडीशी कुठे सैलता आली की, कौंटरवर उभ्या असलेल्या खातेदारांमध्ये चलबिचल माजते.' भालशंकर म्हणाले.

पिंपरी–चिंचवड महानगरातील एक मोठी उलाढाल असणारी बडोदा बँक. महानगरपालिकेच्याच आवारात असल्यामुळे अधिक गर्दी. अधिक कार्यमग्न. त्यामुळे अधिकाऱ्यांना सतत कामावर लक्ष ठेवावे लागते. अत्यंत काळजीपूर्वक काम करावे लागते. भालशंकर यांच्याकडे लघु कर्ज प्रकरणे असतात. अशावेळी रोजच्या कामाव्यतिरिक्त अशा व्यक्तीची माहिती प्रत्यक्ष जागेवर जाऊन घेणे, त्यांच्या अडचणी दूर करून ते प्रकरण कमीत कमी वेळात पूर्ण करणे हे अत्यंत काटेकोरपणे ते करताना दिसतात. त्यांच्या या वृत्तीमुळे सहकाऱ्यांबरोबरच ते खातेदारांतही प्रिय झाले आहेत. त्यांच्याकडे येणाऱ्या खातेदाराला प्रसंगी कायद्याचेही ज्ञान द्यावे लागते. त्यासाठी ते आता कायद्याचा अभ्यास करीत आहेत.

अल्पवयात काम करताना येणाऱ्या अडचणींसंबंधी बोलताना ते म्हणाले, 'अनुभवी व्यक्तींकडून प्रश्न लवकर सुटतात. माझे वयस्कर मंडळींशी चटकन जमते. त्यांच्या अनुभवाचा फायदा होतो. मात्र मी तरुणांचीच बाजू घेत असतो. त्यांच्यात उत्साह असतो. समज कमी असते. खरे तर वयस्कर–तरुण हा भेद असू नये. काही तरुण अकालीच प्रौढ झालेले दिसतात तर कित्येक प्रौढ प्रौढपणात आपला उत्साह टिकवून असतात.'

राखीव जागांच्या ज्वलंत प्रश्नावर बोलताना भालशंकर म्हणाले. 'हा प्रश्न विनाकारण प्रतिष्ठेचा बनविला जात आहे.

त्यामुळे समाजाचे वैचारिक दौर्बल्यच दिसते. राखीव जागांमध्येही आता स्पर्धा निर्माण झाली असून गुणवत्तेतूनच निवड करावी लागते. त्यामुळे हिणकसतेचे जे आरोप होत असतात ते चुकीचे आहेत. व्यक्तिश: मला मागासवर्गीय म्हणून वाईट वागणूक कधीच मिळाली नाही.

श्री. भालशंकर या उत्साही कार्यमग्न तरुणाचे विचार समंजसपणाचे वाटले.



वेदाचार्य मोरेश्वर घैसास

# ऋग्वेदाचा कॉम्प्युटर

---

आपण वेगवेगळ्या क्षेत्रात स्वकर्तृत्वाने चमकणाऱ्या तरुणांची ओळख करून घेतली. आता अगदी वेगळ्या क्षेत्रातील अगदी एकमेव असणाऱ्या तरुणाचा परिचय करून घेऊ. ते क्षेत्र आहे आजकाल जिकडे कुणीही फिरकत नाही असे वेदविद्येचे ! आणि तरुण आहेत वेदाचार्य मोरेश्वर घैसास हे २८ वर्षांचे तरुण ! आज गणकयंत्राद्वारे वेद जतन करण्याचे बोलले जाऊ लागले आहे, अशा काळात प्राचीन परंपरेने वेदांचा अभ्यास पूर्ण केलेले वे. मोरेश्वर घैसास हे पुण्यातील वेदाचार्य फाटक गुरुजींची परंपरा अखंडपणे पुढे चालविणाऱ्या वेदाचार्य विनायकराव घैसास गुरुजींचे धाकटे चिरंजीव.

वेदाध्ययन हे अत्यंत अवघड. त्यातील ऋग्वेद हा सर्वात मोठा ग्रंथ. या ऋग्वेदाची मंत्रसंख्या आहे १०५५२ एवढी. वे. मोरेश्वर घैसास यांचे हे १०५५२ मंत्र तोंडपाठ आहेत. त्यातील पाठभेदासह प्राचीन परंपरेला अनुसरून हे पाठांतर आहे. त्यासाठी १४ वर्षे त्यांना द्यावी लागली. चौदावर्षे सतत रोज पहाटे चार ते सहा, सात ते अकरा, २ ते ६॥ आणि रात्री २ तास असे सतत अध्ययन, रोज बारा तासांचे चालत असे. आणि हे अध्ययन नुसते वाचून नव्हे. गुरूंनी सांगायचे, विद्यार्थ्यांनी म्हणायचे अशी रोज सोळा वेळा संथा घेऊन हे पाठ म्हणायचे. या शिवाय तेवढीच श्लोकसंख्या असलेल्या ९ उपग्रंथांचे अध्ययन पूर्ण झाले आहे.

वे. मोरेश्वर अगदी लहान असताना वयाच्या चौथ्या वर्षी स्वाहाकार यज्ञाच्या वेळेस एकतास त्यांनी ऋग्वेदाचे मंत्र न चुकता म्हटले आणि सर्वांना चकित केले. वयाच्या ५ व्या वर्षी मौंजीबंधनाने अध्ययनाचा मुहूर्त झाला. पुढे चौथीपर्यंत सध्याचे शिक्षण घेतले आणि वयाच्या अकराव्या वर्षी वेदाध्ययनास सुरुवात केली. हे अध्ययन वयाच्या २५ व्या वर्षी पूर्ण झाले. याची परीक्षा 'वेदशास्त्रोत्तेजक सभा' घेते. त्या परिक्षेत उत्तीर्ण झाल्यावर कार्यानुभवाची परिक्षा प्रत्यक्ष स्वाहाकार यज्ञाचे वेळी होते. मद्रास येथे श्री. शंकराचार्य स्वामी जयेंद्र सरस्वती यांनी मोरेश्वर घैसास यांची परीक्षा घेऊन त्यांना शाल आणि आशीर्वाद दिले.

आज मोरेश्वर यांच्या वयाचे ऋग्वेदी संपूर्ण हिंदुस्थानात एकही नाहीत. जुन्या पिढीतील काशीमधील वे. विश्वनाथ शास्त्री देव सोडल्यास बाकी महाराष्ट्रातील ७ वेदाचार्य वगळता भारतात अन्यत्र कोणी नाही. महाराष्ट्रातील सात जणात पुण्यातील तीन आहेत आणि भविष्यात पुण्याचे नाव वैदिक क्षेत्रात चमकविणारे वे. मोरेश्वर घैसास हे आज एकमेव आहेत.

कर्वेपथावरील त्यांच्या घैसास वेद पाठशाळेत सायंकाळी पोहोचलो. सायंसंध्या आटोपेपर्यंत थांबावे लागले. वे. विनायकराव घैसासही होतेच. मी मोरेश्वर घैसास यांना विचारले– 'आज सर्वत्र नोकरी मिळणारे शिक्षण घेण्याकडे सर्वांचा कल असतो. अशावेळी व वेदाध्ययनासारख्या आज ज्याचा जीवनात उपजीविकेसाठी काही उपयोग नाही अशा क्षेत्राकडे कसे वळलात ?'

या प्रश्नावर वे. मोरेश्वर घैसास म्हणाले, 'एकतर या विद्येचा उपयोग नाही हा समज चुकीचा आहे. आजही या देशातील सत्तर–पंचाहत्तर टक्के लोक या ना त्या स्वरुपात याच विद्येचा उपयोग करून घेताना दिसतात. या देशाच्या पंतप्रधान – राष्ट्रपतींपासून सामान्य माणसापर्यंत प्रत्येकाला 'वैदिक' हवे असतात. उपलब्ध झाले तर भरघोस दक्षिणा देऊन त्यांचा सन्मान राखला जातो. ज्याला काहीही येत नाही असा इकडे वळूच शकत नाही. यासाठी बुद्धी अत्यंत कुशाग्र असावी लागते. पूर्वी किंवा आजही आय. ए. एस. साठी जसे परिश्रम घ्यावे लागतात त्यापेक्षा अधिक परिश्रम घ्यावे लागतात. ही एक तपश्चर्याच असते यात मी उत्तीर्ण झालो याचा मला अभिमान वाटतो. कुठेही जगाच्या मागे असल्यासारखे वाटत नाही. ही विद्या श्रेष्ठ विद्या आहे. आमच्या घराण्यात चालत आलेली आहे. वडिलांची इच्छा आणि माझी आवड यामुळे मी आज यात पारंगत झालो. आजही आमच्या वेदपाठशाळेत अध्ययनासाठी विद्यार्थी येत असतात. त्यांचे अध्ययन पूर्ण झाल्यावरच ते गुरुदक्षिणा देतात.'

या अध्ययना व्यतिरिक्त आपणास छंद कोणते आहेत ? आपल्याला मित्र वगैरे कुणी आहेत का या प्रश्नावर हसून मोरेश्वर घैसास म्हणाले. 'मला सर्वच क्षेत्रातले मित्र आहेत. छंद म्हणाल तर चित्रकला, गायन हे छंद आहेत. शिवाय राजकारण हाही एक छंद मी लावून घेतला आहे.'

त्यांच्या त्या उत्तराने मी चमकलो. ते पुढे म्हणाले. 'तसा राजकारणाशी काही संबंध नाही; पण वेदाचार्य फाटक गुरुजींचा पुतळा आम्ही स्वखर्चाने पुणे म. न. पा. कडे दिला होता. त्यावेळी तो दोन वर्ष धूळ खात पडला होता आणि अखेर तो आमच्याकडे त्यावेळचे महापौर श्री. वडके यांनी परत केला. कारण काय तर पुतळा स्वीकारून बसविण्यासाठी, महापालिकेत ठराव व्हावा लागतो. आणि तो ठराव होऊ शकला नाही म्हणून पुतळा परत केला, आणि त्याचवेळी निश्चय केला राजकारणात भाग घ्यायचा. काही गैरसमजांवर आधारित लोक विरोध करतात. त्यासाठी वैदिकांनी समाजात वावरायला हवे यासाठी

## पेपर पॅकिंग निर्मितीची खास आमची वैशिष्ट्ये :

* तांत्रिक सचोटी * दर्जेदार निर्मिती
* स्वयंचलित मशिनरी * उत्कृष्ट पॅकिंग रचना
* ठोक उत्पादन * स्पर्धात्मक दर

## पॅकवेल पेपर प्रॉडक्टस्

**सी–३३, एम. आय. डी. सी.**
**चिकलठाणा, औरंगाबाद**
**फोन : ८३३६ ग्राम : PACKING**

* ब्रॉड, नॅरो, E–फ्ल्युट कोरुगेटेट बॉक्स, प्लेन व प्रिंटेड * ब्युटीमिनाईज्ड ( वॉटरप्रुफ पेपर ) कोरुगेटेड बॉक्स * वॅक्स कोटेड कोरुगेटेड बॉक्स * पी. व्ही. सी. थ्रेडेड कोरुगेटेड बॉक्स. * ब्युटीमिनाईज्ड हेजिन कोरुगेटेड बॉक्स * पी. व्ही सी. लॅमिनेटेड कोरुगेटेड बॉक्स.

## पॅकप्रिंट कार्टन इंडस्ट्रीज

**जी–१८, एम. आय. डी. सी.**
**चिकलठाणा, औरंगाबाद**
**फोन : ८५५५ ग्राम : CARTON**

* वॅक्स कोटेड कार्टन * वॉर्निश कोटेड कार्टन * ग्रे बोर्ड कलर कार्टन * मल्टीकलर प्रिंटिंग लेबल * डुप्लेक्स बोर्ड कलर कार्टन * डायमंड व वॉर्निशिंग लेबल * कोरूगेटेड बोर्ड कलर कार्टन * फॅन्सी कलर्ड कोरूगेटेड कार्टन * पी. व्ही. सी. कोटेड कलर कार्टन.

## बेडसे वॉटरप्रुफ कार्पोरेशन

**जी–५२, एम. आय. डी. सी.**
**चिकलठणा, औरंगाबाद**
**फोन : ८६३३ ग्राम : WATERPROFF**

**पेपर बॅग**

* पी. व्ही. सी. पेपर * फ्लॅट व फोल्डिंग बॅग्ज * प्लेन व प्रिंटेड पेपर बॅग्ज * क्राफ्ट पोस्टर व कलर्ड पेपर बॅग्ज.

**गम टेप**

* प्लेन पेपर गम टेप * ब्युटीमिनाईज्ड कोटेड गमटेप * पी. व्ही सी. कोटेड गमटेप * व्हाईट / कलर्ड गमटेप * विविधरंगी फ्लेक्झो प्रिंटिंग * पी. व्ही. सी. थ्रेडेड गमटेप.

**ब्युटिमन पेपर**

* गनी बॅग टू पेपर ( ब्युटीमिनाईज्ड वॉटर प्रुफ पेपर ) * पी. व्ही. सी. टू पेपर ( ब्युटीमिनाईज्ड वॉटरप्रुफ पेपर ) * पेपर टू पेपर ( ब्युटीमिनाईज्ड वॉटरप्रुफ पेपर ) * रोल फार्म अथवा शीट फार्म वॉटरप्रुफ पेपर * पी. व्ही. सी थ्रेडेड ब्युटीमिनाईज्ड वॉटरप्रुफ पेपर.

## औरंगाबाद पॅकेजिंग

**५, सुराणानगर, जालना रोड, औरंगाबाद**
**फोन : ३५१३**

* **सर्व प्रकारचे वॉटरप्रुफ कोरुगेटेड बॉक्स**
* **ग्रे बोर्ड, स्ट्रॉ बोर्ड मिल बोर्ड, बॉक्सेस-प्लेन व प्रिंटेड**
* **हेवी कन्टेनर्स कोरुगेटेड बॉक्सेस**



## SRI-SYN®

## LEADERS IN STEPPING MOTORS, SYNCHRONOUS MOTORS TIME TOTALISERS

## NOW ADVANCES IN 'DRIVES' ALSO

* First time in India we did it, 'Control Drive' beyond imagination-25600 accurate steps in one revolution. We also manufacture Control Drives in 200, 400, 1200 steps in one revolution.
* Also introducing MICRO PROCESSOR based N.C. SYSTEMS.
* OPTICAL ENCODERS for our stepping motors (200 Division)


**STEPPING MOTORS :**
in Machine Tool, Computer Peripheral, Process Control, Laboratory Equipment and Instrument.
Range : 11 models from 2.8 kg cm to 84 kg cm Holding Torque.

**SYNCHRONOUS MOTORS :**
Range : 11 models from 2 kg cm to 60 kg cm

**BI-DIRECTIONAL GEARED INSTRUMENT MOTOR**
**from 25 RPM to 1 revolution per week.**
with high torque useful for ribbon pulling of Electronic typewriters.

Contact for further details

**srijan control drives**
25, Electronic Co-Op Estate
Pune-Satara Road, Pune 411 009.
Phone : 32856 Gram : SRISYN
Telex : 0145-333-MCCI-C/o Srijan



Parkerson 84122

सामाजिक कार्यात भाग घेतला. त्याचा परिणाम चांगलाच झाला. शिवाजीराव आढाव, आ. अण्णा जोशी यांच्या प्रयत्नाने वेदाचार्य फाटक गुरुजींचा पुतळा बसला. एवढेच नव्हे तर पुण्यात वेदभवन आणि घैसास गुरुजी वेदपाठशाळेस महाराष्ट्र शासनाने जागा देऊ केली. ना. विठ्ठलराव गाडगीळ यांच्या प्रयत्नाने केन्द्रशासनाचे त्यास सहकार्य लाभत आहे. वेदभवनासाठी महाराष्ट्र मंत्रीमंडळातील एक मंत्री व्ही. सुब्रह्मण्यम यांनी सहकार्य केले. हे सर्व मी राजकारणात उतरल्यामुळेच होऊ शकले. मी प्राचीन वेदविद्या जतन करण्यासाठी सर्व ते प्रयत्न करीत असून भविष्यकाळात जगाच्या पाठीवर पुणे अनेक कारणानं प्रसिद्ध असेलच, परंतु वैदिक अध्ययनाचे प्रमुख केन्द्र म्हणून जगातील विद्वान त्याकडे आकर्षित होणार आहेत.'

वे. मोरेश्वर घैसास यांचे भविष्याचा वेध घेणारे उद्गार हे यशस्वी व्हायला हवेत.



सौ. ॲना कुरियन दाणी

## पुरुषांच्या मक्तेदारीस शह

आज पुरुषाच्या बरोबर सर्वच क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसतात. साहित्य– कला –राजकारण या क्षेत्रात तर त्यांनी पुरुषांच्या इतकेच आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. तरीही काही क्षेत्रात अद्यापही स्त्रिया अभावानेच आढळतात. असेच एक क्षेत्र म्हणजे कलेक्टर–जिल्हाधिकारी किंवा आय. ए. एस. झालेल्या अधिकारक्षेत्राचे. कलेक्टरपदावर स्त्रिया अपवादानेच आढळतात. म्हणून ज्यावेळी 'माणूस' तरुण –तरुणी विशेषांकासाठी मुलाखती घ्यायचं ठरलं आणि प्रथम नाव डोळ्यासमोर आलं ते पुण्याच्या डेप्युटी कलेक्टर (अपर जिल्हाधिकारी) सौ. ॲना दाणी यांचं.

सौ. ॲना दाणी या मूळच्या केरळच्या. वडील लष्करातील एक अधिकारी, त्यामुळे संपूर्ण हिंदुस्थानभर ठिकठिकाणी शिक्षण. वयाच्या अकराव्या वर्षी नैनिताल येथे होस्टेलमध्ये ठेवले. तिथून पुढे पूर्णतः होस्टेलमध्येच राहून शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्या दिल्लीत आल्या. 'सोशियॉलॉजी' मध्ये बी. ए. झाल्यावर नेहरू विद्यापीठातून एम. ए. केल्यावर आय. सी. एस. सी. मध्ये रिसर्च असिस्टंट म्हणून काम केले. त्याचवेळी त्यांनी आय. ए. एस. केलं. पुण्यात येण्यापूर्वी अकोला, फलटण, हवेली, मुंबई या ठिकाणी त्यांनी काम सांभाळलं.

दुपारी अडीचची वेळ ठरली होती. त्या दौऱ्यावरून येणार होत्या. त्या आल्यावर लगेचच सुरुवात केली. त्या केरळी असल्यातरी त्यांना मराठी चांगलं येत होतं. त्यामुळे मराठीतूनच संभाषण झाले.

पहिला प्रश्न ओघाने त्याच संबंधी विचारला. 'आपण मराठी कशी काय जाणता ?'

त्या हसल्या नि म्हणाल्या, 'तशी मी खास पुणेरी आहे म्हणजे असं. माझं माहेर केरळी–कुरियन; पण सासर पुण्याचं दाणी. माझ्या मिस्टरांचा परिचय दिल्लीतच झाला. रिसर्चमध्ये असताना, आणि मी मराठी शिकू लागले. चार वर्षापूर्वी आम्ही विवाह केला. माझे मिस्टर मुंबईला प्राइव्हेट सेक्टरमध्ये असतात. मला त्यामुळे महाराष्ट्रात यायला आवडले. विशेषतः पुणं मला आवडलं. त्यामुळे मराठी उत्तम येऊ लागलं. शिवाय आम्हाला नोकरीत त्या त्या प्रांताची भाषा शिकावी लागते.'

त्यांच्या या उत्तरानंतर मी दुसरा प्रश्न केला. 'सामान्यपणे स्त्रिया ज्या क्षेत्रात जात नाहीत अशा क्षेत्रात आपण कशा काय आलात ?' यावर सौ. ॲना दाणी म्हणाल्या,

'दिल्लीकडे सामान्यतः आय. ए. एस. या परिक्षेला बसण्याची प्रथाच आहे. मला पहिल्यापासून आपण काही वेगळं करावं असं वाटायचं. मी पण ही परीक्षा द्यायची ठरवलं. जरी बहुतेकजण परिक्षेस बसत असले तरी दिडशे–दोनशेच जण संपूर्ण देशातून उत्तीर्ण होतात. मी उत्तीर्ण झाले. शिवाय नोकरी करायचं हे माझं सुरुवातीपासून ठरलेलं होतंच. तसं एकटी रहायची सवय होती. त्यामुळे आय. ए. एस. झाल्यावर मी या सर्व्हिसमध्ये ओघानेच आले.'

आपला कामावर रुजू झाल्यावेळचा अनुभव सांगताना ॲना दाणी म्हणाल्या, 'एक आय. ए. एस. अधिकारी म्हणून अकोल्याला आल्यावर सर्वांना नवल वाटलं. मला सुरुवातीला आठवडाभर थोडी भीती वाटली. पण नंतर मी सहजपणे काम करू लागले. स्त्री म्हणून तसा वेगळा अनुभव येत नाही. कारण अधिकारी असल्यामुळे खुर्चीला मान असतो आणि तेच चांगलं नाही का ? व्यक्तीपेक्षा खुर्चीला लोकांनी मान द्यावा. त्यामुळे नोकरीत स्त्री म्हणून काही त्रास झाला नाही. मुंबईला हाताखाली बहुतेक स्त्रियाच असत. इतरत्र मात्र स्त्रियांचे प्रमाण अगदीच कमी आहे. पण हाताखालचे, मी स्त्री म्हणून वेगळे वागत नाहीत.'

'साधारणतः या क्षेत्रात पुरुषच अधिक आढळतात. अशावेळी एक स्त्री म्हणून ही जबाबदारी पार पाडताना काय अनुभव आला ?' या प्रश्नावर सौ. दाणी म्हणाल्या.

'पोलिटिकल लिडर्सना स्त्री अधिकारी म्हणून नको असते. सिनियर ऑफिसर्स त्यामुळे आम्हाला पाठवायला नाराज असतात. आम्ही मागणी करूनही आमच्यावर जबाबदारी टाकू इच्छित नाहीत. परंतु ही परिस्थिती इकडे या महाराष्ट्रातच आढळते. यू. पी., एम. पी., राजस्थान – बिहार या बाजूला स्त्रियांची कलेक्टर म्हणून कुठेही नेमणूक होते. तसं पाहिलं तर त्या भागात इकडच्यापेक्षा असुरक्षितता अधिक असते. महाराष्ट्र त्यामानाने चांगला आहे. तरीही स्त्रियांची नेमणूक होत नाही. इथं स्त्रीला कलेक्टर म्हणून स्वीकारण्याची प्रथा नाही. कदाचित स्त्रिया एवढी मोठी जबाबदारी पार पाडू शकतील का अशी शंका असेल. हे चित्र बदलण्यास वेळ लागेल. भारतात दरवर्षी १५० आय. ए. एस. नेमले जातात त्यात

With Best Compliments
From :

A Well - Wisher

When India dons its colourful clothes, wears its exotic cosmetics, paints its wagons, drives up its highways, fights diseases... HOC is always there.


Hindustan Organic Chemicals. A variety of basic chemicals used in every walk of life, throughout the nation.

HOC – Helping you enrich your life
Playing a pivotal role in improving the quality of life in different spheres is HOC. Contributing to the well-being of millions of families. Manufacturing vital basic chemicals, used for making life-saving drugs and combating killer diseases like TB. Agro-chemicals for formulating pesticides to protect crops. Supplying vital chemicals to the rubber industries for manufacturing strong tyres and allied products. Speciality chemicals to find use in the detergent, toiletery, cosmetic and perfumery industry. Brightening life in general with chemicals for the dye, dye intermediate and paint industries. Making homes beautiful with chemicals for the laminates industry. All in all, assisting mankind and speeding up progress in every direction.

Now, a long leap
Work is in full swing on the Rs. 50 crores Phenol/Acetone Project with a Propylene Recovery Unit at Cochin.
Work on the Rs. 23 crores Polytetrafluoroethylene (PTFE) Project in Medak Dist. (A.P.) is also on.

HOC – Pace-setters in Organic Chemicals.

HOC HINDUSTAN ORGANIC CHEMICALS LTD.
(A Government of India Enterprise)
Regd. Office, Factory & Marketing Division:
Rasayani (410 207), Dist. Raigad.
Maharashtra State.



Dattaram-HOC 77/84

वीसएक स्त्रिया असतात. प्रत्येक राज्यात एक-दोन जणीच येतात. हे प्रमाण अल्प आहे.'

जिल्हा परिषदेतील आपल्या अनुभवाविषयी त्या म्हणाल्या, 'जिल्हा परिषदेत लोक आपापसात वाट्टेल तसं बोलतात. ते कानावर पडत असे. इतरत्र मात्र अनुभव चागला आहे.'

'प्रशासकीय यत्रणेत राजकीय मंडळीचा हस्तक्षेप होताना दिसतो. आपणास असा अनुभव आला का? आपण अशावेळी काय केलत?' या प्रश्नावर सौ. ॲना दाणी हसल्या आणि थोडं थाबून त्या म्हणाल्या,

'राजकीय मडळीना आम्हाला सतत सामोरे जावे लागते. त्याचा हस्तक्षेप होत असतो. अशावेळी खूप त्रास होतो. फलटणला असतेवेळी तेथील राजकीय पुढाऱ्याच्या अशा प्रकारच्या हस्तक्षेपास मी सहकार्य दिले नाही. एका केसबाबत कॉम्प्रमाईज करण्यास नकार दिला. त्याचा परिणाम काय होणार हे ठाऊकच होते. बदली झाली.'

'भ्रष्टाचाराबद्दल आपले काय मत आहे? शासकीय कर्मचारी लाच घेतात, भ्रष्टाचार करतात असे म्हटले जाते. आपले काय मत आहे?' या प्रश्नावर सौ. दाणी म्हणाल्या, 'भ्रष्टाचार आहे याबद्दल दुमत नाही. मी शभर टक्के सहमत आहे. परंतु मला तसा अनुभव नाही किंवा तस मी प्रत्यक्ष पाहिलेल नाही. भ्रष्टाचाराच्या बाबतीत अधिकाऱ्याने तयारी दाखविल्याशिवाय लोक पैसे देत नसतात. लोक स्वत:हून असे वागत नाहीत. पण सर्वत्रच भ्रष्टाचार आहे असं नव्हे. खूप चागली माणसंही आहेत.'

'आपणास ही अशी फिरतीवरची नोकरी करण्यास पतीकडून परवानगी मिळाली का? आपल्या घरी यावरून काही तणाव निर्माण झाले का?' या माझ्या कौटुंबिक प्रश्नावर त्या मोकळेपणान हसून म्हणाल्या,

'मिस्टर दाणीचा नोकरी करण्यास बिल्कुल विरोध नाही. नाहीतर आमचा विवाहच झाला नसता. आमची मते जुळली म्हणूनच तर आम्ही एकत्र आलो. आमच्यापुढे कौटुंबिक प्रश्न आहेत. दूर रहावं लागनं ते येऊन जाऊन असतात. आम्हाला तीन वर्षाचा मुलगा आहे. मी, आई आणि मुलगा असे आम्ही रहातो नोकरी करणाऱ्या स्त्रीला डबल काम करावे लागते. घरची जबाबदारी पार पाडायला हवीच, नाही का? त्रास कमी व्हावा असं वाटतं. पण कसा करणार? हे आता सवयीचं झालय नोकरी तर करणारच. ही सोडली तरी दुसरी करणार. एकदा हातात दरमहा स्वत:च्या कमाईचा पैसा पडू लागला की ते सवयीचं होतं. त्यामुळे नोकरी करणं भाग पडतं. स्त्रियाना या क्षेत्रात खूप वाव आहे. पुरुषांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत हे आपल्या देशात असच चालायचं. स्त्रियांना कशी वागणूक दिली जाते यावर देशाची प्रगती अवलबून आहे.'

सौ. ॲना दाणी याच्या विचारातून समाजाचा स्त्रीला येणारा कडवट अनुभव व्यक्त होत होता. पुरुषाच्या बरोबरीने, हिमतीने काम करून भारतीय तरुणी कशातही मागे नाही हे त्यानी सिद्ध करून दाखविले आहे. तरीही पूर्णत: काम करण्याची सधी केवळ स्त्री असल्यामुळे मिळू शकत नाही याची खतही त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. 'माणूस'च्या वतीने आभार मानून मी परतलो.

**FUEL ECONOMY**
**& SAVING ON PACKING**
**CALL US**

**M/s. Tech - Trade**

Tel. : 44 17 65, 44 61 70

19 / 20, Parvati Industrial Estate,
Pune – Satara Road.
Pune 411 009

FOR :

Steam Trap, Steam Valves, Glabe and Ball Type. Strainer, Non–Return Valves Motorised Valves in S. S. For Efluents.

Also Yantrik Gum Tape Dispenser.

## महाराष्ट्र चर्मोद्योग–
## विकास महामंडळ मर्यादित

( महाराष्ट्र शासन अंगिकृत व्यवसाय )

# Lidcom

**बाय दि बेस्ट**

आपल्या दैनंदिन व्यवहारात तसेच विशेष शुभप्रसंगी
वापरण्यासाठी चामड्याचे बूट, सॅन्डल्स, बॅग्ज,
पट्टे इत्यादि वस्तू खरेदी करण्यासाठी

तसेच

अंतर्गत व निर्यात व्यापाराकरिता खात्रीलायक
हाती शिवलेल्या व संपूर्णपणे हाती
बनावटीच्या चपलांसाठी
– खालील ठिकाणी संपर्क साधावा –

कार्यकारी संचालक :

**महाराष्ट्र चर्मोद्योग**
**विकास महामंडळ मर्यादित**

बॉम्बे लाईफ बिल्डिंग, ४५ वीर नरिमन रोड,
मुंबई ४०० ०२३

दूरध्वनी क्रमांक : २९७१५७, २९५१८६, २५९१०३



# तांबी

- महिलांनो ' तांबी ' वापरा-पाळणा लांबवा.
- पाळणा लांबविल्यामुळे आईची प्रकृती सुदृढ राहते व बाळाची वाढही चांगली होते.
- ' तांबी ' पाच मिनिटांचे काम-तीन वर्षे आराम.
- मासिक पाळी, बाळंतपण अथवा गर्भपाता-नंतर गर्भाशयात ' तांबी ' वापरता येते.
- ' तांबी ' मुळे धुणी, भांडी व इतर घर-काम करताना त्रास होत नाही.
- मूल हवे असल्यास ' तांबी ' काढून टाकता येते.
- ' तांबी ' शरिरात असल्याचे स्त्रियांना जाणवत नाही.
- कोणतेही रुग्णालय, शासकीय दवाखाना व प्राथमिक आरोग्य केंद्र व कुटुंब कल्याण केंद्रात ' तांबी ' मोफत बसविली जाते.
- ' तांबी ' बसविणाऱ्या महिलेला रु. ९/– आर्थिक मोबदला मिळतो.
- गर्भधारणा टाळण्याचा ' तांबी ' हा अत्यंत सोपा व आधुनिक उपाय आहे.

- कुटुंब कल्याण प्रसिद्धी शाखा,
मुंबई : ४०० ००१.



कु. साधना. भा. टुले

## मेरिटचाच मार्ग

पुणे जिल्ह्यातील बारामतीजवळच्या एका खेड्यातील चावीस वर्षाची एक युवती डेप्युटी कलेक्टर होण्याच्या मार्गावर आहे हे कुणाला सांगूनही खरे वाटणार नाही. पण हे खरं आहे.

कुमारी साधना भा. टुले (२४) या एस. एस. सीला बोर्डात सातव्या आल्या. ८१ साली बी. एस. सी. फर्स्ट क्लास पास झाल्या. एम. एस. सी. ला असतानाच वडिलांच्या प्रोत्साहनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची ( MPSC ) परीक्षा दिली आणि चांगल्या प्रकारे त्यात प्राविण्य मिळवून पुण्यात प्रोबेशनवर कलेक्टर कचेरीत आहेत, ट्रेनिंगसाठी.

त्यांच्या घरीच त्यांची मुलाखत घेण्यासाठी गेलो. चहा घेता घेता मी विचारले, ' आपण जे क्षेत्र नोकरीसाठी निवडलेत त्यात मराठी तरुणी क्वचितच दिसतात. आपण कसे काय निवडलेत ?

त्याकरता मला माझ्या घरची पार्श्वभूमी सांगावी लागेल. आम्ही O. B. C. म्हणजे धनगर जमातीतले. आमच्या जातीत मुळातच शिक्षण कमी. त्यात मुलींनी शिकणं म्हणजे पापच. आमच्या वडिलांच्या घरी फक्त वडीलच शिकले. आमच्या आईकडे सर्वजण शिकलेले. आपण काही तरी करियर करायचे असे मनाशी ठरवले होते. मी मेडिकलला जाणार होते; पण एका मार्काने प्रवेश हुकला. मग एम. एस. सी.ला प्रवेश घेतला. एम. पी. एस. सीची परीक्षाही दिली आणि मला हवं असलेलं वेगळं क्षेत्र मिळालं. आपल्याकडे या परीक्षेला बसणारे खूप कमी आहेत. पंजाबी, ख्रिश्चन मुली यात अधिक असतात. महाराष्ट्रात इंग्रजी नसल्यामुळे कदाचित तसं असेल. पण ही परीक्षा मराठीतूनच असते.

कु. साधना टुले पुढे म्हणाल्या, ' मुलीच्या करियरला आपल्याकडे महत्त्व दिले जात नाही. आमच्या समाजात तशा कोणत्याच सुधारणा नाहीत. मिळवत्या–शिकलेल्या स्त्रीला प्राधान्य नाही. माझ्यापुढे असे प्रश्न आहेतच. परंतु मी जे क्षेत्र निवडले आहे तेच स्वीकारणार आहे. '

आपल्या दोन वर्षाच्या काळातील अनुभव सांगताना कु. टुले म्हणाल्या– ' पुरुष अधिकाऱ्यांना सहजपणे ' साहेब ' म्हणून मान मिळतो. हाताखालच्या कर्मचाऱ्यांना आम्हाला ' साहेब ' म्हणणे कमीपणाचे वाटते. बाईला काय घाबरायचं ही वृत्ती दिसते. राजकीय क्षेत्रातील दबावाने बदल्या होतात. ग्रामीण भागात आम्हाला अनुभवासाठी जावे लागते. मी दोन महिने तलाठी ऑफिसमध्ये होते. त्या ठिकाणी राजकारणी मंडळींशी संबंध येतो. भ्रष्टाचारी राजकारणी मंडळींचा अधिकाऱ्यांवर दबाव पडतो. श्री. मधुकर पाटील, अरुण भाटिया, वाघ, खैरनार यासारख्या चांगले वागणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या चांगल्या कामाचाच त्रास झाला. मी राजकीय दबावाला बळी पडणार नाही. होऊन होऊन काय होणार, बदलीच होईल.

साधना टुले म्हणाल्या आणि हसल्या. आपण ओ. बी. सी आहोत असा उल्लेख त्यांनी केल्यामुळे राखीव जागांच्या संदर्भात काय वाटते या प्रश्नावर त्या म्हणाल्या, ' ज्या पद्धतीने हे आंदोलन चालू आहे, ती पद्धत अत्यंत चुकीची आहे. राखीव जागांची अजूनही आवश्यकता आहे. सध्याच्या स्पर्धा युगात आता त्या ठिकाणीही स्पर्धा आहे. कारण ओ. बी. सी. मागासवर्गीय जाती २०० प्रकारच्या आहेत. त्यात दहा टक्के जागा राखीव. त्यातून पॉप्युलेशनचा विचार केला तर जाणार किती ? त्यामुळे मेरिटवरच निवड होते. मी स्वतः कधी राखीवपणाचा फायदा घेतला नाही. मेरिटचाच मार्ग स्वीकारत आलेली आहे.

आजच्या युवकांवर विविध क्षेत्रात जबाबदारी पडत आहे. या जबाबदारीस आजच्या तरुण–तरुणी पात्र आहेत का ? ती जबाबदारी ते समर्थपणे पेलू शकतील का ? या प्रश्नावर साधना टुले यांनी तात्काळ उत्तर दिले. निश्चितच ! ' आजचे तरुण–तरुणी सर्वार्थाने या जबाबदारीस पात्र आहेत. हल्ली कोणतीही जबाबदारी ट्रेनिंगशिवाय दिली जात नाही. त्यामुळे तो आपोआपच पात्र होतो. शिवाय आजचे ज्ञान-शिक्षण हे त्याला उपयुक्त आहे. फक्त एका ठिकाणी त्याला ट्रेनिंग शिवाय प्रवेश मिळतो ते म्हणजे राजकारण ! त्या ठिकाणी मात्र त्याला प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. स्त्रियांनी सर्वच क्षेत्रात जायला हवे. पुरुषांपेक्षा त्या काकणभर सरसच ठरतात. '

त्यांच्या उद्गारातून आत्मविश्वास प्रकट होत होता. त्यांचे आभार मानून मी परतलो. □


सिगरेट ओढण्याने कॅन्सर, क्षय व हृदरोग होतो
मग सोडत का नाही ?
फक्त २ गोळ्या मदर इंडियाचे
**स्मोकिंग हॅबिट** चघळा.
रु. १८/– ची म. ऑ. पाठवा.
२ बाटल्या रजिस्टर्ड पोस्टाने पाठवू.
**आफ्रिका ड्रग हाऊस**
लक्ष्मी रोड, पुणे ४११ ०३०
फोन : ४४ ३१ ६०


सुख समृध्दीसाठी - उज्ज्वला
राष्ट्रीय केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझर्स हा आशिया खंडातील सर्वात मोठा खत कारखाना असून आर.सी.एफ. च्या ट्रॉम्बे आणि थळ या दोन यूनिटमधून रोज ५८०० मे. टन उज्ज्वला यूरियाचे उत्पादन केले जाते.
स्फटिकासारखा शुभ्र, दाणेदार, गंधहीन आणि अत्याधुनिक पद्धतीने तयार करण्यात आलेला उज्ज्वला यूरिया शेतकरी वर्गात अतिशय प्रिय आहे. उज्ज्वलामधे बाययूरेटचे प्रमाण कमी असल्याने तो सर्व पिकांना अधिक फायदेशीर आहे. ४६.४ टक्के नत्र असलेला उज्ज्वला यूरिया अन्य खते, कीटक - नाशके यात मिसळूनहि वापरता येतो.
उज्ज्वला आणि सुफला खते वापरण्यापूर्वी आर.सी.एफ. च्या अमरावती, कोल्हापूर व ट्रॉम्बे येथील भूमी प्रयोग शाळेतून आपल्या शेतातील मातीच्या नमुन्याचे विनामूल्य परीक्षण करून शिफारशीनुसार संतुलित खते वापरावी. सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे खतांचा वापर करावा.

| पीक | उज्ज्वला/पोती यूरिया/हेक्टरी | सुफला/हेक्टरी १५:१५:१५ |
|---|---|---|
| भात | २ | ७ |
| कापूस | २ | ७ |
| ज्वारी | ३ | ८ |
| ऊस (आडसाली) | १० | २३ |

Sai-RCF-14
RCF
राष्ट्रीय केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझर्स लि.
(भारत सरकारचा अंगिकृत व्यवसाय) चेंबूर, मुंबई ४०० ०७४
सुफला
उज्ज्वला

## आयुर्वेद रसशाळा, कर्वे रोड, पुणे ४११ ००४

तारुण्याचा मोहर सदाबहार रहावा
युक्ती त्याची सांगते
च्यवनप्राश – रोज खावा
काळेभोर केस, लक्षण तारूण्याचे
मसाज करा त्यासाठी
वापरा माधवी तेल रसशाळेचे
तरुणींना बलवर्धक किंमतही अल्प
नियमीत खावा शतावरी कल्प
तारुण्यात लहान – मोठचा पिटीका
जरी आल्या भरपूर
गंधक रसायनने हमखास
होतील दूर
सळसळत्या तारुण्याचे रहस्य काय ?
रसशाळेचे द्राक्षासव
हाच एक उपाय

**TO SUM UP OUR ADVERTISING ACTIVITY ... JUST THREE WORDS !**

**Industrious**

Ever on the toes ! That's our motto. We have to be always on the move because of our varied clientele from every business field.



**Illustrative**

We aren't talking about our designs only. We mean, we have illustrated the way in which new trends could be set up in the market.



**Innovative**

Never allowing our think-tanks to dry up, we draw on a perennial source of creative ideas. The reason you find our stamp on so many ads.



Let us grow together !

**MONA ADVERTISING**

1351, Shukrawar Peth,
Natu Baug, Bajirao Road,
Pune 411 002. Tel.: 470292.

**With Best Compliments From**

# Poona Pattern & Foundries

691 / A / 2 Bibwewadi,
Pune 411 009

Phone : 44 36 45



७५

**अमृत महोत्सवी वर्ष**
१९०९-१९८४

उद्योगशीलता व परिश्रम
हेच आमचे बळ
व लोकाश्रयाचे पाठबळ

**वामन हरी पेठे**

सोने-चांदी, हिरे-मोती व वस्त्रप्रावरणाचे व्यापारी

पेठे बिल्डिंग, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, मुंबई-४०० ००४.
पेठे बिल्डिंग, रानडे रोड, दादर मुंबई-४०० ०२८.

GVJ/305

**With Best Compliments From :**


# Butala-Dadhe

## Promoters & Builders

Yashwant Appartments
1032, Tilak Road,
Opp. to Mahratta Chamber
of Commerce & Industries
POONA - 411 002

Phone : 44 96 20

युवदर्शन – चॅनेल टू




## रसरशीत तरुणपण
## खणखणीत आव्हान

( पृष्ठ ५२ वरून )

पुढच्या अकरा दिवसात खंडाचं लिखाण, फोटो टाईप सेटिंग, डमी सगळं केलं. संपूर्ण खंड अकरा दिवसात पुण्यात इथे तयार केला. आम्ही संध्याकाळी सातला जे जमायचो ते सकाळी नऊला जायचो. तेव्हा नेमकी जागा नव्हती. पण राजूचं घर रिकामं होतं. मग आम्ही तिथेच ऑफिस तयार केलं. ऑफिस म्हणजे दोन टेबलं टाकली. संसारकडनं भाड्यानं आणली पाच रुपये रोजनं आणि टाकली. सगळेजण रात्रभर सतत काम करत असायचे. घरनं कोणीतरी कॉफी घेऊन यायचं. टाईपसेटिंगसुद्धा आनंद लाटकरनं अक्षरशः आठ दिवसात करून दिलं. पण भाषा आणि शब्द वेगळे असल्यामुळे करेक्शन भयंकर होतं. ३८ पैकी १३ गॅल्या करेक्शनच्या निघाल्या. त्यामुळं राजूला पेस्टिंगचं भयंकर काम पडलं.

**अकरा दिवसात तुम्ही सगळं काम केलंत हे खरं वाटत नाही.**

: मला सुद्धा वाटत नाही. म्हणजे खंड जेव्हा माझ्या हातात आला तेव्हा अर्धा तास अक्षरशः दिग्मुढ होऊन बसलो की कसं बुवा आपण केलं. किंवा आपण हे केलंच नाही असं वाटायला लागलं.

**या खंडाचं मला एक वैशिष्ट्य वाटतं की तुम्ही चौघांनी यात लिखाणाची बाजू उचलली असली तरी यातली भाषा अगदी सलग लिहिल्यासारखी वाटते. ते कसं ? लेख लिहून झाल्यावर पुन्हा त्या भाषेचं सोपीकरण करून घेत होता का ?**

: हो. त्यातले दोन लेख, फोटोंची कॅप्शन्स वगैरे माझ्याकडे होतं. उत्क्रांतीचा लेख प्रभाकरनं लिहिला आणि बाकी मिलिंदनं. पण आमचे लेख लिहून झाल्यावर भाषेत सलगता यावी म्हणून मिलिंदने ते पुन्हा लिहून काढले.

**मिलिंद वाटवेची भाषा यातली फार छान आहे. तेव्हा खरंच वाटतं की सोपं लिहिणं फार अवघड आहे.**

: दोन महत्त्वाकांक्षी लोक एकत्र आले की सत्यानाश होतो. तसं मिलिंदचं नाही. म्हणजे तोही आहे, पण माझ्यासारखा उतावळा नाही. माझं काय होतं की, मी कधी कधी माझे विचार दुसऱ्यावर लादतो. तसं त्याचं नाही. तो त्याच्या त्याच्या पद्धतीनं व्यवस्थित काम करत असतो. तो जास्त मॅच्युअर्ड आहे माझ्यापेक्षा.

निर्मितीतला आणखी एक भाग राहिला. म्हणजे अंकाचं संपादन हा काय प्रकार असतो तो मी अक्षरशः अनुभवला आहे, इतर कुणाहीपेक्षा. कारण कटिंग-पेस्टिंग सगळं मला पुन्हा करावं लागलं. संपूर्ण छपाई माझ्या डोळ्यादेखत झाली. एकदा तर त्यांनी पान उलटं लावलं होतं. कारण भाषा माहीत नाही. या सगळ्या गोष्टी मी अनुभवल्या आहेत. इथंही माझ्या मनात काही निश्चित कल्पना होत्या की अमुक एक गोष्ट अशी व्हायला पाहिजे. त्याच्या बाहेर मी जाणार नव्हतो. पण त्याच्या आणि माझ्या कल्पना जुळल्यामुळे सगळं एका चाकोरीत पार पडलं. वेळ वाचवण्यासाठी मग काही लेख मिलिंदनं कॅसेटवर सांगितले. तो प्रोफेसर असल्यामुळे त्याची बोलायची भाषा आणि लिहायची भाषा एकच आहे. त्याची बायको लिहून काढायची. संध्याकाळी ती लिहीत बसायची. सकाळी सहाला आनंदच्या ताब्यात द्यायचं. आनंदनं प्रेस बंदच केला नाही आठ दिवस. परवा आम्ही सगळे जमलो होतो, तेव्हा पाठीमागचा तो काळ आठवला, आणि वाटलं, च्यायला, हे कसं काय जमलं ?

**पहिली कॉपी हातात पडल्यावर कसं वाटलं ?**

: अक्षरशः अंगावर काटा आला. पहिली कॉपी कशाला, जेव्हा डमी तयार झाली, तेव्हा पहिल्यांदा वाटलं की काहीतरी झालं बुवा. आणि मुख्य म्हणजे माझ्या ज्या काही अपेक्षा होत्या त्याच्यापेक्षा त्याची निर्मिती खूप चांगली झाली. असं नाही, की हे झालं नाही, ते राहिलं. म्हणजे फार थोड्या वेळात फार चांगलं झालं असं वाटतं. आता आम्हाला लिहायला वेळ कमी लागला याचं लोकांना आश्चर्य वाटेल. पण म्हणून परिश्रम कमी लागले असं नाही. आधी आम्ही लिहिण्यापूर्वी सात वर्षं सतत भटकत होतो त्याचं काय ?

**म्हणजे सगळं तुमच्या इतकं डोक्यात होतं की लिखाण फारच सहज झालं...**

: सगळं माहितीच होतं. जे काही बघितलं होतं, ते फक्त लिहून काढायचं होतं. आता

माझा जो 'नीश तसा वेश' लेख आहे. त्यातलं सगळं काही मी पाहिलेलं आहे. कोणता पक्षी कसा वागतो ते मी समोर उभं राहून पाहिलं आहे. संपूर्ण फोटोग्रॅफी माझी असल्याचा हा मोठा फायदा मला मिळाला. एक फोटो काढायला किती वेळ लागतो ते मला माहिती आहे. त्या वेळात मी जे पक्ष्या-प्राण्यांचं निरीक्षण केलंय, त्यांच्यापेक्षा चांगला अभ्यास होऊच शकत नाही.

**तुला यात सरकारी मदत झाली का ?**

: नाही. शून्य मदत. आणि घेणारही नाही. नाहीतर त्यांची बंधनं फार येतात. इकडून छापून घ्या. असं करा. आत्तापर्यंत तरी सोमायटी आणि स्वतःच्या जीवावर सगळं चालवलंय.

**परदेशी ग्रँट वगैरे काही मिळविण्याचा प्रयत्न करतोयस का ?**

: मला अजिबात इच्छा नाही परदेशी ग्रँट मिळवण्याची. कारण जर हे खंडाचं चांगलं मार्गी लागलं तर आम्हीच परदेशी लोकांना ग्रँट देऊ शकू. आता इंग्लीश खंड दोन महिन्यात बाहेर येईल. इंग्लिश रुपांतराची जबाबदारी मी घेणार आहे. वाटवे आहेच. दुसऱ्या कोणावर सोपवणार नाही कारण आम्हाला त्यातला आशय अजिबात विस्कळीत होऊ द्यायचा नाहीये. ते महत्त्वाचं.

**किती भाषेत एकूण खंड येणार आहे ?**

: तामीळ. कारण सिंगापूरला त्याला चांगलं मार्केट आहे. चिनी भाषेतही येणार आहे. तशी मागणी त्यांनीच केली, आणि इंग्रजी. तिन्ही खंडात येणार आहे की, Translated From Original Marathi. कारण त्याची निर्मितीच मराठीत झाली आहे. मला एक वाटतं की स्वतःची डिग्निटी तुम्ही वाढवली पाहिजे. मला मान द्या म्हणून होणार नाही. ही फॅक्ट आहे चालू युगाची.

**सारंच असे स्वाभिमानी प्रयत्न जास्त झाले पाहिजेत, उगाच बांबेचं मुंबई करा असल्या घोषणांनी मराठीला किंमत येणार नाही.**

: आणि सगळ्यात मला इतका संताप येतो की, मुंबईहून आपण निघावं इंडियन एअर लाईन्सच्या विमानानी तर कोणाच्याही हातात महाराष्ट्र टाईम्स दिसणार नाही. हेच बडोद्याहून निघालो किंवा भुवनेश्वरहून निघालो तर त्या लोकांच्या हातात त्यांच्या भाषेतली वर्तमानपत्रं दिसतात आणि लोकांना त्याचं काही वाटत नाही. आपल्याला मात्र मराठी पेपर हातात ठेवायची लाज वाटते. खंड प्रसिद्ध झाला त्या दिवशी इकडे येताना विमानात माझ्या शेजारी एक डुढ्ढाचार्य बसले होते. मी माझा खंड चाळत होतो. मी कितीही मराठी बोलायचा प्रयत्न केला तरी ते इंग्लिशवरून खाली उतरायलाच तयार



दूरदर्शन – चॅनेल टू

**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची प्रकाशने**

| | | |
|---|---|---|
| १. | **भारतीय रेल्वे** – प्रा. अ. म. सहस्रबुद्धे | १४–०० |
| २. | **खगोलशास्त्राचे विश्व** – डॉ. जयंत नारळीकर | ३२–०० |
| ३. | **माताजी** (द्वितीयावृत्ती) – श्री. वि. य. कुळकर्णी | २५–०० |
| ४. | **शेफालिक** – पद्यानुवाद – राजा बढे<br>गद्यानुवाद – अरविंद मंगरूळकर | ११४–०० |
| ५. | **आचार्य भागवत यांचे संकलित वाङ्मय** – संपादक – प्रा. अ. के. भागवत | २५–०० |
| ६. | **भाषाशुद्धी** – (द्वितीयावृत्ती) | २०–०० |
| ७ | **भागंतुरा** – डॉ. सरोजिनी बाबर | ३२–०० |
| ८. | **संपूर्ण गडकरी** – (पुनर्मुद्रण) (दोन खंड) | ७५–०० |

वरील प्रकाशने मिळण्यासाठी आपण शासकीय ग्रंथालयाशी संपर्क साधावा. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद.

**अधिक माहितीसाठी** – **श्री. सु. दा. देशमुख**
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
५ वा मजला, रुम नं. ५०८ (मेन) मंत्रालय,
मुंबई – ३२

सर्व ग्राहकांच्या व हितचिंतकांच्या सदिच्छेने
शतक वर्षात यशस्वी पदार्पण

हरी केशव गोखले ज्युवेलर्स १००

सोने, चांदी व मोती यांचा खात्रीचा तयार आणि
सुबक माल मिळण्याचे ठिकाण

५१ / ५३, तात्या घारपुरे पथ ( मुगभाट ) गिरगाव, मुंबई – ४०० ००४

दुकानची वेळ : सकाळी ९ ते १२–३० दुपारी ३ ते ७–३०

( दुकान शुक्रवारी बंद असते ) फोन : ३५६४०२

आत्मविश्वासाकडून
आत्मनिर्भरतेकडे

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे असामान्य यश.
प्रयोग, अविश्रांत परिश्रम, अविचल निष्ठा अभंग उमेद व सहकार विषयक
अचूक वेध घेण्याची ताकद, सेवाभावी कार्यकर्ते हेरण्याची व त्यांना राखण्याची किमया
यातून हे यश साधले आहे. झोपडीतून महालापर्यंत आणि हमालापासून सैनिकापर्यंत
साऱ्यांनाच आपलीशी वाटणारी

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक लि.

( दि विदर्भ को–ऑपरेटिव्ह बँक लि., सम्मिलित )

९, नगीनदास मास्तर रोड विस्तार, फोर्ट, मुंबई ४०० ०२३

टेलिफोन : २४ २९ २० टेलेक्स नं ३९१२

# आरोग्य स्वास्थ्यासाठी अमृतसंहिता

**अमृत मलम**

ओठ फुटणे, पाय फुटणे, पायाला चिरा पडणे, थंडीमुळे अंग फुटणे, कातडी कोरडी पडून खाज सुटणे, हातापायांची आग होणे, ॲसिड, गरम पाणी किंवा आगीमुळे भाजणे, जखमा यांवर गुणकारी.

**सरूप लेप**

चेहऱ्यावरील मुरूमे, पुटकुळ्या, तारुण्यपिटीका, काळे डाग, तेलकट चेहरा यावर अत्यंत गुणकारी. नेहमीच्या वापराने रंग उजळतो.

**सरूप हेअरटॉनिक**

केस गळण्याचे थांबतात, लांब वाढतात, केसांचे काळेपण टिकते, केसांची निरोगी वाढ होते व शान्त झोप लागते. कॉन्सन्ट्रेटेड असल्याने १/४ चमचा सरूप हेअरटॉनिक व ३/४ चमचा खोबरेल तेल वापरावे.

**अमृत पेनबाम**

डोकेदुखी, सर्दी, पडसे, स्नायुदुखी, लचक, थकवा यावर पूर्ण समाधान देणारा एक उत्तम आयुर्वेदिक पेन बाम

अमृत फार्मास्युटिकल्स, बेळगांव
अमृतनगर–हिंडलगा, बेळगांव ५९११०८

BYP



With Best Compliments :

RAWAT BROTHERS

*Sales & Service Authorised Dealers*

- B. P. L. Video Audio
- Aristocrat Luggage
- Electrical Appliances
- Refrigerators.
  Presentation Article.

Tilak Road, Opp. Maharashtra Mandal
Pune 411 030

Phone : 44 06 12


नाहीत आणि सगळयात गंमत म्हणजे नंतर मला म्हणाले, Why don't you take out in English ? अरे हा काय प्रश्न आहे का ? इंग्लीशमधून का काढलं नाही हा प्रश्न तुम्ही इंग्लंडमध्ये का जन्माला आला नाहीत असंच विचारण्यासारखा आहे.

**पण असं धाडस करणारे फारच थोडे आहेत·**

: आणि म्हणून आमची ईर्षा होती. मी तुला सांगतो, मी जर हे इंग्लीशमधे काढलं असतं, तर मला पैशाचा एवढा प्रश्न आलाच नसता, हातोहात कॉपीज मी खपवल्या असत्या; पण आम्ही ठरवलं होतं टिच्चून की, काढायचा आणि मराठीत काढायचा. त्यामुळे आम्हाला जास्त हुरुप आला होता.

**निसर्गकोषाचं काम संपलं की काय करणार ?**

नंतर आम्ही फिल्मसमध्ये उतरणार आहोत. आम्ही अशा फिल्मस् काढू ज्या जगात कोणीही काढलेल्या नसतील. कारण निसर्गावर आपल्याकडच्या फिल्मस् आहेतच कुठे. फिल्मस् म्हणलं की सगळ्या आहेत त्या आफ्रिकेतल्या.

**यानंतरच्या खंडांचं काय ?**

: दुसरा आणि तिसरा खंड पक्षी–प्राणी यांच्यावरच असेल. डॉ. मकरंद दाबक, संतोष मराठे हे लोक पुढच्या खंडात लिहिणार आहेत. मला अगदी आवर्जून तरुणच लिहिणारे हवेत. अगदी मोठे कितीही तज्ज्ञ असले तरी मला नकोत. कारण मला वाटतं मुलांनी पुढे यायला हवं. ती मुलं करतील अभ्यास आणि लिहितील! आश्चर्य वाटेल पण खंडासाठी संपूर्ण इंडेक्सिंगच काम आठवी–नववीतल्या पोरांनी केलं आहे.

आमचा पाचवा खंड फार महत्त्वाकांक्षी असणार आहे. कारण त्यात संपूर्ण मानववंशाची माहिती आहे. त्यासाठी मला संपूर्ण जगभर फिरायला लागणार आहे. ज्या माणसांच्या वेगवेगळ्या जाती आज आहेत. म्हणजे खरे निग्रो, खरे पिग्मी, खरे आर्य, खरे द्रविड हा सगळा मानववंशाचा इतिहास. नंतर वेगवेगळे धर्म, म्हणजे थोडक्यात शेवटचा खंड मनुष्य प्राण्यावर असणार आहे. माणसांशी संबंधित जे जे काही असेल ते. यात युद्धही येतील, हे मला फार मोठं आव्हान वाटतं. पाचव्या खंडाची आणखी एक कल्पना म्हणजे त्याचं कव्हर थ्री डायमेन्शनल करणार आहे, त्यामुळे एकाच वेळी दोन दृश्यं दाखवता येतील. अजून कोणती नवी तंत्र तेव्हा येतात ते आता पहायचं. □

## गणेशोत्सवासाठी

' उषःकाल ' निर्मित
संगीताने सजलेले विनोदी

# तुझं माझं एकच !

लेखक, दिग्दर्शक – विनायक दामले
गीते, संगीत – वि. र. गोडे
भूमिका – वि. र. गोडे व मंजिरी देव

संपर्क : साई निवास,
२०७, लेडी जमशेटजी रोड,
मुंबई ४०० ०१६
टे. नं. ४४ ६३ ७३



**Y. L. THATTE & CO.**

*Printing Material Supplier Associates :*


- Pamm Enterprises, Pune – 2
- Thatte Graphic Sales, Pune – 30

Phone : 442637, 440208



# हप्त्याने बुश टीव्ही आणि तोही बँक प्रपोजल शिवाय!

इतरांप्रमाणे आपल्याही घरी एखाद्या चांगल्या कंपनीचा
टी व्ही असावा असचं तुम्हाला वाटतं नां?
मग विलंब कशाला? तुम्ही आमच्याकडे या आणि तुम्हाला
हवा असलेला सर्वोत्तम रंगीत अथवा कृष्ण-धवल बुश टी व्ही
घरी घेऊन जा आणि टी व्हीचे पैसे सुलभ हप्त्याने चुकतें करा.
बरं बँक प्रपोजलची कटकटही नाही. सारं काही आम्हीच करतो
मग कधी येतायं आमच्याकडे?
केव्हाही आलात तरी स्वागतच होईल.



LDB

## एल. डी. भावे ॲण्ड सन्स

• १२५८ बी, डेक्कन जिमखाना नटराज टॉकीज समोर,
पुणे – ४११ ००४ फोन : ५९७६६
• ३१८ एम्. जी. रोड सेंट्रल बँकेशेजारी,
पुणे ४११ ००१ फोन : ६७३४४

रविवारी दुकान बंद असते.

Kalpak 85/78

**MANOOS WEEKLY** ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW - 28




# आमच्या महाराजा क़्लासची काय सांगावी बात
# सामान्य फर्स्ट क्लासवर सहज करी मात

पहा तर खरं – तुम्हाला कसं महाराजासारखं वाटाव म्हणून आम्ही काय काय देतो :

- प्रत्येक सीट म्हणजे आलिशान स्लम्बरेट. आमच्या सर्व 747 वर.
- युरोपीय किंवा मसाल्याची लज्जत देणारा भारतीय आहार. सुबक सुंदर चायना आणि चांदीच्या भांड्यातून. राजेशाही थाटात.
- चोखंदळ निवडीचे ड्रिंक.
- परपरागत परिधानातील हवाई सुंदरींची लगबग सेवा. खास भारतीय आदरातिथ्याचा अनुभव देणारी.
- महाराजाच्या राजवाड्याला शोभेशी सजावट.
- बहुसंख्य विमानतळांवर महाराजा लाऊंज.
- स्वतंत्र आणि विशेष चेक-इन सुविधा.

तेव्हा, इतर कुठे कंटाळवाण्या अस्वस्थतेला तोंड देण्यापेक्षा आमच्या महाराजा क्लासमध्ये प्रवेश करा, पाय वर ठेवा, स्लम्बरेटवर पसरा आणि महाराजासारखा थाट अनुभवा.



**एअर·इंडिया**

**AIR·INDIA**

**तुम्हाला महाराजासारखा मान देणारी एअरलाइन**

AIR-158